महानगरपालिका औरंगाबाद

स्थायी समिती इतिवृत्तांत

दिनांक १३-०३-२००३ ते दिनांक ०२-०९-२००३

रजिष्टर क्र. ५

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
स्थायी समिती सभा

अ. क्र	स्थायी समिती सभेचा दिनांक	विषय क्र. व ठराव क्र.	शेरा
०१.	१३-०३-२००३	विषय क्र. ७८ ते ९३	
०२.	१५-०३-२००३	विषय क्र. ७८ ते ९३	
०३.	२९-०३-२००३	विषय क्र. ९३/९	
०४.	२०-०४-२००३	विषय क्र. ९४/१०१	
०५.	२८-०५-२००३	विषय क्र. ०१	
०६.	२५-०६-२००३	विषय क्र. ०२ ते ०४	
०७.	०९-०७-२००३	विषय क्र. ५ ते विषय क्र. ०८	
०८.	०७-०८-२००३	विषय क्र. ०९ ते विषय क्र. १०	
०९.	०२-०९-२००३	विषय क्र. १० (अ) ते २३	
		विषय क्र. २४ ते ३०	

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १३-०३-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक १३ मार्च २००३ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११.४० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सभेस सुरु झाली. या सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

१)	स. स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष	स. सदस्य
२)	स. स. श्री. मीर हिदायत अली	-//-
३)	स. स. श्री. शिंदे किशारे रावसाहेब	-//-
४)	स. स. श्री. शेख इलियास किरमाणी	-//-
५)	स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू	-//-
६)	स. स. श्री. ओक जयवंत केशवराव	-//-
७)	स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव	-//-
८)	स. स. श्री. डॉ. आशा उत्तम बिनवडे	-//-
९)	स. स. श्री. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर	-//-
१०)	स. स. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे	-//-
११)	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
१२)	स. स. श्री. चंद्रशेखर जैस्वाल	-//-
१३)	स. स. श्री. कैसरखान बद्रोउद्दीनखान	-//-
१४)	स. स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग	-//-

संवाद :

श्री. इलीयास किरमानी : मा. आयुक्त सभेला उपस्थित नाहीत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ३८ नुसार मा. आयुक्तांना स्थायी समितीच्या समितीने अनुपस्थित राहता येते. तशी परवानगी आयुक्तांनी घेतली आहे का या सभेचा प्रशासनावर वचक राहीला नाही. त्यामुळे अधिकारी सभेस येण्याचे टाळतात.

मा. सभापती : ज्या ज्यावेळी सभेच्या दिवशी मा. आयुक्तांना काम असते. त्या त्या वेळी त्यांनी मला माहिती देऊनच गेलेले आहेत. त्यांना परवानगी देण्यात आलेली आहे. आज ते लोकसेवा आयोगाच्या मुलाखतीसाठी गेलेले आहे.

श्री. इलियास किरमानी : तोंडी किंवा फोनवरुन माहिती देवून परवानगी होणे कायदयाने बरोबर आहे का माझ्या माहितीप्रमाणे लेखी स्वरुपात मान्यता घ्यावयास पाहिजे. परंतू तसे होत नाही. म्हणून अधिकारी तोंडी सुचना देवून गैरहजर राहतात. हा सभागृहाचा व सभापतीचा अवमान आहे. हे विसरुन चालणार नाही.

मा. सभापती : तोंडी किंवा दुरध्वनीवरुन सुचना देवून मान्यता घेणे योग्य आहे. यापुढे कोणत्याही अधिकाऱ्याने सभागृहाच्या परवानगीनेच लेखी सुचना देवून गैरहजर राहिले पाहिजे याची नोंद घ्यावी.

श्री. जयवंत ओक : खडकेश्वर भागात जे फुटपाथचे काम चालु आहे. त्यावर कुणाचे नियंत्रण आहे. हे काम अंबा-अप्सरा सिनेमा गृहापर्यंत जाणार का डॉ.

बाबासाहेब आंबेडकर पुतळयापासुन छत्रपती शाहु महाराज यांचे पुतळया पर्यंतचे अर्धवट राहीलेले काम पुर्ण होणार की नाही याचा खुलासा करावा. कामाची क्वॉलिटी बरोबर नाही. म्हणून सभा संपल्यानंतर मा. आयुक्तांसह कामाची पाहणी करावी.

मा. सभापती : प्रत्यक्ष पाहणी करायची की, सभेत निर्णय घ्यायचा चर्चा करावी.

श्री. जयवंत ओक : प्रत्यक्ष पाहणीकेल्यास कामाचा दर्जा चांगला नसल्यास संबंधित गुत्तेदारास काळया यादीत टाकणार का? फुटपाथ करुन रस्ते खराब केले. चांगले काम होत नसेल तर कुणासही माफ करु नये.

श्री. किशोर शिंदे : लाईटचे टेंडर आहे का? अदयाप साहित्य मिळत नाही. वॉर्डात लाईटची दुर्दशा झालेली आहे त्योकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री. इलियास किरमानी : बायोमेडीकल वेस्टच्या संदर्भात ३१ डिंसेबर ही शेवटची तारीख सुप्रीम कोर्टाचे आदेशानुसार होती. अदयापर्यंत जागा घेतली नाही. मा. आयुक्त खाजगी डॉक्टरांना मदत करीत आहेत. बन्सीलाल नगर येथील जागेच्या संदर्भात तीन दिवसात अहवाल देणार होते. तो अदयाप दिलेला नाही. गारखेडा येथील जागेच्या संदर्भात अहवाल मागविला तो सुध्दा प्राप्त झाला नाही. प्रत्येक बैठकीस आयुक्त उपस्थित नसतात. उत्तरे मिळत नाही. हे किती दिवस चालणार हा प्रकल्प कार्यान्वीत करण्याची तात्काळ कार्यवाही केली नाही तर कन्टेट बांधकाम परवानगी संदर्भात तीन दिवसात अहवाल देणार आहे. तो दिला नाही. आता स्थगिती देण्यात आली. तर परवानगी चुकीची होती का? या सदस्यांना त्यांचे वस्तीमध्ये काम करायचे आहे. त्यासाठी निधी आवश्यक आहे.

मा. सभापती : आरोग्य वैदयकिय अधिकारी यांनी खुलासा करावा.

आ. वैद्य अधि : ३९ मार्च पर्यंत जागा हस्तांतर करण्याचे प्रयत्न होत आहेत. मालमत्ता विभागामार्फत कार्यवाही चालु आहे.

श्री. प्रशांत देसरडा : बायोमेडीकल वेस्ट संबंधी श्री. किरमाणी यांनी मांडलेला मुद्दा महत्वाचा आहे. सत्यम फर्टीलायझरला ज्याप्रमाणे हा प्रकल्प दिला होता त्याप्रमाणे हा प्रकल्प पुन्हा बंद पडेल अशी शंका येते. आतापर्यंत प्रकल्प सुरु होणे गरजेचे होते. जागा घेतली हस्तांतर केली नाही. प्रकल्प चालु केला नाही म्हणून न्यायालयात मनपाने दंड भरलेला आहे. ठराविक मुदतीत प्रकल्प चालु करणार म्हणून शपथपत्र दिले अशी माहिती आहे. शहरातील खाजगी डॉक्टर कचऱ्याचा प्रकल्प सुरु करणार तो सर्व कचरा मनपाच्या प्रकल्पात येण्यासाठी मा. आयुक्त आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी डॉक्टरांशी चर्चा मार्ग काढावा त्यात गॅरेटर मनपा आहे. डॉक्टरांची डिमांड किलोवर कचरा घ्यावा म्हणून आहे व आपण कॉट प्रमाणे आकारणी करत आहोत. जे वप्पनी कचरा घेत आहेत. त्यांचा प्रकल्प चालु आहे. नाशिक मनपाचा कॉट बेसिसप्रमाणे असलेला प्रकल्प चालु झाला नाही.

श्री. इलियास किरमाणी : सुप्रीम कोर्टाचे आदेश असतांना कार्यवाही झाली त्याच जबाबदार कोण? मनपास दंड झाला तर जनतेचा पैसा जाणार आहे.

डॉ. आशा बिनवडे : चार पाच दिवसापूर्वी खाजगी डॉक्टरांनी कचऱ्याचा प्रकल्प सुरु केला अशा उलट सुलट बातम्या वाचण्यास आल्या त्यांनी स्वतःच्या हितासाठी हा

प्रकल्प सुरु केला यापुर्वी मी स्टेटमेंट केले होते की, मनपाने या प्रकल्पाला एन. ओ. सी.दिली नाही तर प्रकल्प सुरु होवू शकत नाही. वर्तमानपत्रात आले. मनपा सुध्दा तसाच प्रकल्प उभा करणार आहे. या प्रकल्पास खाजगी डॉक्टरांनी जैविक कचरा द्यावाच असे बंधन नाही. मग हा प्रकल्प कुणाच्या मदतीने उभा करायचा मनपा खाजगी डॉक्टरांना दबावाखाली आणु नये. जबरदस्तीने दर आकारले म्हणून डॉक्टरांनी नवीन प्रकल्प सुरु केला. मनपा हॉस्पीटल मधील कचऱ्याची विल्हेवाट लावू शकत नाही. अधिकारी वर्तमानपत्रांना उलटसुलट विधाने करतात. म्हणून मोठे नुकसान भविष्यात होण्यापेक्षा मनपाचा प्रकल्प उभा करु नये अशी माझी विनंती आहे. कुणी कोर्टात जाईल हा विचार सोडुन दयावा.

श्री. नंदकुमार फुलारी : जैविक कचऱ्याचा प्रकल्प सुरु करण्यास जी एन. ओ. सी. लागते सी मनपाने दिली का?

श्री. जयवंत ओक : विधी सल्लागार यांचे मत घ्यावे.

मा. सभापती : वृत्तपत्रात जे स्टेटमेंट अधिकाऱ्यांचे येते चुकीच्या पध्दतीने असे स्टेटमेंट करु नये. केलेले आहे का सत्य काय आहे खुलासा करावा.

श्री. हिदायत अली : या सभागृहाचे सदस्य महराष्ट्र प्रदुषण मंडळाचे सदस्य आहेत. त्यांना जागा दाखविण्यासाठी बोलाविण्यात आले होते का? त्यांचेशी संपर्क करावा असे माझे मत आहे.

आ. वैदय अधिकारी : मा. आयुक्तांनी मदत करण्याबाबत जे विधान केले त्यासंबंधी उपआयुक्तांनी खुलासा मागविलेला आहे का. कोणत्या आधारे मदत करणार असे बोलतो.

उपआयुक्त (अ) : शहरात जेवढा कचरा असेल त्यात जैविक व घन कचरा यासाठी प्रोजेक्ट उभा करुन याविषयी कम्प्लायन्स देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. जैविक तसेच घन कचरा दुर नेऊन समाजाला त्यापासून मुक्त करायचे आहे. म्हणून सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट प्रकल्प सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची प्रयत्न चालु आहेत. जैविक कचरा प्रकल्पासाठी मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत दोन एकर जागा प्राप्त करुन घेतली आहे. हा प्रकल्प बोट पध्दतीने कार्यान्वित करणार आहेत. कचऱ्याच्या संदर्भात जे दर ठेवले ते पर्याय म्हणुन ठेवले आहेत. खाजगी डॉक्टरांनी मनपास सहकार्य करुन हा कचरा मनपाच्या प्रकल्पास द्यावा. हा दृष्टीकोन आहे. बंधनकारक नाही. परंतू जैविक कचऱ्याची विल्हेवाट कोणत्याही डॉक्टरांनी लावली नाही तर त्यांचेवर मनपा कार्यवाही करु शकते. मनपातर्फे नोटीस देऊन सभासद होण्याची सुचना केली. हॉस्पीटलमध्ये प्रकल्प करुन कचऱ्याची विल्हेवाट योग्य पध्दतीने लावु शकतात कि, नाही नोटीस नुसार आलेल्या खुलाशाची पडताळणी होवुनच कार्यवाही करता येते प्रकल्पासाठी सरकारी जागेचा ताबा मिळला असून नकाशा प्राप्त करुन घ्यावयाचा आहे. तो दोन-तीन दिवसात मिळेल त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल. प्रायव्हेट एजन्सी निश्चित केली असून, बोट पध्दतीने कार्यवाही करणार आहोत.

श्री. नंदकुमार फुलारी : कचरा टाकणे डॉक्टरांना बंधनकारक आहे का?

आ. वैदय अधि : मनपाच्या प्रकल्पातच कचरा द्यावा असे बंधनकारक आहे. प्रोजेक्टला जॉईन्ट झाले नाही तर त्यांनी स्वत: विल्हेवाट लावावी. त्यांचेवर जबाबदारी

असते. शहरातील कचरा बाहेर वाहुन नेण्यासाठी मनपाची एन. ओ. सी. घ्यावी लागेल.

श्री. प्रशांत देसरडा : डॉक्टर लोकांशी बोलणी करुन मार्ग काढावा असे अजूनही प्रशासनास वाटत नाही. डॉक्टर असोशिएनच्या अध्यक्षांनी आतापर्यंत चार पत्र दिले की, जे अटी शर्ती घातल्या त्या शिथील कराव्या. दर कमी करावे. चर्चेसाठी का बोलाविण्यात येत नाही. प्रशासन व संबंधित डॉक्टर यांचेत चर्चा होऊन वाद मिटवावा असे माझे मत आहे.

आ. वैद्य. अधि : जो दर व अटी शर्ती घालून दिल्या त्या सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या आहे. मा. आयुक्त श्री. शर्मा साहेब तसेच मध्यंतरी प्र. आयुक्त, मा. जिल्हाधिकारी बैठका घेऊन वेळोवेळी चर्चा केलेली आहे आतापर्यंत मनपाकडे ३५० मेंबर झालेले आहे. दर कमी करायचे असेल तर, सर्वसाधारण सभेलाच अधिकार आहे.

श्री. देसरडा प्रशांत : मा. आयुक्त शर्मा यांनी चर्चेसाठी डॉक्टरांना बोलाविले. परंतू ऑपरेशन करणारे डॉक्टर, मलमपट्टी करणारे या सर्वांना सारखेस दर ठेवले त्यामुळे चर्चे अंती काही निर्णय झाला नाही. शर्मा साहेब यांनी अपशब्द वापरले त्यामुळे चर्चा झाली नाही. म्हणून या सभागृहाने मा. सभापती यांनी या संदर्भात पुढाकार घ्यावा जेणे करुन या शहराचे आरोग्य धोक्यात येणार नाही. हा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा अशी आमची इच्छा आहे.

श्री. जयवंत ओक : मनपाही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. विधी सल्लागार येथे नाही. नसता खुलासा घेतला असता, मनपाने मनपाचा प्रकल्प राबवावा. ताठ मानेने राहून प्रश्न सुटत नसतो. डॉक्टरांनी मनपाच्या प्रकल्पातच कचरा द्यावा. कायदयाने नाही. नोटीस कोणत्या कायदयाने दिली ३ महिन्यापासून कोर्टाचेच डायरेक्शन आले का निर्णय घेतला नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार इमारती पाडण्यात झाल्या. चांगल्या प्रोजेक्टचा प्रतिसाद मिळेल अशा प्रकारे कार्यवाही व्हावी. सर्वांना सारखेच रेट ठेवू नये. जेवढी सेवा मनपास देता येईल तेवढी दयावी. यातुन मार्ग काढुन निर्णय घ्यावा. न्यायालयाचे आदेश आहे. मनपाचे काही नुकसान झाल्यास त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे.

मा. सभापती : सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार काय कार्यवाही केली. खुलासा दयावा.

उप आयुक्त (म) : बायोमेडीकल वेस्ट इंडिज तसेच व इतर कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी मनपाची आहे परंतु घरारातून निघणार कचरा जो तो विल्हेवाट लावू शकतो. कॉमन सर्व फॅसिलिटी मनपा पुरविते. कॉमल फॅसिलिटी म्हणून मनपास प्रोजेक्ट उभा करणे आवश्यक आहे. बायोमेडीकल वेस्ट प्रकल्प उभा करण्याचे मनपाची कार्यवाही चालु आहे. खाजगी संस्थेमार्फत बोट पध्दतीने करण्याचा निर्णय झाला त्यानुसार कार्यवाही होईल. सुरु करण्याची मान्यता आहे. त्यासाठी जागा मिळालेली असून, नकाशा ताब्यात आलेला नाही. सरकारी गायरान जमीन आहे. सिंमाकन करुन देणार आहे. तहसीलदार यांचे यंत्रणे मार्फत कार्यवाही होईल. पुढील महिन्याच्या पहिलाचा आठवडयामध्ये सुरु करणार आहेत.

डॉ. आशा बिनवडे : खाजगी डॉक्टरांच्या बाबतीत अडवणुकीचे धोरण प्रशासनाने ठेवु नये. एकत्र येऊन मार्ग कसा निघेल हे पहावे. सवलती मान्य करण्या वृत्तपत्रात तसे आव्हार केले तर आणखी मेंबर मिळु शकतील.

मा. सभापती : बायोमेडिकल वेस्ट प्रकल्प संदर्भात प्रस्ताव सभागृहापुढे आला होता. त्यावर चर्चा करण्यात आली. वाटाघाटी होण्याच्या दृष्टीने प्रशासनाने प्रयत्न करावे. डॉक्टरांना चर्चेसाठी बोलवावे. जो वेळ हा प्रकल्प राबविण्यात होत आहे त्यात कोर्टाचा अवमान होता कामा नये. यास प्रशासनाच जबाबदार असेल.

श्री. इलियास किरमानी : एक महिन्यापूर्वीच न्यायालयाने १०००/- फाईन केलेला आहे. पुन्हा फाईन केलेला आहे. पुन्हा फाईन केल्यास मनपा भरेल मनपाचा पैसा हा जनतेचा पैसा आहे.

मा. सभापती : डॉ. सुखझेच्या बाबतीत झालेले आहे. याही प्रकल्पात ज्या अधिकारी या प्रकल्पात जबाबदार असतील व तशी परिस्थिती निर्माण झाल्यास त्या अधिकाऱ्यांच्या वेतनातून तो वसूल करावे. स. स. श्री. ओक यांनी मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत सभा संपल्यानंतर प्रत्यक्ष तेथे कामाची पाहणी करु काम चांगल्या क्वॉलिटीचे झालेले नसेल तर, कार्यवाही करण्यात येईल.

श्री. प्रशांत देसरडा : बन्सीलालनगर येथील बांधकाम परवानगीच्या संदर्भाने अहवाल देणार होते. अदयाप आलेला नाही.

मा. सभापती : प्र. मुख्यलेखापरिक्षक यांना अहवाल देण्याबाबत आदेशीत केले होते. का अहवाल झाला नाही. खुलासा करावा.

प्र. मुख्यलेखापरिक्षक (श्री. खैरनार) : बन्सीलालनगर येथील बांधकाम परवानगीच्या संदर्भात चौकशी करण्याचे मा. सभागृहाने निर्देश दिले त्यानुसार चौकशी करण्यासाठी आवश्यक ती माहिती नसल्याने संबंधित विभागाला पत्र देऊन काही संचिका हस्तांतर केल्या. परवानगी देत असतांना सहा. संचालक पदाचा चार्ज श्री. सोनी यांचेकडे होता. त्यांच्याकडून काही खुलासा मला आवश्यक असल्याने दि. २८-०२-२००३ व दि. ११-०३-२००३ रोजी पत्र देऊन सर्व कागदपत्राची मागणी केलेली आहे. ३ दिवसांत अहवाल तयार करुन सादर करण्यात येईल काही बाबतीत त्याचा अभिप्राय घ्यावा लागणार आहे.

श्री. प्रशांत देसरडा : बांधकामास स्थगिती दिली का? दिली असेल तर का दिली?

सहाय्यक संचालक नगररचना : दि. २०-०२-२००३ च्या मा. सर्वसाधारण सभेच्या निर्णयावर चौकशी करण्यासाठी तुर्त स्थिती देण्यात आलेली आहे. १० मार्च २००३ रोजी या विभागाने स्थगिती दिली.

मा. सभापती : मुख्यलेखापरिक्षक यांनी ३ दिवसात अहवाल दिला नाही तर, या सभागृहाला वेगळा निर्णय घ्यावा लागेल याची नोंद घ्यावी. तीन दिवसात या प्रकरणाचा अहवाल सादर करावा.

डॉ. आशा बिनवडे : बऱ्याच सभांचे इतिवृत्त सादर झालेली नाही. पुढील बैठकीत इतिवृत्त येतील तर आम्ही ८ राहणार नाही. आमचे जे प्रश्न आहे. त्याचे उत्तर आम्हला विचारण्यापासून आम्ही वंचित राहु. आमच्या कार्यकाळातील इतिवृत्त

०१/०४/२००३ पर्यंत आम्हला सादर करावे. नसता आमच्या अधिकाराचा हक्क गमावला जाईल असेच होईल.

मा. सभापती : आपल्याला काय प्रश्न विचारयचा हे विचाराचा हे विचारावा अधिकारी उत्तर देऊ शकत नसतील तर ३ दिवस वेळ द्यावा लागेल. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लगेच मिळेल शक्य नाही.

डॉ. आशा बिनवडे : २ वर्ष संपत आली १ वर्षापासून औषधी खरेदी संदर्भात सभागृहात चर्चा झाली. निर्णय झाला आयोग स्थापन केले. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्याची अदयाप चौकशी होवू शकली नाही. संबंधित अधिकारी यांनी पेन्हशन मंजूर करण्यसास संदर्भात काही दिवसापुर्वीच मनपास पत्र दिले ते आयोगासमोर त्यांना सामोरे जावे लागणार वगैरे ही प्रोसेस कुठपर्यंत झालेली आहे.

मा. सभापती : आयोगासमोर त्यांना जाणे बंधनकारक राहणार आहे. आपल्याला शंका निर्माण झाली.

डॉ. आशा बिनवडे : संबंधित आतापर्यंत अदयापपर्यंत पत्रचे दिले नाही की, आयोगासमोर हजर होण्याचे असे उत्तर मला प्रशासनाकडुन मिळाले.

मा. सभापती : मागील सभांचे इतिवृत्त तयार करुन पुढील सभेत देण्याचे प्रयत्न करावे. स. सदस्य बिनवडे यांना या संदर्भात लेखी स्वरुपात माहिती दयावी.

श्री. शिंदे किशोर : लाईट साहित्य घेण्याबाबत चर्चा केली खुलासा करावा.

श्री. जयवंत ओक : लाईटचे साहीत्य वर्षापासून घेत आहोत. अदयाप कार्यवाही कार्यवाही नाही. नागरीक आम्हाला धारेवर धरतात. रिकॉल केले त्यासाठी एक वर्ष लागावे का? ८-१५ दिवसात टेंडर प्रोसेस फायनल करुन तात्काळ सर्व शहरात आवश्यक ठिकाणी लाईट कसे लागतील यासाठी प्रयत्न करावे.

मा. सभापती : लाईट बाबतची संचिका संबंधित अधिकाऱ्यांनी बाजुच्या आज माझ्या बरोबर घेऊन चलावे. चर्चा करुन फायनल करुन घेवु.

श्री. जयवंत ओक : एक वर्ष अगोदर मेटीरीयल येवून पडले पाहिजे. सर्व साहित्य चांगल्याप्रतीचे असावे. थर्डपार्टी इन्स्पेक्शन झाले पाहिजे. जो त्रास अधिकाऱ्यांना होतो तो होणार नाही. यानंतर मेटेरीयल अगोदरच मागवावे.

श्री. इलियास किरमाणी : १ वर्षानंतर साहित्य आणण्याची कार्यवाही होते. यास जबाबदार कोण?

काय. अभि (विद्युत) : निविदा काढलेल्या आहेत. रिपोर्ट आज उद्या येईलच लवकरच कार्यवाही करणार आहोत.

श्री. हिदायत अली : माझ्या वार्डात जे लाईटचे लहान काम असतात ते सुध्दा होत नाही.

मा. सभापती : टेक्नीकलसाठी फाईल गेली. ज्यावेळेस सर्वसाधारण सभेत निर्णय झाल्या बरोबर दर वर्षाचे साहित्य अगोदरच मागविण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. कैसरखान : तिसऱ्या आघाडीची कॅबीनला लॉक करण्यात आले. इतिवृत्त अद्याप कायम करण्यात आले नाही. तरी सुध्दा कॅबीन का काढण्यात आली. नियमाने बरोबर आहे का?

मा. सभापती : हा विषय सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने मंजुर झाला या विषयावर चर्चा करणे बरोबर नाही.

श्री. कैसरखान : कोणकोणत्या कामाचे टेंडर रिकॉल होत आहे. ६-६ महिने टेंडर रिकॉल होते. मंजुर दिली जात नाही.

मा. सभापती : रिकॉल केलेल्या कामाच्या संदर्भात किती संचिका आहे. त्याचा लेखी खुलासा स. सदस्य यांना ३ दिवसात देण्यात यावा.

विषय क्र. ७८ :

प्रकल्प संचालक, यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी औरंगाबाद शहरातील नामांकित व जुने छायाचित्रकार श्री.एच. ए. एस. मोहम्मद भाई यांच्या संग्रहात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दुर्मीळ छायाचित्रे आहेत. सदर छायाचित्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात असावीत या उद्देशाने या स्टुडीओचे श्री. दाऊदभाई यांना मा. आयुक्तांच्या दालनात मुख्य लेखाधिकारी, केंद्र समन्वयक व प्रकल्प संचालक यंचे उपस्थितीत छायाचित्रे खरेदी दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्यात. सदर एजन्सीने रु. ११,३७०/- किंमतीची तीन छायाचित्रे त्यांच्या वडीलाच्या स्मृतिप्रित्यर्थ संशोधन केंद्रास दान म्हणून देण्याचे म. आयुक्तांची विनंती मान्य केली. या संदर्भास निवेदन की, दुर्मिळ छायाचित्रे फक्त याच सुडीयोकडे उपलब्ध असल्याने जाहिर निविदा प्रकाशित करण्यात आली नाही.

सदर लॅमिनेटड ८ एम. एम. न्युयोबोर्ड छायाचित्रकाचा आकार २० x ३० इंच व फ्रेम २ इंच रुंद असेल. सागवानी लाकडाची फ्रेम उत्तम ग्लॉसी पॉलिश अशा बावीस छायाचित्रे नग रु. ३७९०/- प्रमाणे सदर कामावर रु. ८३,३८०/- खर्च अपेक्षीत आहे. स्टुडीओचे मालकांनी रु. ४०,०००/- आगाऊ रक्कमेची मागणी केली आहे. उपरोक्त बाबींना मा. आयुक्तांनी दिनांक २४-०२-२००३ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त दरात बावीस छायाचित्रके ए. एच. मोहम्मद भाई औरंगाबाद यांचेकडुन विना निविदा उपरोक्त दरात खरेदीस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री. जयवंत ओक : प्रस्ताव मंजुर करावा तसेच जिल्हा न्यायालयात डॉ. आंबेडकरांची मोठी छायाचित्रे उपलब्ध आहेत. ती सुध्दा विकसीत करुन संशोधन केंद्रात लावावीत.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी शहरातील नामांकित व छायाचित्रकार श्री. एच. एस. मोहम्मद भाई यांच्या संग्रहात असलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दुर्मीळ छायाचित्रे लॅमिनेटेड २० x ३० इंच आकाराची व सागवानी लागडाची फ्रेम असलेली एकुण बावीस छायाचित्रे प्रती नगर रु. ३७९०/- प्रमाणे होण्यास व या कामासाठी लागणाऱ्या रक्कम रु. ८३,३८०/- च्या खर्चास व संबंधितास रक्कम रु. ४० हजार आगाऊ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. उपरोक्त दर्शविलेली दुर्मिळ छायाचित्रे फक्त ए. एच. मोहम्मद भाई फोटो स्टुडीओ यांच्याकडेच उपलब्ध असल्याने विना निविदा खरेदीस मान्यता देण्यात येते.

त्याचप्रमाणे जिल्हा न्यायालयात उपलब्ध असलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची छायाचित्रे मोठी विकसीत करुन घेण्यास यावीत व सदर फोटो डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात ठेवण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ७९ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलिस उप आयुक्त/पोलिस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जा. क्र/सीआर/३००/औ.बाद/२००२/६० दि. ०८-०१-२००३ नुसार आरोपी लोकसेवक श्री. रामदास भाऊराव टाक, ज्येष्ठ स्वच्छता निरिक्षक (निलंबित) व दौलत किसनराव सलामबाद शिपाई (दै. वेतन) (सध्या सेवेतुन कमी) यांचे विरुध्दच्या लाचलुचपतीच्या सापळा केस प्रकरणी त्यांचेविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. पत्रासोबत सदरच्या गुन्हा प्रकरणाच्या तपासाचे संपुर्ण कागदपत्र संच त्यांनी पाठविलेला आहे.

सर्व कागदपत्रे बारकाईने तपासली आहेत. संबंधित श्री. रामदास भाऊराव टाक व श्री. दौलत किसनराव सलाम बादद यांचेविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी पुरेसा पुरावा दिसुन येत आहे. सबब प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, पोलिस उप आयुक्त/पोलिस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील दि. ०८-०१-२००३ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार आरोपी लोकसेवक श्री. रामदास भाऊराव टाक ज्येष्ठ स्वच्छता निरिक्षक (निलंबीत) व दौलत किसनराव सलामबाद शिपाई (दै. वेतन) (सध्या सेवेतून कमी) यांचे विरुध्दच्या लाचलुचपतीचा सापळा केस प्रकरणी त्यांचेविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८० :

उप आयुक्त (अ) यांनी प्रस्ताव सादर केला की, महानरगपालिकेच्या मालकीचे मो. औरंगपुरा येथील औरंगपुरा भाजी मंडीतील १५० ओटे १९७४ नगर परिषदेच्या काळात प्र. चौ. फुट रु. ०.५० पैसे विदयुत बील समाविष्ठ करुन भाडे आकारण्यात आले होते. विदयुत बिलात कालानंतर वाढ होत गेल्याने तेथील विदयुत देयक अदा करणे शक्य होत नाही.

महनगरपालिकेच्या नवीन बांधण्यात आलेल्या विविध व्यापारी संकुलातील गाळयात भाडेकरुस स्वतंत्र विदुयत मीटर घेऊन स्वतः विदयुत बील भरण्यासाठी " ना हरकत प्रमाणपत्र " देण्यात येत आहे. तरी औरंगपुरा भाजी मंडीतील ओटे धारकांना स्वतंत्र विदयुत मीअर घेण्यसाठी नाहरकत प्रमाणपत्र द्यावे. किंवा वीज बिलाचा समावेश करुन भाडे वाढ करावी. यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेत विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

संवाद :

श्री. फुलारी नंदकुमार : इतर व्यापारी संकुलनात कशा पध्दतीने कार्यवाही करतो. आविष्कर कॉलनी येथील दुकानास कशा पध्दतीने वीज बील आकारणी होते.

मालमत्ता अधिकारी : मीटर ज्याच्या नावे असेल त्याच्या नावाने बील येईल.

श्री. प्रशांत देसरडा : आतापर्यंत त्या गाळयामध्ये लाईट नाही का? नसेल तर तेथे लाईट घेतलेले दिसतात ते कोठुन घेतले. मीटर दिले असेल तर पुर्वीचे थकीत बील किती आहे.

उप आयुक्त (अ) : काही वर्षापुर्वी भाडेमध्ये बील हे नाममात्र लावण्यात येत होते परंतू कालांतराने वीजेचे दर वाढलेले आहे हे मनपास परवडणारे नाही. १-२ बल्ब लाईटसाठी ठिक होते. तेवढे भाडे भरण्यास काही वाटत नव्हते. दरवाढीमुळे ते बील पेड करतील. मनपा अशा गाळेधारकांना स्वतंत्र मीटर घेऊन नाहरकत प्रमाणपत्र घेऊन बील पेड करतील. मनपा कवत गाळयांचे भाडे वसुल करेल किंवा वीज बील समावेश करुन भाडे वाढ करायची का यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. १ लक्ष वीज बील आहे. ज्यांनी वीज वापरली त्यांचेकडुन वसुल केले जाईल सभागृहाने जो निर्णय होईल त्यानुसार कार्यवाही करता येईल

श्री. प्रशांत देसरडा : १ लक्ष बील अगोदर वसुल करावे नंतरच नाहरकत प्रमाणपत्र दयावे.

श्री. डॉ. आशा बिनवडे : १ लक्ष थकित वीज बील वसुल झाले नाही. तरी सुध्दा नाहरकत प्रमाणपत्र देत असेल तर योग्य होणार नाही. वीज बील अगोदर वसुल करावे. नंतरच ना हरकत प्रमाणपत्र द्यावो. तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

मा. सभापती : थकीत १ लक्ष वीज बील वसुल करण्यात यावे. मालमत्ता अधिकारी यांनी वसुल करावे. विषय मंजुर करण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महनगरपालिका मालकीचे औरंगपुरा भाजी मंडईतील ओटे धारकांना स्वतंत्र विदयुत मीटर घेण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तत्पुर्वी थकीत वीज बीलाची रक्कम रु. एक लाख संबंधिताकडुन वसुल करण्याची जबाबदारी मालमत्ता अधिकारी यांची राहील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८१ :

उप आयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला की, नाथ सुपर मार्केट औरंगपुरा येथील पश्चिमेकडील जिन्या खालची जागा जिचे क्षेत्रफळ ४.४६ चौ. मी. असून, ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव अनामत रक्कम ४,०००/- प्रति चौ. मी. व भाडे प्रति महा जो सर्वात जास्त होईल. आधारभूत प्रति महा भाडे १,१७६/- ठरविण्यात आले आहे. जा. क्र./मनपा/मामअ/१२६/२००२ दि. ३१-०१-०२ अन्वये दै. लोकमत समाचार, विश्वमित्र लोकविजय या वर्तमानपत्रात निविदासुचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविल्या असता, निविदि अंतीम दि. ०७-०२-२००२ पर्यंत ४ निविदा विकल्या गेल्या. अंतिम दि. ११-०२-२००२ पर्यंत दर भरलेले निविदा ०३ प्राप्त झाल्या.

दर भरलेल्या निविदा खालील प्रमाणे.

अ. क्र.	जागेचे क्षेत्रफळ	आधारभूत भाडे प्र. महा.	निविदा विक्री	प्राप्त निविदा	निविदा धारकांचे नांव	देऊ केलेले प्रति महा. भाडे
१.	४.४६ चौ. मी.	१,१७६/-	०४	०३	१ अभिजित जोशी २ अभय रामचंद्र तळणीकर ३ राहूल सुभाषचंद्र मालानी	१,२०४/- १०७०/- ०९३६/-

वरील तुलनात्मकदृष्ट्या ०३ निविदाधारकांचे दर श्री. अभिजित जोशी यांचे आधारभुत भाडे जास्त असल्याने दर स्थायी सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, नाथसुपर मार्केट औरंगपुरा येथील पश्चिमेकडील जिन्या खालची ४.४६ चौ. मी. क्षेत्रफळाची जागा भाडेपट्ट्याने देणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या आधारभुत भाडयापेक्षा जास्त दराची म्हणजेच प्रति महा रु. १,२०४/- या भाडेदराची श्री. अभिजित जोशी यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८२ :

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला की, महनगपालिकेच्या मालकीच्या लोटाकारंजा येथील व्यापारी संकुलातील ०६ दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे रु. १५५/- प्रति, चौ. मी. प्रति. महा अनामत रक्कम ४,०००/- प्रति चौ. मी. ठरविण्यात आले आहे. दै. तरुण भारत सिटीजन्स या वर्तमानपत्रात जा. क्र./माममअ/२०५/२००२ दिनांक १४-०३-०२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता निविदा विक्रीचे अंतीम दि. २६-०३-०२ पर्यंत १४ निविदा विकली गेली व दर भरलेले निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. २८-०३-०२ पर्यंत ८ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्याखालील प्रमाणे आहेत.

अ. क्र.	दुकान क्र.	निविदा विक्री	प्राप्त निविदा
०१	०१	०३	०१
०२	०२	०३	०१
०३	०३	०२	०१
०४	०४	०१	०१
०५	०५	०२	०२
०६	०६	०३	०२

वरील तक्त्या प्रमाणे ०६ दुकानासाठी प्राप्त झालेल्या निविदाचे दर खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	दु. क्र.	क्षेत्रफळ	आधारभुत रक्कम प्रति चौ. मी. ४०००/- प्रमाणे	निविदा धारकांचे नांव	निविदेनुसार येणारे अनामत रक्कम
०१	०१	८.७६ चौमी	३५,०४०	श्रीमती रशिदा बेगम	३६,००७/-
०२	०२	७.९२	३१,६८०/-	श्री. हबीबोद्दीन हमीद	३२,५३५/-
०३	०३	७.९२	३१,६८०/-	श्री. शे. महंमद शे. नसीर	३२,३५३/-
०४	०४	७.९२	३१,६८०/-	श्री. अम रबाशवान अ. वाहेद	३२,४३२/-
०५	०५	८.९४	३५,७६०/-	१. श्री. सिध्दकी मो.	३६,६८१/-

				मोईनोशी २. श्री. शे. आमीरशे. बन्सी	३५,७६०/-
०६	०६	८.६४	३४,५६०/-	१. श्री. नसीरोद्दीन सिध्दकी २. श्री. गुलाब गालीबखान	३५,०३५/- ३४,६४६/-

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार निविदा धारकांचे दर आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त आहे. करीता दुकान क्र. १ साठी श्रीमती रशिद बेगम, दुकान क्र. २ साठी श्री. हबीबोद्दीन हमीद, दुकान क्र. ३ साठी शे. महंमद शे. नसीर, दुकान क्र. ४ साठी श्री. अमर बाशवान अ.वाहेबद दुकान क्र. ५ साठी श्री. सिध्दकी मो. मोईनोद्दीन दुकान क्र. ६ साठी श्री. नसीरोद्दीने सिध्दकी यांची दुकान निहाय आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त असल्याने त्यांचे दर स्थायी समिती सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, महनगरपालिकेच्या मालकीची लोटाकारंजा येथील सहा दुकाने ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी प्रस्तावात दर्शविलेल्या तुलनात्मक दर तक्त्यानुसार निविदा धारकांचे दर आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त असल्याने दुकान क्र. ०१ साठी श्रीमती रशिद बेगम, दुकान क्र. ०२ साठी हबी बोद्दीन हमीद, दुकान क्र. ३ साठी शेख महम्मद शेख नसीर, दुकान क्र. ०४ अमर बाशवान अ. वाहेद, दुकान क्र. ५ साठी सिध्दकी मो. मोईनोद्दीन व दुकान क्र. ०६ साठी नसीरोद्दीम सिध्दीकी यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८३ :

उप आयुक्त (अ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगपुरा प्रिया मार्केट पहिला मजला येथील उर्वरीत २५ दुकाने, दुकान क्र. ३, ६, ८ ते १२ व १४ ते ३१ या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे १५५/- प्रति चौ. मी., प्रति चौ. मी. प्रति मा व अनामत रक्कम ४,०००/- प्रति चौ. मी. ठरविण्यात आलेले आहे. दैनिक सकाळ अजिंठा औरंगाबाद टाईम्स वर्तमानपत्रात क्र. मनपा/गमअ/६९२/२००२ दिनांक १६-०८-९२ अन्वये जाहिर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतीम दि.२६-०८-०२ पर्यंत ०२ निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम व दर भरलेले सिल बंद निविदा स्विकारण्याचे अंतिम दि. २८-०८-०२ पर्यंत ०२ निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. २८-०२-०२ पर्यंत ३२ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

अ. क्र.	दुकान क्र.	निविदा विक्री	प्राप्त निविदा
०१	०६	०१	०१
०२	०९	०१	०१

वरील प्रमाणे दुकान क्र. ६ व ९ साठी प्राप्त झाल्या जी निविदा आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त आहे व महिलांसाठी ३०% दुकान क्र. ३, ६, ९, १२, १६, १९, २३, २७ व

मागासवर्गीयसाठी ५% दुकान क्र. २५ खुल्या प्रवर्गासाठी ८, १०, ११, १४, १५, १७, १८, २०, २१, २२, २४, २६, २८, २९, ३०, ३१ असे एकूण २५ दुकानांपैकी महिलांसाठी आरक्षित दुकानांपैकी दुकान क्र. ६ व ९ साठी निविदा प्राप्त झाल्या त्यांचे दर खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	दु. क्र.	क्षेत्रफळ	आधारभुत रक्कम प्रति चौ. मी. ४०००/- प्रमाणे	निविदा धारकांचे नांव	आधारभुत जास्त देऊ होण्याची निविदा रक्कम
०१	०९	७.२ चौमी	२८,८००/-	सौ. हिरारत्नाकर दांडगे	३०,१००/-
०२	०६	७.२ चौमी	२८,८००/-	सौ. राजश्री अनिल घोडके	२९,०८८/-

वरील दुकान क्र. ६ व ९ साठी प्राप्त झालेल्या निविदा व निविदेतील दर आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त आहेत. करीता वरील दुकानासाठी भरलेली निविदा धारकाचे दर स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, औरंगपुरा प्रिया मार्केट पहिला मजला येथील उर्वरीत २५ दुकाने, दुकान क्र. ६, ७, ८ ते १२ व १४ ते ३१ या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव दुकान क्र. ६ व २ साठी प्राप्त झालेल्या निदिा व निवेदेतील दर आधारभूत रक्कमेपेक्षा जासत असल्याने दुकान क्र. ०६ साठी सौ. राजश्री अनिल घोडके व दुकान क्र. ०९ साठी सौ. हिरा रत्नाकर दांडगे यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८४ :

उप आयुक्त (अ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संजय नगर भाजी मंडई येथील उर्वरीत ०४ दुकाने, दुकान क्र. ३, ५, ७ व ८, या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे ७१/- प्रति चौ. मी. प्रति महा व अनामत रक्कम ४०००/- प्रति चौ. मी. ठरविण्यात आलेले आहे. दैनिक सकाळ, अंजिठा, औरंगाबाद टाईम्स वर्तमान आलेले आहे. दैनिक सकाळ, अजिंठा, औरंगाबाद टाईम्स वर्तमानपत्रात क्र./मनपा/मामअ/६२९/२००२ दि. १६-०८-०२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतीम दि. २६-०८-०२ पर्यंत ०२ निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. २८-०८-०२ पर्यंत ०२ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. महिलासाठी ३०% आरक्षीत दुकान क्र. ५साठी १ व खुल्या प्रवर्गासाठी दुकान क्र. ३, ७, ८ पैकी दुकान क्र. ३ साठी ९ निविदा प्राप्त झाली त्याचे दर खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	दु. क्र.	क्षेत्रफळ	आधारभुत रक्कम प्रति चौ. मी. ४०००/- प्रमाणे	निविदा धारकांचे नांव	आधारभुत जास्त देऊ होण्याची निविदा रक्कम
०१	०३	६.३ चौमी	२५,२००/-	गणेश सांडुजी रत्नपारखे	२५,२६३/-
०२	०५	६.३ चौमी	२५,२००/-	सौ. मंगर गणेश रत्नपारखे	२५,२६३/-

एकुण ०४ दुकानापैकी ०२ निविदा प्राप्त झाल्या दुकान क्र. ३ साठी ०१ निविदा श्री. गणेश साडुजी रत्नपारखे व दुकान क्र. ५ महिला आरक्षणातुन सौ. मंगल गणेश रत्नपारखे यांची निविदा आधारभूत निविदा दरपेक्षा जास्त आहे. करीता निविदा धारकांचे दर स्थायी समिती सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा. सभापती : मान्यता देण्यास्तव येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर, भाजी मंडई येथील उर्वरीत ०४ दुकाने, दुकान क्र. ३, ५, ७ व ८, या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदानुसार दुकान क्र. ३ साठी ०१ निविदा श्री. गणेश सांडुजी रत्नपारखे व दुकान क्र. ५ महिला आरक्षणातून सौ. मंगल गणेश रत्नपारखे यांची निविदा आधारभुत निविदा दरपेक्षा जास्त असल्याने या निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८५ :

उप आयुक्त (म) यांनी प्रस्ताव तयार केला आहे की, कबाडीपूरा व्यापारी संकुलातील उर्वरीत १४ दुकाने दुकान क्र. २, ३, व ५, ७ ते १७ या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे १५५/- प्रति चौ. मी प्रति महा व अनामत रक्कम ३०००/- प्रति चौ. मी. ठरविण्यात आलेले आहे. दैनिक सकाळ, अजिंठा, औरंगाबाद टाईम्स वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामअ/६९२/२००२ दि. १६-०८-०२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतीम दि. २६-०८-०२ पर्यंत १० निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. २८-०८-०२ पर्यंत १० निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. २८-०८-०२ पर्यंत १० सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

अ. क्र.	दुकान क्र.	निविदा विक्री	प्राप्त निविदा
०१	०२	०४	०४
०२	०३	०२	०२
०३	०७	०१	०१
०४	११	०२	०२
०५	१२	०१	०१

वरील प्रमाणे दुकान क्र. २, ३, ७, ११, १२ साठी निविदा साठी निविदा प्राप्त झाल्या जी निविदा आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त आहे. महिलांसाठी १०% दुकान क्र. ३, ८, ११, १५ व मागासवर्गीय साठी ५% दुकान क्र. ७ खुल्या प्रवर्गासाठी २, ५, ९, १०, १३, १३, १४, १६, १७ असे एकुण १४ दुकानांपैकी महिलासाठी आरक्षित दुकानांपैकी दुकान क्र. ३ व ११ साठी ४ निविदा प्राप्त झाल्या. दुकान क्र. ७ मागासवर्गीय साठी ५% आरक्षित पैकी १ निविदा प्राप्त झाली. खुल्या प्रवर्गासाठी दुकान क्र. २, १२ साठी ५ निविदा प्राप्त झाल्या त्याचे दर खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	दु. क्र.	क्षेत्रफळ	आधारभुत रक्कम प्रति चौ. मी. ४०००/- प्रमाणे	निविदा धारकांचे नांव	आधारभुत रक्कमे पेक्षा जास्त देऊ केल्याची निविदा रक्कम
०१	०२	१०.५ चौमी	४२,०००/-	१. अदिल खान नादेरखान	७२,४५०/-
				२. स. शकील अहमद स. अहमद	५४,८९२/-
				३. शे. जमील शे. अमिरोउद्दीन	५२,५००/-
				४. स. मोनोनोउद्दीन अहेमद हाश्मी	५१,७००/-
०२	०३	२४ चौ मी	९६,०००/-	१. हशीबाबेगम जमीहोद्दीन	१,२०,०००/-
				२. सौ. रजी यारखान वाहेदखान	१,१६,४००/-
०३	०७	१९.३८ चौमी	७७,५२०/-	१. अ. वाजेदखान हमीदखान	८१,३२६/-
०४	११	०.६९ चौमी	३८,७६०/-	१. फरजानाबेगम शे. शकील	४६,५००/-
				२. नसीम बेगम अ. नफीस	४०,७८६/-
०५.	१२	१४.१९ चौमी	५६,७६०/-	१. सिकंदरखान उस्मानखान	५८,१७९/-

वरील दुकान क्र. २, ३, ७, ११, १२ साठी प्राप्त झालेल्या निविदा वरील तुलनात्मक तक्त्याप्रमाणे दुकान क्र. ७ साठी अब्दुल वाजेदखान हमीदखान दुकान क्र. ११ साठी करप्पाना बेगम शे. शकील दुकान क्र. १२ साठी सिंकदरखान उस्मानखान यांनी निविदा आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त आहेत. करीता वरील दुकानासाठी भरलेली निविदा धारकाचे दर स्थायी समितीस समोर विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कबाडीपूरा व्यापारी संकुलातील उर्वरीत १४ दुकाने दुकान क्र. २, ३ व ५, ७ ते १७ या २९ वर्षाच्या भाडेपट्टया देण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदानुसार तुलनात्मक तक्त्या प्रमाणे आधारभूत किंमतीपेक्षा जास्त असल्याने दुकान क्र. २ साठी श्री. आदिलखान नादेररखान दुकान क्र. ३ साठी हबीबाबांना जमीलदान, दुकान क्र. ७ साठी अब्दुल वापेदखान हमीदखान दुकान क्र. ११ साठी फरजाना बेगम शे. शफीक दुकान क्र. १२ साठी सिंकदरखान उस्मानखान यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८६ :

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव तयार केला आहे की, एकनाथनगर, उस्मानपुरा व्यापारी संकुलातील एकुण ३० दुकाने (नविन) दुकान क्र. १ ते ३० या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे १८२४/- प्रति महा व अनामत रक्कम ४०००/- प्रती चौमी ठरविण्यात आलेले आहे. दैनिक सकाळ, अजिंठा, औरंगाबाद टाईम्स वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामअ/६९२/२००२ दि. १६-०८-०२ पर्यंत ०१ निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतिम दि. २८-०८-२० पर्यंत ०१ सिलबंद निविदा प्राप्त झाली. मागासवर्गीयासाठी ५% दुकान क्र. १५ व २५ महिलासाठी ३०% दुकान क्र. ३, ७, १०, १४, २७, २१ २४, २७, ३० खुल्या प्रवर्गासाठी दुकान क्र. १, २, ४, ५, ६, ८, ९, ११, १२, १३, १६, १८, १९, २०, २२, २३, २६, २८, २९ असे एकुण १ ते ३० दुकानांपैकी महिला आरक्षणातुन दुकान क्र. ३० साठी ०१ निविदा प्राप्त झाली त्याचे दर खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	दु. क्र.	क्षेत्रफळ	आधारभुत रक्कम प्रति चौ. मी. ४०००/- प्रमाणे	निविदा धारकांचे नांव	आधारभुत रक्कमे पेक्षा पास देऊ केल्याची निविदा रक्कम
०१	३०	४.५६ चौमी	१८,२४०/-	सौ. मदीना बेगम शे. करीम	१८,६९६/-

दुकान क्र. ३० साठी प्राप्त झालेली निविदा आधारभुत निविदा दरापेक्षा जास्त असल्याने निविदा दर स्थायी समिती सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एकनाथनगर, उस्मानपुरा व्यापारी संकुलातील एकुण ३० दुकाने (नविन) दुकान क्र. १ ते ३० या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव निविदा मागविल्या असता फक्त दुकान क्र. ३० साठी निविदा प्राप्त झाली असून, ही निविदा आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त असल्याने सौ. मदीना बेगम शे. करीम यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८७ :

उपआयुक्त (अ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नेहरु भवन व्यापारी संकुलातील उर्वरीत ०२ दुकाने दुकान क्र. १, ८ या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे ९७/- प्रति चो. मी. प्रति महा व अनामत रक्कम ४०००/- प्रति चौ. मी. ठरविण्यात आलेले आहे. दैनिक सकाळ, अजिंठा, औरंगाबाद टाईम्स वर्तमानपत्रात क्र. मनपा/मामअ/६९२/२००२ दि. १६-०८-०२ अन्वये जाहीर निविदा प्रसिध्द करुन सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविल्या असता कोरे निविदा विक्रीचे अंतिम दि. २६-०८-०२ पर्यंत ३ निविदा विकल्या गेल्या व दर भरलेले सिलबंद निविदा स्विकारण्याचे अंतीम दि. २८-०८-०२ पर्यंत ०३ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

अ. क्र.	दुकान क्र.	निविदा विक्री	प्राप्त निविदा
०१	०१	०२	०२
०२	०८	०१	०१

वरील प्रमाणे दुकान क्र. १ ते ८ साठी निविदा प्राप्त झाल्या जी निविदा आधारभुत रक्कमेपेक्षा जास्त आहे. महिलासाठी ३०% दुकान व १ व ८ आरक्षीत असल्याने त्यांचे दर खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	दु. क्र.	क्षेत्रफळ	आधारभुत रक्कम प्रति चौ. मी. ४०००/- प्रमाणे	निविदा धारकांचे नांव	आधारभुत रक्कमे पेक्षा जास्त देऊ केल्याची निविदा रक्कम
०१	०१	९.८४ चौमी	३९,३६०/-	१. सईदा बेगम सरदारखान	७५,१००/-
				२. ताहेरा बेगम अहमदखान (अनामत रक्कम भरली नाही.)	५०,०००/-
०२	०८	९.८४ चौमी	३९,३६०	१. ताहेरा बेगम अहमदखान	४५,०००/-

दुकान क्र. १ व ८ महिला आरक्षण असल्याने ०३ निविदा प्राप्त झाल्यास वरील तुलनात्मक तक्त्याप्रमाणे दुकान क्र. १ साठी सईदा बेगम सरदारखान दुकान क्र. ८ साठी ताहेरा बेगम अहमद खान यांनी निविदा आधारभूत निविदा दरापेक्षा जास्त आहे. करीता वरील दुकानासाठी भरलेली निविदा धारकांचे दर स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नेहरु भवन व्यापारी संकुलातील उर्वरीत ०२ दुकाने दुकान क्र. १, ८ या २९ वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदानुसार दुकान क्र. १ व ८ महिला आरक्षण असल्याने ०३ निविदा प्राप्त झाल्यास वरील प्रमाणे दुकान क्र. १ साठी सईदा बेगम सरहारखान दुकान क्र. ८ साठी ताहेरा बेगम अहमद खान यांनी निविदा दरपेक्षा जास्त असल्याने या निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८८ :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत शहरातील महत्वाच्या रस्त्यावर कमानी उभारणे बाबत मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. १९४/४ दिनांक १९-०१-२००१ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कमान उभारणी करीता सदरील काम बी. ओ. टी. (बांधा वापरा, हस्तांतरीत करा) या तत्वावर करुन घेण्यात येणार आहे. सध्या फक्त २६ कमानी व १३० दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहे.)

सदरील कमानी उभारण्यासाठी वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदापत्रके मागविण्यात आली असता एकुण पाच निविदा पत्रके विकल्या गेली व यापैकी फक्त चार निविदापत्रके प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	एजन्सीचे नांव	कामाचा अनुभव	मनपाकडे हस्तांतरीत करण्याचा कालावधी (कन्सेशन पिरेड)
०१	मे. व्हिजन कम्युनिकेशन	४ वर्षे	११ वर्षे
०२	श्री. गुरुगोदावरी एंटरप्रायजेस	२ वर्षे	१३ वर्षे
०३	इम्पॅन्ट ॲडव्हरटायझिंग एजन्सीज	१८ वर्षे	१८ वर्षे
०४	मे. हॉटेल रेस्टॉरंट	नाही	२१ वर्षे

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्ट्या मे. व्हिजन कम्युनिकेशन यांनी दिलेल्या कन्सेशन पिरेड सर्वात कमी असून, तो वरील दर्शविल्याप्रमाणे ११ वर्षे इतका आहे. परंतू मे. व्हिजन कम्युनिकेशन यांच्याशी कन्सेशन पिरेड बाबत प्रत्यक्ष वाटाघाटी केल्या असता त्यांनी वाटाघाटी अंती सदरील पिरेड ११ वर्षे ऐवजी १० वर्षे ६ महिने इतका केला आहे.

तरी मे. व्हिजन कम्युनिकेशन यांची १० वर्षे ६ महिने कन्सेशन पिरेडची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा. सभापती : मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दतीत शहरातील महत्वाच्या रस्त्यावर बांधा वापरा हस्तांतरीत करा (बीओटी) तत्वावर २६ कमानी व १३० दिशा दर्शक फलक लावण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी कन्सेशन पिरेडच्या निविदाधारक मे. व्हिजन कम्युनिकेशन यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील कामाकरीता ११ वर्षे ऐवजी १० वर्षे ६ महिने कन्सेशन पिरेडची मे. व्हिजर कम्युनिकेशन याची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ८९ :

मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या जाहिरात कराच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातुन राज्य स्तरावरील वृत्तपत्रात निविदा दिनांक १४-०१-२००३ रोजी प्रसिध्दीस देण्यात आली होती. यात होर्डींग फिऑक्स, ॲडपोल्ससाठी दि. २७-०१-२००३ रोजी निविदा ०५ वर्षासाठी देकार मागविण्यात आले होते. एकूण ०३ निविदा प्राप्त झालेल्या असून, महानगरपालिकेस होर्डीग्स, ग्लोसाईनाही ऑक्स व ॲड पोल्ससाठी रु. ४३,४४, ६१६/- इतके उत्पन्न अपेक्षीत होते. निविदेद्वारे खालील प्रमाणे वर्षानिहाय देकार आहे.

०१	सन २००३-०४	रु.	४३,९७,८५१/-
०२	सन २००४-०५	रु.	४६,६२,७२२/-
०३	सन २००५-०६	रु.	५०,४१,५१८/-
०४	सन २००६-०७	रु.	५२,७६,४३०/-
०५	सन २००७-०८	रु.	६१,६७,४२१/-

सदरील देकार मध्ये वर्षानिहाय व ग्रुपनुसार खालील निविदा धारकांनी जास्तीचे दर दर्शवुन निविदा भरली आहे.

सन	ग्रुप	एजन्सीचे नांव
२००३-०४	होर्डींग ब्लोसाईन	मे. न्युक्लेअस साईट, मुंबई
	ग्रुप १ व २	
	ग्रुप क्र. ३	मे. न्यु. नंदा पब्लिसिटी नागपूर
	ग्रुप क्र. ४ ते १९ किऑक्स व ॲड पोटस	मे. सेल ॲडस्, औरंगाबाद
२००४-०५	होर्डींग ग्लोसाईन	मे. न्युक्लेअस साईट, मुंबई
	ग्रुप १ व २	
	ग्रुप क्र. ३	मे. न्यु. नंदा पब्लिसिटी नागपूर
	ग्रुप क्र. ४ ते १९ किऑक्स व ॲड पोटस	मे. सेल ॲडस्, औरंगाबाद
२००५-०६	होर्डींग ग्लोसाईन	
	ग्रुप १ व २	

	ग्रुप क्र. ३ ते १९ किऑक्स व ॲड पोटस	मे. न्युक्लेअस साईट, मुंबई
२००६-०७	होर्डींग ग्लोसाईन	मे. न्युक्लेअस साईट, मुंबई
	ग्रुप १ व २	
	ग्रुप क्र. ३ ते १९ किऑक्स व ॲड पोटस	
२००७-०८	होर्डींग ग्लोसाईन	मे. न्युक्लेअस साईट, मुंबई
	ग्रुप १ व २	
	ग्रुप क्र. ३ ते १९ किऑक्स व ॲड पोटस	मे. सेल ॲडस्, औरंगाबाद

उपरोक्त नुसार व जाहिरात नियमावली प्रमाणे २ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी कॉन्ट्रेक्ट करता घेऊ शकत नाही. म्हणून २००३-०४ व २००४-०५ या वर्षासाठी होर्डींग्स व ग्लासाईनच्या ग्रुप क्र. १ व २ साठी न्युक्लेअस साईट, मुंबई, ग्रुप क्र. ३ साठी मे. न्यु. नंदा पब्लिसाठी नागपुरा तसेच ग्रुप क्र. ४ ते १९ फिऑक्स व अँड पोटससाठी मे. सेल ॲडस् औरंगाबाद यांनी जास्तीचे दर निविदेन दर्शविले असल्यामुळे त्यांच्या समवेश जाहिरात करासंबंधी करारनामा करण्याच्या मंजुरीस्तव तसेच करारनामा करते वेळी संबंधित एजन्सीचे होर्डींग्स ज्यावेळी रिकामे असतील त्यावेळी जनहित संदेश जाहिरात संबंधित एजन्सीचे त्यांच्या सौजन्याने महानगरपालिके करीत आपआपल्या होर्डींग्सवर सादर करावे अशी अट करारनाम्यात सामाविष्ठ करण्यात येणार असून, निविदा धारकांकडुन निविदा रक्कमेच्या ५०% रक्कमेचे बँक गँरेटी घेण्यात येणार आहे.

तरी मे. न्युक्लेअस साईट मुंबई, मे न्यु. नंदा पब्लिसिटी नागपुर व मे. सेल ॲडस् औरंगाबाद यांनी सादर केलेले ०५ वर्षाचे देकार मान्यतेस्तव सादर.

चर्चा :

श्री. प्रशांत देसरडा : २ वर्षाच्या वर नियमाने करारनामा करता येत नाही. प्रस्तावात ४-५ वर्षाचा करारनामा करण्यासंदर्भात नमुद केले. मनपाच्या हिताचा निर्णय घेण्यात यावा.

मा. सभापती : मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्य लेखाधिकारी : विषय क्र. ८८-८९ हे दोन्ही वेगवेगळे आहेत विषय क्र. ८८ मध्ये बोट पध्दतीने कार्यवाही होत आहे. त्यात कन्सेक्शन पिरेड ११ वर्षाचा आहे. तो १० वर्ष ६ महिन्याचा आहे. ८९ विषयामध्ये होर्डींग्स, पॅड, बोल्ड यासाठी निविदा मागविलेल्या आहेत. दोन वर्षाचा जो करारनामा आहे. तो शासनाने जाहिरात देऊन केलेला आहे. कमीत कमी दोन वर्षाचा तरी करारनामा करावा असे आहे. परंतू आपण ५ वर्षासाठी निविदा मागविलेल्या होत्या. आऊटपूट चांगले मिळावे म्हणून नागपूर मनपाच्या धरतीवर निविदा केलेल्या आहेत. करारनामा दोन वर्षाचा करणार आहोत. एक होर्डींग्स ५००/- रु. ला देत होतो. दरवर्षी दर वाढतील त्याप्रमाणे ॲसीसमेंट सुध्दा वाढवून दिलेले आहे. बेसीक रेट मध्ये लायसन्स दिले नाही. त्या व्यतिरिक्त निविदा मागविल्या आहेत. यात आता फक्त ३१९ होर्डींग्स दिल्या आहेत. एरिया वाढला नवीन होर्डींग्स आल्यास त्याच्या नवीन निविदा काढाव्या लागतील.

श्री. देसरडा प्रशांत : दोन वर्षाचीच मुदत ठेवावी. शासनाने तसे निश्चित केले आहे. २ वर्षानंतर पुन्हा टेंडर प्रोसेस करावे. मनपास उत्पन्न मोठया प्रमाणात येऊ शकते.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत असून, मनपाचे उत्पन्न वाढविण्याचा प्रस्ताव आहे.

श्री. इलियास किरमाणी : मुख्यलेखाधिकारी यांनी व प्रस्ताव देऊन मनपाचे चांगल्या प्रकारे उत्पन्न वाढविण्याचा एक प्रकारे प्रयत्न केला त्याबद्दल त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात यावे.

मा. सभापती : मनपाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाच्या प्रस्ताव प्रशासनाने सादर केला त्याबद्दल मुख्य लेखाधिकारी यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते.

या प्रस्तावासंबंधीची उर्वरीत कार्यवाही तात्काळ करावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या जाहिरात कराच्या उत्पन्ना वाढ होण्याच्या दृष्टीने होर्डीग्स, फिऑक्स व ॲडपोटससाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार सन २००३-०४ व २००४-०५ या वर्षासाठी होर्डींग्स व ग्लासाईनच्या ग्रुप क्र. १ व २ साठी न्युक्लेअस साईट मुंबई, ग्रुप क्र. ३ साठी मे. न्यु नंदा पब्लिसिटी नागपूर, तसेच ग्रुप क्र. ४ ते १९ फिआक्स व ॲड पोल्ससाठी मे. सेल ॲडस् औरंगाबाद यांनी जास्तीचे दर निविदेत दर्शविले असल्यामुळे त्यांच्या समवेत जाहिरात करासंबंधी करारनामा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. करारनामा करते वेळी एजन्सीचे होर्डींग्ज ज्यावेळी रिकामे असतील त्यावेळी जनहित संदेश जाहिरात संबंधित एजन्सीने त्यांच्या सौजन्याने महानगरपालिके करीता आपआपल्या होर्डींग्सवर सादर करावे अशी अट करारनाम्यात समाविष्ठ करण्यास व न्युक्लेअन्स साईट, मुंबई मे. न्यु. नंदा पब्लिसिटी, नागपुरा व मे. सेल ॲडस् औरंगाबाद यांनी सादर केलेले ०५ वर्षाचे देकार स्विकरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ९० :

(दिनांक १५ फेब्रुवारी ०३ च्या सभेतील विषय क्र. ७२ पुढील सभेत ठेवण्याचा निर्णय झाल्यानुसार - औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना - अंमलबजावणी योजना)

औरंगाबाद महानगरपालिका विरुध्द दिगंबररावळ (याचिका क्रमांक १९१०/२००२) व औरंगाबाद महानगरपालिका विरुध्द श्री. गट्टानी (याचिका क्रमांक ५३१/२००२) संदर्भाने दिनांक २२-०७-२००२ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आलेल्या होती. त्या संदर्भाने मा. न्यायालयाने आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद व जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी न्यायालयात उपस्थित राहण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार सुनावणीच्या वेळी मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद तसेच विशेष भुसंपादन अधिकारी सहाय्यक संचालक, नगररचना हे उपस्थित होते. सुनावणीचे वेळी मा. न्यायालयाने सांगितले की,सन १९७५ पासुन आरक्षणातील जमिनी महानगरपालिका ताब्यात घेत नाही किंवा त्यांचा मोबदलाही देत नाही. त्यामुळे नागरिकांचा जमीनी अडकुन पडत आहेत व सदरील मिळकतीच्या हक्काबाबत नागरिक वंचित राहत आहेत. त्यामुळे औरंगाबाद शहरासाठी असलेली विकास योजना अंमलबजावणी कशी करणार आहेत. याबाबत

महानगरपालिका आयुक्तांनी अंमलबजावणी आरखडा दोन महिन्यांचे आंत न्यायालयात सादर करावा.

उपरोक्त आदेशान्वये मा. आयुक्तांनी वेळोवेळी संबंधित अधिकारी, मुख्यलेखाधिकारी, सहाय्यक संचालक नगर रचना शाखा औरंगाबाद तसेच संबंधित विधीज्ञ यांचे बरोबर घेतलेल्या बैठका व सदरील बैठकानंतर दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे विकास योजना अंमलबजावणी अहवाल तयार करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर विकास योजना अंमलबजावणीचा अहवाल तयार करण्यात आला आहे. सबब औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना अंमलबजावणी अहवाल स्थायी समिती समोर सादर.

(टिप : अंमलबजावणी अहवालाची प्रत दिनांक १५ फेब्रुवारी रोजी वितरीत करण्यात आली आहे.)

चर्चा :

मा. सभापती : दोन तीन वेळेस हा प्रस्ताव सभागृहासमोर आलेला आहे. सविस्तर चर्चा करावी. सर्वसाधारण सभेपुढे पाठवावयाचा आहे.

श्री. जयवंत ओक : या संदर्भात प्रशासनाने सविस्तर खुलासा द्यावा. ५० वर्षापासुन घरे बांधलेली आहेत. आरक्षणात किती भुखंड आहेत त्याची यादी सादर करावी माझ्या मते जो आराखडा तयार केला तो प्रत्याक्ष जागेवर पाहणी करुन केलेला नसून बंद खोलीत केला आहे.

मा. सभापती : प्रशासनाने सविस्तर माहिती दयावी.

सहा. संचालक न. र. : याचिका क्रमांक १९१०/२००२ महानगरपालिका विरुध्द गट्टाणी या प्रकरणार मा. उच्च न्यायालयाने सहा महिन्याच्या आत भुसंपादनासाठी २/३ रक्कम विशेष भुसंपादन अधिकारी यांचेकडे जमा करण्याचे निर्देश दिले होते. तसेच अनेक वर्षापासुन विकास योजना आरखड्यासह आरक्षीत जमिनी रस्त्यासाठी भुसंपादन होणाऱ्या मिळकती आहेत. भुसंपादनाची कार्यवाही मनपाकडुन वेळेवर होत नसल्याने संबंधित जमीन मालक अशा जमिनीच्या उपभोग घेण्यापासून वंचित राहत आहेत. यासाठी एक कालावधी निश्चित करुन न्यायालयात सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मा. आयुक्तांनी आरखडा तयार करुन मा. न्यायालयात स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या मंजूरीच्या अधीन राहुन सादर केलेला आहे. नुकतीच जी माहिती समोर आलेली आहे की, याचिका क्रमांक १२१०/२००२ श्री. दिगंबर रावळ ह्या प्रकरणांत मा. न्यायालयाने सदर मिळकतीसाठी मनपा भुसंपादन अधिकारी यांचेकडे रक्कम जमा केली असल्याने सदरची याचिका निकाली काढलेली आहे. अंमलबजावणी आरखडा ज्या याचिकेच्या अनुषंगाने होता तो मा. उच्च न्यायालयात दाखल केलेला आहे. याचिका निकाली काढली असली तरी न्याय बाबी पडताळणी पाहण्यासाठी विधी सल्लागार यांचे मत घेणे आवश्यक आहे. जो आराखडा दिला त्यात आगामी १० वर्षाची विकास योजना आहे. यात बराचसा भाग भुसंपादनाचा आहे. अंमलबाजवणीचा आरखडा दाखल केलेला आहे. प्रामुख्याने पुस्तिकेमधील पुरवणी ड मध्ये विकास योजनेतील आरक्षणे व भुसंपादन करावयाच्या कार्यवाहीची प्रकरणे भुसंपादन अधिकारी यांचेकडे दाखल आहे. त्याचा आरखडा दिला आहे. विकास योजनेचा जो डेव्हलपमेंटच्या एक रिपोर्ट

आहेत. यामध्ये सर्वसाधाराणपणे महानगरपालिकेच्या वार्षीक खर्चाच्या १०% खर्च हा भुसंपादन कार्यवाहीसाठी करणार आहेत. त्या अनुषंगाने हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे. या प्रस्तावास मंजुरी देणे आवश्यक आहे.

श्री. जयवंत ओक : माझ्या वार्डात अजित कॉलनी ७०-८० वर्षापासुन असेल परंतू तेथे आरक्षीत जागा दाखविण्यात आली. गट्टाणीचे हे प्रकरण १९७५ पासून चालू आहे. अशा अनेक वसाहती असतील.

श्री. देसरडा प्रशांत : कैलास नगर आरक्षीत जागेवर आहे. प्रस्ताव मंजुर करणे कितपत योग्य होईल स्थायी समितीवर न्यायालयाने दोष ठेवले.

डॉ. आशा बिनवडे : कितीतरी आरक्षणे अशी आहेत की, तेथे वसाहती आल्या. उदा. भानुदासनगर शैक्षणिक झोन म्हणून आहेत. परंतु घरे आली आहेत. त्यास ॲक्वॉयर सुध्दा करु शकत नाही. किती आरक्षणामध्ये वसाहती अनाधिकृत आणि आहेत. त्याबाबतीत सुध्दा माहिती सभागृहासमोर यावयास पाहिजे. सर्व माहिती समोर नाही म्हणून हा प्रस्ताव मंजूर करणे योग्य होणार नाही.

श्री. जयवंत ओक : वार्ड वाईज माहिती दयावी. कोणते भुखंड कोणत्या झोनसाठी होते. सविस्तर दयावे ६०-६० वर्षापासून काही आरक्षित जागेवर घरे आणि तेथे मनपाने सुविधा सुध्दा दिल्या. त्या वगळण्यात यावा. सुधारीत प्रस्ताव आणावा. या विषयासाठी विशेष बैठक बोलवावी.

सहा. संचालक न.र. : विकास योजना आरखडयातुन दोन बाबी आहेत. एक आहे रस्त्यासाठी करावयाचे भुसंपादन दुसरे सार्वजनिक उपयोगाकरीता ठेवलेली आरक्षणे परंतू महापालिकेने विविध आरक्षणाच्या बाबतीत व्यापक सर्वेक्षण केलेली नाही. असे सर्वेक्षण करणे हे खर्चिक काम असून जो पर्यंत व्यापक सर्वेक्षण होणार नाही तो पर्यंत अहवाल देता येणार नाही.

मा. सभापती : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन नगर रचना विभागाला सुचना करण्यात येतात की, या प्रकरणा व्यतिरिक्त आणखी काही प्रकरणे आहेत का तसेच सभासदांच्या सुचनेनुसार ज्या भागात काही आरक्षणे राहीले असतील त्याचा समावेश करण्यात यावा. येत्या १५ तारखेला सकाळी ११.०० वाजता या विषयावर सभा आयोजीत करण्यात येते. सर्वांनी उपस्थित रहावे.

श्री. जयवंत ओक : कोर्टात दाखल करण्यास वेळ असेल तर, सविस्तर माहिती घेवू नये सभा बोलवावी.

सहा. संचालक न. र. : पान क्र. १२१ मध्ये पुरवणी 'ड' मध्ये जे दिले त्यात भुसंपादनाच्या कार्यवाही बाबत आहे. जी कार्यवाही भुसंपादन अधिकाऱ्यांकडुन चालु आहे. अशा जागांचा उल्लेख आहे. उर्वरित पुरवणीमध्ये प्रलंबीत प्रकरणांचा गोषवारा दिला आहे. त्यात रस्त्याच्या संदर्भात जास्त प्रकरणे आहेत. अनाधिकृत वस्त्यांमध्ये जे आरक्षण आहे. त्याचा येथे वस्तुनिष्ठ अहवाल देता येणार नाही.

डॉ. आशा बिनवडे : न्यायालयाचे आदेश काय आहेत. आरक्षणामध्ये अतिक्रमण झाले असे न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिले का

श्री. जयवंत ओक : विकास आरखडा प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन तयार करणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले नाही.

श्री. हिदायत अली : माझ्या वॉर्डात उदयानासाठी आरक्षण होते तेथे बांधकाम होऊन १०-१५ इमारती तयार आल्याचे दिसून येते.

सहा. संचालक न. र. : दोन दिवसांत अहवाल तयार होणे शक्य नाही. व्यापक सर्वेक्षण होणार नाही.

श्री. जयवंत ओक : न्यायालयात प्रकरण गेले म्हणुन हे चित्र समोर आले. १९७५ च्या आरखडयातील किती आरक्षणे व त्यानंतरची किती याची माहिती दोन दिवसांत प्रशासन देत असेल तर, नंतर सभा घ्यावी. विशेष बैठ घेऊनच या विषयावर चर्चा व्हावी असे माझे मत आहे. त्यानंतर सहा महिने किंवा वर्षाने अहवाल दयावा.

डॉ. आशा बिनवडे : सद्य. परिस्थिती न्यायालयाच्या निदर्शनास म्हणून दिलेली नाही. सभागृहाची मान्यंता नसतांना कोर्टात अहवाल सादर केला. त्याला काहीच अर्थ नाही.

सहा. संचालक न. र. : पुरवणी 'ड' मध्ये भुसंपादन कार्यवाही चालु असल्याचा गोषवारा दिला. कोणतीही दिशाभूल केलेली नाही. उर्वरीत आरक्षणातील जी माहिती देत आहोत. त्या विकास योजनेतील यादी प्रसिध्द केलेली आहे. आरक्षणातील जमिनी मोकळया नाहीत ही आजची परिस्थित आहे. विकास योजना कशा प्रकारे तयार केली याकरीता सुध्दा प्राथमिक स्वरुपात सर्व प्रथम ज्याला आपण सद्य स्थितीतील जमीन वापर म्हणतो. नकशा तयार करुन जागेवरील परिस्थिती बघुनच होतो. शासनाकडुन मंजुरी झाल्यानंतर अंतिम स्वरुप येते.

मा. सभापती : सर्व स. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या विषयावर येत्या १५ तारखेला सकाळी ११.१० वाजता सभा आयोजीत करुन चर्चा करण्यात येईल.

ठराव :

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळचे विषय

विषय क्र. ९१ :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांती चौक ते सिल्लेखाना या १०० फूट डी. पी. रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा. बां. विभागाचे सन २०००-२००१ च्या दरसूचीनुसार र. रु. ९,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. सदर कामाचा खर्च हा नविन डांबरीकरण या लेखा शिर्षकाच्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

सदर कामासाठी निविदा सूचना जा. क्र. ३६/२००१ अन्वये दै. वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागवण्यात आल्या. त्यामध्ये सर्वात कमी दर हा श्री. अजित सिंग यांचा असून, अं. प. दरापेक्षा ३१.०१% कमी असा दर असून, त्यास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

क्रांतीचौक ते सिल्लेखाना हा शहराचा मुख्य रस्ता असल्याने सदर रस्ता दर्जेदार करण्यासाठी काही बाबींमध्ये वाढ करावी लागेल. तसेच काही बाबी अतिरिक्त करण्या लागणार आहेत. तरच रस्ता टिकवून होणार आहे. क्रांतीचौक ते सिल्लेखाना हा रस्ता अत्यंत रहदारीचा आहे. रस्त्याची सद्यस्थिती आणि मंजुर निविदेतील बाबी यांचा विचार करता रस्ता परिपूर्ण होणार नाही. करीता अंदाजपत्रक सुधारीत करणे आवश्यक आहे.

त्यामुळे हा शहराचा मुख्य रस्ता दर्जेदार होईल. रस्त्याच्या मजबुती व टिकाऊपणाच्या बाबीचा विचार केल्यास प्रस्तावित काम करणे आवश्यक वाटते. करीता सुधारीत अं. प. १७,१७,५००/- मान्यतेस्तव सादर. तसेच मुळ मंजूर निविदेचे गुत्तेदार श्री. डी. अजितसिंग हे त्यांचे मंजुर निविदेतील दरानेच म्हणजे अ. प. दरापेक्षा ३१.०१% कमी दराने काम करावयास तयार आहेत. तेव्हा त्यांचे मार्फत काम करावे की, फेर निविदा मागवून काम करावे बाबत आदेशास्तव व मंजुरीबाबत सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांती चौक ते सिल्लेखाना या १०० फूट डी. पी. रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण करणेच्या कामाकरीता र. रु. ९,८०,०००/- च्या अंदाजपत्रकामध्ये हा शहराचा मुख्य रस्ता दर्जेदार व टिकवू होण्याकरीता अतिरिक्त कराव्या लागणाऱ्या बाबींचा विचार करता या रस्त्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या सुधारीत अंदाजपत्रक र. रु. १७,१७,५००/- च्या खर्चास तसेच सदरील काम या कामाचे मुळ गुत्तेदार श्री. डी. अजितसिंग यांचेकडुन निविदेतील मंजुर दराने म्हणजेच अं. प. दरापेक्षा ३१.०१% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ९२ :

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उदयान येथील सुलभ शौचालयाची मागील दिनांक १३-०२-०८ पासुन २००३ पर्यंत पाच वर्षाकरीता श्रीमती राधाबाई किशोर चावरिया या अधिकृत सुलभ शौचालयाची मनपाची अटी शर्ती नुसार देखभाल करीत असून, त्यांनी शौचालयाची वास्तु व त्यातील शौचालये स्नानगृहे इत्यादीची स्थिती चांगली ठेवली असून, स्वच्छाताही चांगली आहे व सदर ठिकाणी लागणारे स्वच्छता विषयक साहित्य त्या स्वतःच उपलब्ध करुन स्वच्छता करीत असतात.

सुलभ शौचालय जनतेच्या सोईसाठी नाममात्र पैसे आकारुन उपलब्ध करुन दिले जाते. करीता श्रीमती राधाबाई चावरियाँ यांचा मागील अनुभव बघता त्यांनी पुढील पाच वर्षासाठी मनपाच्या अटी शर्ती अधिन राहुन मुदतवाढ देण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उदयान येथील सुलभ शौचालयाच्या देखभालीचे काम गेल्या पाच वर्षापासून पाहात असलेल्या श्रीमती राधाबाई किशोर चावरिया यांचा मागील पाच वर्षाचा अनुभव बघता त्यांना पुढील पाच वर्षासाठी मनपाच्या अटी शर्तीस अधिन राहुन मुदत वाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ९३ :

औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना नाशिक महानगरपालिकेच्या धर्तीवर (आधारभूत मानुन) गणवेश व गणवेश साहित्य पुरविणे बाबत निर्णय घेणे.

संवाद :

श्री. जयवंत ओक : नाशिक महापालिकेच्या धर्तीवर या मनपाच्या अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांना गणवेश साहित्य देण्यात येते.

अग्निशमन अधिकारी : नाशिक मनपाच्या धर्तीवर औरंगाबाद मनपाच्या अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना गणवेश व गणवेश साहित्य देण्याचा प्रस्ताव होता. त्यास मा. आयुक्तांनी तत्वतः मान्यता दिलेली आहे.

मा. सभापती : नाशिक मनपाच्या धर्तीवर औरंगाबाद मनपातील अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना गणवेश व गणवेश साहित्य देण्यात यावे. याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी तात्काळ अंमलबजावणी करावी.

ठराव :

औरंगाबाद महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना गेल्या तीन वर्षापासुन गणवेश व गणवेश साहित्य पुरविण्यात आलेले नाही. म्हणून ज्याप्रमाणे नाशिक महापालिकेतील अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना गणवेश व गणवेश साहित्य पुरविण्यात येते. त्यास आधारभूत मानुन औरंगाबाद मनपाच्या अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना खालील दर्शविल्याप्रमाणे गणवेश व गणवेश साहित्य पुरविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ. क्र.	साहित्यांचे नांव	कापडाचा प्रकार	सब ऑफिसर इतर सर्व व त्यावरील पदांसाठी पदे	इतर सर्व पदांसाठी	कालावधी
१.	फुल पॅन्ट (नेव्हिब्ल्यू/खाकी)	रेमंड/विमल	०२ नग (सुपेरियर क्वॉलिटी	०२ नग	दर वर्षी
२.	टयूनिक कोट (-//-)	-//-	०२ नग	०२ नग	दर दोन वर्षांनी
३.	शर्ट फुलबाहीचे (स्काय ब्ल्यु/खाकी)	-//-	०३ नग (पांढरा)	०२ नग	दरवर्षी
४.	बनियन (मनपाचे नांव चिन्हासह)	सुपरिअर	०३ नग	(स्काय ब्ल्यू) ०३ नग	दरवर्षी
५.	पायमोजे (नायलॉन सुपरियेर)	-//-	०३ जोड	०३ जोड	दरवर्षी
६.	बॅरेट कॅप (सर्व ब्ल्यू)	-//-	-//-	०१ नग	दरवर्षी
७.	टाय (नेव्हि ब्ल्यू)	-//-	०१ नग	-//-	दरवर्षी
८.	शीटी व दोरी	-//-	०१ नग	०१ नग	आवश्यकते नुसार
९.	लेदर बुक (जोधपुरी/काळे)	-//-	०१ नग	०१ नग	दरवर्षी
१०.	पी. टी. शुज	-//-	-//-	०१ जोड	दरवर्षी
११.	पी. कॅप	-//-	०१ नग	-//-	दर २ वर्षांनी
१२.	गमबूट	-//-	०१ जोड	०१ जोड	-//-
१३.	रेन कोट (टोपीसह काळा)	-//-	०१ नग	०१ नग	-//-
१४.	उलनजर्सी (नेव्हिब्ल्यू)	-//-	०१ नग	०१ नग	दर २ वर्षांनी
१५.	लेदर बेल्ट (काळा/प्लेट व क्लिपसह)	-//-	०१ नग	०१ नग	आवश्यकते नुसार
१६.	कॅनव्हॉस बेल्ट	-//-	०१ नग	०१ नग	आवश्यकते नुसार
१७.	कॅप शेल्टर बॅजेस	-//-	०२ सेट	०२ सेट	आवश्यकते नुसार

१८.	कोट बटन्स (एनएमएकरास)	-//-	०२ सेट	-//-	आवश्यकते नुसार
१९.	हेल्मेट	-//-	०१ नग	०१ नग	आवश्यकते नुसार
२०.	नेमप्लेट	-//-	०१ नग	०१ नग	आवश्यकते नुसार
२१.	आयडेन्टीटी कार्ड (वॉटर प्रुफ)	-//-	०१ नग	०१ नग	आवश्यकते नुसार

टीप :

१. सब ऑफिसर व त्यावरील पदांसाठी-यामध्ये सहा ऑफिसर, स्टेशन ऑफिसर, फायर ऑफिसर (उपप्रमुख अ. शा.अधिकारी) आणि अग्निशमन दल प्रमुख ही पदे अभिप्रेत आहेत.

२. इतर सर्व पदांसाठी यामध्ये लिंडीग फायर मन, वाहनचालक फायरमन, टेलिफोन ऑपरेटर, क्लिनर इत्यादी पदे अभिप्रेत आहेत.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा स्थगित केल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १५ मार्च २००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शनिवार दिनांक १५ मार्च २००३ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंद मातरम् " या गिताने सभेस सुरु झाली. या सभेस संबंधित अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

१.	स. स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष	स. सदस्य
२.	स. स. श्री. मीर हिदायत अली	-//-
३.	स. स. श्री. शिंदे किशारे रावसाहेब	-//-
४.	स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू	-//-
५.	स. स. श्री. ओक जयवंत केशवराव	-//-
६.	स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव	-//-
७.	स. स. श्री. डॉ. आशा उत्तम बिनवडे	-//-
८.	स. स. श्री. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर	-//-
९.	स. स. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे	-//-
१०.	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
११.	स. स. श्री. चंद्रशेखर जैस्वाल	-//-
१२.	स. स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग	-//-

विषय क्र. २३/१ :

(दिनांक १५ फेब्रुवारी ०३ च्या सभेतील विषय क्र. ७२ पुढील सभेत ठेवण्याचा निर्णय झाल्यानुसार औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना अंमलबजावणी अहवाल)

औरंगाबाद महानगरपालिका विरुध्द दिगंबर रावळ (याचिका क्रमांक १९१०/२००२) व औरंगाबाद महानगरपालिका विरुध्द गट्टणी (याचिका क्रमांक ५३१/२००२) संदर्भाने दिनांक २२-०७-०२ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आलेली होती. त्या संदर्भाने मा. न्यायालयाने आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना न्यालयात उपस्थित केले होते. त्यानुसार सुनावणी त्यावेळी मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद तसेच विशेष भुसंपादन अधिकारी सहाय्यक संचालक नगररचना हे उपस्थित होते. सुनावणीचे वेळी मा. न्यायालयाने सांगितले की, सन १९७५ पासून आरक्षणातील जमिनी महापालिका ताब्यात घेत नाही किंवा त्यांचा मोबदलाही देत नाही. त्यामुळे नागरिकांच्या जमिनी अडकुन पडत आहेत व सदरील मिळकतीच्या हक्काबाबत नागरिका वंचित राहत आहेत. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने सहा महिन्यांच्या आंत भुसंपादन अधिकारी यांच्याकडे २/३ रक्कम जमा करावी. तसेच औरंगाबाद शहरासाठी असलेली विकास योजना अंमलबजावणी कशी करणार आहेत. याबाबत महानगरपालिका आयुक्तांनी अंमलबजावणी आरखडा दोन महिन्याचे आत न्यायालयात सादर करावा.

उपरोक्त आदेशान्वये मा. आयुक्तांनी वेळोवेळी संबंधित अधिकारी, मुख्य लेखाधिकरी, सहय्यक संचालक नगर रचना शाखा औरंगाबाद तसेच संबंधित विधिज्ञ यांचे बरोबर घेतलेल्या बैठका व सदरील बैठकानंतर दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे विकास योजना

अंमलबजावणी अहवाल तयार करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर विकास योजना अंमलबजावणीचा अहवाल तयार करण्यात आला आहे. सबब औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना अंमलबजावणी अहवाल स्थायी समिती समोर सादर.

संवाद :

मा. सभापती : शहराच्या विकास आरखडयाबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी विस्तृत चर्चा करावी.

श्री. जयवंत ओक : सदरील बैठक ही शहर विकास आरखडयासारखी आहे की, भुसंपादनाची आहे याबाबत माहिती दयावी. भुसंपादनाच्या प्रक्रियेबाबत एक व्यक्ती कोर्टात गेलेली आहे आणि कोर्टाच्या आदेशाप्रमाणे प्रशासन काय कार्यवाही करीत आहे. किंवा कोर्टाने दिलेले आदेश काय आहेत. कृपया याची माहिती दयावी आणि कोटीने भुसंपादनाच्या प्रक्रियेबाबत जर का डायरेक्शन दिलेले असेल तर मग भुसंपादनाच्या बाबतीचेच तेवढा मुद्दा आपण चर्चेला होऊन तेवढी माहिती कोटीसमोर सादर करावी अशी माझी विनंती आहे व याबाबतचा खुलासा सभागृहात द्यावा. भुखंडाबाबत आजच्या शहर विकास आरखडयांच्या बैठकीत जर चर्चा करीत आहोत तर या संदर्भाने कोर्टाचा काय आदेश आहे. आपण या ठिकाणी सांगावे. त्यानंतर पुढील चर्चेला सुरुवात करता येईल. मी सभागृहात काही मुद्दे लेखी स्वरुपात मांडत आहे. त्याचा खुलासा व्हावा.

मा. सभापती : स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी लेखी स्वरुपात जे मुद्दे मांडले (१ ते १४) त्यानुसार सहाय्यक संचालक नगर रचना यांनी माहिती दयावी.

सहा संचालक नगर रचना : स. सदस्यांनी जे १४ मुद्दे मांडलेले आहेत. त्यापैकी सर्व मुद्यांबाबत माहिती देता येणार नाही. तर काही मुल्यांबाबत मला अभिलेख पाहुनच विस्तृतपणे माहिती मांडता येईल.

०१. बैठक विकास आरखडयाची आहे की, भुसंपादनाची आहे.

०२. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ मधील तसुदी नुसार शहर विकास आरखडा संचालक तसेच शासनाची मंजुरी आहे काय या विकास आराखडयास शासनाची मंजूरी आहे. सदरची मंजूरी ॲडीशनल एरियासाठी १०-१०-९१ रोजी देण्यात आली आहे व एक्स्टेन्डेड पोर्शन (वाढीव हद्द) ला मंजूरी १७-०८-०२ रोजी देण्यात आली आहे.

०३. मा. उच्च न्यायालयास सदर आरखडयास मंजूरी नसतांना कसा व कसा दर करण्यात आला. याबाबत कोटीचे आदेश आहेत काय? सदरील आराखडयास मंजुरी आहे. मंजूरीविना कोर्टाला आपण कोणताही अहवाल सादर केलेला नाही. आपल्या समक्ष सभागृहात जो अहवाल देण्यात आलेला आह. तो मंजूर विकास आरखडयातील अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून जी प्राथमिक भूसंपादनाची कार्यवाही आहे त्याचा आपण आगामी दहा वर्षाकरीता कालबध्द कार्यक्रमाचा अहवाल सादर केलेला आहे. तथापी हा अहवाल सादर करीत असतांना पुरवणी ब व क यामध्ये आपण विकास योजनेतील सर्व आरक्षणे व रस्त्यांची विस्तृतपणे.

०४. सदर विकास आरखडा सर्वसाधारण सभेत चर्चेला आला होता काय? व मंजूर आला आहे काय? व मंजूर केल्यावर स्थायी समिती समोर येण्याची आवश्यकता आहे काय? एम. आर. टीपी ॲक्ट १९६६ मधील

तरतुदीत विकास योजना तयार करतांना या सर्व वैधानिक बाबी आहेत. त्यासर्व तरतुदीचे अनुपालन केलेले आहे. मंजूर विकास योजना हा नियोजन प्राधिकरण म्हणुन मा. सर्वसाधारण सभेत तो सादर करण्यात आलेला होता. तद्नंतरच विकास आरखडयास शासन स्तरावरच मंजूरी देण्यात आलेली आहे.

०५. सदर विकास आराखडा स्थायी समिती सभेमध्ये मंजूर झाल्यावर सर्वसाधारण सभेत पाठविणार आहात काय प्रश्न क्र. २ चे उत्तर देत असतानांच मी सांगितले आहे की, विकास योजना मंजुर करण्यात आलेली आहे. मंजुर विकास योजनेतील आरक्षणाच्या अंमलबजावणीचाच फक्त या ठिकाणी गोषवारा चर्चेत आहोत. विकास योजनांच्या सर्व बाबींची वैधानिक पुर्तता झालेली असल्याने पुन्हा आता कुठल्याही प्रकारची मंजूरी विकास योजनेच्या दृष्टीकोनातून आता आवश्यक नाही.

०६. सदर विकास आराखडयाची प्रशासनाने छाननी केलेली आहे काय? याचे उत्तर या सर्व वैधानिक बाबींची पुर्तता केलेली आहे आणि नियोजन प्राधिकरणाची सुध्दा या विकास आराखडयास मंजुरी असल्या कारणाने हा प्रश्न उपस्थित होत नाही.

०७. विकास आराखडयाच्या अंतर्गत होणाऱ्या भुसंपादनाच्या प्रकरणात ज्या ठिकाणी Join-Measurment सारख्या कार्यवाही झालेल्या नाहीत, अशी प्रकरणे या वर्षात २००२-२००३ या वर्षात पुर्ण करु नये.

स. सभागृहाच्या निर्दशनास एक बाब आणु इच्छितो की, विकास आरखडयात दर्शविण्यात आलेले कुठलेही आरक्षणे अथवा रस्ते यांची संयुक्त मोजणीची कार्यवाही करण्यात आलेली नाही. कुठल्याच आरक्षणाची अथवा रस्त्याची संयुक्त मोजणी करण्यात आलेली नसल्याने हा प्रश्न या ठिकाणी विचार करावा लागणार आहे.

०८. सदर विकास आराखडा तयार करत असतांना १९७५ मधील झालेले बरल विचारात घेतले आहेत काय? एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ तहत पुर्वी दरमहा वर्षाला विकास योजना ही सुधारीत करणे क्रम प्राप्त होते. सुधारीत विकास योजना तयार करतांना मंजूर रस्त्याला विद्यमानजी विकास योजना आहे, याचा देखील विचार होतो. तसेच (राक्सी स्टॉंग लँड ग्रुप) म्हणजे विद्यमान जमीन वापर या बाबीचा सुध्दा विचार होईल. तद्नंतरच प्रारुप आरखडा तयार होतो. आणि प्रारुप आरखडयावरती आलेल्या चर्चेनंतर प्लॅनिंग ॲथॉरिटीच्या मान्यतेनंतर सुचना/हरकतींची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर शासन स्तरावर विकास योजनेला अंतिम स्वरुप येते. या शहराचा विकास आराखडा व शासन स्तरावर मंजूर झालेला आहे.

०९. च्या विकास आराखडयात जे बहल झालेले आहेत. त्या बदलाची माहिती स. सदस्यांना तसेच स्थायी समिती सदस्य यांना देण्यात आलेली काय या प्रश्नाचे उत्तर पुनश्च तेच आहे. विकास योजना सुधारीत करतांना नियोजन प्राधिकरणा समक्ष हा विषय चर्चेला येतोच. तसेचआज जनतेच्या सुचना व हरकती या सर्वच अपेक्षील्या जातात. याचाच मतितार्थ असा आहे की, सर्व संबंधितांना सुधारीत विकास योजनेतील होऊ घातलेल्या सर्व बदलाबद्दल माहिती जकात करुन दिलेली आहे.

१०. शासनाने गुंठेवारीचा कायदा मंजूर केलेला आहे. त्यानुसार हा विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे काय? शहराचा विकास आराखडयास किंवा डेव्हलपमेंट प्लॅन आणि गुंठेवारी कायदा या दोन स्वतंत्र बाबी आहेत. विकास योजनाही एकंदरीत या शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक उपयोगाकरीता आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा विचार करुन विकास योजनेची कार्यवाही होत असते. आणि हा कायदा १९६६ चा आहे. गुंठेवारी विकास कायदा हा नुकसान शासनाकडुन शहरामध्ये होत असलेल्या अनाधिकृत विकासांना वैधानिक स्तरावर मान्यता देण्याच्या दृष्टीकोनातून कायम करण्यासाठी तसेच शहरामध्ये आज अनाधिकृत विकास होत आहे, त्याला आळा बसविण्याकरीता हा नुकताच अंमलात आणलेला आहे. म्हणून एम.आर. टी. पी. ॲक्ट लढत तयार घेणाऱ्या विकास योजना तयार करतांना गुंठेवारी कायदयाची कुठल्याही प्रकारची दखल होण्याची अजिबात आवश्यकता नाही व तशी नव्हती.

११. ही बैठक भुसंपादनाची आहे की, विकास आरखडयासाठी आहे? मुलतः आज आपण ज्या अहवालावर चर्चा करीत आहोत त्याचा उगम आधी विचारात होणे आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठातील याचिका क्र. १९१०/२००२ व याचिका क्रमांक ५३१/२००२ या प्रकरणांमध्ये हितसंबंधी व्यक्तींना मा. न्यायालयाच्या एक बाब निदर्शनास आणून दिली की, विकास आराखडयातहत त्यांच्या जमिनी ज्या प्रकल्पासाठी बाधीत आहेत. त्यानुसार २५ वर्षापासून विकास आराखडयाच्या नावाखाली त्यांना त्यांच्या जमिनीचा उपभोग होता आलेला नाही. त्या जमिनी महानगरपालिकेत किंवा नियोजन प्राधिकरणाने संपादीत न केल्यामुळे त्यांचे अतोनात नुकसान होत आहे. त्यांना कुठल्याही प्रकाराचा मोबदला मिळालेला नाही. उक्त याचिकेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने महानगरपालिकेस निर्देश दिले की, विकास योजनेतील जी आरक्षणे आहेत ज्याची भुसंपादनाची कार्यवाही प्रलंबीत आहे. अशा सर्व प्रकरणांचा विस्तृत गोषवारा सादर करणे बाबत आदेश दिले होते. सदरहू आदेशाच्या अनुषंगाने हा अहवाल आपण सादर केलेला आहे. म्हणून ही सभा विकास आरखडयातील विविध आरक्षणे यांनी बाधीत होणाऱ्या मिळकतीच्या भुसंपादनासंदर्भात एक कालबध्द कार्यक्रमाचा अहवाल सादर करणे संदर्भात चर्चा होत आहे.

१२ मा. उच्च न्यायालयात सदर प्रकरणी आयुक्तच नगररचनाकार यांनी शपथपत्रावर निवेदन सादर करावयाचे आहे तेव्हा त्यांची या सभेत उपस्थिती आवश्यक आहे. सदरहू सभेस मा. आयुक्त मी. स्वतः (सहा. संचालक नगररचना) उपस्थित आहे.

१३. एम. आर. टी. पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२७ नुसार आतापर्यंत महानगरपालिकेस किती नोटीसा प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी किती नोंटीसावर कार्यवाही करण्यात आली. प्रलंबीत किती प्रकरणे आहे व प्रशासनाची काय भूमिका आहे सदर प्रश्नाची विस्तृत माहिती देण्यासाठी मला माझ्या अभिलेखाची माहिती घेणे. तपासणे आवश्यक आहे.

१४. शहराच्या विकास आराखडयातील आरक्षीत जागेवर रस्ता रुंदीकरणात बाधीत होणाऱ्या घरांच्या बाबतीत पर्यायी व्यवस्था अथवा त्यांना मोबदला देणेचा काय प्रस्ताव आहे. मला वाटते या प्रश्नाबाबतच या ठिकाणी

आपण चर्चा करीत आहोत. आपणासमक्ष सादर केलेला अहवाल यामध्ये दोन्ही बाबींचा समावेश आहे. ज्या प्रकरणामध्ये भुसंपादनाची कार्यवाही चालु आहे. त्यांना देय असलेल्या मोबदल्याचे आगामी दहा वर्षासाठी नियोजन आपण या ठिकाणी दाखविलेले आहे.

श्री. जयवंत ओक : विकास आरखडयाप्रमाणे शासनाची मंजूरी व डायरेक्शन आपल्याला मिळाले व सभागृहाने मंजुरी दिली मग पुन्हा स्थायी समितीपुढे प्रस्ताव का आणला. कालच्या बैठकीत असे सांगितले की, आम्ही स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवला यास मंजूरी द्यावी. त्यानुसार प्रस्ताव ठेवता येईल असे वक्तव्य सभागृहात झालेले होते. याबाबत कोर्टाचे काय आदेश आहेत ते सभागृहात दाखवावे. रावळ नावाची व्यक्ती कोर्टात गेली होती व भुसंपादनासाठी त्यांनी कोर्टात केस टाकली आहे.

मा. आयुक्त : शहराचा विकास आराखडा कसा तयार होतो हे आपल्या सर्वांना माहित आहेत. सन १९७५ हा प्रथम आराखडा मंजूर झाल सदरील आराखडा यामधील विकास आरखडयातील दाखविलेली आरक्षणे जी विविध प्रकारचे असतात. रोडचे संदर्भात आरक्षण आहेत. शहराच्या सुदंरतेने आरक्षणे असतात. शाळा, उदयाने, खेळाचे मैदान, यलो झोन, ग्रीन झोन, अशा प्रकारे आरक्षणे असतात. यानंतर सन १९९१ ला केलेला विकास आराखडा वाढीव दृष्टीचा हद्दीचा २२ चा २००२ च्या दुरुस्त्या यामधील मध्येमध्ये नागरिकांचे ऑब्जेजन वगैरे असतात. आक्षेप असतात. ते सर्व नोंदवून शासनाकडे पाठवावे लागतात. व अंतीम मंजूरी ही शासनाचीच असते. आपण चर्चा करीत असतांना विकास आराखडा म्हणायचा किंवा भुसंपादन म्हणायचे मला असे म्हणायचे आहे की, विकास आराखडा तयार करीत असतांना बदल करण्याचा अधिकार जसा मला नाही आहे तसा महापालिकेलाही नाही आहे. कारण की तो आराखडा शासन स्तरावर मान्य झालेला आहे. अधिकार असतो महापालिकेला परंतु सुचना व हरकती घेवून शासनाकडे पाठवावयाचे असते. व त्यास अंतीम मंजूरी शासन होत असते. यामध्ये आपण काहीही करु शकत नाही. यामध्ये पृष्ठ क्र. ६ बघितले असता यातील काही गोष्टी मी स्पष्ट करु इच्छितो. मात्र मा. उच्च न्यायालयात जे प्रकरण आले होते जसे ए. डी. टीपी यानी सांगितल्याप्रमाणे विकास आराखडयाने जे बाधीत झालेले (रोड मधील बाधीत झालेले घरे) त्यांना कम्पेन्सेशन द्यावयाचे असते. म्हणजे कुळ संकल्पना ही आरक्षणाच्या भुसंपादनातील आहे. सध्या कोर्ट प्रकरण असल्याने वृत्तपत्रात देण्याची गरज नाही. यामध्ये वाद निर्माण होऊ नये. याबाबत Argument आहेत की, आमचे २५-२५ वर्ष आरक्षणे आहेत. केव्हा पुर्ण होणार आम्ही ना विकु शकत ना बांधू शकत. कारण सदरील जागा आरक्षणात दाखविलेली असल्याने आपली ताकत किती आहे हे आपण समजून घ्यावयास पाहिजे. आपले अंदाजपत्रक १२८ कोटीचे असले तर एम. आर. टी. पी. ॲक्ट अन्वये त्यातील ५ किंवा १०% रक्कम खर्च केली पाहिजे. परंतू यासाठी अंदाजपत्रकात तशी तरतूद होणे आवश्यक आहे. आरक्षणाचे बाबतीत भुसंपादनाचा मोबदला देणे बाबत आधी कुणाचे द्यावे. ज्याची जमिन आरक्षीत भुसंपादनाचा मोबदला देणे बाबत आधी कुणाचे द्यावे. ज्याची जमिन आरक्षीत केली व नोटीस दिली त्याची की, जो कोर्टात गेलेला आहे त्याची यासाठी

आपण विकासात्मक बाबीकडे आपण पहावे व आरक्षीत जमिनीचे भुसंपादन करावे. याबाबत तीन पर्याय आहेत. १) कॉस्ट कमी होणे, २) एफ. एस. आर. देऊन ७५:२५ ला ॲकोमोडेशन देऊन किंवा (३) ट्रान्सफर ऑफ डेव्हलपमेंट राईटसचा याबाबतचा निर्णय घ्यावा जेणे करुन ९१० ते ९२० कोटींची कॉस्ट आपण आजच्या घडीला काढलेली आहे. आणि कोटीने असे सुचविलेले आहे की, १००% आरक्षण तुम्हाला करावे लागेल. लोकांना तुम्ही कसे सांगणार आरक्षणावर तुम्ही जर जास्त प्रमाणात खर्च केले तर विकास कामावर आपण काहीही खर्च करु शकत नाही. आणि १००% आरक्षणावर भर द्यावयाचे झाल्यास आपल्या सर्वांवर कशाच्या माध्यमातून भर पडण्याची शक्यता आहे आणि यासाठी आपल्या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार आरक्षणावरील खर्च तुम्ही किती करु शकाल हे म्हणण्याचा आयुक्तांना काहीही अधिकार नाही. कारण की, जे आरक्षण दाखविलेले आहे त्या आरक्षणाची १००% अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते. आर्थिक परिस्थितीने आम्ही करु शकत नाही असे आपण कुठेही म्हटलेले नाही. आम्हाला आर्थिक मदत झाली तर १०० कोटी रुपयाचा करु शकतो. दर वर्षाचा आमचा उत्पन्नाचा किती भाग होईल. येत्या दहावर्षामध्ये १०% व १५% जर अंदाजपत्रकात रक्कम खर्च करण्याची तरतुद ठेवली तर आणि राहीलेल्या पैकी पैशाची मदत कुठल्या स्वरुपातील सोसैसने झाली वि ज्यावेळेस वेगवेगळया सुविधा आहेत. टी. डी. आर. वगैरे वगैरे ह्याच्यातून जेवढे कामे होईल. तेवढे कामे करुन आपण हे अंमलबजावणी करु शकतो. परंतु पैसे मिळाले पाहिजेत. यासाठी आम्ही शासनास सुध्दा कळविलेले आहे की, पैशाची जर मदत झाली तर आरक्षणाची १००% अंमलबजावणी करणे योग्य होईल पण या सर्व प्रकरणांमध्ये आयुक्तांना त्यांच्या अधिकाराची आणि कर्तव्याची जाणीव निश्चित ठेऊन करावी लागणार आहे कारण आपण पृष्ठ क्र. ६ जर पाहिजे तर यामध्ये स्पष्टता केलेली आहे की, शहराचा महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ नुसार तयार होत असल्याने त्यास शासनाने अंतीम मान्यता दिलेली असल्याने त्याची अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे. करीता सदरील विकास आराखडयात आयुक्तांना बदल करता येत नाही. कोर्टाचे सुध्दा असे म्हणणे होते की, तुम्ही किती कराल व किती करणार नाही परंतू तुम्हाला काहीही बदल करता येणार नाही व मलाही काही बदल करता येणार नाही हा एक असून, दुसरा भाग म्हणजे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम हा कायदा आहे. त्याच्या तरतुदी माझ यासमोर आहेत की, मी किती पैसे कोणत्या कामावर खर्च करावयाचे याबाबतचे अधिकार अधिनियमातील कलम २६ प्रमाणे हे अधिकार स्थायी समितीस आहेत आणि सदर तरतुदीचे सर्वसाधारण सभा फेरफार करण्याची तरतुद आहे. म्हणजे स्थायी समिती व सर्वसाधारण सभा त्यामुळे प्रस्तावित नियोजनात तरतुद २१.६.४८ लाख दर्शविलेली आहे. सदर बाबही स्थायी समिती व सर्वसाधारण सभेस आधीन राहील आणि केलेले सर्व नियोजन हे स्थायी समिती व सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात येतीदल. तेव्हा कोर्टाने दोन महिन्याची मुदत दिली त्या नियोजनाचे काय कारण खर्चाबाबतचे सर्व अधिकार स्थायी समितीचे मान्यतेचे होत असल्याने ते सभेमसोर ठेवणे आवश्यक आहे कारण ९००.०० कोटीचे नियोजन आम्ही

करु शकणार नाही. पण आपणी अडचण काय आहे ती सदस्यांसमोर मांडली पाहिजे. म्हणजेच भुसंपादन हा मुळ गाभा आहे. यामध्ये नियोजनात बदल करण्याचा प्रशासनाचा कोणताही हेतु नाही. यासाठी स्थायी समितीला काही सुचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्या सभेसमोर जरुर कराव्यात.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : पृष्ठ क्र. ८१ मध्ये पुरवणी पत्रिकेवरील वाहनतळ औरंगपुरा दाखविलेले आहे. याबाबत सविस्तर माहिती दयावी.

मा. सभापती : सबंधित अधिकाऱ्यांची माहिती दयावी.

नगररचनाकार : सदरील वाहनतळ दोन दाखविलेले जरी असतील तरी एक साईट क्र. ५८ व एक साईट क्र. ५९ असा आहे. याबाबतचे लोकेशन डी. पी. प्लॅन पाहुन दाखविता येईल.

मा. सभापती : स. सदस्य यांना याबाबतची एक प्रत द्यावी.

श्री. जयवंत ओक : स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर माझे असे मत आहे की, जे आरक्षणे दाखविली आहेत. त्यावर आता १००% घरे होऊन वसाहती आलेल्या असतील. परंतू आरक्षणे जे आपण कागदपत्रे दाखविलेली आहेत. ते खरोखर पोकळ आहे का? यासाठी आम्हाला नांवासह यादी जर दिली असती तर बरे झाले असते. आता यादी नंतर देऊ असे सांगितले. भुसंपादनाबाबत मा. आयुक्त यांनी जी माहिती सांगितली त्याबाबत आम्ही पुर्णपणे सहमत आहोत. यामध्ये फेरकार बदल करता येणार नाही हे सर्व ठिक आहे. परंतू शासनास आपण २५ वर्षापासून का वळविलेले नाही की, विकास आरखडा हा ७५ पासून २००९ पर्यंत या प्रशासनाने कळवु शकले नाही. जसे की, शासनाचे निर्देशान्वये १९९५ पुर्वीचे गुंठेवारीबाबत निर्णय अपेक्षीत आहे. तसे प्रशासनाने सभागृहाला कळविणे आवश्यक होते जसे की, बऱ्याचशा भागात आरक्षीत जागा दाखविल्या आहेत. त्या ठिकाणी दवाखाना नाही. पुर्नवसनसाठी जागा आरक्षीत आहे. जागेवर अगोदरच पुनर्वसन अगोदरच झालेले आहे. अशी बरेचशे प्रकरणे आहेत की, आपण ॲक्ट प्रमाणे फेरफार करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेमध्ये प्रकरण ३७ अन्वये सदस्यांना आहेत ते करता येतील का? गुंठेवारी प्रकरणात विकास आरखडयानुसार डी. पी. रोडवरील जी घरे आहेत ते भविष्यात रस्त्यात बाधीत होणार घरे पाडुन त्यांना पर्यायी व्यवस्था देणार आहात काय? यासाठी आरक्षणे वगैरे वगळण्यात आहात काय? एखादया वेळेस सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव येतात आणि आरक्षणातून वगळले जातात व शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवून ती वगळल्या जाते तसे आपण करणार काय? बरेचसे आरक्षणाच्या जागा या रिकाम्या आहेत व तरीही आपण त्या जागा वगळतो हे किमतप शक्य आहे. एखादया भुखंडावर शैक्षणिक झोन आहे ते उचलुन तिसऱ्या ठिकाणी टाकल्या जाते हे कसे काय? त्या शैक्षणिक झोनवर घरे झालेली आहेत. उदा.स. स. श्री. जैस्वाल यांनी जसा प्रश्न उपस्थित केला की, आरक्षीत जागेवर घरे झालेली आहे. त्याप्रमाणे असू शकते.

मा. आयुक्त : विकास आराखडा ही एक बाब आणि या विकास आराखडयावर अतिक्रमणे होणे ते घरे न पाडणे ही दुसरी बाब आहे याबाबत खुलासा असा की, मो. रंगारगल्ली रोडवर आरक्षण दाखविलेले आहे. पण घरे अजुन तोडलेली

नाहीत कारण त्या ठिकाणी भुसंपादन व्हावयाचे आहे. एखादया स. सदस्यांनी दाखविले की, या ठिकाणी ही अ नावाची जागा आरक्षीत आहे. परंतू त्या ठिकाणी घरे आहे ही वस्तुस्थिती आहे. पण त्यामुळे आजच्या घडीला आरक्षण बदलले नाही. आरक्षण राहील व महापालिकेला आरक्षणाबाबत दहा वर्षापर्यंत जो काही नियोजन शासनाला पाठवावयाचे असते त्यापैकी किती ठेवायचे यामध्ये दुसरे का बादल करायचा ही भुमिका मांडुन ते शासनाकडुन बादल करुन घ्यावे लागणार आणि ज्या ठिकाणी आरक्षणाच्या जागेवर अतिक्रमण असेल तर जी काढण्याची जबाबदारी भुसंपादन करुन मनपाची आहे. अनाधिकृत बाबतीत निश्चितपणे आपल्याला आरक्षणाच्या ठिकाणी कार्यवाही करता येईल. मा. आयुक्त महोदय यांनी सांगितल्याप्रमाणे एखादी जागा आहे. रंगारगल्ली येथील डी. पी. प्लॅनच्या रोडमध्ये आमचे म्हणणे भुसंपादनाच्या बाबतीत काहीही नाही. आपण सदरची जागा भुसंपादन करुन घ्यावे. एखादी जागा आहे आणि ती मनपाची नाही ती जागा आरक्षीत दाखविलेली आहे मी काल बोलल्याप्रमाणे विकास आराखडा तयार करतांना हे एखादया बंद खोलीत तयार करण्यात आलेला आहे. म्हणजे संबंधित जागेवर गेले असते तर, चित्र पुर्णपणे स्पष्ट दिसले असते की, जनतेची घरे त्या ठिकाणी झालेली आहेत. तसे पाहता आजच्या घडीला शहरात ११४ अनाधिकृत वसाहती आहेत. ५२ झोपडपट्टया या ठिकाणी आहेत तर ५२ स्लम सरकारी जमिनीवरील आहेत व अनाधिकृत वसाहत्या या प्रायव्हेट जागेवरील आहेत. ही जो आरक्षणे आहेत ती आरक्षणे बिंबविल्या गेलेली आहेत. ज्या मनपाच्या जागेवर अतिक्रमणे आहेत. ती मोकळी करण्यास हरकत नाही. त्याबाबत आमचे दुमत नाही. ज्या जमिनी आपल्या नाहीत. ज्या जमिनीचा मनपाशी काही संबंध नाही आणि त्या ठिकाणी घरे झालेली आहेत. गेल्या २०३० वर्षापासूनची आहेत. त्यांना मनपाने सर्व सुविधा दिलेल्या आहेत. तरीही त्या जागेवरील आरक्षणे या ठिकाणी दाखविल्या गेलेली आहेत. मग आपण ३७ च्या नियमान्वये काही प्रमाणात बदल / फेरफार करुन शासनाकडे आपण पाठविणार आहेत काय?

मा. आयुक्त : प्रथम सर्व लोकांच्या हातात शहराचा विकास आराखडा आहे. ही एक ताकत आहे. आता आपल्याला प्रत्येक गोष्टीची छाननी करता येईल. आज आपण जनतेला सांगु शकतो की, कोणत्या जमिनीवर जागा आरक्षीत आहे. कोणती जागा खजगी आहे. याचा वापर करुन आपण चांगली कामे करु शकतो. आपल्या ज्या सूचना आहेत त्या सन २००५ च्या विकास आराखडयापैकी एक प्रकारे चांगले काम करण्याची संधी आहे. यासाठी तुम्ही सुध्दा सांगू शकाल जनतेला व एक जनमत तयार होऊ शकेल.

श्री. जयवंत ओक : आयुक्त महोदय आपल्या निदर्शनास एक बाब आणून देऊ इच्छितो की, ज्या ज्या स. सदस्यांनी प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये ठेऊन मंजूर करुन घेतले व शासनाकडे अंतीम मंजूरीसाठी गेलेले आहेत. शासनाकडुन मंजूरीपुर्वी काहीचे आक्षेप नोंदविलेले असल्यास पुर्ण विचारार्थ नोटीस दयावी लागते त्याप्रमाणे आक्षेप आम्ही नोंदवूनही त्या संबंधाने काहीही झालेले नाही. कारण त्याबाबत आम्ही आक्षेप नोंदवूनही काहीही आले नाही. व प्रकरण जसेच्या तसेच आहे. त्याठिकाणी आरक्षणाच्या जागेवरील घरे जसेच्या तसेच आहेत. आपण म्हणाला की, विकास आरखडा सन २००५ मध्ये होईल तेव्हा

त्यावेळेस आम्ही सुध्दा काढावा का असा प्रश्न उपस्थित होतो व त्यावेळी आरक्षणे बाबत पुन्हा निर्णय होईल का मग आक्षेप कधी घेणार?

मा. आयुक्त : आक्षेपाबाबत मी आपल्याला सांगु इच्छितो जेव्हा शहराच्या विकास आरखडयाबाबत जाहीर नामा निघतो. जेव्हा आक्षेप घेतात. त्याचा एक कॉस्मेट आहे त्या नांव लिहावा लागतो. त्यांनी काय आक्षेप घेतले त्याबाबत सुनावणीसाठीची प्रोसेस आहेत. हे सर्व तयार करुन महानगरपालिकेच्या दृष्टीकोन झालेल्या तक्रार धारकांचे आक्षेप हे सर्व पहावे लागते व शासनाकउे पाठवावे लागते आणि शासन जेव्हा हो म्हणेल किंवा नाही त्यावेळेस निर्णय होतो व कार्यवाही केली जाते.

श्री. जयवंत ओक : आपण जे बोललात त्याबाबत कार्यवाही या महनगरपालिकेत केली जात नाही. सन १९७५ ला आक्षेप घेतलेला आहे. लोकनियुक्त प्रतिनिधी या महानगरपालिकेत सन १९८८ ला आली. त्यावेळेस सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर केले तरीही आतापर्यंत याबाबत अंमलबजावणी झाली नाही. आपले कडुन जे अपेक्षीत होते ते झालेले नाही ते जनतेची केले. यासाठीच शहराचा आरक्षणाबाबत सर्व्हे होणे अत्यंत आवश्यक आहे.

मा. सभापती : स. स. श्री. जयवंत ओक आपण केलेल्या सुचनांची या ठिकाणी नोंद घेतली आहे. शहराच्या विकास आराखडयाबाबत या ठिकाणी चर्चा चालू आहे आणि आर्थिक बाबतीत आपण मंजूरी द्यावयाची आहे. सन १९७५ ते ९५ व १९९५ ला रिवाईज्ड झालेला विकास आराखडा २००३-०३ मध्ये येत आहे तो कसा आला का याबाबतची चर्चा बाजुला जर ठेवली तर कुणामुळे येवो का येणे हा योगायोग म्हणावे लागेल आणि आला नाही तर आणखी पाच वर्षे कुठेतरी पडला असता यामध्ये जे काही मुद्दे दिले. ९१६.०० कोटी रु. महानगरपालिकेचे भुसंपादन करण्यसाठी ठेवलेले आहे. तर हा पैसा येणार कोठुन आणि आपण विकसीत करणार कसे हा मुद्दा प्रशासन व सर्व स. सदस्यासमोर येईल. त्याला लागूनच आपण दोन-चार मुद्दे दिलेले आहेत की, ज्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडु शकेल. ठेवलेल्या अंदाजपत्रकापेक्षा ५०% तरी उत्पन्न अपेक्षीत आहे. सन १९९५ ला रिवाईज्ड आराखडा मंजूर झालेला आहे. तेव्हा सन १९९५ ते २००८ पर्यंत या आराखडयाबाबत प्रशासनाने काय केले. याबाबतची सर्व जबाबदारी पदाधिकारी आणि स. सदस्यांची आहे काय? प्रशासनाला यासाठी काही चांगल्या बाबी आढळल्या नाही काय? प्रशासनाने जाहिरात द्यावयास पाहिजे होती की, असे किती भुखंड शहरात आहेत की, औरंगाबाद मनपातर्फे एफ. एस. आय. चा मुद्दा असेल, ७५:२५ चा मुद्दा असेल टी. डी. आरचा मुद्दा असेल काही मुद्दे आहेत की, ज्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडू शकेल. ठेवलेल्या अंदाजपत्रकापेक्षा ५०% तरी उत्पन्न अपेक्षीत आहे.सन १९९५ ला रिवाईज्ड आराखडा मंजूर झालेला आहे. तेव्हा सन १९९५ ते २००८ पर्यंत या आराखडयाबाबत प्रशासनाने काय केले. याबाबतची सर्व जबाबदारी पदाधिकारी आणि स. सदस्यांची आहे काय? प्रशासनाला यासाठी काही चांगल्या बाबी आढळल्या नाही काय? प्रशासनाने जाहिरात द्यावयास पाहिजे होती की, असे किती भुखंड शहरात आहेत की, त्यांना आरक्षीत मध्ये कुणाला एफ. एस. आयचा उपयोग दयावयाचा असेल अशा प्रकारे आपण जाहीरात देऊन विकास केला असता तर ९१६.००

कोटीचे अंदाजपत्रक आपले कमी झाले असते. ज्यावेळेस जर हे केले असते तर त्यावेळेसच शीघ्र सिध्दगणकाप्रमाणे पैसे द्यावे लागते असते आता ते भुसंपादन आपल्याला सन १९७५ मध्ये करावयाची गरप्प होती ते भुसंपादन सन २००४ मध्ये केलेले नाही आणि २०२५ मध्ये ही प्रक्रिया पुर्ण करावयाची झाल्यास त्यावेळेसची आर्थिक दराबाबतचे शीघ्र सिध्द गणकाची जबाबदारी कुणावर द्यावा किंवा कोण होईल यास कुणीही कारणीभूत नसून सर्वस्वी प्रशासन कारणीभुत आहे. चांगल्या कामासाठी आम्ही प्रशासनाला कुठेही थांबविलेले नाही. आमचे काही मतभेत असतील काही आक्षेप असतील. मात्र विकास कामांबाबत प्रशासनाला आम्ही कुठेही थांबविलेली नाही. या सर्व बाबतीत बोजवारा करण्याचे काय प्रशासनाने केलेले आहे कारण ९१६.०० कोटी लागणाऱ्या भूसंपादनाचे खर्चाबाबत प्रशासकीय यंत्रणा जबाबदार आहे. दुसरे असे की, ज्येष्ठ स. सदस्य यांनी जी चर्चा केली की, रस्त्याच्या आरक्षणावर रस्ता विकसीत झाला त्यावर तुमचे काय म्हणणे आहे. आज आपण याठिकाणी जे मुद्दे ठेवलेले आहेत. त्याप्रमाणे त्या ठिकाणी एखादी वस्ती आहे काय जसे स. सदस्य श्री. जैस्वाल यांनी सांगितले की, वाहनतळ नाही. आज कामाचा आराखडा व फक्त कागदोपत्री कसा राहील हे दाखविलेले आहे. मग आपण एक म्हणतो की, दरवर्षी आम्हाला अमुक करावयाचे मग ते वाहनतळ असेल. या वाहनतळावरील अतिक्रमण म्हणता येईल. मग तो तोडुन वाहनतळ करायचे का? यामध्ये दुसरी गोपट खेदाने सांगाविशी वाटते की, १०९ प्रकरणे जी शासनाकडुन मंजुर घेऊन आली तर हे शासन पण झोपलेले आहे. ज्याप्रमाणे आपण म्हणतो की, एका बंद खोलीत आराखडा तयार केला. म्हणावयाचे आहे की, जर तुम्ही शासनाला सुझाव दिला असता की, उदा. कैलासनगर या वसाहतीत खेळाचे मैदानासाठी आरक्षण आहे. मात्र आज ज्या ठिकाणी कचराकुंडी ठेवावयला जागा नाही. भानुदास नगर येथे प्राथमिक शाळेसाठी आरक्षण आहे तर तेथे आम्हाला गाडी चालवायला जागा नाही तर १०९ प्रकरणे शासनाने मंजूर केली त्यावेळी शासनाला वाटले नाही काय की, गोरगरीबांच्या वस्तीमध्ये आरक्षण आहे. ते जर आरक्षण काढले तर या भागातील गोरगरीब नागरिकांना न्याय मिळेल व ज्या भागासाठी आरक्षण आहे. त्या आरक्षणाबाबत न्याय मिळेल. जे शासनाने १०९ प्रकरणे आरक्षणाबाबत मंजूर केलेले आहे ती सर्व प्रकरणे मोठमोठया बिल्डर लोकांचे आहेत. राजकारणी लोकांचे आहेत. ते येथून उचलले आणि बदल केले. म्हणून मी शासनाचाही या ठिकाणी धिक्कार करतो कारण शासनाने नीट भूमिका समाजावून घेतली असती तर जसे की, २५ आरक्षणे आहेत ती गुंतवणूकीची आहेत. शासनाकडून आठ महिने पूर्वी पासून पत्र आलेले आहे. या झोपलेल्या प्रशासनाने (आम्हाला) सर्वसाधारण सभेत माहितीस्तव प्रत सुध्दा दिलेली नाही. जी प्रकरणे आहेत. शासनाने मंजूर केलेले त्यावर आम्ही आक्षेप नोंदविले नगररचना विभागाने आक्षेप नोंदवून शासनाकडे साद केले तरीही शासनाने काहीही न बघता मंजरू केले. क्रांतीचौक येथील रस्त्याच्या बाधीत जागेबाबत (मस्जिदच्या बाजूला) भाग-१ हा शासनाकडे पाठविला व भाग-२ हा थांबवून ठेवला. असा हा प्रकार प्रशासन व शासनाने नागरिकांना गोंधळुन टाकले व स्वत:ही गोंधळत आहे. त्यामुळेच ११६ ते ११७ कोटी रुपयांचा

बोजा मनपा प्रशासनावर भुर्दंड म्हणून पडत आहे. गुंठेवारी प्रकरणावर याबाबतचा मुद्दा उपस्थित झालेला होता. गुंठेवारी कायदा अंमलात आणित असतांना आरक्षीत जागेवर जर काही घरे असतील त्यांचे बाबतीत आपण काय करणार? आरक्षण उठविण्याचे अधिकार हे सर्वसाधारण सभेला आहेत असे त्यावेळी आम्हाला सांगण्यात आले. भानुदास नगर येथील आरक्षीत जागेच्या बाबतीत रद्द केली तर त्याची किंमत ७ कोटी आहे आणि हे गुंठेवारी अंमलबजावणीत मनपाचे रुपये ७ कोटी नुकसान होणार आहे. शासनाने याबाबत जर स्पष्ट भूमिका घेतली असती आणि असे जर १० प्रकरणे असतील त्यापैकी एक तरी प्रकरणावर विचार व्हावयास पाहिजे होते. तेव्हा शासनाकडुन १०९ प्रकरणे मंजूर घेऊन आलेली आहे. त्यावर मनपा प्रशासनाने शासनाकडे आपिल करावे. आम्हला ही सर्व प्रकरणे नामंजूर आहेत. प्रादेशिक नगररचना कार्यालयात या सर्व प्रकरणाबाबत आक्षेप घेऊन सुनावणी होणे आवश्यक आहे. कारण शहरातील कोणत्या भागात जागेवर उदयान, दवाखाने खेळाचे मैदान, शाहा आरक्षीत आहेत. मात्र त्यावर सध्या नागरिक घरे बांधून राहतात. त्यावर निर्णय होणे आवश्यक आहे. मंत्रालयातील अधिकाऱ्यांना या बाबतीत काहीही कल्पना नसते. ते येथील अधिकारीच स्पष्टपणे सांगतात पृष्ठ क्र. १०३ जालना रोड येथे प्राथमिक शाळा करावयाची आहे, असे यामध्ये नोंद आहे. याची रक्कम ठेवली. पृष्ठ क्र. ७२ मध्ये आरक्षण क्र. ३३१ प्राथमिक शाळा जालाननगर असे आहे आणि तेथे जालना रोड असे आहे. म्हणजे हे सर्व स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी म्हटल्याप्रमाणे बंद खोलीत कागदोपत्री कार्यवाही झालेली दिसते. पुन्हा यासाठी सर्व्हे होणे आवश्यक आहे. दुसरा मुद्दा म्हणजे १९७५ पासून आजपर्यंत भुसंपादनासाठी ४० कोटीचा खर्च झालेला असेल तर याची प्रायोरिटी काय? आहे याबाबत प्रशासनाने बारकाईने पाहणी केली आहे काय? जसे की, आज प्रशासनाने ३ कोटी रुपयांचे भुसंपादन केले. कोणते केले, महानगरपालिका कार्यालय ते लोटाकारंजा जर रस्ता मोकळा करावयाच्या झाल्यास मधला भाग सिटी चौक हा सोडुन दिला. जालना रोड व कैलासनगर यामध्येही लक्ष्मण चावडीया पार्ट घेतला, सोडून दिला. राममंदिर किराडपूरा ते रोषणगेट यामध्येही कुठेतही दोन प्रॉपर्टी घेतल्या व सोडुन दिल्या तर यास जबाबदार कोण राहणार सन १९७५ ते २००४ पर्यंत रु. ४०.०० कोटी खर्च भुसंपादन करण्यासाठी लागले असतील परंतू याला प्रायोरिटी नाही त्यास जबाबदार कुणास धरावे. शहरातील एक वर्षाला एकच प्रपोजल ठेवून प्रायोरिटीने काम करुन घ्यावे आणि यामध्ये पाच मुद्दे आमच्या समोर ठेवले. एक चांगली योजना जर आपण आपली आणि वर्तमानपत्रात जाहिरात दिली की, काही कालावधी टाकुन नागरिकांसाठी आरक्षीत जागेबाबत ७५:२५ बाबब प्रपोजल असल्यास एफ. एस. आय. ५% किंवा १०% माल करु अशा प्रकारची योजना आखल्यास सर्व आरक्षीत जागेवाले आपलेकडे येतील. आलेल्या नागरिकांना दिलासा मिळेल व त्यांना लवकर परवानगी द्यावी त्यांना एका महिन्यांच्या आंत अशी मुदत घालुन द्यावी आणि या झोपलेल्या शासनाने १०९ प्रकरणे मंजूर केली ती चुक आहे. त्याचा निषेध करतो. मोठमोठया बिल्डर्संना न्याय दिला गरीबांना न्याय मिळावा अशी अपेक्षा करतो. चेलीपूरा कॉर्नर पोलीस स्टेशन जवळील जागा

भुसंपादन करण्यासाठी पैसे देऊन तातडीने कार्यवाही व्हावी. जेणे करुन त्या ठिकाणी रस्ता रुंद घेऊन रहदारीचा मार्ग मोकळा होईल स. सदस्यांनी वेळोवळी झोपलेल्या शासनाबाबत वक्तव्य केले आहे. तेव्हा आरक्षणाबाबतचा विकास आराखडा किती वर्षा पासुनचा आहे. माझ्या वॉर्डात उदयाने व शाळेसाठी आरक्षीत जागा आहे त्यावर प्रशासनाने कार्यवाही केली नाही व हे शासन झोपलेले आहे असे वक्तव्य वेळोवेळी करीत आहे. हे शब्द सदस्यांना शोभा न देणारे आहे ते या सभागृहात सभापती पद भोगलेले आहे. त्यांचे तोंडून असे शब्द येणे अशी लांच्छनास्पद गोष्ट आहे. त्यांनी आपले शब्द परत घ्यावे. या शहराच्या आरक्षीत जागा ह्या गेल्या २५ वर्षापासूनच्या आहेत. चेलीपूरा ते आझाद चौक हा रस्ता भुसंपादनासाठी प्रक्रियेसाठी होता व तो सध्या थांबलेला आहे कारण काय तर आर्थिक बाबतीत भुसंपादनाच्या लागणाऱ्या पैशासाठी थांबलेला आहे. या रस्त्यावरील बाधी होणरे १.४७ लाग भुसंपादन कार्यालयाकडे पैसे १/३ ने जमा करावे परंतू गेल्या ५-६ महिन्यापासून अदयापपर्यंत जमा केलेले नाही. त्यामुळे संबंधित गुत्तेदाराने रस्त्याचे काम पुर्णत: बंद केलेले आहे. रस्त्यावरील धूळ माती सारखी उडत राहते. या भागासाठी प्रस्ताव मंजूर झालेला आहे. परंतू कार्यवाही होत नाही. तेथील टेंडर कॉल होऊनही काम चालु न होण्याचे कारण काय आहे?

नगररचनाकार : रोषनगेट ते सिडको या रस्त्यासाठी २/३ भुसंपादनासाठी भुसंपादन कार्यालयाने १.५० कोटीची रक्कमेची मागणी केलेली होती. याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये विचाराधीन प्रस्ताव होता. सदरील प्रस्ताव मंजूर झालेला आहे. त्यानंतर माजी महापौर यांचे सहमत खाजगी वाटाघाटीने घ्यावा असे ठरले होते. एक-दोन वेळेस माजी महापौर यांचेकडे लोक या भागातील आलेले ते तथापि वाटाघाटी काही झालेल्या नाहीत. मध्यंतरीच्या कालावधीत मा. आयुक्त यांचेकडे काही लोकांना बोलाविले होते. तेव्हा त्या लोकांना सांगितले की, आपण यासाठी काही भाग रस्त्यासाठी देणार आहात काय? त्यामध्ये काही लोकांनी होय म्हटलेले आहे. परंतु पुढील कार्यवाही अजुन बाकी आहे.

श्रीमती मानकापे : पृष्ठ क्र. ५३ काल्डानगर/बालाजीनगर/विष्णूनगर येथील रस्ता अर्धा भाग आला व अर्धा भाग आणखी पडलेला आहे. मग हा उर्वरीत अर्धा भाग असाच सोडून देणार काय? आणि रस्त्याचे काम करता करता सोडण्याचे कारण काय आहे. याबाबतची माहिती द्यावी.

नगररचनाकार : काल्डानगर अमरप्रित गजानन महाराज रस्ता मार्ग बालाजीनगर हा जो रस्ता आहे. या रस्त्याची लांबी जास्त आहे. सध्या अर्धा झालेला आहे. परंतू माझ्या माहितीप्रमाणे जेवण रस्ता होता तेवढा तो रस्ता आलेला आहे. उर्वरीत रस्ता जो आहे. त्याचे भुसंपादन आलेले नाही. याबाबतीत आपल्याला विशेष तरतुद करावी लागेल आणि तरतुद केल्यानंतर तो रस्ता जो आहे भुसंपादन करण्यासाठी टाकावे लागेल.

श्रीमती मानकापे पार्वती :सदरील रस्ता या वर्षात करणार काय? काल्डानगर हा भाग मधुनच बसलेला आहे. अगोदर ही वस्ती नव्हती.

मा. सभापती : नगररचनाकार यांनी स. स. सौ. मानकापे यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे जलद कार्यवाही करावी.

डॉ. आशा बिनवडे : शहर विकास आराखडयांच्या भुसंपादनाची अंमलबजावणी कशी करणार याबाबत चर्चा चालु आहे. मा. उच्चन्यायालयात एक प्रकरण दाखल झाले त्या निमित्ताने का होईना हे सर्व आपल्यासमोर आलेले आहे. सुरुवातीला विसंगती अशी होती की? हा आराखडा आहे हा माहितीस्तव दिला गेला की, स्थायी समितीमध्ये मंजूर होऊन मा. उच्चन्यायालयात पाठवावयाचा आहे असा समाज होता. परंतू मला वाटते आता सदरील प्रकरणाबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये सादर करुन आलेले आहे व त्या याचिकेत निकालही लागून गेला आहे. आता फक्त स्थायी समितीमध्ये माहितीस्तव व यापुढील भुसंपादनाबाबत काय करावे याविषयी चर्चा करण्यासाठी हा प्रस्ताव आहे. या शहराला आपल्याला वर का कुठे आखीव रेखीव करावयाचे असेल तर, भुसंपादन करणे आधी आवश्यक आहे. ही गोष्ट आपल्याला कुठेही दुर्लक्षीतता येणार नाही. कारण नियमानुसार आपल्याला दहा वर्षाच्या आंत किंवा हा जो विकास आराखडा आहे पुर्णतः भुसंपादन करणे आणि तो विकसीत करणे कार आपल्याला आवश्यक आहे. पण भुसंपादन करतांना काही बाबतीत आपल्याला अडचणी येणार आहेत. याबाबतीत चर्चा करीत असतांना दुरदृष्टीने विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. या शहराचा विकास करणे आपले तितकेच महत्वाचे आहे. जितके सर्व तऱ्हेने सुविधा पुरविणे या शहराला महत्वाचे आहे. यामध्ये चर्चा करीत असतांना असे लक्षात येते की, या संदर्भात अर्थसंकल्पामध्ये तरतुद मात्र जेवढी पाहिजे तेवढी करु शकत नाही. अर्थसंकल्पात काही प्रमाणात आपण तरतुद वाढवू शकतो काय? किंवा इतर काही मार्गाने आपण पैसा उपलब्ध करुन देऊ शकतो काय? किंवा हे जे आरक्षण आहे ती जमिन भुसंपादीत करु शकतो काय? आज आपल्यापुढे एवढा मोठा प्रश्न आहे.९१६.० कोटीचा त्याच्यामध्ये आपल्याला जमीन भुसंपादनच करणे आपल्याला एवढे अवघड वाटते तर त्या पुढील विकास कामांच्या बाबतीत आपण आणून विचारही करु शकत नाही. म्हणजे भुसंपादनावरच आपण अजुन अडकुन पडलेलो आहोत. तो सुध्दा खुप मोठा प्रश्न बनुन आपल्यापुढे आलेला आहे. या प्रश्नाला सामोरे जाण्यासाठी काही चांगल्या प्रकारच्या चर्चा या सभागृहात आपल्याला घडवून आणाव्या लागणार आहेत. १) पुरवणी 'अ' मध्ये एकुण सर्व आरक्षणाची माहिती आपण दिलेली आहे. यामध्ये असे आहे की, जमिन भुसंपादन करण्यासाठी जी काही रक्कम पाहिजे आहे. ती यामध्ये दर्शविलेली नाही. मला वाटते ती प्लॅनप्रमाणे पुढे अशी दर्शविलेली असावी. पृष्ठ क्र ४६ पण यामध्ये यापुढे आपण जर कोणत्या सर्व्हे नंबर मध्ये आहेत त्याची साईट (भाग) कुठे आहे हे यात दर्शविलेले नाही. म्हणजेच आमच्याच वॉर्डातील कोणता भाग प्रत्यक्षात कुठे आहे. यात काहीच बोध होत नाही. त्यामध्ये सर्व्हे नंबर कोणता हे नमूद करावयास पाहिजे होते. तसेच माझ्या वॉर्डातील काही आरक्षणे जी दर्शविलेले आहेत पृष्ठ क्र. ६८८ अ. क्र. १४९ पासून १६८ पर्यंत) आणि (अ.क्र. २५३ पासुन २५ पर्यंत) म्हणजे गारखेडा परिसर जवाहर कॉलनी असे जे सर्व आहे तर या सर्व आरक्षणाचे पोर्ट प्लॅन संपूर्ण माहितीसहीत मला उपलब्ध करता येतील का? आणि दुसरे असे की, पृष्ठ क्र. ८९ वर सन २००५-०६ या वर्षाच जो प्लॅन दिलेला आहे की, यावर्षी आपणांना जमिन भुसंपादीत करणार आहोत. (अ. क्र. ११-१२ जवाहर

कॉलनी येथील शाळा आरक्षण) याबाबत किती खर्च होणार ते दाखविलेले आहे. त्या जमिनी मला सांगावयाचे आहे की, या जागा मनपाच्या आहेत. मनपाच्या ओपन स्पेसवरील आरक्षण आहेत. त्याचा विकासही झालेला आहे मग आता पुन्हा संपादन करणेची आपल्याला आवश्यकता आहे काय? मग हे यामध्ये नमूद का करण्यात आले. यामध्ये काही गोष्टी डोळे झाकुन झालेले असावे असे मला वाटते.

नगररचनाकार : हा जो रस्ता आहे. आपण डी.पी. रोड शासनाने मंजूर केलेला आहे. तर डी. पी. रिपोर्टमध्ये फेज वाईज Implementation आहे. तीन-चार वर्षामध्ये कोणते रोड घ्यावे किंवा नाही (scheduled P) डी. पी. रोडमध्ये काय काय दिलेले आहे. ते फक्त माहितीस्तव आहे यात जमा संपादीत झालेली असेल तर, यापुढे येणार नाही.

डॉ. आशा बिनवडे : या जागेच्या किंमती अगदी लाखांच्या, कोटीमध्ये आहे. या संपादन आपण करणार नाही तरीपण ते या प्रस्तावात दिसुन येतात. ते मला सांगावयाचे आहे आणि या सर्व जागा मनपाच्या आहेत आणि त्या विकसीत झालेल्या आहेत. तेव्हा संपादन करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

नगररचनाकार : नाही, अशी एखादी गोष्टी असल्यास ती दुरुस्त करता येईल.

मा. सभापती : सदरील बाब वगळण्यात यावी.

डॉ. आशा बिनवडे : यानंतर पृष्ठ क्र. ११० वर जी. ३, ४, ५, ६ ही आरक्षणे आहेत यामध्ये आज एक इंचही जागा शिल्लक नाही.

मा. आयुक्त : डेव्हलपमेंट प्लॅन जर आला तर या प्लॅनमध्ये विहीत मुदतीत हा डेव्हलपमेंट प्लॅन व्हावा असा सुध्दा चाप्टर असतो. कोणत्या वर्षात काय काय पुर्ण करावे त्याप्रमाणे त्याची मांडणी जशीच्या तशीच केलेली आहे. तेव्हा संपादन करावयाचा जो प्रस्ताव राहील तेव्हा त्याच्यात ते रद्द होईल.

डॉ. आशा बिनवडे : नाही हे सुध्दा रद्द झालेले नाही ते पुढे आलेले आहे.

मा. आयुक्त : ठिक आहे, याची ही नोंद घेतो.

डॉ. आशा बिनवडे : पृष्ठ क्र, ११० मध्ये ३, ४, ५ व ६ ही आरक्षणे दाखविली आहेत. यामध्ये कोटयावधी रुपयांची तरतुद हवी. असे आपण या ठिकाणी म्हणतो. पुढे आपल्याला त्याच्या किंमती सुध्दा आहेत. ते किती रुपयात संपादन करायचे ते सुध्दा करता येणार नाही. म्हणजे स. स. देसरडा यांनी म्हटल्याप्रमाणे शासनाने मोठया बील्डर्सची जी काही आरक्षणे होती ती वगळण्याचे काम इतक्या अटपट केलेले आहे. पण जेथे अनाधिकृत व रस्त्या आलेल्या आहेत जे आरक्षण आपण संपादन करु शकणार नाहीत. त्या रस्त्यांचे आरक्षण भागश: वगळण्याचे मात्र कुठेही प्रयत्न केलेला नाही. ते मात्र जी. बी. वर म्हणजे स्थानिक स्वराज संस्थेवर सोडुन दिले बाकीच्या गोष्टी मात्र स्थानिक स्वराज संस्थेला न विचारता केलेले आहेत. मग आता याबाबत आपण काय कार्यवाही करणार यात तरतुद केली आहे. तेव्हा वगळणे किंवा संपादन करता येणार नाही. म्हणजे तरतुद रक्कम ऑन पेपर राहील त्याचे काय? पृष्ठ क्र. ५ वर प्रशासनामार्फत काही गोष्टी सूचीत केलेल्या आहेत की, दहा हा संपुर्ण आराखडा याची अंमलबजावणी जर आपल्याला करावयाची असेल तर, ती दहा वर्षाच्या विहीत कालावधीमध्ये करणे बंधनकारक आहे. याबाबत आपणास काही गोष्टीचा विचार करावा लागणार आहे. अर्थसंकल्पामध्ये आपण दर केलेला जी तरतुद ठेवता ती फक्त सोड सहा टक्के ठेवतो आणि

शासनाचा भुसंपादनाच्या संदर्भात प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४१,१२७ प्राप्त झालेल्या खरेदी सुचनेच्या याठिकाणी लिहीलेला आहे. दहा टक्के एवढी तरतुद उक्त पुस्तिकेच्या पृष्ठ क्र. १२२ म्हणजे कुठले पुस्तक हे लक्षात येत नाही. यानुसार आपण दहा टक्के रक्कम ठेवणे अतिशय आवश्यक आहे काय? ठेवता येते असे आहे की, ठेवली पाहिजे असे आहे. नेमके काय कारण आहे ते सांगावे शहराच्या विकासाची गोष्ट तेवढीच महत्वाची असल्यामुळे किमान चालू आर्थिक वर्षात भुसंपादनासाठी दहा टक्के रक्कम अर्थसंकल्पामध्ये ठेवण्यासाठी निर्णय या सभागृहामध्ये घ्यावा असे वाटते. दुसरी गोष्ट टी. डी. आरसाठी सुध्दा डेव्हलपमेंट राईट जो आहे. याच्यामध्ये सुध्दा ट्रान्सफर केला तर बऱ्याचशा जागा विनामोबदला आपल्या ताब्यात येऊ शकतील यासाठी सुध्दा प्रयत्न करणे गरजेचे आहे. मागे सुध्दा हा प्रस्ताव आला होता तो अजुनही समंत आलेला नाही. या स्थायी समितीमध्ये असाही निर्णय घेण्यात यावा की, हा जो प्रस्ताव आहे तो सर्वसाधारण सभेपुढे येण्यासाठी स्थायी समितीने शिफारस करावी. याच पृष्ठ क्रमांकावर नगररचना योजना राबविता येईल असे प्रशासनाने सुचविलेले आहे. परंतू मेगासिटी वैगेरे आहे काय? मला या योजनेचे कारण समजू शकले नाही. तेव्हा याबाबची माहिती दयावी.

सहाय्यक संचालक नगररचना : नगररचना योजना म्हणजे टी. पी. स्किम ही जी संकल्पना आहे यामध्ये कॉम्पेन्सीव्ह डेव्हलपमेंट स्किम म्हणजे या पोलींग ऑफ लॅन्डस सर्व जमिन एकत्रित करुन नंतर त्याचे एक नियोजनबध्द आणि विकास योजना कार्यान्वित केली जाते. परंतू यामध्ये एक सोसीटाल ॲक्पेक्ट आहे. जोपर्यंत समाजाचा यामध्ये सहाभाग होत नाही. तोपर्यंत त्याचे यशस्वितेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते. माझ्या माहिती प्रमाणे लोणावळा, कोल्हापूर आणि नगर या ठिकाणी अशा प्रकारच्या टी. पी. स्किन राबविण्यात येत आहेत. परंतू तेथे सुध्दा खुप काही असे निष्पन्न आलेले दिसून येत नाही. समजा तेथे १०० एकर जमिन आहे. त्याचे जे जमिन मालक आहेत. त्यांनी १०० हेक्टर जमिन पुल करायची ही एकत्रित जमिन पुल केल्यानंतर त्याची कार्यान्वित योजना करुन विकास योजना करुन त्याचे अंतीमरित्या प्लॉटस करायचे. एक कॉम्पेन्सीव्ह डेव्हलपमेंट यामध्ये तयार करायची यामध्ये सर्व नागरिकांचा समावेश हा आवश्यक आहे. आता ही स्कूल ऑफ ऑप शॉट जी आहे ती जागरुकता तयार करायची आहे. ती अवअरनेस किंवा जागरुकता जर आली त्यावेळेस शहरासाठी यशस्विरित्या राबविता येऊ शकेल तेव्हा हा प्रयोग पर्यायी म्हणुन आपल्या समोर ठेवलेला आहे. आजही आपल्याकडे विकास योजनेवर सुचना हरकती मागवितो या सर्व बाबतीत गोषवारा जर बघितला तर हरकतीशिवाय सुचना कुठेच नाहीत आणि हरकती वरती ९०% असे आहेत की, माझ्या जमिनीवर आरक्षण टाकू नका.

डॉ. आशा बिनवडे : टी. डी. आर. बाबत सर्वसाधारण सभेमध्ये हा प्रस्ताव पाठविण्यात यावा अशी शिफारस स्थायी समितीने करावी. कारण या टी. डी. आर मुळे सर्वसामान्य नागरिकांना आरक्षणाच्या जमिनीवरील त्यांचे हक्क आहेत बिल्डर्संना न मिळता तेथील नागरिकांना मिळतील. यानंतर ७५:२५ अशा प्रकारचे आरक्षण बाबतचे जे मुद्दे चर्चेसाठी ठेवलेले आहेत. शहरा आतापर्यंत

फक्त चार किंवा पाच एवढेच परवानगी घेतलेली आहे. आणि त्यावेळेसची एवढी वादग्रस्त आलेली आहे की, सहावी म्हणायचा असा प्रश्न उपस्थित होतो या ठिकाणी वातावरण असे तयार आलेले आहे की, या वातावरणाला काही प्रमाणात प्रशासनही जबाबदार आहे. परंतू प्रत्येक गोष्टींचे खापर प्रशासन किंवा पदाधिकारी यांचेवर फोडुन चालणार नाही. उलट या गोष्टींसाठी चांगले वातावरण तयार केले पाहिजे. ७५:२५ या प्रमाणापेक्षा ४०:५० असे प्रमाण जर केल्यास प्रशासन यावर तयार व्हावे असे मला वाटते. हे करीत असतांना ४०% आम्हाला मिळणार आहे. तेच वरवर इतकी म्हणजे त्याच क्रॉसची मिळवी असे करार होणे आवश्यक आहे. नाहीतर ४० टक्के कुठेतरी मागील बाजूस आम्हाला मिळेल. तेव्हा या सर्व गोष्टींचा स्थायी समितीने विचार करुन शिफारस करावी.

सौ. सुवर्णा चंद्रात्रे : २५ वर्षांनी जेव्हा हा प्लॅन याठिकाणी आलेला आहे आणि खेदाने म्हणा या ठिकाणी चर्चा होत आहे. याबाबत प्रशासनाची फार मोठी चुक होते असे माझे स्पष्ट मत आहे. ज्यावेळेस हा प्लॅन आला तेव्हा एक-एक प्रकरण धरुन जर हातावेगळे केले असते तर डेव्हलपमेंट प्लॅन प्रमाणे स्टेप बाय स्टेप केले असते तर आज आपल्याला एवढा मोठा बोजा पडला नसता. पहिल्यांदा १९७५ साली ज्यावेळी रु. २/- खर्च करावे लागत होते. आता याच साठी रु. २४०/- खर्च करावे लागते. हे सर्व जनतेच्या माथी भरणे आहे. अर्थसंकल्पावर ज्यावेळी चर्चा होती. त्यावेळी मला चांगले आठवते की, विकासासाठी आपण स्पष्ट बोलु शकलो नाही याचे कारण असे की, येथील बिकट आर्थिक परिस्थिती होती आज आनंदाने असे म्हणायचे आहे की, आजच्या घडीला सुरुवात होत आहे. जेव्हा विकास होईल तेव्हा परवानगी देणे आवश्यक आहे. या ठिकाणी स. स. देसरडा, डॉ. बिनवडे यांनी ज्या सुचना केल्या टी. डी. आर. बाबत पुन्हा एकदा पाचारण करुन त्यावर चर्चा करुन टी. डी. आर. लागू करावा. प्रशासनाचे म्हणणे असे असते की, पोषक वातावरण त्यासाठी स. स. देसरडा यांनी ज्या सुचना केल्या त्यावर विचार करुन प्रशासनाने ठोस पाऊले उचलुन कामे करावीत.

श्री. मीर हिदायत अली : टी. डी. आर. जर आपण लागु केले तर आपले बरेचशे काम हलले होईल. ७५:२५ ही चर्चा आली यामध्ये ९१६ कोटीची तरतूद पाहिजे. त्यामुळे याबाबत आपला खर्च एकदम २५% वर येईल.

श्री. नंदकुमार फुलारी : या ठिकाणी बऱ्याच कालावधीपासुन स. स. नी. चर्चा केली तेव्हा याची अंमलबजावणी घेणार आहे काय? जी नुसतीच चर्चा होऊन प्रकरण संपणार आहे. याबाबत मला संशय येतो.

मा. सभापती : संशय होण्याचे काहीही कारण नाही. याठिकाणी सर्व स. स. नी. चांगल्या रितीने चर्चा घडवून आणली. स. स. डॉ. बिनवडे यांनी सांगितल्याप्रमाणे भुसंपादनासाठी लॅण्ड ॲक्वाईजीशन साठी पैसा जास्त ठेवला पाहिजे. मागिल वर्षीचा आणि यावर्षीचा आपण जर बघितले तर फार मोठे बदल आहे. ७.५० कोटी आपण याबाबत घेतलेले आहे. ज्या सुचना स. सदस्यांनी केलेल्या आहेत. त्याबाबत जे काही करता येईल ते आपण करु या परंतु या सुचनांच्या अनुषंगाने निर्णय या ठिकाणी सांगु इच्छितो. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार औरंगाबादच्या विकास योजना प्रस्तावित अंमलबजावणी बाबत तयार करण्यात आलेल्या अहवालाबाबत आज सविस्तर

चर्चा झाली. या सुचने अंतर्गत आरक्षीत असलेल्या जागा या वर्षानुवर्षे संपादीत केल्या नसल्याने जमिन मालकास त्या जागेच्या उपभोगापासून वंचित रहावे लागते. तसेच विकास योजनेस विलंब झाल्यामुळे अंमलबजावणीचा खर्च हा काळापासुन वाढत जातो. पर्यायाने मनपाच्या महसुलावर अनावश्यक बोजा पडतो. म्हणून संपादन याची कार्यवाही वेळेत न केल्याने जमिन मालकाचे नाईलाजाने एम. आर. टी. पी. कायदयाच्या कलम १२७१४९ तहत खरेदी सुचना द्यावे लागते. अशा प्रकारचे खरेदी सुचनांची अंमलकाल मर्यादीत दखल घेऊन भुसंपादनाची कार्यवाही सुरु करावी लागते. विकास योजना अहवालानुसार साधारण: वार्षीक अहवाल अर्थसंकल्पामध्ये विकास आराखडयाबाबतच्या अंमलबजावणी करीता किमान १०% रक्कमेची तरतुद करणे आवश्यक आहे. तरी न्यायालयीन संदर्भ खरेदी सुचना व अन्य बाबीमुळे अनर्पेक्षीत आर्थिक ताण पडतो. त्यामुळे विकास योजनांवर मुळ उद्देश सफल होत नाही. विकास योजनांची अंमलबजावणी नियोजन प्राधान्य म्हणून कसे बंधनकारक आहे. मनपाचे वार्षीक अर्थसंकल्पामध्ये विकास योजना अंमलबजावणी करीता पुरेशी तरतुद अनिवार्यपणे उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे नगररचना विभाग, लेखा विभाग, व स्थायी समिती यांच्यामध्ये समन्वय घेऊन वार्षीक तरतुद बाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. विकास योजना अंमलबजावणीचे प्रामुख्याने दोन भाग ठरतात (१) भुसंपादनाची कार्यवाही व (२) संपूर्ण आरक्षणे व रस्त्यांचे विकास करणे. सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केल्यास निवड भुसंपादन करण्यासाठी ९१६.०० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याबाबत हा खर्च हिशोबीत करतांना भुसंपादन कायदयातील इतर घटक म्हणजे रक्कमेवरील व्याज बिलाची रक्कम तसेच रुपयांचे अवलमूल्यन न्यायालयीन संदर्भानुसार भरपाई व इतर बाबींचा समावेश नसल्याचे समजते. प्रस्तुत ९१६.०० कोटी रक्कमेत भरीव वाढ घेण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा सांगोपांग विचार करता विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या घाटीने काही ठोस निर्णय घेणे आवश्यक ठरेल.

०१. ज्या आरक्षीत जमिनीवर अथवा रस्ते मोठे प्रमाणपत्र अतिक्रमणे वाढलेले आहेत. अशा रचनेचा फेरविचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

०२. शासनाने मनपाच्या आर्थिक समतेच्या दृष्टीकोनातून काही धोरणात्मक निर्णयाचा समावेश कायदयात केलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने

अ) रस्त्याचे बाधीत क्षेत्राचा एफ. एस. आय. देणे.

ब) टी. डी. आर.

क) आरक्षण योजनेत आरक्षणाचा विकास

या बाबींपैकी रस्त्याने बाधीत क्षेत्रासाठीची एफ एस. आय. ची मागणी बांधकाम परवानगी करीता प्रस्ताव दाखल करतांना जमिन मालक व स्वत: करीता अपशा प्रकारे प्रोत्साहन देणे.

०३. टी. डी. आर. बाबत सर्वसाधारण सभेने त्वरीत निर्णय घेऊन त्यास मान्यता दयावी.

०४. समावेशक आरक्षणाच्या धर्तीवर आरक्षणाचा विषय करण्यासाठी आकर्षक व पोषक धोरण अवलंबविल्यास अशा प्रकारची मागणी नागरिकांकडुन मोठया प्रमाणात होऊ शकेल. पर्यायाने मनपा प्रशासनावरील

विकास योजनासाठी पडणारा आर्थिक बोजा कमी होऊ शकेल व उद्दीष्ट सफल होऊ शकेल. आज शहरात मोठया प्रमाणात उपयांकरीता आरक्षण असुन देखील त्याचा विकास करण्याकरीता नागरिकांचा सहभाग अत्यल्प आहे व यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. याकरीता समावेशक आरक्षण हे विकासा संदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन त्याची जास्तीत जास्त प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या प्रस्तावात मनपाचे थेट आर्थिक संबंध नसतांनाही विविध सार्वजनिक उपक्रम विकसीत होत असल्याने त्याचा प्रभावीपणे योजना अंमलात आणणे आवश्यक आहे. वरील सुचनांसह प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सोबतच हा जो प्रस्ताव आलेला आहे. प्रस्ताव मा. आयुक्त व सहा. संचालक नगररचना अत्यंत मेहनतीने सदरील प्रस्ताव मांडलेला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विकास योजना अंमलबजावणी संबंधी तयार करण्यात आलेल्या अहवालास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्याची शिफारस करण्यात येते. तसेच प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खालील प्रमाणे प्रशासनाचे कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

१. ज्या आरक्षीत जमिनीवर किंवा रस्त्यांच्या आरखणीत मोठया प्रमाणात अतिक्रमण वाढलेले असेल अशा आरक्षण व रस्त्यांच्या आखणीच्या पुनर्रचनेबाबत फरेविचार करावा.

२. हस्तांतरणीय विकास हक्क (डी. डी. आर) बाबत सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेऊन मान्यता देण्यात यावी.

३. समावेशक आरक्षणाचा विकास योजने अंतर्गत आकर्षक व पोषक धोरण अवलंबविण्यात यावे. या जनतेला या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहीत करण्याकरीता विशेष प्रयत्न करण्यात यावेत.

४. विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचे आर्थिक स्वरुपात मोबदला देण्याऐवजी अनुज्ञेय वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देणे बाबत जनतेला प्रोत्साहन देण्यात यावे.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २९-०३-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. शनिवार दिनांक २९ मार्च २००३ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सायंकाळी ०५.१५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सभेस सुरु झाली. या सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते.

१.	स. स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष	स. सदस्य
२.	स. स. श्री. मीर हिदायत अली	-//-
३.	स. स. श्री. औताडे रावसाहेब ममतू	-//-
४.	स. स. श्री. ओक जयवंत केशवराव	-//-
५.	स. स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव	-//-
६.	स. स. श्री. डॉ. आशा उत्तम बिनवडे	-//-
७.	स. स. श्री. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर	-//-
८.	स. स. सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे	-//-
९.	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
१०.	स. स. श्री. चंद्रशेखर जैस्वाल	-//-
११.	स. स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग	-//-

चर्चा :

श्री. नंदकुमार फुलारी, श्री. प्रशांत देसरडा : क्रिकेट पटु सचिन तेंडुलकर व त्यांचे सहकारी यांनी विश्वकप क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यापर्यंत मजल मारली त्याबद्दल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करावे. तसेच संजय बांगर हे चांगले क्रिकेटपटु असून, त्यांचेही अभिनंदन करण्यात यावे. शक्य झाल्यास मनपातर्फे त्यांचा सत्कार करण्यात यावा.

श्री. जयवंत ओक, श्री. रावसाहेब औताडे : यास आमचे अनुमोदन आहे.

मा. सभापती : स. सदस्यांनी सुचना केल्यानुसार क्रिकेटपटु सचिन तेंडुलकर व संजय बांगर याचे ह्या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते. महापालिकेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात यावा. विषय क्र. ९४ वर चर्चा करावी.

विषय क्र. ९४ :

दिनांक १३ जानेवारी २००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

डॉ. आशा बिनवडे : मागील तीन-चार सभांचे इतिवृत्त अदयाप देण्यात आले नाही. ३१ मार्च पुर्वी सर्व इतिवृत्त देऊन आमच्याच काळात कायम व्हावेत. जेणे करुन आम्हाला त्यावर प्रश्न मांडता येतील.

श्री. प्रशांत देसरडा : सचिव विभागात कर्मचारी कमी असतील तर देण्यात यावे संगणक यंत्र आणखी देण्यात यावे.

नगरसचिवत : संगणक देऊन कायदा नाही. सर्वांचे इतिवृत्त हे लघु लिपीत नोंद होते ती नोंद घेण्यासाठी नगरसचिव विभागाकडे एकच दैनिक वेतन कर्मचारी आहे. मागील दोन महिन्यात सर्वसाधारण सभा व स्थायी समितीच्या जास्त सभा झ ाल्या असून, काही विशेष समित्यांच्या सभा संपन्न झालेल्या आहेत. त्यामुळे कामाचा व्याप वाढत व इतिवृत्त तयार करण्यास उशीर होत आहे.

श्री. प्रशांत देसरडा : नगरसचिवांनी मागील सभेत एक कार्यालयीन अधिक्षक व स्टेनो यांची मागणी केलेली होती. आतापर्यंत कर्मचारी दिलेली नाहीत. सभा नेहमीच होत राहतील त्यास प्रशासन थांबक शकणार नाही. एक स्टेनो सचिव विभागाकडे देण्यता येऊन मागील सर्व सभांचे इतिवृत्त पुढील सभेत देण्यात यावे.

डॉ. आशा बिनवडे : मागील बैठकीत सुध्दा हा मुद्दा उपस्थित झाला होता. झालेल्या सभेचे कामकाज पुढील सभेत कायम केल्याशिवाय त्या सभेचे कामकाज करता येत नाही असा नियम आहे. आमच्या कार्यकाळातील इतिवृत्त आमच्या समोर कायम करण्यासाठी येत नसेल तर, एक प्रकारे आमचा हक्क हिरावून घेतल्यास जमा आहे. मागील बैठकीत सुध्दा हेच उत्तर देण्यात आले की, इतिवृत्त प्रोसेसमध्ये आहे. इतिवृत्त दिले नाही तर पुढील कामकाज करु नये. सभा तहकुब करावी. सदस्यांची मागणी आहे. त्यांचा हक्क नाकारु शकत नाही. इतिवृत्त केव्हा देणार त्याचा खुलासा करावा. ३१ मार्चपूर्वी इतिवृत्त देण्यात यावे.

मा. सभापती : नगरसचीव हेच सध्या उपआयुक्त (प्र) म्हणून आहेत. तात्काळ एक स्टेनो व इतर कर्मचारी नगरसचीव विभागात देण्यात यावे. नेहमीच या विषयावर चर्चा होते. यापुढे चर्चा होता कामा नये. प्रशासन जबाबदार राहील. यांची उपआयुक्त (प्र) यांनी नोंद घ्यावी.

श्री. जयवंत ओक : इतिवृत्त कायम करीत असतांना माझी प्रशासनास एक सुचना आहे की, पान क्र. २ वर माझा संवाद आहे. दिनांक १८-०९-२००२ रोजीच्या स्थायी समितीतील ठराव क्र. ४१ नुसार सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी ज्यांनी जास्तीचे काम केलेले आहे. अशा सर्व कर्मचाऱ्यांना त्याचा मोबदला द्यावा म्हणून निर्णय दिलेला आहे. यात काही अस्थायी कर्मचारी सुध्दा येतात. ज्यांनी काम केलेले आहे. अशा अस्थायी नगरसचीव विभागातील कर्मचाऱ्यांना जास्तीचा कामाचा मोबदला देण्यात आलेला नाही. म्हणून दिनांक १३-०१-२००३ च्या स्थायी समितीमध्ये मी मुद्दा उपस्थित केलेला आहे. इतिवृत्तातील पान क्र. २ वर काम केलेले असेल तर, मोबदला देण्यात यावा म्हणून मा. सभापती यांचे रुंलिग आहे. मुळ संचिकेमध्ये या नगरसचीव विभागातील ४-५ कर्मचाऱ्यांची नांवे असतांना मोबदला दिला नाही. काम केलेले असेल, तर मोबदला देण्यात येईल असे मुख्यलेखाधिकारी यांचे संवादामध्ये दिलेले आहे. अदयापपर्यंत का मोबदला दिलेला नाही. वारंवार सभागृहात तीच चर्चा होऊन मा. सभापती यांनी आदेशित करुनही कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही.

श्री. प्रशांत देसरडा : वारंवार सभागृहात तोच तो प्रश्न उपस्थित करावा लागतो. कार्यवाही होत नाही. म्हणुन चर्चा होते. सभापतीच्या आदेशाचे पालन होत नाही. मी सुध्दा मागील एका बैठकी या विषायावर बोललो होतो. आतापर्यंत अतिरिक्त

कामाचा मोबदला का देण्यात आला नाही. कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे मोबदला दिला त्याप्रमाणे अस्थायी कर्मचाऱ्यांना देण्यात यावा.

मा. सभापती : मुख्य लेखाधिकारी आजच्या बैकीला उपस्थित नाहीत. नगरसचिवांनी सभागृहात झालेली चर्चा व घेतलेला निर्णय संबंधित अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आणुन दयावा. ठराव क्र. ४१ नुसार अंमलबजावणी करावी.

डॉ. आशा बिनवडे : इतिवृत्तातील पान क्र. ७ वर रस्त्याची जागा भुसंपादनाचा प्रस्ताव सन १९८९ साली आलेला होता. १.९४ कोटी द्यावयाचे होते. पुन्हा २००२ मध्ये प्रस्ताव सादर केला. एकाच जागेचा दोन वेळा प्रस्ताव कसा येतो. खुलासा दयावा.

श्री. प्रशांत देसरडा : जाहीर प्रगटन दिले होते. ६० दिवसातून ४० दिवसा या जागेच्या संदर्भात वर्तमानपत्रात बातम्या आजकालचा त्याची दखल प्रशासनाने का घेतली नाही.

मा. सभापती : ज्या ज्या सुचना सभासद मांडतात. इतिवृत्त तयार होते. कोणत्या विभागासंबंधी काय चर्चा इतिवृत्तामध्ये आहे. याकडे त्या त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष दिले पाहिजे. सभागृहात स. सदस्य प्रश्न विचारतात. परंतू अधिकाऱ्यांना माहित नसेत. याचा अर्थ इतिवृत्ताचे वाचन केले जात नाही. असे होत असेल तर, योग्य नाही. यापुढे सर्व अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

श्रीमती पार्वती मानकापे : सभागृहात महत्वाच्या विषयावर चर्चा होते. अधिकाऱ्यांना खुलासा द्यावयाचा झाल्यास पुढील बैठकीत दिला जाईल असे उत्तर दिले जाते. प्रत्येक वेळी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर पुढील बैठकीत देण्याचे आश्वासन अधिकारी देत असतील तर ही सभा देण्यात येऊ नये.

डॉ. आशा बिनवडे : मी केलेल्या प्रश्नाचा खुलासा देण्यात यावा.

मा. सभापती : सहा. संचालक न. र. यानी खुलासा द्यावा. सिटीटास्क ५५१८७ मध्ये रस्त्याच्या भुसंपादनाचा प्रस्ताव दोन वेळेस का आली याची माहिती दयावी.

नगररचना-१ : अर्जदार डी. एन. संचेती व इतर यांनी न. भू. क्र. १५१८७ गारखेडा ही मिळकत औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता जालना रोड ते सुत गिरणी या रस्त्याने बाधीत होत असल्याने या मिळकतीसाठी एम. आर. टीपी कलम १२७ नुसार खरेदी सुचना दिली होती. दिनांक २०-११-२००२ त्यासोबत खरेदीखत व मंजुर रेखांकन आदेश जोडलेला होता. ही संचिका तपासली असता त्या जागेचा ताबा मनपाने दिनांक २६-०६-१९८७ रोजी घेतलेला आहे. पंचनाम्यानुसार क्षेत्रफळा ११० चौ. मी. इतके आहे. या जागेचा मोबदला मिळावा म्हणुन संबंधिताने अर्ज केला. त्या जागेचे मूल्याकंन उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांचेकडुन १९८९ ला करुन घेण्यात आले ते १ लक्ष ९७ हजार ४०० रुपये इतके झाले. स्थायी समितीची मान्यता घेऊन सदर जागेचा मोबदला घेऊन जाणेबाबत दि. १५-०९-१९९० ला कळविण्यात आले. परंतू मोबदला अत्यंत अल्प आहे. मान्य नसल्याचे त्यांनी कळविले.

श्री. जयवंत ओक : गेल्या दोन महिन्यात या जागेसंदर्भात ४० दिवस वृत्तपत्रात प्रकरण गाजले. मागील बैठकीत या सभागृहात सविस्तर चर्चा झाली. पोलीस केस सभापतींनी आदेश दिले होते. त्यावर काय कार्यवाही केली. बैठक होऊन दोन महिने झाले. मनपाचे ले-आऊट आहेत का?

सहा. संचालक न. र. : सिटीएस नं. १५१८७ गारखेडा ही मिळकत जालना रोड ते सुतगिरीणी या १०० फुट रुंद रस्त्याचे बाधीत होत असून, यात जवळपास ९११० चौ. मी. जागा रस्त्याचे बाधित होत आहे. हा रस्ता ताब्यात घेत असतांना २६ जून १९८७ रोजी ९११० चौ. मी. क्षेत्र मनपाने ताब्यात घेतले आहे. त्यानंतर या रस्त्याच्या बाधित होणाऱ्या जमिनीचे मालकांनी मनपाकडे मावेजाची मागणी केली. सदर जागेचे मूल्याकंन १९८९ साली उपसंचालक नगररचना यांचेकडुन १,९७,४००/- रु. निश्चित केले मा. स्थायी समितीचा ठराव क्र. ३२५/२६ दि. २७-१०-१९८९ व ०९-११-१९८९ अन्वये त्यास मान्यता देण्यात आली. ही किंमत अर्जदारास मान्य नसल्याने त्यांनी २०-०१-२००० रोजी एम. आर. टी. पी. ॲक्ट चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना बजावलेली आहे. सदर भुसंपादनाची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आलेला होता. २०-११-२००० च्या पत्राने त्यांनी कळविले की, केलेले मूल्यांकन मान्य नाही.

श्री. प्रशांत देसरडा : सन १९८९ प्रमाणे त्यांना पैसे दयावेत.

सहा. संचालक न. र. : भुसंपादनाची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर आणलेला आहे. ही कार्यवाही भुसंपादन अधिकारी मुल्यांकन करणार असतात. भुसंपादनाच्या कार्यवाही सह मुल्यांकन दिनांक ही जमिनीची ताबा घेतलेल्या दिनांकाला मुल्यांकन दिनांक निश्चित केला जातो. १९८९ हाच मुल्याकंन दिनांक राहणार आहे. दोन वेळेस मावेजा देण्याबाबत प्रस्ताव आलेला नाही.

डॉ. आशा बिनवडे : २००० मध्ये हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर होता. किती मावेजा द्यायचा हे नमुद नव्हते. यापुर्वी १९८९ साली प्रस्ताव आलेला होता. अधिकारी सभागृहाची दिशाभूल करतात. सविस्तर खुलासा दिला जात नाही. १९८९ चा प्रस्ताव होता तर त्यावेळेसच का मोबदला दिला गेला नाही. इतकी वर्ष का थांबलो?

मा. सभापती : या प्रश्नासंबंधी नगररचना विभागाने स. सदस्यांना सविस्तर द्यावी. विषय क्र. ९४ मंजुर करण्यात येत आहे.

ठराव :

दिनांक १३-०१-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. ९५ :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मजनुहिल येथील मौलाना अब्दुल कलाव आझाद संशोधन केंद्र उभारण्याचा संपूर्ण प्रकल्प साठीच्या एकूण अ. प. र. रु. १७२.०० लाखाच्या प्रस्तावास दि. १४-१०-१९९७ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र. १०२/६ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदरील प्रस्तावात प्रकल्पाच्या परिसराचे सुशोभीकरण (लँड स्केपींग) करणे अंतर्भूत असल्याने सदरील कामाचे सा. बा. खात्याचे सन २०००-२००१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या मंजूर अं. प. रक्कम रु. २३,८५,०००/- चे कामाच्या रितसर विविध मागविण्यात आल्या.

प्रस्तावित कामासाठी अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ (८) निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत खालील प्रमाणे एकुण पाच मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या

आणि त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या निविदाधारकांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

१.	मे. एलोरा कन्स्ट्रक्शन	३.७८६% अं. प. दरापेक्षा जास्त दराने
२.	मे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन	४.१९% अं. प. दरापेक्षा जास्त दराने
३.	श्री. मन्नानखान	७.८६% अं. प. दरापेक्षा जास्त दराने
४.	मे. अलिफ असोसिएटस	८.९३% अं. प. दरापेक्षा जास्त दराने
५.	मे. एन. आर. घोडके	१०.०६% अं. प. दरापेक्षा जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ३.७८६% जास्त दराची असलेली मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा समक्ष दराचे वाटाघटी अंती मा. आयुक्त महोदय यांनी दि. २६-०३-२००३ रोजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% (पाच टक्के) कमी दराने मान्यता दिलेली आहे.

तरी मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्या अं. प. दरापेक्षा (पाच टक्के) ५.००% कमी दराच्या निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री. प्रशांत देसरडा : या प्रस्तावानुसार काय काम करणार आहोत.

कार्य. अभि (स्लम) : यामध्ये मुख्य प्रवेशद्वार बांधकाम असून, वॉचमन्साठी दोन कॅबीन बांधकाम तसेच मोठया भिंतीस लेवलकरुन मातीचा भराव करावयाचा आहे. त्यास लँड स्केंपीग पाथवे चे काम आहे. राहीलेल्या कामाचा यात समावेश आहे.

श्री. जयवंत ओक : या संशोधन केंद्राचे काम अंतिम स्टेजला असल्याने संशोधन केंद्रात कुणाला काहीही माहिती असल्यास पुराणकालीन माहिती साठविण्याचा प्रयत्न करावा. जनतेला जाहीर प्रगटन देऊन कळवावे.

मा. सभापती : या संशोधन केंद्राच्या संदर्भात उपआयुक्त श्री. जावरे साहेब यांनी नोंद घेऊन पत्र व्यवहार करावा व संपुर्ण माहिती द्यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजनुहिल येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र प्रकल्पाच्या परिसराचे सुशोभिकरण (लँड स्केपींग) करण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ९६ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ज्योती प्यारेलाल रैदपाल यांनी अशोक नगर येथील असेलेली जागा भाडेतत्वार देण्यासाठी विनंती केल्यानुसार जागेची व प्रकरणाची छाननी करुन सदरील जागा अशोक नगर येथील नाला जमिन क्षेत्र ३० X ३५ असून सदरील जागा पडीत असल्याने महानगरपालिकेतर्फे विकास करणे शक्य नाही. करीता कु. ज्योती प्यारेलाल सैहवाल यांना सदरील जागा भाडे तत्वावर प्रथम ३० वर्षाच्या मुदतीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियिम १९४९ चे कलम ७९ अन्वये तसेच कार्यालयीन

परिपत्रक क्र./मआ/सिस/९९/८४ दिनांक १६-१०-९९ च्या मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहुन प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अशोकनगर येथील पिडीत असलेली नाला जमिन क्षेत्र ३० X ३५ कु. ज्योती प्यारेलाल सैदवाल यांना प्रथम ३० वर्षाच्या मुदतीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४८ चे कलम ७९ अन्वये तसेच कार्यालयीन परिपत्रक क्र. मआ/मिस/९९/८४ दिनांक १६-०१-९९ च्या मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहुन भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ९७ :

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या वर्ष २००३-२००४ करीता तुरटी खरेदीसाठी रक्कम रु. १७,६१,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. २१-०३-२००३ रोजी मान्यता दिली आहे. सदर खर्च सन २००३-२००४ या आर्थिक वर्षाअंतर्गत रसायन खरेदी या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १७,६१,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ९८ :

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दी करण केंद्र फारोळा जेथे शुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या वर्ष २००३-२००४ करीता ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी र. रु. १४,२५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी दि. २९-०३-२००३ रोजी मान्यता दिली आहे. सदर खर्च सन २००३-२००४ या आर्थिक वर्षाअंतर्गत " रसायन खरेदी " या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पुरवठा योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र, फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या ब्लिंचिंग पावडर खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १४,२५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ९९ :

श्री. भगवान मनाजी अंभोरे लिपिक विभाग क्र. ०३ (निलंबीत) यांचे आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे आदेश क्र. मनपा/अस्था-१/२००३/३९१ दिनांक २१-०२-२००३ चे निलंबन आदेशाविरुध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ (४) अन्वये अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मा. सभापती : अपील मंजूर करण्यात येते.

ठराव :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये श्री. भगवान मनाजी अंभोरे लिपीक विभाग क्र. ९३ (निलंबित) यांचे निलबंन रद्द करणे बाबतचे अपील मंजुर करण्यात येते. प्रशासनाने त्यांना पुर्ववत कामावर रुजु करुन घ्यावे व निलबंनाचा कालावधी अनुज्ञेय होणाऱ्या रजेत रुपांतर करुन रजेचा कालावधी म्हणुन गृहीत धरण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. १०० :

उपआयुक्त (प्र) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००३-०४ या एका विलिय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील खादय निविदा मागविण्यात आलेल्या आहे. मा. आयुक्त यांनी मान्तेअन्वये त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अ) लुर्सन घास : याकरीता एकुण (२) कोरे निविदा पत्रकाची विक्री झाली असून, एकूण (२) निविदा पत्रके भरुन प्राप्त झाली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अ. क्र.	निविदाधारकांचे नांव	भाव प्रति किलो
१.	श्री. जनार्दन शेळके	१.९०
२.	श्री. मोहम्मद सलीम	४.००

श्री जनार्दन शेळके यांचे दर सर्वात कमी असून, मा. आयुक्त यांचेशी चर्चेनंतर रु. १६० प्रती किलो या दराने पुरवठा करण्यास मान्यता दिली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

ब) **शाळु ज्वारी कडबा :** याकरिता एकुण (२) कोरे निविदा पत्रकांची विक्री झाली असून (२) निविदापत्रके प्राप्त झाल्या आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अ. क्र.	निविदाधारकांचे नांव	भाव प्रति किलो	
१.	श्री. जनार्दन शेळके	६०००.००	५१५०.००
२.	श्री. शेख शहाउद्दीन	६३५०.००	५२५०.००

वरील प्रमाणे सर्वात कमी दर श्री. जनार्दन शेळके यांचे असून, मा. आयुक्त यांचेशी चर्चेनंतर शाळु कडुबा रु. ४२००.०० प्रतिटन व शाळु बाटुक रु. ५२००.०० प्रती टन या दरानुसार पुरवठा करण्यास संमती दर्शविली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर (पुरवठयाचा काळ ०१-०७-२००३ ते ३०-०६-२००४ राहील.)

क) **पशुपक्षी खाद्य :** याकरिता एकुण (४) कोरे निविदा पत्रकाची विक्री झाली असून, (०४) भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

अ. क्र.	निविदाधारकांचे नांव	भाव प्रति किलो	
१.	श्री. गजानन हारदे	७४०.००	१२१०.००
२.	श्री. सय्यद अहमद उल्ला	७७५.००	१३००.००
३.	श्री. मोहम्मद जावेद	१००५.००	१४५०.००
४.	श्री. मोहम्मद ईब्राहीम	११५०.००	१६५०.००

सर्वात कमी दर श्री. गजानन हारदे यांचे असून, मा. आयुक्त यांची मान्यते अन्वये पशु-खाद्या रु. ७४०.०० पक्षी खाद्य रु. १२१०.०० पुरवठा करण्यास मान्यता दिली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

ड) **भाजीपाला व फळफळावळा :** या करीता एकुण (४) कोरे निविदा पत्रकाची विक्री झाली असून, एकुण (३) निविदा भरुन प्राप्त झाली आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अ. क्र.	मालाचे वर्णन	श्री. जनार्दन शेळके	श्री. प्रभाकर पवार	श्री. युसूफ खान
१.	केळी	७.७५	८.००	१२.००
२.	मोसंबी	११.५०	२०.००	१५.००
३.	चिक्कु	१५.५०	१७.५०	१८.००
४.	पि. टोमॅटो	९.००	१०.५०	१३.००
५.	काकडी	१२.००	१७.५०	१२.००
६.	गाजर	०५.४०	०५.५०	१०.००
७.	बटाटे	०८.००	०९.१०	१२.००
८.	कोबी	१०.००	१०.५०	१४.००
९.	वांगी	०६.००	०८.००	०८.००
१०.	पालकभाजी	०५.००	०८.००	१०.००

वरील प्रमाणे सर्वात कमी दर श्री. जनार्दन शेळके यांचे असून, मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

इ) **मासोळी :** या करीता एका कोरी विक्री झाली असून, एकच निविदा प्राप्त झाली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

श्री. मुमताज अहेमद	मासोळी	६३.०० प्रती किलो
	झिंगे	८०.०० प्रती किलो

मा. आयुक्तांचे मान्यते मासोळी रु. ६१.०० व झिंगे रु. ७७.०० या दराने पुरवठा करण्यास मान्यता दिलेली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

ई) **किराणा पदार्थ :** याकरीता एकुण दोन कोरे निविदाची विक्री झाली असून, दोन निविदा प्राप्त झालेल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे.

अ. क्र.	मालाचे वर्णन	भारत किराणा औरंगाबाद	चेतन प्रोव्हिजन औरंगाबाद
१.	हरभरे	२४.००	२४.५०
२.	गहु	१०.००	१०.५०
३.	तांदुळ	१४.००	१४.५०
४.	शेंगादाणे	३८.००	३९.००
५.	गुळ	१७.००	१७.५०
६.	साखर	१६.००	१६.००

७.	कॉकीवडी	२२.००	२२.००
८.	निरमा पावडर	१८.५०	१८.५०
९.	माचिस बॉक्स	७.५०	७.५०
१०.	लक्स सोप	१२.५०	१२.५०
११.	रिन सोप	८.००	८.००
१२.	लाईफ बॉय सोप	१०.००	१०.००

वरील प्रमाणे भारत किराणा यांचे दर सर्वात कमी असून, मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार खालील दराने पुरवठा करण्यास संमती दर्शविली आहे.

अ. क्र.	मालाचे वर्णन	मा. आयुक्तांशी झालेल्या वाटाघाटीनुसार ठरलेले दर
१.	हरभरे	२३.५०
२.	गहु	०९.५०
३.	तांदुळ	१३.५०
४.	गुळ	१६.००
५.	साखर	१५.००
६.	निरमा पावडर	१८.००
७.	माचिस बॉक्स	०७.५०
८.	रिन सोप	०८.००
९.	लाईफबॉय सोप	१०.००

वरील प्रमाणे दर कमी केले असून, प्रस्ताव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००३-२००४ या एकावित्त्यि वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्राहालयातील प्राण्यांना खाद्य पुरवठयाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी खालील प्रमाणे निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ) लुर्सन घास पुरवठयासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराने निविदाधारक श्री. जनार्दन शेळके यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार रु. १.६० प्रती किलो या दराने लुर्स घास खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते.

ब) शाळु ज्वारी बाटुक व कडबा पुरवठयासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी कमी दराने निविदाधारक श्री. जनार्दन शेंळके यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार शाळु कडुबा ४२०० रु. प्रती टन व शळु बाटुक ५२०० रु. प्रतीटन या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. (दिनांक ०१-०७-२००३ ते ३०-०६-०४) पुरवठयाचा कालावधी राहील.)

क) पशु-पक्षी खाद्या पुरवठयासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे म्हणजे पशु-खाद्य रु. ७४० प्रती क्विंटल व पक्षी खाद्य १२१० प्रती क्विटंल या दराची श्री. गजानन दारदे यांची निविदा स्विकारण्यास मंजुरी देण्यात येते.

ड) भाजीपाला व फळाफळावळ पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची श्री. जनार्दन शेळके यांची निविदा स्विकारण्यास मंजुरी देण्यात येते.

इ) मासोळी पुरवठयासाठी प्राप्त झालेल्या निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार मासोळी रु. ६१.०० प्रती किलो व झिंगे रु. ७७.०० प्रती किलो श्री. मुमताज अहेमद यांचेकडुन खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते.

ई) किराणा पदार्थ पुरवठयासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे. भारत किराणा औरंगाबाद यांची निविदा स्विकारण्यास व झालेल्या वाटाघाटी नुसार खालील दर्शविलेल्या ॲटम समोरील दरास मंजुरी देण्यात येते.

अ. क्र.	मालाचे वर्णन	मा. आयुक्तांशी झालेल्या वाटाघाटीनुसार ठरलेले दर
१.	हरभरे	२३.५०
२.	गहु	०९.५०
३.	तांदुळ	१३.५०
४.	गुळ	१६.००
५.	साखर	१५.००
६.	निरमा पावडर	१८.००
७.	माचिस बॉक्स	०७.५०
८.	रिन सोप	०८.००
९.	लाईफबॉय सोप	१०.००

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. १०१ :

श्री. पी. यु. तुर्कमाने, विभागीय अधिकारी विभाग क्र. ४ मनपा, औरंगाबाद यांचे आदेशा जा. क्र./मनपा/मआ/स्वीस/०२/५२१ दिनांक २३-१०-२००२ अन्वये कायमस्वरुपी गोठविण्यात आलेल्या दोन वेतनवाढी खुल्या करणे संबंधीच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मा. सभापती : अपील मंजुर करण्यात येते.

ठराव :

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६८४ अन्वये श्री. पी. यु. तुर्कमाने यांचे कायमस्वरुपी गोठाविण्यात आलेल्या दोन वेतनवाढी खुल्या करण्यासंबंधीचे अपील मंजुर करण्यात येते. प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करुन संबंधीताच्या गोठविण्यात आलेल्या दोन वेतनवाढी खुल्या कराव्यात.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचीव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १०-०४-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गरुवार दिनांक १० एप्रिल २००३ रोजी मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा (सभापती निवड) " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ३.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील सभासद उपस्थित होते.

१.	स. स. श्री. चंद्रशेखर लक्ष्मीनारायण जैस्वाल	स. सदस्य
२.	स. स. श्री. चंद्रात्रे सुवर्णा उमेश	स. सदस्य
३.	स. स. श्री. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर	-//-
४.	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
५.	स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक	-//-
६.	स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन	-//-
७.	स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग	-//-
८.	स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण	-//-
९.	स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग	-//-

विषय क्र. १ :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करणे.

पिठासन अधिकारी : मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) स्थायी समिती सभापती निवड करण्याकरीता दिनांक ०१ एप्रिल २००३ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषीत करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक ०६ एप्रिल २००३ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारण्याची कार्यवाही पुर्ण झाली असून, दिनांक ०६ एप्रिल २००३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहे.

अ. क्र.	उमेदवारांचे नांव	सुचक.	अनुमोदक
१.	श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक	श्रीमती मानकापे पार्वती	सौ. सुवर्णा चंद्रात्रे
		सौ. सुवर्णा चंद्रात्रे	श्री. घोडेले नंदकुमार
		श्री. संजय शिरसाठ	श्रीमती जयश्री किवळेकर
२.	सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन	श्री. ठकुजी वाणी	सौ. शाहिनजफर व म. जफर
		श्री. शे. इलियास किरमाणि	श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान
३.	श्री पंडागळे रतनकुमार नारयणराव	श्री. साळवे माणिक लक्ष्मण	श्री. शे. इलियास किरमाणी

पिठासन अधिकारी : सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४ व ४७ अन्वये आता प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे छाननीचे काम पुर्ण झाले असून, खालील नामनिर्देशनपत्रे वैध ठरली आहेत.

१. स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
२. स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव

पिठासन अधिकारी : वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक त्यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर, इच्छुकाला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच्य संमतीने ३० मिनिटाच्या अवधीत म्हणजे व ३.३५ वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना स्थायी समिती सभापती पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव ३.३५ वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर स्थायी समिती पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पिठासन अधिकारी : स्थायी समिती सभापती पदासाठी उमेदवारांपैकी विहीत मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

अ. क्र.	**उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे**
१.	स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव

आता स्थायी समिती सभापती निवडणुकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिगंणात आहेत.

अ. क्र.	**उमेदवारांची नांवे**
१.	स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक

मा. सभापती : सभापती स्थायी समिती या पदासाठी योग्य रितीने सुचविण्यात आलेले नामनिर्देशनपत्रापैकी आता फक्त श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक हे एकच नामनिर्देशनपत्रक शिल्लक असल्यामुळे शासनाने दिनांक २९ जानेवारी १९८८ ला मंजुर केलेले महानगरपालिकेचे व समित्यांचे कामकाज इत्यादी संबंधी जादा नियमावली नियम क्र. ४८ अन्वये श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक यांची स्थायी समिती सभापती पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात येते. व त्यांचे अभिनंदन करण्यात येऊन त्यांनी सभापती स्थायी समिती पदाचा पदभार स्विकारावा अशी विनंती करण्यात येते.

(याचे वेळी नुतन मा. सभापती श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक हे पदग्रहण करतात.)

एम. ए. पठाण यांनी पुष्पगुच्छ देऊन सभापती यांचे स्वागत केले व यांनतर समायोचित भाषणे झाली.

ठराव :

स्थायी समिती सभापती, पदासाठी वैध ठरलेल्या नामनिर्देशन ज्यापैकी विहीत मुदतीत नामनिर्देशन पत्र परत घेतल्यानंतर श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक हे एकच नामनिर्देशन पत्र शिल्लक असल्यामुळे सभा कामकाज नियमावलीचे जादा नियमातील नियम क्र. ४८ अन्वये श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक यांची स्थायी समिती सभापती पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या बरोबरच जण गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचीव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २८-०५-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. बुधवार दिनांक २८ मे २००३ रोजी मा. सभापती श्री. भाऊसाहेब पुंडलिकराव ताठे ह्यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह "येथे दुपारी १२.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील स. सभासद उपस्थित होते.

१)	स. स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग	स. सदस्य
२)	स. स. श्री. चंद्रात्रे सुवर्णा उमेश	स. सदस्य
३)	स. स. श्री. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर	-//-
४)	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
५)	स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन	-//-
६)	स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग	-//-
७)	स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण	-//-
८)	स. स. श्री. शेख इलियास किरमानी	-//-
९)	स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग	-//-
१०)	स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर	-//-
११)	स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फर यारखान	-//-
१२)	स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण	

चर्चा :

श्री. इलियास किरमानी, श्रीमती मानकापे पार्वती : मा. सभापती यांचे अध्यक्षतेखाली ही पहिलीच सभा होत आहे. मा. आयुक्तांनी उपस्थित असणे आवश्यक होते.

श्री. संजय शिरसाठ, श्रीमती जयश्री किवळेकर : मा. आयुक्त यांनी तसे लेखी कळविले आहे का? मा. सभापतींच्या अध्यक्षतेखाली पहिलीच सभा होत आहे. उपस्थित राहणे आवश्यक होते.

श्री. घोडेले नंदकुमार : मा. आयुक्तांनी या सभेला उपस्थित असणे आवश्यक आहे का? नियमात काय दिले, खुलासा द्यावा. लेखी स्वरुपात उपआयुक्त यांना कळविले का?

श्रीमती शाहीन जफर : मा. आयुक्तांनी आजच्या बैठकीस उपस्थित असणे आवश्यक होते. स्थायी समिती हा सर्वोच्च समिती आहे. मा. सभापती यांची नव्यानेच या पदावर नियुक्ती झाली असून, त्याचे अध्यक्षतेखाली पहिल्यांदा सभा होत आहे. आयुक्तांनी परवानगी घेतलेली आहे का?

उप आयुक्त (प्र.) : मा. आयुक्तांनी मला संदेश दिला व त्याच्या वतीने सभेला उपस्थित राहण्याबाबत प्राधिकृत केले आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : या नुतन सभापतीचा मा. आयुक्त उपस्थित नसल्याने अपमान झालेला आहे. सभापतींना मा. आयुक्तांनी अनुपस्थितबाबत कल्पना दिलेली आहे का?

श्री. संजय शिरसाठ : मा. आयुक्त येत नाही तोपर्यंत सभा कामकाज चालवू नये. मा. आयुक्तांनी सभापतींना अनुपस्थित राहण्याबाबत काही कळविलेले आहे का? मा. सभापतींनी याबाबतीत खुलासा करावा.

श्री. माणिक साळवे : यापुर्वीही सर्वसाधारण सभेत मा. आयुक्त श्री. गजभीये उपस्थित नसल्याने सभा तहकुब करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे आजची सभा थोडया वेळाकरीता तहकुब करावी. मा. आयुक्तांनी बोलाविण्यात यावे. नंतर सभा बोलवावी.

मा. सभापती : मा. आयुक्तांनी अनुपस्थित राहण्याबाबत मला काहीही कळविलेले नाही.

श्री. संजय शिरसाठ : मा. आयुक्तांनी सभापतींनी काहीही कळविलेले नाही. उपआयुक्त (प्र.) यांना उपस्थित राहण्याबाबत कळविले त्यांचे कडे अगोदरच उपआयुक्तांचा अतिरिक्त पदभारत आहे. या सभागृहात जी चर्चा होईल निर्णय होईल त्यावर काय्रवाही करण्यास आयुक्त म्हणून प्रभारी उप आयुक्त सक्षम आहेत का? ते सक्षम नसतील तर मा. आयुक्तांना सभेला बोलवावे. सभा तहकुब करावी.

मा. सभापती : उप आयुक्त (प्र.) यांनी मा. आयुक्तांना संदेश सभेला बोलवावे. १/२ तासांसाठी सभा तहकुब करण्यात येते. (वेळ १२.१० वाजता सभेला सुरुवात १२.४० वाजता)

(सभा तहकुबीच्या वेळेत मा. आयुक्त सभागृहात सभेसाठी उपस्थित राहातात.)

श्रीमती पार्वती मानकापे : मा. आयुक्त आजच्या बैठकीला उपस्थित राहील्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

मा. सभापती : आता विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

विषय क्र. २ :

दि. १५-०२-२००३ दि. १७-०२-२००३, दि. २१-०२-२००३ दि., २८-०२-२००३, दि. १३-०३-२००३ दि. २९-०३-२००३, व दि. १०-०४-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. माणिक साळवे : आजच्या बैठकीसाठी जवळपास एकुण ७ इतिवृत्त सादर झाले. प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त त्या त्या सभेच्या वेळी देण्यात यावेत.

श्री. नंदकुमार घोडेले : दिनांक १५-०२-२००३ च्या इतिवृत्तातील विषय क्र. ७० हा सि. टी. आर. मॅन्युफॅक्चरिंग लि. या कंपनीस आयात मालावर जकात कर भरण्याकरीता चालु खाते उघडण्याचा प्रस्ताव होता. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन पुन्हा सविस्तर प्रस्ताव सादर करावा असा निर्णय झाला प्रस्ताव आलेला नाही. खुलासा द्यावा. ही सभा घेऊन ०३ महिने आले. प्रशासनाने प्रस्ताव का आणलेला नाही.

मुख्यलेखाधिकारी : सदरचा प्रस्ताव सविस्तर माहितीस्तव मा. आयुक्त यांचे मान्यतेसाठी सादर केलेला आहे. पुढील बैठकीत या संदर्भाचा प्रस्ताव सादर होईल.

श्री. नंदकुमार घोडेले : दिनांक १७-०२-२००३ च्या इतिवृत्तातील पान क्र. १४ वर मा.सभापती यांनी रुलींग दिले की, शहरातील मालमत्तेचे सर्वेक्षण १० मार्च पुर्वी सुरु होईल. या संदर्भात प्रशासन आतापर्यंत का प्रयत्न केलेले आहे. तसेच १७ कोटीचा थकबाकी खाजगी संस्थेमार्फत वसुल करणार होते. काय कार्यवाही केली. निविदा काढण्यात आलेल्या आहात का?

करमुल्यनिर्धारण अधिकारी : निविदा तयार केल्या आहेत. मुख्यलेखाधिकारी यांचेकडे संचिका पाठविलेली आहे.

मा. आयुक्त : प्रकरण मा. उच्च न्यायालयात असेल तर तपासणी करुन पहावे लागेल. न्यायप्रविष्ठ मुद्दे असतील तपासावे लागेल. प्रस्ताव कसा केला किती मालमत्ता आहे. त्यात खाजगी किती व अन्य किती आहेत. ही धोरणात्मक बाब असून, अत्यंल्प महत्वाची बाब आहे. पुर्ण मालमत्ताचे सर्वेक्षण करणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. या प्रस्तावास प्राधान्य दिलेले आहे. त्या संदर्भाची संचिका तयार केलेली आहे. कायदयाच्या बाजुचा अभ्यास करुन निर्णय घेता येईल. आताच काही उत्तर देता येणे शक्य नाही. एकत्रित नसून निर्णय घेता येईल.

श्री. नंदकुमार घोडेले : यात १७ कोटीची थकबाकी वसुल करावी असे रुलींग आहे. ही थकबाकी निविदा काढुन खाजगी अभिकर्त्या मार्फत करावी. निविदा काढावयाची आहे किंवा नाही निर्णय घ्यावी.

मा. आयुक्त : सभागृहाच्या सुचनांची प्रशासन नोंद घेत आहे.

मा. सभापती : १७ कोटीची मालमत्ता व पाणीपट्टीची थकबाकी वसुली करण्याबाबत प्रशासनाने तात्काळ प्रयत्न करावे. शहरातील मालमत्ताचे सर्वेक्षण सुध्दा तात्काळ करण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

ठराव :

दि. १५/०२/२००३ दि. १७-०२-२००३ दि., २१-०२-२००३, दि. २८-०२-२००३ दि. २९-०३-२००३, व दि. १०-०४-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. ३ :

मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेने या कार्यालयाचे आदेश क्र. मनपा/भांडार/शिक्षण/२००२/८६ दिनांक १०-०१-२००२ अनुसार औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह हर्सुल यांना बास्करपट्टी व्हॅटकलर १०X१५ च्या एकुण ३१५० नगाची प्रति नग ७,२५,२८८/- एवढया रक्कमेचे आदेश दिले होते.

सबंधित कार्यालयाने दिनांक २७-०२-२००२ रोजी सदरील साहित्याचा पुरवठा केला असून, प्राप्त साहित्याची तपासणी मान्य नमुन्यानुसार करण्यात आली असता फक्त ४० नग नमुन्याप्रमाणे आढळल्या मा. आयुक्त यांची तजवीज दिनांक २२-०३-२००२ अनुसार वरील प्रमाणे फक्त ४० नग आसनपट्टया स्विकारण्यात येऊन उर्वरित साहित्य परत घेऊन जाणेबाबत संबंधितास पत्र देण्यात आले. परंतु स्मरणपत्रे देऊनही संबंधितांनी साहित्य परत घेऊन न जाता साहित्याची तांत्रिक तपासणी करणे संबंधी विनंती केली असता कारागृहाचे प्रतिनिधी यांना समक्ष बोलाविण्यात येऊन नमुन्या प्रमाणे साहित्य आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात आली असता त्यांनी साहित्याची तपासणी करुन दुरुस्त साहित्य १५ दिवसाचे आत पुरविण्यात येईल याबाबत आश्वासन दिले परंतु तसे झाले नाही.

मा. आयुक्त यांचे स्वाक्षरीने मा. कारागृह उपमहानिरिक्षक हर्सुल जेल, औरंगाबाद यांना अ. शा. पत्र क्र./मनपा/भांडार/१४४/२००२ दिनांक २०-०७-२००२ अनुसार देण्यत आले. परंतू त्यांनी त्यालाही प्रतिसाद दिला नसल्याने मा. आयुक्त यांचे स्वाक्षरीने दिनांक १२-०९-२००२ रोजी निर्वाणीचे पत्र देण्यात आले. त्यास अनुसरुन प्राप्त पत्रानुसार साहित्याची तांत्रिक तपासणीसाठी हातमाग यंत्र माग व वस्त्रोद्योग औरंगाबाद या

कार्यालयास पत्र देवुन साहित्याची तपासणी करण्यात आली. प्राप्त तपासणी अहवाल खालील प्रमाणे.

१.	चांगल्या प्रतीच्या घरपट्टया	२१३५
२.	मिक्स स्वरुपाच्या बस्करपट्टया	५५५
३.	कमी प्रतीच्या बस्करपट्टया	४६०

वरील प्रमाणे प्राप्त अहवालानुसार मनपाने चांगल्या प्रतीच्या बस्करपट्टया स्विकारुन उर्वरीत साहित्य परत घेऊन जाणेबाबत संबंधितास कळविण्यत आले. परंतू त्यांनी सदरील प्रस्ताव देखील नाकारला व साहित्यांची तपासणी मुंबई येथील लेबरोटरी मे. केंद्रीय कपास प्रौद्योगिक अनुसंधान संस्थान येथे करणे बाबतचा आग्रह धरला त्यामुळे वरील प्रमाणे वेगवेगळया प्रतीच्या बस्करपट्टयांचे एकुण पाच नमुने व पसंत नमुन्यासह तपासणीस पाठविण्यात आले प्राप्त अहवालानुसार पाचही आसनपट्टया नाकारण्यात आल्याने संबंधितास तपासणी अहवालाच्या प्रतीसह पत्र देऊन संपुर्ण साहित्य परत घेऊन जाण्यास विनंती करण्यात येऊन सदरील पत्राची प्रत मा. अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरिक्षक, पुणे यांनी देण्यात आली. मा. आयुक्त यांचे सहित अ. शा. पत्र क्र./मनपा/भांडार/२००३/२४६ दिनांक २८-०१-२००३ नुसार मा. अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरिक्षक पुणे यांना साहित्य तसेच पडुन आहे व त्याचा शालेय विद्यार्थ्यांना देता येत नाही. करीता माहितीस्तव व पुढील आदेशास्तव सादर.

संवाद :

मुख्यलेखाधिकारी : भांडार विभागातर्फे हर्सुल कारागृहातून बस्करपट्टी व्हॅट कलरच्या एकुण ३१५० नगाची प्रतिनग रु. २३०.२५ प्रमाणे रु. ७,२५,२८८/- एवढया रक्कमेचे पुरवठा करण्याचे आदेश दिले होते.सदर कारागृहातुन जो साहित्याचा पुरवठा झाला तो सॅम्पलप्रमाणे नाही. वेळोवेळी पत्रव्यवहार केला सदर साहित्याची तपासणी हातमाग, वस्त्रोद्योग यांचेकडुन करण्यात आली. सॅम्पलप्रमाणे साहित्य पुरवठा न झाल्याने हर्सुल कारागृहात यांना मनपाने पत्राने कळविले. परंतु त्यांनी सदरील प्रस्ताव नाकारला व साहित्याची तपासणी मुबंई येथील लॅबरोटरी मे. केंद्रीय कपास प्रौद्योगिक अनुसंधान संस्था यांचेकडे पाठविण्याचा आग्रह धरला त्यानुसार या संस्थेकडे तपासणीसाठी नमुन पाठविले असता साहित्य नाकारण्यात आले या संदर्भात कारागृह महानिरिक्षक, पुणे यांनाही पत्र देऊन माहिती दिली. एक वर्षापासुन हे साहित्य मनपाकडे पडुन आहे. सॅम्पल प्रमाणे पुरवठा नसल्याने वाटप करता आलेले नाही. वेळोवेळी सर्वसाधारण सभा स्थायी समिती सभेत या साहित्याच्या संदर्भात मागणी झालेली आहे. म्हणुन हे साहित्य तसेच ठेऊन नवीन खरेदी करावे किंवा कसे या संदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री नंदकुमार घोडेले : ज्या अटी शर्ती असेल त्यानुसार कार्यवाही करावी. थंडीच्या दिवसांत मुलांना खाली फरशीवर बसावे लागते. १ वर्ष पुर्ण असेच संपले.

मुख्यलेखाधिकारी : हर्सुल कारागृह हे शासकीय आहे. निविदा न काढता कार्यवाही करावी लागते. अशा साहित्यांचे जे शासनाने दर ठरविलेले आहे. त्याप्रमाणे देय

होते. अटी व शर्ती नसतात. सॅम्पल प्रमाणे साहित्य न आल्याने मा. आयुतांच्या स्तरावर कारागृह निरिक्षक यांना पत्र दिले आहे.

मा. आयुक्त : सन २००२ मध्ये या साहित्यांची मागणी कारागृहाकडे केलेली होती. शासनाच्या नॉर्म्सप्रमाणे मागणी केलेली आहे. दिनांक ०७-०३-२००२ चे स्थायी आदेश आहेत. त्यात मागच्या बऱ्याच आदेशाचा उल्लेख केलेला आहेत. त्याच्या बाहेर जात येत नाही. बाहेर जाऊन निविदा काढल्या तर गंभीर स्वरुपाची कार्यवाही करण्यात येते. त्यांना ॲडव्हान्स पेमेन्ट देण्याबाबतची तरतुद आहे. शासनाचे गृह खात्याचे सचीव यांना सुध्दा या संदर्भात पत्र देऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल या साहित्यात ७ लक्ष रुपये मनपाचे अडकुन पडलेले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : रक्कम दिलेली नसेल तर, तुर्त खरेदी करण्याचे टेंडर काढावे कार्यवाही करावी.

मुख्यलेखाधिकारी : वस्त्रोद्योग, खादी ग्रामोद्योग यांचेकडुन मागणी करावी लागेल. टेंडर काढता येणार नाही. शासनाने निर्बंध घालुन दिल्यानुसार वस्त्रोद्योग खादी ग्रामोद्योग यांचेकडुन मागणी करावी लागेल. शासनाने ३ मंडळास प्राधान्यक्रम दिले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : शासनाने निर्बंध घातलेला असेल तर, शासनास पत्र पाठवून परवानगी घेवून टेंडर पध्दतीने साहित्य खरेदी करण्याची कार्यवाही करावी.

मुख्यलेखाधिकारी : हर्सुल कारागृह हे शासकीय आहे. निविदा न काढता कार्यवाही करावी लागते. अशा साहित्याचे जे शासनाने दर ठरविलेले आहे. त्याप्रमाणे देय होते. अटी व शर्ती नसतात. सॅम्पल प्रमाणे साहित्य न आल्याने मा. आयुक्तांच्या स्तरावर कारागृह निरिक्षक यांना पत्र दिले आहे.

मा. आयुक्त : सन २००२ मध्ये या साहित्याची मागणी कारागृहाकडे केलेली होती. शासनाच्या नॉर्म्सप्रमाणे मागणी केलेली आहे. दिनांक ०७-०३-२००२ चे स्थायी आदेश आहेत. त्यात मागच्या बऱ्याच आदेशाचा उल्लेख केलेला आहे. त्याच्या बाहेर जाता येत नाही. बाहेर जाऊन निविदा काढल्या तर गंभीर स्वरुपाची कार्यवाही करण्यात येते. त्यांना ॲडव्हान्स पेमेंट देण्याबाबतही तरतुद आहे शासनाचे गृह खात्याचे सचीव यांना सुध्दा या संदर्भात पत्र देऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल या साहित्यात ७ लक्ष रुपये मनपाचे अडकुन पडलेले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : रक्कम दिलेली नसेल तर तुर्त खरेदी करण्याचे टेंडर काढावे कार्यवाही करावी.

मुख्यलेखाधिकारी : वस्त्रोद्योग, खादी ग्रामोदयोग यांचेकडुन मागणी करावी लागेल. टेंडर काढता येणार नाही. शासनाने निर्बंध घालुन दिल्यानुसार वस्त्रोद्योग खादी ग्रामोद्योग यांचेकडुन मागणी करावी लागेल. शासनाने ३ मंडळास प्राधान्यक्रम दिले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : शासनाने निर्बंध घातलेला असेल तर, शासनास पत्र पाठवून परवानगी घेऊन टेंडर पध्दतीने साहित्य खरेदी करण्याची कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : जे साहित्य पुरवठा केला ते सॅम्पलनुसार नाही. या संदर्भात मुबंईच्या लॅबरोटरी में. केंद्रीय कपास प्रोद्योगिक अनुसंधान संस्थाचा रिपोर्ट मिळालेला आहे. तो अहवाल गृहसचिव यांना कळविला जाईल. गुणवत्ता बरोबर नसल्यामुळे ते स्विकारण येणार नाही.

श्री. माणिक साळवे. : इतर शहरातील कारागृहातुन मागवावे. ७.२५ लक्ष रक्कम मा. आयुक्तांच्या अखत्यारीतील बाब आहे. मा. आयुक्त सुध्दा निर्णय घेऊ शकतात. प्रस्ताव सादर करायची आवश्यकता नव्हती.

श्रीमती पार्वती मानकापे : एक वर्षापासुन साहित्य आहे. आज प्रस्ताव येतो हे योग्य नसुन शाळेतील लहानमुळे फरशीवर बसतात. याची दखल घेण्यात यावी. वारंवार सभागृहात आसमपट्टया संदर्भात चर्चा झालेली आहे.

श्री. संजय शिरसाठ : शासनाने प्राधान्यक्रम दिल्यानुसार त्याच मंडळाकडुन साहित्याची मागणी करणार जे साहित्य आले. त्याचा तपासणी अहवाल देखील आला असून, योग्य प्रतीचे वाहीत असे शासनास कळवावे तसेच पुरवठा केलेले साहित्य परत घेऊन जाण्यास सांगितले हे साहित्य सुध्दा कारागृह अधिक्षक घेऊन गेले नाही. हे सुध्दा शासनास कळवावे.

मुख्यलेखाधिकारी : या एजन्सीजला पेमेंट दिले नाही. सॅम्पलप्रमाणे साहित्य पुरवठा व केल्याने परत घेऊन जाण्यास प्रशासनाने विनंती सुध्दा केलेली आहे. शाळेत मुलांना बसण्यासाठी आसमपट्टया नाही. शाळा उघडणार पुन्हा अडचण येऊ नये. म्हणून प्रस्ताव सादर केलेला आहे. सभागृहाने निर्णय घ्यावा. यात आता साहित्य मागणीही वस्त्रोद्योग विभागाकडे करावी लागणार आहे.

सौ. सुवर्णा चंद्रात्रे : वस्त्रोद्योग मंडळाकडून मागणी करणार. पुरवठा झालेले साहित्य कारागृहाने परत घेऊन न गेल्यास पुढील कार्यवाही काय करणार आहे.

मुख्यलेखाधिकारी : जो पर्यंत नेत नाही तो पर्यंत सुरक्षित ठेवावे लागेल.

मा. आयुक्त : जेलमध्ये कैदयासंबंधी पुर्नवसन अशी सोय आहे. मा. गृहासचीन यांना लिहावे लागेल. सॅम्पल प्रमाणे साहित्य पुरवठा झाला नाही. सब स्टँडर्ड आहे. त्याच्या वरीष्ठाच्या निर्दशनास आणले पाहिजे त्यांचेकडुन लवकर निर्णय मिळेल.

मा. सभापती : सॅम्पलप्रमाणे साहित्य नाही. गृहखात्यास कळवावे. शासन मान्यता घेऊन वेळ वाया घालवू नये. द्वितीय क्रमांकाचे असेल त्यांना दयावे.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : हे काम आयुक्तांच्या अधिकारातील आहे. कृपया वेळ घालवू नये.

ठराव :

महानगरपालिकेने हर्सुल कारागृहाकडुन घेतलेले साहित्य बस्करपट्टी ही नमुन्यानुसार नस्ल्याने केंद्रीच कपात प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान मुंबई या प्रयोग शाळेचे अहवालानुसार देखील साहित्य नमुन्याप्रमाणे नसल्याने ते परत करण्यात यावेत. याबाबत गृहसचिव मंत्रालय मुबंई यांना उपरोक्त बाबी निर्दशनास आणुन दयावी व बस्करपट्टीची खरेदी ही वस्त्रोद्योग महामंडळाकडुन करावी. सत्वर कार्यवाही असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ४ :

उप आयुक्त (प्रशासन यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००३-२००४ या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्राहालयातील प्राण्याकरीता बीफ (खन्नी) खरेदी निविदा मागविण्यात आलेल्या आहे. मा. आयुक्त यांचे मान्यते अन्वये त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

१. बीफ (खन्नी) - बीफ (खन्नी) करीता एकुण (०७) कोरे निविदा पत्रकाची विक्री झाली असून, एकुण (४) निविदापत्रके भरुन प्राप्त झाली आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

अ. क्र.	निविदाधारकांचे नांव	भाव प्रति किलो रुपये-पैसे
१.	श्री. शेख भूसा शेख करीम	२९.५५
२.	श्री. मोहम्मद जफर मो. युनूस	३१.९९
३.	श्री. अब्दुल रहीम शेख छोटे	३२.६०
४.	श्री. फिरोजखान रहेमानखान	अनामत रक्कम भरली नाही.

वरील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून, तुलनात्मकदृष्टीने सर्वात कमी दर श्री. शेख भुसा शेख करीम यांचे असून, मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर रु. २३.०० प्रति किलो या दराने पुरवठा करण्यास मान्यता दिली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्रीमती जयश्री किवळेकर : उप आयुक्त (प्र.) यांनी प्रस्तावात किती पुरवठा करावे लागेल. रक्कम किती येईल हे नाही प्रस्तावात वेळ घालवण्यात अर्थ नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : प्रस्तावात सविस्तर माहिती दिलेली नाही. बीफ किती लागते. एक महिन्यासाठी किती, वर्षासाठी किती, याचा उल्लेख प्रस्तावात नाही. सविस्तर प्रस्ताव येणे आवश्यक आहे. जनावरांना तुर्त खाद्य नसेल व स्थायी समितीने हा प्रस्ताव मंजुर केला नाही. यातून सभागृहाची बदनामी सुध्दा घेऊ नये. प्रशासनाचा तया खुलासा घ्यावा की, आणखी किती दिवसांसाठी पशुखाद्य आहे. या खाद्यांसाठी अर्थसंकल्पात किती तरतुद केली हे प्राणी संग्राहालय एक आदर्श प्राणी संग्राहालय आहे. मागील वर्षी कोणत्या दराने बीफ (खन्नी) घेण्यात आले. त्याबाबतही खुलासा करण्यात यावा.

श्रीमती पार्वती मानकापे : मागील वर्षात रुपये २२० पैसे प्रमाणे खरेदी केलेली आहे. गेल्या वेळेस पुरवठा केलेले बीफ चांगल्या प्रतीचे होते का असेल तर जे प्राणी दगावले ते कशामुळे मृत्यू झालेल्या जनावरांचे बील देत होतो का? खुलासा द्यावा. किती जनावरे आतापर्यंत मृत्यूमुखी पडली किती बीफ संपूर्ण वर्षासाठी खरेदी केलेले झालेला खर्च किती यावर्षीसाठी किती बीफ (खन्नी) खरेदी करावी लागणार याचा खुलासा दयावा.

संचालक प्राणी संग्राहालय : मागील वर्षीचे दर व बीफ संदर्भात सविस्तर स्टेंटमेंट सादर केलेले होते. कोणत्या जनावरांना किती बीफ दररोजचे लागते या संदर्भात सभागृहाला माहिती दिलेली होती. बाजार भावाप्रमाणे ३०/- दर आहेत. गेल्या वेळेस दोन पुरवठा धारकांच्या वादात एक पुरवठाधारक यांना रुपये ९.९०/- प्रति किलो प्रमाणे पुरवठा केला. जे बीफ येते ते शासकीय डॉक्टराकडुन तपासणी करुनच त्यानंतर आपले कर्मचाऱ्यांसमवेत प्राणी संग्राहालयात आणले जाते. खन्नी होतो. मेलेल्यांचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : मागील वर्षात बीफसाठी किती खर्च झाला किती. बीफ घ्यावे लागते. दररोज किती लागते. यावर्षी किती खरेदी करणार, किती खर्च येणार याचा सविस्तर तक्ता देणे गरजेचे आहे.

संचालक प्राणी संग्राहालय : प्राण्यांना दररोज २२१ किलो बीफ (खन्नी) लागते. एकुण खर्च १५.१६ लक्ष रुपये येणार आहे. दर निश्चित करावे. सभागृहाला पुढील बैठकीत सविस्तर माहिती दिली जाईल.

श्री. नंदकुमार घोडेले : कमी दराने निकृष्ट प्रतीचे खरेदी केले. त्यामुळे जनावरे दगावले अशी शंका येते.

श्री. संजय शिरसाठ : अंदाजपत्रक सादर केले नाही. मागील वर्षात किती बीफ (खन्नी) खरेदी केले त्या संदर्भात प्रस्तावात सविस्तर माहिती द्यावयास पाहिजे होती. पशुखादय तुर्त नसेल तर दिवसासाठी २३/- रु प्रमाणे मान्यता देऊ शकतो. परंतू सविस्तर असा प्रस्ताव येणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : १० लक्ष पेक्षा जास्त असल्यास स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. दराबाबत वाटाघाटीनंतर ठरलेले दर किती लागेल इत्यादी तपशील मूळ प्रस्तावात आवश्यक आहे ही आर्थिक शिस्त आहे. दैनंदिन लागणारे खाद्या (गरज) काढण्यात आलेले आहे. मुक्या जनावराचा प्रश्न हा दर मान्य असेल तर ठरवावे. पुढील सभेत किती प्रमाणात बीफ लागते हा वादाचा विषय होऊ नये म्हणून केंद्र सरकारने ठरविलेले निकष काय आहे हे तपासुन सादर करावे.

श्री. संजय शिरसाठ : दररोज खाद्य लागते. कमी दराने घेऊन ते चांगल्या प्रतीचे असणे गरजेचे आहे. दररोज किती खाद्य लागते. मागील वर्षी किती लागते यावर्षी किती लागणार आहे. सविस्तर माहिती सह प्रस्ताव सादर करावा.

संचालक प्राणी संग्राहालय : पशुखादय हे केंद्र सरकारच्या नॉर्न्स प्रमाणेच खरेदी होत आहे यात शंका घेण्याचे कारण नाही. निविदा अंतिम घेण्यास वेळ लागेल. ३० जुन पर्यंत रु. २३/- प्रमाणे खरेदी करण्यास निर्णय घ्यावा.

श्री. नंदकुमार घोडेले : पुढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव सादर करावा. ३० जुन पर्यंत२३/- रु. दराने तुर्त खरेदी करण्यास मान्यता मिळावी.

मा. सभापती : प्राण्यांना बीफ (खन्नी) रु. २३/- प्रति किलो प्रमाणे ३० जुन पर्यंत खरेदी करण्यास मान्यता देण्यात येते. सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा.

ठराव :

सभागृहास झालेल्या चर्चेनुसार प्राणी संग्राहालयातील प्राण्यांसाठी देण्यात येणारे एकुण बीफ ते खरेदीसाठी असणारी तरतुद, मागील वर्षीचे बीफचे भाव व त्यावरील खर्च तसेच यावर्षीसाठी लागणारा खर्च इत्यादी सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करावा. तुर्त २३/- प्रति किलो या दराने ३० जुन २००३ पर्यंत बीफ खरेदी करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्रीमती जयश्री किवळेकर : बन्सीलाल नगर येथील दिलेल्या बांधकाम परवानगी संदर्भात अहवाल देणार होते. अदयाप अहवाल सादर झालेला नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : कालच्या सर्वसाधारण सभेतच अहवाल सादर झालेला होता. मा. सभागृहांचे सर्व सदस्य सर्वसाधारण सभेत आहेत. अहवाल देण्यात आलेला असून, त्यावर चर्चा करणे योग्य नाही. सर्वसाधारण सभा निर्णय घेईल.

मा. सभापती : या अहवालाची प्रत माझ्याकडे आलेली आहे. स. सदस्यांशी मागणी असेल तर सर्व सदस्यांना प्रत दिली जाईल.

श्री. नंदकुमार घोडेले : मागील वर्षाचे बजेट १२८ कोटीचे होते ९९ कोटी वसुल आहे. २८ निर्माण झाली. यावर्षी सुध्दा १४९ कोटीचा अर्थसंकल्प मंजुर केला. प्रशासनास खुलासा विचारु इच्छितो की, २८ कोटीची तुट निर्माण होत

असेल तर, महापालिकाचे अधिकरी, कर्मचारी किती कार्यक्षम आहे हे दिसून येते. २ महिन्यापासुन वसुली कमी होत आहे. सादर केलेल्या अर्थसंकल्पातील उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने आतापर्यंत काय प्रयत्न केलेले आहे. असता गेल्या वर्षी २८ कोटीची तुट यावर्षी पुन्हा त्यापेक्षा जास्त होणार याचा अर्थसंकल्प व फुगवून दाखविला जातो. विकास कामांना खिळ बसतो. वसुली मात्र तेवढी केली जात नाही. जे अधिकारी, कर्मचारी चांगल्या प्रकारे वसुली करतात. त्याचा प्रशासनाच्या वतीने सन्मान सुध्दा झाला पाहिजे या मताशी हे सभागृह सहमत आहे. जे कामात कुचराई करतील त्यांचेवर कार्यवाही सुध्दा झाली पाहिजे.

मुख्यलेखाधिकारी : गतवर्षी १२७ कोटीचा अर्थसंकल्प होता. ९९.३५ कोटीचे उद्दीष्ट झालेले आहे. प्रशासनातर्फे ११७ कोटीचा अर्थसंकल्प सादर केला होता. स्थायी समितीने १२१ कोटी केले त्यानंतर १२८ कोटी सर्व साधारण सभेत करण्यात आले. जवळपास ९.१० कोटीचा जासत रक्कमेचा अर्थसंकल्प मंजुर झाला. यावर्षी सुध्दा स्थायी समितीने वाढ सुचवून सर्वसाधारण सभेत सुध्दा सविस्तर चर्चा झालेली असून, कर्मचाऱ्यांना कार्यक्षम करणे तसेच नवीन कर्मचारी झोन निहाय आकृतीबंध तयार करण्याची आवश्यकता आहे. असा खुलासा आलेला आहे. पदांना शासन मंजुरी घेऊन कार्यवाही करावी लागणार आहे. उद्दीष्टाप्रमाणे वसुली जास्तीत जास्त कशी होईल यासाठी मा. आयुक्त यांनी विभाग प्रमुखांची बैठक घेऊन सुक्ष्म नियोजन करण्यासाठी कार्यवाही सुरु केलेली आहे. आयुक्तांच्या स्तरावर विभाग प्रमुख/विभागीय अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. १०० कोटी एकदम वसुल होऊ शकणार नाही. मागील वर्षी सुधारीत अर्थसंकल्प १०२ कोटीचा होता. यास शासनाकडुन मिळणारे अनुदान प्राप्त झालेले नाही. वित्त आयोगाकडुन प्राप्त होणारे अनुदान प्राप्त झाले नाही. सुधारीत नुसार वसुली झालेली आहे. यावर्षी १४९ कोटीचा अर्थसंकल्प झालेला आहे. अर्थसंकल्पानुसार प्रशासनाच्या वतीने वसुली संदर्भात सुक्ष्म नियोजन तयार करुन कार्यवाही होणार आहे. आवश्यक सुचना विभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत जो पर्यंत आकृतीबंध तयार होत नाही. तोपर्यंत १४९ कोटी वसुल होणे शक्य होणार नाही. ही वस्तुस्थिती आहे. स्पील ओव्हरची कामे करावी लागणार असून, नवीन नमुद केलेली कामे बऱ्याच प्रमाणात कमी करावी लागणार आहे. नागरिकांना ड्रेनेज लाईन पाणी रस्ते या आवश्यक सुविधा पुरविण्यासंदर्भात त्या कामांना प्राधान्य द्यावे लागणार आहे. स्पील ओव्हर नवीन कामांना बंधन घालावे लागेल. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या स्तरावर सुचविलेल्या कामाबद्दल विचार करावा लागेल. येणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत या संदर्भात सविस्तर टिप्पणी सादर करण्यात येईल.

सौ. सुवर्णा चंद्रात्रे : उपआयुत सुचनांचा उल्लेख नाही. संगणकीकरण दर ३ महिन्याने रिव्ह्यु याचा उल्लेख नाही.

मुख्यलेखाधिकारी : विभाग प्रमुखांना सुचना द्यावयाच्या आहेत. त्याचा विचार केला जाईल.

श्री. इलियास किरमाणी : वसुली होत नाही तर वॉर्डात कामे सुध्दा केली जात नाही. गेल्या वर्षी किती जकात वसुली आली होती. यावर्षी किती आलेली आहे. २ महिन्यात २ कोटीचा फरक नैसर्गिक वाढीनुसार यापेक्षा जास्त जकात वसुली यावयास पाहिजे होती. जकात विभागावर सक्षम अधिकारी नियुक्त

करावे. एकाच अधिकाऱ्याकडे दोन देणे बरोबर नाही. २ कोटी नैसर्गिक वाढ नुसार वसुली यावयास पाहिजे होती. जकात विभागावर सक्षम अधिकारी नियुक्त करावे. एकाच अधिकाऱ्याकडे दोन चार्ज देणे बरोबर नाही. २ कोटी नैसर्गिक वाढ नुसार वसुली यावयास पाहिजे होती. दरवर्षी २ कोटी कमी आल्यास महापालिका दिवाळखोरीत निघेल. ले-आऊटच्या बांधकाम परवानगीच्या किती तरी संचिका एन. ए. ऑर्डन नसल्याने प्रलंबीत पडलेल्या आहेत. यामुळे महापालिकेचे नुकसान होत आहे. एन. ए. ऑर्डर देण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची आहे. एन. ए. ऑर्डर नसेल तरी परवानगी दिली पाहिजे. महापालिकेचे नुकसान करु नये.

श्री. नंदकुमार घोडेले : एन. ऑर्डर नाही म्हणुन परवानगी दिली नाही अशी किती प्रकरणे प्रलंबित आहे. ज्या नागरिकांनी परवानगीची मागणी केली. एन. ए. ऑर्डर नसेल तर व त्या व्यक्तीने मा. जिल्हाधिकारी यांचेकडे एन. ए. साठी अर्ज केला असेल तर नागरिकांना बांधकाम परवानगी दिली पाहिजे. केवळ एन. ए. ऑर्डर नाही म्हणून बांधकाम परवानगी देणार नाही ही भूमिका समोर देऊन मनपाचे नुकसान करणे बरोबर नाही. तसेच जकात विभागासाठी सक्षम अधिकारी नियुक्त करावेत. विभागातील कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बादलचा ह्या ३१ मे २००३ पर्यंत करण्याच्या शासनाचे आदेश आहेत. आता १ महिना वाढविला म्हणुन ज्या कर्मचाऱ्यांना जास्त कालावधी एकाच विभागात आला असेल. अशा कर्मचाऱ्यांच्या तुर्त बदलचा करण्यात याव्यात. नगर रचना विभागातील कर्मचाऱ्यांच्या सुध्दा बदल्या कराव्यात. एन. ए. ऑर्डर नाही म्हणुन परवानगी दिली जात नाही. यात महापालिकेचे नुकसान होते. एखादया जागेची रजिष्ट्री करतांना संबंधित विभाग महापालिकेच्या नाहरकत प्रमाणपत्राशिवाय कार्यवाही करते हे नियमाने बरोबर आहे का? एन. ए. ऑर्डर जिल्हाधिकारी कार्यालय देते. एन. ए. साठी त्या व्यक्तीने अर्ज दिलेला असेल तर, मनपाने यापुढे अशा व्यक्तीला बांधकाम परवानगी देण्याची कार्यवाही करावी.

नगररचनाकार : बांधकाम परवानगी देतांना एन. ए. ऑर्डर असणे आवश्यक आहे. एक खिडकी योजना सुरु केले. तेथे सुध्दा सुचना दिलेली आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : महानगरपालिका कायदयाप्रमाणे बंधनकारक आहे का? आपण गट टाकुन द्यावी. रजिष्ट्री करतांना महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्या जात नाही. एखादया जागेची मनपाच्या एन. ओ. सी. शिवाय रजिष्ट्री न झाल्यास नागरिक स्वत:हुन जागेचा टॅक्स भरुनच रजिष्ट्री करतील.

मा. आयुक्त : बांधकाम परवानगी कोणत्या जागेवर द्यायची हा मुद्दा आहे जी जागा निवासी भुखंड म्हणून वापरासाठी आहे त्यास अकृषी परवान्याची आवश्यकता नाही असे माझे मत आहे. एन. ए. शिवाय बांधकाम परवानगी देता येत नाही. यावर चर्चा करणे योग्य वाटत नाही.

श्री. नंदकुमार घोडेले, श्री. संजय शिरसाठ : एन. ए. ऑर्डर नसेल तरी बांधकाम परवानगी द्यावी. एन. ए. साठी एखादया व्यक्तीने अर्ज केलेला असेल व जिल्हाधिकारी कार्यालयाने कार्यवाही केली नसेल तर, परवानगी देतांना एन. ए. ऑर्डर शिवाय परवानगी न देणे म्हणजे महापालिकेचे नुकसान करणे होय म्हणुन एन. ए. ऑर्डर नसेल तरी परवानगी देण्याचा निर्णय घ्यावा. एन. ए. ऑर्डर

महापालिकेसाठी बंधनकारक नाही. जिल्हाधिकारी विभाग त्यांचे काम करतील मनपाचे जे काम असेल ते या विभागाने करावे. परवानगीसाठी जे दिले तेथे एन. चा उल्लेख केलेला नाही.

मा. आयुक्त : मी रुजू झाल्याबरोबर या विभागाची संपुर्ण माहिती होत आहे. किती बांधकाम परवानगी किती ले-आऊट मंजुर आहेत याची आकडेवारी लवकरच सादर होईल. जो निवासी भुखंड आहे. त्या जागावर त्वरीत परवानगी द्यावयास पाहिजे.

नगररचनाकार : विकास योजनेच्या नकाशातील वापर प्रमाणे व त्यासोबत एन. ऑर्डरची मागणी करण्यात येते. त्याशिवाय बांधकाम परवानगी देत नाही. एक खिडकी योजने अंतर्गत देखील कागदपत्राच्या यादीत सुध्दा एन. ए. ऑर्डर आवश्यक आहे असे दिलेले आहे.

मा. आयुक्त : या संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांचे सोबत चर्चा करुन लवकरच कार्यवाही केली जाईल.

श्री. इलियास किरमानी : जकातीमध्ये २ महिन्यात २ कोटी वसुली कमी झाली यास जबाबदार कोण उत्पन्न कमी झाल्यास वॉर्डात कामे होणार नाही.

प्र. उपआयुक्त (अ) : दोन दिवसांपुर्वीच मी उपआयुक्त (म) पदाचा पदभार घेतला. सन २००३ मध्ये एप्रिल महिन्या ४.३३ कोटी वसुली जकातीतुन झालेली सन २००३-०४ एप्रिल महिन्यात ३.७८ कोटी वसुल झालेले आहे. कमी वसुल होण्याचे कारण एकुण २५ दिवस व्यापाऱ्याचा संप चालु होता. माल आला नाही. ५०-६० लक्ष मागील वर्षाच्या तुलनेत जकात कमी वसुल आलेली आहे.

मा. आयुक्त : जकात वसुलीचा सरासरी इष्टांक १८ लक्ष दररोजच्या गृहीत धरल्यास दररोजच्या वसुली नुसार १८ लक्षला किती कमी पडतो पाहण्यात येईल. जकात वसुलीचा सर्वच कालावधी सारखा नसतो. परंतू काही काळात मालाची आवक जास्त सुध्दा असते तेव्हा वसुली जास्त होणे गरजेचे आहे. यासर्व बाबींचा मी आढावा घेउुन १५ दिवसापुर्वी उपआयुक्त (अ) यांना कारणे नोटीस सुध्दा बजावलेली आहे. त्याचा खुलासा आलेला असून, त्यात संपाचे कारण दर्शविलेले आहे. बाकीची जी कारणे व त्रुटया दाखविल्या त्यावर पुन्हा सविस्तर अहवाल उपआयुक्त (अ) यांचेकडुन मागविला आहे. यात आणखी काय सुधारण करता येईल. प्रस्तावाची तयारी आहे. सुसंगत दिसला त्याचा पाठपुरावा करण्यात इच्छा आहे. जोपर्यंत निविदा प्रसिध्द होत नाही व त्यास योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. तोपयात प्रशासकीय यंत्रणेद्वारेच जकात वसुल करावी लागेल. तो प्लॉईंग स्कॉड चांगले काम करतात. जे उद्दीष्ट ठरवून दिले ते जास्त वाटत असले तरी आपण इष्टकांपर्यंत जाऊ शकतो का. ते समजुन घ्यावे व उपआयुक्त महसुल यांनी यावर अभिप्राय द्यावेत.

श्री. संजय शिरसाठ : एक्सप्रेस लाईनचे काम केले. १० कोटी खर्च झाले. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण या एजन्सीकडे काम दिले होते. त्यांनी काम बरोबर केले नाही. १७% सर्व्हिस चार्ज देण्यात आला आतापर्यंत १.५० ते १.७५ कोटी रुपये सर्व्हिस चार्ज म्हणुन या एजन्सीजला देण्यात आले. या जलवाहिनीचे ५ मे २००३ रोजी तत्परतेने उद्घाटन केले. जनतेच्या अपेक्षेप्रमाणे पाणी पुरवठा आजही होत नाही. वृत्तपत्रात बातमी आली. जलवाहिनी फुटली काही

ठिकाणी रस्त्यावर पाणी वाहते तर काही भागात १ दिवसाआड पाणी दिले जाते. काही ठिकाणी १५-२० मिनिटेच पाणी दिले जाते. आज पाणी ब्रुस्टींगसाठी ३२-३४ लक्षचा बसवावा लागेल असे म्हणण्यात येते. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण आपण १७% सेवा शुल्क देतो त्यांना सुचले नाही. ही बाब त्यांना तेव्हाच लक्षात यावयास पाहिजे होती. मनपाने त्यांना सर्व्हिस चार्ज दिलेला आहे. हे काम त्यांच्याकडुन करुन घेण्यात यावे. व मनपाचे टेक्नीकल विभागाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी होणारा खर्च ही टळेल. गेल्या ६ महिन्यापूर्वी लोकांना होर्डींगच्या लोकांना नोटीसा देतो. त्यावर काय कार्यवाही झाली सांगायला तयार नाहीत. भ्रष्टाचार मोठया प्रमाणात होत आहे. नगररचना विभागात जनता दरबार घेवुन प्रकरणे निकाली काढली. काही कर्मचारी/अधिकारी याचा असा समज झालेला आहे की, या महनगरपालिकेतील कुणीही अधिकारी/आयुक्त आल्यास माझे बदली किंवा इतर कार्यवाही करु शकत नाही. असे ठामपणे सांगतात काही म्हणतात ६ महिन्यात परवानगी दिली तर, काही सुरुवात एकही परवानगी दिली नाही. म्हणून जे काम चुकान आहेत. त्यांचेवर कार्यवाही करण्याची गरज आहे. या मनपाच्या शाळा राजशेशपणे उघडतात. मालमत्ता अधिकारी म्हणतात मी काय करु माझा काय अधिकार आहे. शाळा लग्न व इतर कार्यक्रमास वापरतात. महानगरपालिकेची परवानगी होत नाही. मनपास भाडे देत नाही. मोठया प्रमाणात नुकसान होते याचा विचार कुणीही करीत नाही. मा. आयुक्तांना या सभागृहाच्या वतीने सुचना करेल की, आपणास २२ वर्षाचा मोठा अनुीाव आहे या सर्व बाबतीत प्रतिबंब घालणे आवश्यक आहे. काही आयुक्तांचे अभिनंदनही केलेले आहे. विकास कामाच्या संदर्भात लोकांच्या प्रतिक्रिया मोठया आहे. विकास कामे करीत असतांना किंवा इतर कामात कुणी नगरसेवक अडथळा/अडचण आणत असेल तर, नियमाने त्यांचे नगरसेवक पद रद्द होते. कुणी अडथळा/अडचण आणत असेल तर कार्यवाही सुध्दा झाली पाहिजे. मागील एका सर्वसाधारण सभेत उपआयुक्त (म) यांनी श्री. दिवेकर यांनी श्री. दिवेकर यांनी वसुलीच्या संदर्भात सर्वसाधारण सभेत जाहीर निवेदन केले होते. अधिकारी कुचकामी आहेत. वर्ग ४ चे लोक वसुली करतात. स्टेंटमेंट त्यांनी केलेले होते. ते योग्यच आहे. म्हणुन जे कर्मचारी कामात सक्षम नसतील त्याची त्या विभागातुन त्वरीत बदल्या करण्याची गरज आहे. प्रशासनाला या सभागृहाचे सर्व सहकार्य मिळेल. या सर्व बाबतीत योग्य तो निर्णय मा. आयुक्तांनी दयावे अशी अपेक्षा आहे.

मा. आयुक्त : सर्व विभागाची मी माहिती घेत आहे. योग्य प्रकारे काम न करणाऱ्यावर कार्यवाही होईल यात शंका नाही.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : शासकीय अनुदनासंबंधी प्रशासनाने काय प्रयत्न केलेले आहे.

म. आयुक्त : अत्यंत महत्वाचा मुद्दा स. सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. वरीष्ठ पातळीवर मा. सचिवासह या संदर्भात मी चर्चा केलेली आहे. एकुण ३० कोटी रु. पैकी २४.५० कोटी रुपये येते आहे. लवकरच अुनदान प्राप्त करण्याचे आश्वासन मा. सचिव यांनी दिलेले आहे. मराठवाडयासाठी वेगळा निधी आहे. त्यात फक्त नांदेड औरंगाबाद या दोनच मनपा आहेत. विशेष अनुदान इतर महापालिकेस शासनाने दिलेले आहे. सुरुवातीपासुनच अनुदानासाठी प्रयत्न होणे आवश्यक होते. आता प्रयत्न करावे लागतील.

तसेच वॉर्ड ऑफिसर यांना सक्षम करण्यासाठी या पदावर डेप्युटेशनचे अधिकारी मागविण्याचे प्रयत्न चालु आहे. प्रस्ताव तयार केलेला असून, या संदर्भात प्रयत्न चालु आहेत. मालमत्ता तसेच जकात वसुली ही उद्दीष्टाप्रमाणे होण्यासाठी योग्य त्या उपाययोजना राबविण्याचा प्रयत्न करणार आहोत. पुढील काही काळात वसुली जास्तीत जास्त होण्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाईले.

मा. सभापती : या मनपाने सर्व पदाधिकारी, मा. आयुक्त तसेच जिल्हाचे स्थानिक मंत्री, आमदार यांच्या मदतीने विशेष अनुदान प्राप्त होण्यासाठी शासनाकडे प्रत्यक्ष मागणी करुन प्रयत्न केले जातील.

याच बरोबर जण गन मन या गीताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचीव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २५-०६-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. बुधवार दिनांक २५ जुन २००३ रोजी मा. सभापती श्री. भाऊसाहेब पुंडलिकराव ताठे ह्यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी १२.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील स. सभासद उपस्थित होते.

१.	स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव	स. सदस्य
२.	स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण	-//-
३.	स. स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग	-//-
४.	स. स. सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश	-//-
५.	स. स. सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर	-//-
६.	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
७.	स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन	-//-
८.	स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग	-//-
९.	स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण	-//-
१०.	स. स. श्री. शेख इलियास किरमानी	-//-
११.	स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग	-//-
१२.	स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर	-//-
१३.	स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खान	-//-

चर्चा :

श्री. रतनकुमान पंडागळे : आजच्या सभेला मा. आयुक्त उपस्थित नाहीत.

श्री. घोडेले नंदकुमार : मा. आयुक्त रजेवर गेलेले आहेत. असे वृत्तपत्रातुन वाचविण्यात आले. त्यांच्या वतीने सभेस कोण काम पाहणार आहे. त्यांची सुट्टी झालेली आहे काय? त्यांचा कार्यभार कोणाकडे सुपर्द केला हे सभागृहाच्या निर्दशनास आणुन दयावे.

उप आयुक्त (प्र.) : मा. आयुक्त वैदयकिय रजेवर गेलेले आहेत. त्यांचा पदभार कोणालाही देण्यात आलेला नाही. आम्ही उपआयुक्त म्हणून आलेलो आहोत.

श्री. घोडेले नंदकुमार : ही बाब योग्य नाही. सभागृहात जे महत्वपुर्ण निर्णय घेतले जातील त्याची अंमलबजावणी कोण करणार अन्यथा सभा दोन दिवसानंतर घेण्यात यावी. मा. आयुक्त ज्या सभांना उपस्थित असतात त्या सभेचे बऱ्याच निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. आता मा. आयुक्त सभागृहात नाहीत तर सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होणार आहे काय? या संबंधी तसेच मा. विभागीय आयुक्तांनी भेट घेऊन त्यांच्या निर्दशनास आणुन देणे योग्य होईल.

मा. सभापती : पुढील सभेत अशी परिस्थित निर्माण होणार नाही. याची दखल घ्यावी. तसेच मा. विभागीय आयुक्तांची भेट घेऊन त्यांना कळविण्यात येईल.

श्रीमती मानकापे पार्वती :यापुर्वी मा. आयुक्तांच्या गैरहजेरीत अनेक सभा झालेल्या आहेत. उपआयुक्त हजर आहेत. सभा चालु ठेवण्यात यावी.

विषय क्र. ५ :

दिनांक २८-०५-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. नंदकुमार घोडेले : शालेय विद्यार्थ्यांचे आसनपट्टया वस्त्रोद्योग महामंडळाकडुन खरेदी करण्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली.

मुख्यलेखाधिकारी : वस्त्रोद्योग महामंडळाला कार्यादेश दिलेले आहेत. साधारण: १५ दिवसांत पुरवठा होईल. मागील स्थायी समिती सभेत विलंब का झाला ते इतिवृत्तांत आलेले आहे. शासन निर्णयानुसार आदेश दिलेले आहेत.

श्रीमती मानकापे पार्वती : तात्काळ खरेदी करण्यात यावे यानंतर विलंब होऊ नये.

श्रीमती शाहीन जफर : शालेय गणवेशाचे अदयाप वाटप नाही. पुस्तकांचे वाटप नाही. १५ दिवसांत देणार शाश्वती आहे काय?

मुख्यलेखाधिकारी : जे पत्र पाठवायचे होते ते पाठविण्यात आलेले आहे. १५ दिवसात (माल) (साहित्य) येईल.

श्री. नंदकुमार घोडेले : अकृषी परवानगी संदर्भात जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करुन कार्यवाही करण्यात येणार होती कुठपर्यंत आली? मा. आयुक्तांनी कबुल केले होते की, विकास योजनेत जो भाग रहिवांशी दाखविले आहे. त्याठिकाणी अकृषी परवानगीची गरज नाही.

सहा. संचालक न.र. : जिल्हाधिकारी यांच्याकडे अकृषी परवानगी संदर्भात बैठक झाल्याबद्दल मा. आयुक्तांनी सांगितलेले आहे. महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषी परवानगी घेणे आवश्यक आहे. मा. जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा झालेली आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : मालमत्तांचे सर्वेक्षण खाजगी अभिकर्त्यांमार्फत करण्यात येणार होते तसेच अनेक मिळकतींना कर लावण्यात आलेला नाही. बऱ्याच प्रकरणात तफावर दिसते. एक वर्ष झाले काय कार्यवाही झाली.

प्र. करमूल्य निर्धा. अधिकारी : या संदर्भात मा. आयुक्तांना टिप्पणी दिली होती. विभागीय कार्यालय व निर्धारण विभाग यांचेकडील अभिलेखाची पुन: पडताळणी (Reconcilliation) आवश्यक आहे. अभिलेखाचे संगणकीकरण आवश्यक आहे. मुळ अभिलेख अदयावत करणे आवश्यक आहे. कर मुल्य निर्धारण अधिकारी ५ कडे संगणक आहे. २ कडे नाही एक वर्ष झाले. मिळाले नाही. हाच बेस अदयावत करणे आवश्यक आहे. त्यामुळे मालमत्तांचे सर्वेक्षण करणे सोपे होईल.

श्री. संजय शिरसाठ : विचारलेला प्रश्न वेगळा आहे. मा. आयुक्तांनी सांगितले होते की, संचिका माझ्याकडे आहे. मूळ प्रस्तावाचे काय झाले?

प्र. करमूल्य निर्धा. अधिकारी : १ महिना वेळ लागेल त्यानंतर निविदाची कार्यवाही करता येईल.

श्री. संजय शिरसाठ : प्रत्येक वेळी १-१ महिना लागेल असे सांगण्यात येते. गेल्या वेळी मा. आयुक्तांनी सांगितले होते संचिका माझेकडे आहे. अदयाप पर्यंत एकही संचिका मंजूर झालेली नाही. त्यांचा रक्तदाब कमी होतो. आपण सभा घेऊन काही उपयोग न होता. आयुक्तांनी दिलेला शब्द आज सभागृहात प्रभारी करमुल्य निर्धारण अधिकारी हे एक महिना लागेल असे म्हणतात.

मुख्यलेखाधिकारी : मागील वर्षीच स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार कर मुल्य निर्धारण अधिकारी श्री. रामटेके यांनी नकाशे इत्यादी तयार करण्याचे कामे सुरु केले. यासाठी अट आवश्यक आहे. आताच संगणकीकरण करण्याची आवश्यकता नाही. सर्वेक्षणानंतर नकाशे व माहिती संकलन करुन नंतरच संगणकीकरणाची गरज पडेल. कर योग्य मूल्य बदलणार नाही. मूल्य निर्धारण बरोबर आहे का क्षेत्रात बदल झालेले आहे का प्रत्येक संचिका मुल्य निर्धारण अधिकारी पाहुनच तपासतो असे नाही. आता एक महिना लागणार एक महिन्यात हे शक्य होणार नाही. ते करणार असतील तर त्यांना संगणक पुरवठा करण्यात येईल. पुन: पडताळणी शक्य वाटत नाही.

श्री. संजय शिरसाठ : दोन वेगवेगळे खुलासे समोर येत आहेत. याचा अर्थ संचिका मा. आयुक्तांकडे गेलेलीच नाही असे दिसते.

श्री. नंदकुमार घोडेले : मा. आयुक्तांनी संचिका माझेकडे आहे असे निवेदन केले आहे. एक महिना झाल तीच स्टेज असेल तर निर्णय कशासाठी दयायचे ताकीद देण्यात यावी.

श्री. संजय शिरसाठ : गेल्या एक महिन्यापासून मा. आयुक्तांकडे संचिका आहे. अशी चर्चा होते. मा. आयुक्त आजारी आहेत. मागील १-२ महिन्यात एकही फाईल वर नाही. केलेली नाही. संचिका कोठे आहे.

मा. सभापती : प्रशासनाने आठ दिवसांत संचिका निकाली काढावी.

श्रीमती पार्वती मानकापे : नुसती चर्चा होते. पहिल्या सभेत जी चर्चा झाली त्याची पुर्तता दुसऱ्या सभेपुर्वी होणे आवश्यक आहे.

मा. सभापती : इतिवृत्त मंजुर करण्यात येते.

ठराव :

दिनांक २८-०५-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. ६ :

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की. सन २००३-२००४ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्राहालयातील प्राण्यांकरीता बीफ (खन्नी) चे दर रुपये २३.०० प्रति किलो या दराने श्री. मुसा अब्दुल करीम रा. सिल्लेखाना, औरंगाबाद यांचे स्थायी समिती विषय क्रमांक ०४ दिनांक २८-०५-२००३ अन्वये ३० जुन पर्यंत पुरवठा करणे बद्दल मान्यता दिलेली आहे.

मा. स्थायी समितीच्या सुचनेप्रमाणे प्रत्येक जनावरांना देण्यात येणाऱ्या बीफ (खन्नी) ची माहिती सादर करण्यात येते (सोबत तक्ता जोडण्यात आलेला आहे)

तरी दि. २८-०५-२००३ च्या सभेचा विषय क्र. ०४ अन्वये दि. ३०-०६-२००३ बीफचा पुरवठा करणे करीता श्री. मुसा अब्दुल करीम यांचे दर रुपये २३.०० प्रति किलो प्रमाणे पुरवठा करण्यास मान्यता दिली आह. ती दिनांक ११-०३-२००४ पर्यंत वाढविण्याबद्दल प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

चर्चा :

श्रीमती पार्वती मानकापे : बीफची खरेदी मागे रु. ९.९० प्रती किलो प्रमाणे केली होती. आता पुर्ण माहिती घ्यावी व पुढच्या सभेत ठेवावे.

श्रीमती शाहीन जफर : १५ दिवसांपर्यत खरेदी करण्याची परवानगी द्यावी व निविदा पुन्हा बोलाविण्यात यावी.

श्री. नंदकुमार घोडेले : १५ दिवसाची खरेदी करण्याची परवानगी द्यावी व नवीन निविदा काढावी.

संचालक पशुसंवर्धन : निविदा अंतिम होईपर्यंत खरेदी करण्याची मंजुरी देण्यात यावी.

मा. सभापती : निविदा अंतीम होईपर्यंत प्रस्तावित दराने खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते व निविदा पुन्हा मागविण्यात यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सभागृहात झालेल्या निर्णयानुसार फेर निविदा काढण्यास आणि तो पर्यंत प्रस्तावात नमुद केलेल्या दराप्रमाणे आवश्यक असलेले बीफ खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ७ :

मुख्य लेखापरीक्षक यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक ०८-१२-१९८२ रोजी महानगरपालिका औरंगाबाद अस्तिवात आली आहे. तेव्हापासुन ते आज पावतो या विभागामार्फत वेळोवळी विविध विभागांचे लेखापरीक्षण उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेखांआधारे करण्यात आले असून, त्यांचे वार्षिक अहवाल मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०६ (३) अन्वये यथास्थिती मा. प्रशासक व मा. सभापती स्थायी समिती यांना वेळोवेळी सादर करण्यात आलेले आहेत. या सर्व अहवालावरुन असे निर्दशनास येते की, सन २००१-२००२ हे वर्ष वगळता उर्वरीत वर्षात नगर रचना विभागाचे सखोल लेखा परीक्षण झालेले नाही. सन २००१-२००२ या वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालात ज्या आक्षेपार्ह बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. त्या केवळ चाचणी लेखापरीक्षण दरम्यान निर्दशनास आलेल्या आहेत. या विभागाचे असे निदर्शनास आले आहे की, वेळोवेळी मागणी करण्यात येऊनही नगररचना विभागाने लेखा परीक्षणास्तव अभिलेख उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

त्यामुळे या विभागाकडील अभिलेखांचे सखोल लेखापरिक्षण होऊ शकले नाही.

या विभागाकडील अपुरा कर्मचारी वर्ग लक्षात घेता असे प्रस्तावित करण्यात येते की, महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंतचे लेखापरिक्षण नगररचना विभागाच्या शासनाच्या सेवेतून नियुक्त झालेले वर्ग-१ अथवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांकडुन प्राप्त होणारे विविध करुन घेण्यात यावे. सदरील अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त आक्षेप निकाल संबंधित विभागावर ते बजावण्यात येतील. या विभागाचे संपूर्ण लेखापरिक्षण केल्याने होणारे आक्षेप या विभागांकडुन तपासुन निघु शकतील व या विभागाच्या कामकाजाबाबतच्या तक्रारी कमी होतील.

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०८(०१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनास महापालिकेच्या लेख्यांचे विशेष लेखा परिक्षण करण्यासाठी लेखा परिक्षकाची नियुक्ती करण्याचा अधिकार असून, अशा विशेष लेखा परिक्षणासाठी शासनाने निश्चित केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती महानगरपालिका फंडातून करण्यात येईल. त्या

आधारे हाती घ्यावयाच्या लेखा परिक्षणासाठी या विभागाकडील अपुरा कर्मचारी वर्ग लक्षात घेता तसेच अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन त्यांचेकडुन प्रस्तावित केल्यानुसार लेखापरिक्षण करुन देण्यासाठी अनिश्चित कालावधी लागु शकेल व कर्मचारी यांचे वेतनावरील खर्च निश्चितपणे होईलच.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन प्रस्तावित विशेक्ष लेखापरीक्षण हे शासनाच्या नगररचना विभागाचे सेवेतून नियुक्त झालेल्या वर्ग-१ अथवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यास्तव व अशा अधिकाऱ्यांचा मानधनावर (Audit-Fee) व इतर खर्चाच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री. नंदकुमार घोडेले : सन २००१-२००२ वगळता नगररचना विभागाचे सखोल लेखापरीक्षण झालेले नाही. २० वर्षे झाले लेखापरीक्षण झालेले नाही. परीक्षण झाले असते तर प्रशासनाला जाब विचारण्यात माध्यमातुन विकासाचे प्रस्ताव आहेत. त्यापैकी एका प्रकरणात स्वत:चे ७५% पुर्ण बांधकाम करुन घेतले व मनपास २५% देत आहे. फाईल गहाळ झाल्याचे सांगण्यात येते. प्रतिनियुक्तीवर अधिकारी येतात. आता श्री. सोनी साहेब यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. ते संचिका दर शकत नाहीत. हा प्रस्ताव आताच का आला यापुर्वी का नाही. याला जबाबदार कोण?

प्र. मुख्य लेखा परीक्षक : सध्या माझ्याकडे पदभार आलेला आहे. त्यामुळे हा प्रस्ताव मी मांडलेला आहे. अहवाल विचार घेतलेले आहेत. अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत. मुख्यलेखापरीक्षक हे वैधानिक पद असून, स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या नियंत्रणाखाली काम करण्यात येते. हा विभाग सक्षम करणे जास्त गरजेचे आहे. तुर्त या ठिकाणी फक्त ६ कर्मचारी काम करतात. या कर्मचाऱ्यांकडुन संपुर्ण महानगरपालिकेचे लेखा परिक्षणाचे कामे होणे शक्य वाटत नाही. महालेखाकार यांच्या मार्फत लेखापरिक्षक करुन घेतले. नगर रचना विभागाचे २० वर्षापासुन लेखापरिक्षण नाही. आक्षेपावर कार्यवाही प्रस्तावित केली. मी पदभार स्विकारण्यापासुन २-३ पत्र दिले संचिका प्राप्त झाली नाही. मा. आयुक्तांमार्फत पत्र पाठवूनही संचिका मिळालेल्या नाही. साप्ताहिक अहवाल देणे आवश्यक आहे. हा विभाग ५-६ कर्मचाऱ्यांवर चालतो. मुख्यलेखाधिकारी यांच्याकडे एकुण ३२ कर्मचारी काम करतात. मुख्य लेखापरिक्षक यांच्याकडे देखील तितक्याच कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. तुटपुंज कर्मचाऱ्यांकडुन कामे करुन घ्यावी लागतात. त्या त्या वेळच्या मुख्य लेखापरिक्षकांची ती जबाबदारी होती. त्यांनी त्यावेळी ते काम करावयास पाहिजे होते. आता नगररचना विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१ दर्जाचे अधिकाऱ्याकडुन ही कामे करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. बऱ्याच संचिका गहाळ आहेत. त्या सापडत नाहीत. अभिलेखात आहे किंवा नाही हे देखील सांगण्यात येत नाही.

श्रीमती पार्वती मानकापे : २० वर्ष संचिका गेल्या कोठे याचे उत्तर दयावे.

श्री. रतनकुमान पंडागळे : मागच्या सहा महिन्यापूर्वी मी प्रश्न निघाला होता त्यावेळी मी मुख्यलेखापरिक्षक त्यांना पत्र पाठविले होते. त्यांनी कळविले आहे की, मला सहकार्य मिळत नाही. प्रशासनाने काय कार्यवाही केली. मुख्य लेखा परिक्षक

याच प्रमाणे नगर सचीव कार्यालय देखील सक्षम करणे आवश्यक आहे. अनेक विशेष समित्या झालेल्या आहेत. स्टाफ नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : २० वर्षाच्या लेखा परिक्षणाची गरज आहे की, नाही. अहवाल पुढच्या बैठकीत सादर करावा.

मा. सभापती : विषय मंजूर करण्यात येतो. वर्ग-१ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमार्फत लेखा परिक्षण करण्यात यावे. तसेच मुख्य लेखा परिक्षक या विभागात कर्मचारी वाढवून देण्यात यावे. तसेच नगरसचीव विभागात कार्यालयीन अधिक्षक व इतर आवश्यक असलेल्या पदांचे कर्मचारी तात्काळ वाढवून देण्यात यावे.

मुख्य लेखा परिक्षक : मुख्य लेखापरिक्षक व नगरसचीव यांना पदानिर्मितीचा अधिकार आहे. त्यांनी तसा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेऊन त्यास मान्यता घेऊन सर्वसाधारण सभेपुढे ठेवून मान्यता घेऊन कार्यवाही करता येते. प्रशासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही.

मा. सभापती : स्थायी समिती सभेत प्रस्ताव सादर करावा.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगर रचना विभागातील अभिलेखांचे सखोल परिक्षण करण्यासाठी शासनाच्या नगर रचना विभागांचे सेवेतुन निवृत्त झालेल्या वर्ग-१ अथवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांची मानधनावर नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. ८ :

उपआयुक्त (अ) यांनी प्रस्ताव सादर केल्यानुसार व दिनांक १३-०२-२००३ च्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. ७० अन्वये सि. टी. आर. मॅन्युफॅक्चरिंग लि. एम. आय. डी. सी. चिकलठाणा या कंपनीस चालु खाते सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ ठेवण्यात आलेला होता. त्यानुसार एक समिती गठीत करुन अहवाल सादर केला आहे.

औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम ९५ नुसार चालु खातेची सवलत देण्याची तरतुद आहे. अशा प्रकारची सवलत दैनिक लोकमतचे पृथ्वी प्रकाशन व मे. सिल्वर लाईट इंडस्ट्रिज औंरगाबाद यांना देण्यात आलेली आहे.

संबंधित कंपनीस चालु खातेची परवानगी होणे झाल्यास खालील अटी शर्तीच्या अधिन राहुन चालु खातेची परवानगी देण्यात येईल.

१. सदर कंपनीकडुन रु. ३,००,०००.०० बिन व्याजी अनामत ठेवणे.
२. संबंधितांनी त्यांचे कंपनीस आयाम मालाचे विवरणपत्र दर महिन्याच्या पाच तारखेच्या आत जकात विभागास सादर करुन त्यावर होणारी जकात भरणे बंधनकारक राहील.
३. आवश्यकता भासेल त्यावेळी आयात मालासंबंधीची कागदपत्रे व माहिती अभिलेख जकात अधिकारी यांना तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
४. आयात मालाची जकात हिशोब केल्यानंतर महापालिकेस देय आढळुन आलेल्या कोणत्याही रक्कमेबाबत ती भरली न गेल्यास तसेच अनामत ठेव अपुरी असल्यास तर मालाची अटकावणी करुन किंवा मालमत्तेची विक्री करुन जकात कर वसुल करण्यात येईल.
५. जकात नियम १९८४ चे कलम (१६) चा चालु खात्यात समावेश होणार नाही.

६. संबंधित कंपनीने मा. उच्च न्यायालयात " प्रोटेशोमीटर " या मालाच्या निर्याती संदर्भात याचिका दाखल केली आहे. सदर प्रकरणांत अंतिम निर्णय झाल नाही. त्यामुळे " प्रोटेशोमीटर " याचा चालु खाते अंतर्गत समावेश होणार नाही.

७. वरील अटी शर्तीचा भंग झाल्याचे जकात अधिकाऱ्यांचे निर्दशनास आल्यास अनामत जप्त करुन चालु खाते परवानगी बंद करण्यात येईल व कायदेशीर कार्यवाही करण्याचे येईल.

वरील बाबी व अटी व शर्ती घालुन चालु खाते उघडण्याची परवानगी देणेबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सि. टी. आर. मॅन्युफॅक्चरींग लि. एम. आय. डी. सी. चिकलठाणा या कंपनीस औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम २५ मधील तरतुदीनुसार प्रस्तावातील अ. क्र. १ ते ७ च्या अटी व शर्तीस अधिन राहुन चालु खातेचा सवलत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्री. नंदकुमार घोडेले : नियम क्र. ७३ (५) नुसार ५० हजारापेक्षा जास्त व दहा लाख रुपयांपर्यंतच्या आलेल्या विकास कामाची माहिती स्थायी समितीस देणे प्रशासनाला बंधनकारक आहे. आतापर्यंत तशी माहिती सभागृहाला सादर झालेली नाही.

मा. सभापती : काही कामाच्या बाबतची माहिती विभाग प्रमुखाकडुन आलेली आहेत. यापुढे प्रत्येक सभेत माहिती ठेवायला पाहिजे.

श्री. माणिक साळवे : ५० हजारापासून १० लाखापर्यंतचे अधिकार मा. आयुक्तांना आहे. या सभागृहाने असा निर्णय घ्यावा की, राज्य शासनाला विनंती करुन राज्यातील जवळपास १८ ते १९ महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती यांनी परिषत आयोजीत करुन वरील रक्कमेच्या खर्चास मंजूरी घेण्यास शासनाकडे मागणी करावी.

श्री. नंदकुमार घोडेले : सभापती परिषद आपण स्वत: बोलवावी होणाऱ्या खर्चाची मंजूरी येणाऱ्या सर्वसाधारण सभेत मंजूर करुन दयावी. लवकरच परिक्षदेचे आयोजन करावे. स. सदस्यांनी सुचविलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा. सभापती : आताच स. सदस्य श्री. माणिक साळवे यांनी सुचविल्याप्रमाणे राज्यातील इतर सर्व महानगरपालिकेतील स्थायी समितीच्या सभापतींना पत्र व्यवहार करुन लवकरच परिषद बोलविण्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. मा. आयुक्त व मुख्य लेखाधिकारी यांनी चर्चा करुन या संबंधी तारीख निश्चित करावी.

श्रीमती पार्वत मानकापे : सिध्दार्थ उद्यानातील चंदनाच्या झाडाची चोरी झालेली आहे. सदर उद्यानात आपले कर्मचारी कार्यरत असतांना झाडाची चोरी कशी होऊ शकते. वृत्तपत्रात सुध्दा बातमी आलेली आहे. याबाबत चौकशी करण्यात यावी. व जो दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

संचालक (प्रां.स.) : ३-४ वर्षाचे हत्तीघराजवळ रात्रीच्या वेळी मध्यरात्रीनंतर सुमारे ३-५ या वेळात सदर चंदनाच्या झाडाची चोरी झाली असावी. या संबंधी क्रांतीचौक पोलीस स्टेशन मध्ये तक्रार नोंद केलेली आहे.

उप आयुक्त (म) : यासंबंधीचा गुन्हा दाखल केलेला आहे. आवश्यक ती माहिती सादर करण्यात आलेली आहे. तपासणी अंती कार्यवाही होईल.

मा. सभापती : प्रशासनाने या सबंधीची दखल घेऊन तात्काळ कार्यवाही कशी होईल. त्यासाठी प्रयत्न करावे.

श्री. नंदकुमार घोडेले : किती टॉवर्सचे नुतनीकरण झालेले आहे. टोअरटेलचे नुतनीकरण झालेले नाही. आतापर्यंत कोणावर कार्यवाही केलेली आहे.

उप अभियंता -२ (न.र.) : एकुण ३२ टॉवर्स मालकांनी परवानगी घेतलेली आहे. ज्यांची मुदत संपलेली आहे. त्यांना रितसर पुन्हा नुतनी करण्यासाठी नोटीस देण्यात आलेली आहे. त्यासंबंधीची माहिती मा. महापौर यांना देण्यात आली असून, पुढील सभेत सविस्तर माहिती देण्यात येईल. जे अनाधिकृत टॉवर्स उभे आहेत. त्यासंबंधी प्रशासकीय विभागाला कळविण्यात आलेले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : ज्या टॉवर्स मालकांनी अनाधिकृतपणे टॉवर्स उभे केले त्या संबंधीची कार्यवाही होण्यासाठी पुन्हा प्रशासकीय विभागाला कळविण्यात यावे. ज्या टॉवर्सची मुदत संपलेली असेल व ज्यांच्याकडे परवानगी नसेल त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

श्री. माणिक साळवे : दोन तीन महिन्यापुर्वीच्या सर्वसाधारण सभेत अनाधिकृत टॉवर संदर्भात सखोल चर्चा होऊन असे टॉवर्स तात्काळ पाडण्यात यावेत असा निर्णय झालेला असतांना संबंधित विभागाने आतापर्यंत का कार्यवाही केलेली नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : ज्यांनी परवानगी घेतलेली नाही असे टॉवर्स पाडण्यात यावे व ज्यांनी परवानगी घेतलेली आहे ते राहु द्यावे. एखादया गरीबाचे घर असल्यास तात्काळ पाडण्यात येते. अनेक वर्षापासून अनाधिकृत टॉवर्स शहरात उभे असतांना वेळोवेळी सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन पाडण्याबाबतचा निर्णय घेतलेला असतांना कार्यवाही होत नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

मा. सभापती : नगररचना विभागाने सविस्तर माहिती पुढील (बैठकीत) सभेत देण्यात यावी. जे अनाधिकृत असेल ते पाडण्यास हरकत नाही. पुढील बैठकीत अहवाल देण्यात यावा.

श्रीमती पार्वत मानकापे : नुसती चर्चा करुन उपयोग नाही. सर्वसाधारण सभेत निर्णय घेण्यात आला. कार्यवाही झाली नाही. या समितीने सुध्दा प्रशासनाला तसे आदेश द्यावेत व अहवाल मागवावा.

श्री. इलियास किरमानी : अनाधिकृत टॉवर्स पाडण्यात येऊन पुढील सभेत तसा अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावेत.

श्री. नंदकुमार घोडेले : यापुर्वीच शासनाने आदेशीत केलेले आहे की, पाण्याचे व वीजेचे ऑडीट तात्काळ करणे अपेक्षीत आहे. त्या संबंधीची कार्यवाही कुठपर्यंत आलेली आहे. माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : पाणी व वीजेचे ऑडीट संदर्भात सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्यासंबंधी इतर महापालिकेकडुन माहिती घेऊन कागदपत्र जमा करण्याचे काम केले. निविदा अंतीम टप्यात आहे. येत्या १५ दिवसांत पुढील कार्यवाही सुरु होईल.

श्री. नंदकुमार घोडेले : महापालिकेचे वकिलांचे पॅनल किती वर्षासाठी कार्यरत असते? त्यांचे परफॉर्मन्स काय? नविन पॅनलसाठी कार्यवाही करता येईल का? विधी सल्लागार यांच्या मार्फत सदर पॅनलवरील वकीलांना प्रकरणाचा पत्रव्यवहार होतो. त्यानुसार कामकाज चालते. परंतु सुमारे ७५% प्रकरणाचा निकाल महानगरपालिकेच्या विरोधात लागतो. फक्त २५% च प्रकरणाचा महापालिकेच्या बाजुने निकाल लागतो. तत्कालीन मा. आयुक्त श्री. शर्मा साहेब यांनी सदरील पॅनलवरील वकिलांना बदलण्यात यावे असे सुचविले होते. अद्याप पॅनल का बदलण्यात आले नाही. तसेच वास्तु विशारद आर्किटेक्ट यांचे पॅनल किती वर्षासाठी असते याची माहिती द्यावी.

विधी सल्लागार : महानगरपालिकेतील न्यायप्रविष्ट प्रकरणासाठी वकिलांचे पॅनल्स नियुक्त केले आहे. उच्च न्यायालयासाठी ६ वकीलांचे खालच्या कोटीसाठी वकीलांचे आहे. यात कामगार न्यायालय, औदयोगिक न्यायालय सुध्दा आहे. पॅनलवरील सर्व वकीले महापालिकेच्या सर्व केसेस हाताळतात. परफॉमर्स चांगला आहे. वेळोवेळी माहिती घेण्यात येते. त्यांची नियुक्ती ही जुनी आहे. प्रकरणाचा आढावा घेऊन पॅनल नव्याने नियुक्त करण्यासंदर्भात अर्ज मागविले आहेत. उच्च न्यायालयाच्या पॅनलवरील काही व काळ वयोवृध्द असून नवीन पॅनलसाठी अर्ज मागविले अर्ज प्राप्त झाल्यानंतर कामाचा अनुभव कामाची पध्दती व निकाली काढलेल्या केसेस विचारात घेऊन वरीष्ठांकडे सादर करण्यात येईल. सभागृहाला पुन्हा सविस्तर माहिती देण्यात येईल. पॅनलवरील काही सल्लागार यांना ४ वर्षासाठी काहींना त्यापेक्षा जास्त व अटी शर्ती व कामाचा कालावधी बद्दल विचार करुन कमीत कमी ३ वर्षानंतर पुन्हा विचार करण्यात येईल. सरकारी वकील नियुक्ती नियम जे आहेत. त्याबाबतचा विचार करुन लवकरच पाठपुरावा करण्यात येईल.

मा. सभापती : मा. आयुक्त आल्यानंतर या संदर्भात झालेली चर्चा निदर्शनास आणुन द्यावी व विधी सल्लागार पॅनल नव्याने नियुक्त करण्यासंदर्भात तात्काळ करण्यात यावी.

याच बरोबर राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचीव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक ०९-०७-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. बुधवार दिनांक ०९ जुलै २००३ रोजी मा. सभापती श्री. भाऊसाहेब पुंडलिकराव ताठे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी १२.१५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला संबंधित अधिकारी तसेच खालील स. सभासद उपस्थित होते.

१.	स. स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव	स. सदस्य
२.	स. स. सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश	-//-
३.	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
४.	स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन	-//-
५.	स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग	-//-
६.	स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण	-//-
७.	स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग	-//-
८.	स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फर यारखान	-//-

विषय क्र. ९ :

दिनांक २५-०६-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

चर्चा :

श्री. नंदकुमार घोडेले : खाजगी अभिकर्त्यामार्फत शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा झालेली होती. सदर सर्वेक्षणाची संचिका ८ दिवसांत निकाली काढावी म्हणून या सभापतींनी आदेश दिलेले होते. कुठपर्यंत कार्यवाही झालेली आहे. खुलासा करण्यात यावा तीन बैठकीपासून या विषयावर चर्चा होत आहे. आपण उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करतो. त्यामुळे उत्पन्नात भर पडणार असून, अशा महत्वाच्या कामाची अंमलबजावणी का करण्यात आलेली नाही. संचिका कोठे आहे?

मा. सभापती : श्री. खरवडकर हे मा. खासदार यांचेकडे कामासाठी गेलेले आहे. मला कल्पना देऊन गेले.

श्री. रतनकुमान पंडागळे, श्री. संयज शिरसाठ : त्यांनी लेखी दिले आहे का? सभागृहाला खुलासा पाहिजे. विभाग प्रमुख उप आयुक्त (म) हजर आहे. त्यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (अ) : मालमत्तांचे सर्वेक्षण संबंधी संचिका मा. आयुक्तांकडुन आली होती. त्यात अशी सुचना केली आहे की, झोन क्र. ८ चे प्रायोगिक तत्वावर सर्वेक्षण सुरु करावे. त्यासाठी योग्य ते नियोजन करण्यात यावे. किती वाढ होते. हे पाहुन त्यानंतर खाजगी अभिकर्त्यांमार्फत सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात येईल. त्या अनुषंगाने करमुल्य निर्धारण विभागाने झोन क्र. ८ चे सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेतलेले आहे.

श्री. संजय शिरसाठ : आज स्थायी समितीची सभा आहे. यापुर्वीच फाईलमध्ये काय झाले खुलासा यावयास पाहिजे होता. नेमकी टिप्पणी काय झाली माहिती देण्यात यावी.

श्री. पंडागळे रतनकुमार : मालमत्तांचे सर्वेक्षणे करणे, हा प्रशासकीय विषय अर्थसंकल्पातच सादर झालेला होता. अर्थसंकल्प मंजुर होऊन ३-४ महिने झाले. अदयाप काहीही कार्यवाही नाही. अशा पध्दतीने कामे होत असेल तर, शहराचा विकास होणार नाही. किती दिवस संचिका ठेवायची प्रशासकीय प्रस्ताव होता सर्व तयारीसह प्रस्ताव दिला असेल तर अदयाप अंमलबजावणी झालेली नाही.

श्री. घोडके नंदकुमार : खाजगी संस्थेमार्फत मालमत्ताचे सर्वेक्षण करुन घ्यावे या प्रस्तावास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली. अर्थसंकल्पाच्या ठळक वैशिष्टांनमध्ये सुध्दा दिलेले आहे. प्रायोगिक तत्वावर एका झोनचे सर्वेक्षण करणे हा निर्णय प्रशासनाने कशासाठी घेतला.

श्री संजय शिरसाठ : खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याचा सर्वसाधारण सभेने घेतलेला निर्णय प्रशासनाने आणलेला प्रस्ताव आहे. ठळक वैशिष्टयांमध्ये नमुद केलेले आहे. आर्थिक फायदा आहे. याला सहजतेने (कॅज्युअल) घेऊ नये. संपुर्ण शहराचे सर्वेक्षणाचा प्रस्ताव आहे. गांभीर्याने घ्यावा.

श्री. नंदकुमार घोडेले : खाजगी संस्थेमार्फत मालमत्तांचे सर्वेक्षण करावे असा तो विषय होता. धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेने घेतलेला आहे. १-२ झोनचा प्रस्ताव नाही. सर्व शहरासाठी आहे.

श्री. संजय शिरसाठ : झोन क्र. मधील एखादया घराचा करयोग्य मुल्य झोन क्र. ६ मधील एखादया घराला लागणार असे काही घेणार आहे का? सर्वेक्षण करावयाचे असेल तर संपुर्ण करावयाचे असेल तर, संपुर्ण शहराचे करावे लागणार आहे.

उप आयुक्त (अ) : झोन क्र. ८ चे प्रायोगिक तत्वावर सर्वेक्षण करावे. अशा मा. आयुक्तांचे सुचना होत्या. त्यानुसार आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षणाचे काम सुरु केलेले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : नुसते झोन क्र. ८ चे प्रायोगिक तत्वावर सर्वेक्षण करावयाचे होते तर प्रस्ताव आणण्याची आवश्यकता नव्हती. सर्वसाधारण सभेत आमची दिशाभूल केलेली आहे का? प्रशासनाने हा विषय आणलेला होता.

श्री. संजय शिरसाठ : प्रशासनानेच प्रस्ताव टाकलेला होता. निर्णय झालेला असतांना अंमलबजावणी का करण्यात आलेली नाही?

श्री. उप आयुक्त (म) : झोन क्र. ८ चे प्रायोगिक तत्वावर सर्वेक्षण हा सर्वेक्षणाचाच एक भाग आहे. त्याचे ॲसॅसमॅन्टच्या आधारे बेस तयार होईल व नंतर संपुर्ण भागाचे सर्वेक्षण करता येईल.

श्री. घोडेले नंदकुमार : आर्थिक वर्ष संपत आहे. सर्वसाधारण सभेने घेतलेला निर्णय वेगळा झोन क्र.८ चा नव्हता हा बदल केला तर त्यावेळी संपूर्ण शहराचा का ठेवला?

मुख्यलेखाधिकारी : मालमत्तांचे सर्वेक्षण खाजगी संस्थेमार्फत करण्यासंदर्भात स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाल्यानंतर तात्कालीन आयुक्त मा. श्री. गजभीये यांनी निविदा काढावे म्हणून आदेश केलेले होते. तात्कालीन

आयुक्तांनी निविदा काढावी असे म्हटलेले आहे. आता कोणी बदल केला माहित नाही.

श्री. घोडेले नंदकुमार : हा विषय गेल्या तीन बैठकीपासुन उपस्थित होत आहे. आपण घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होत नसेल तर सभेला काय मागील तीन बैठकीत हे उत्तर का दिले नाही.

श्री. संजय शिरसाठ : वारंवार सभेत या संदर्भात चर्चा होते निर्णय होतो. अंमलबजावणी होत नाही. सभा घेऊन अर्थ नाही.

श्री. घोडेले नंदकुमार : इतिवृत्त होत आहे. त्याचा संदर्भ घेऊनच चर्चा करीत आहे. खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याची कार्यवाही प्रशासनाने का सुरु केली नाही.

मा. सभापती : ९ दिवसाचा कालावधी दिला होता. मा. आयुक्त नाहीत. आणखी एक महिना लागेल.

श्री. संजय शिरसाठ : मा. सभापती यांचे आदेशाचे पालन होत नसेल तर, आम्हाला सभात्याग करावा लागेल. आजच या संदर्भात सविस्तर खुलासा देण्यात यावा. मा. आयुक्त नाहीत तर सभा तहकुब करावी.

उप आयुक्त (म) : स्थायी समिती मध्ये जो निर्णय झाला आहे. त्या संबंधीचे कार्यवाही प्रोसेसमध्ये आहे. मा. आयुक्त यांचेशी चर्चा करुन पुढील कार्यवाही १५ दिवसांत करण्यात येईल.

श्री. शिरसाठ संजय : अर्थसंकल्पामध्ये ठळक वैशिष्टयांमध्ये हा विषय आलेला आहे. त्यास स्थायी समिती सर्वसाधारण सभेने मान्यताही दिली. सर्वेक्षण करण्यासंदर्भात मा. आयुक्त श्री. गजभीये साहेब यांनी निविदा काढाव्या म्हणून मान्यता दिली. मान्यता दिल्या नंतरही संचिका का प्रलंबीत राबलेली आहे. सर्वेक्षणाचे काम आले असते तर, जवळपास ४-५ कोटीचा फायदा झाला असता मा. आयुक्त रक्तदाब कमी म्हणून येत नाही. प्र. आयुक्त मनपामध्ये येत नाही. १४२ कोटीचा अर्थसंकलप मंजुर झालेला आहे. यात वाढ झाली नसती निव्वळ प्रशासनामुळे संचिका प्रलंबीत आहे. याची जातीने जबाबदारी का घेत नाही. सद्यस्थितीत संचिका कोठे आहे. मागविण्यात यावी व काय झाले ते पहावे.

श्री. पंडागळे रतनकुमार : अर्थसंकल्पीय प्रस्तावास स्थायी समिती/सर्वसाधारण सभेने एकमुखाने मान्यता दिली तो बाजुला ठेवून दुसरी कार्यवाही का प्रस्तावित केली दोन्ही सभागृहाचा अवमान होतो आहे. प्रशासनाचाच प्रस्ताव मन दोन मत का? तत्कालीन आयुक्त यांनी चुकीने मंजूरी दिली का? तसेच दोन्ही करमुल्यनिर्धारण अधिकारी सुध्दा उपस्थित नाही. त्यांनाम माहिती आहे. इतिवृत्तावर चर्चा होणार आहे. या विषयावर चर्चा होईल. दुसरा विषय आहे.

मा. सभापती : मा. खासदार यांचेकडे कर मुल्यनिर्धारण अधिकारी गेलेले आहे. मला कल्पना देऊन गेले.

श्री. संजय शिरसाठ : संबंधित अधिकारी मा. खासदार यांचेकडे गेले. खासदारांचे नांव यात घेऊ नये. अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे खासदार साहेबापुढे जात आहे. कदाचित ते चुकीचेही असू शकेल. त्यांनी आपणाकडे लेखी दिलेले आहे का? अधिकाऱ्यांनी सभेला उपस्थित राहणे गरजेचे नाही का? त्यांच्यासाठी सभेचे कामकाज थांबावयाचे का? तसे असेल तर, दोन तासासाठी सभा तहकुब करण्यात यावी. एखादया सभेला अधिकारी गैरजहजर असेल व त्यांचेसाठी सभा तहकुब करावी लागत असेल तर

यासारखे दुर्देव नाही. ज्या विभागाचा विषय असेल त्या विभागाने अधिकारी उपस्थित नसेल तर, विभाग प्रमुख जबाबदार राहील व उपआयुक्त यांनीच या प्रश्नाची उत्तरे दिली पाहिजे. एक प्रकारचा मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्या माझा आरोप आहे. महापालिकेच्या हितांचा विषय असतांना मा. आयुक्त यांनी त्या संचिकेवर काय रिमार्क केला हे सुध्दा बघायला मिळत नाही. प्र. आयुक्त महापालिकेमध्ये येण्यास तयार नाही. अशा पध्दतीने कार्यवाही होत असेल तर, स्थायी समिती/सर्वसाधारण सभा कशासाठी बोलाविण्यात येते. सभेत उपस्थित होणाऱ्या प्रश्नावर अधिकारी दखल घेत नाहीतर आम्ही सभात्याग करायचा का?

श्री. माणिक साळवे : संबंधित अधिकारी श्री. खरडकर मा. खासदार यांचेकडे गेले. ते प्रशासनातील अधिकारी आहे. त्यांची नैतिक जबाबदारी आहे की, त्यांनी उपआुयक्त (म) यांची परवानगी घेऊनच जायला पाहिजे होते. त्यांची आजच्या एक दिवसाची गैरहाजरी लावण्यात यावी व त्यांना कारण दाखवा नोटीस देण्यात यावी. उपआयुक्तांची परवानगी घेतली नाही. उपआयुक्तांनी कार्यवाही करावी.

मा. सभापती : १५ मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते. (वेळ दुपारी १२.३० वाजता पुन्हा सभेला सुरुवात ०१.२० वाजता)

श्री. रतनकुमार पंडागळे : तत्कालीन मा. आयुक्त श्री. गजभिये यांनी केव्हा मंजूरी दिली.

श्री. संजय शिरसाठ : महत्वाच्या विषयावर चर्चा चालु होती. ज्या कारणासाठी सभा तहकुब केली होती. त्याबाबतची काय माहिती आलेली आहे. खुलासा करण्यात यावा.

मा. सभापती : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

कर मुल्य निर्धा. अधि-२ (श्री. खरडकर) : मालमत्ता कर आकारणीसाठी जे सर्वेक्षण खाजगी एजन्सीमार्फत करण्याचा जो विषय आता चर्चेला येतो. त्यामध्ये एक संचिका मा. आयुक्तांकडे सादर करण्यात आलेली होती. दिनांक २७ फेब्रुवारी रोजी तत्कालीन आयुक्त यांनी मान्यता दिली होती. ज्या संचिकेमध्ये खाजगी तत्वावर म्हणजे पायलट सर्वे हा झोन क्र. ८ चा करावा. पहिला टप्पा असा होतो की, खाजगी एजन्सी मार्फत टेंडर काढण्याचा ही प्रस्ताव होता. मधल्या काळामध्ये पायलट सर्वे न झाल्यामुळे मुख्यलेखाधिकारी यांनी मा. आयुक्तांकडे प्रस्ताव दिला की, खाजगी एजन्सी मार्फत टेंडर ते फ्लोट करावे टेंडर डाक्युमेंट वैगेरे पुर्ण करुन मा. आयुक्तांकडे सादर करण्यात आलेले होते. त्यास मान्यता झाली. त्यानंतर ही संचिका करमुल्यनिर्धारण विभाग-१ मध्ये होती. आता नवीन आयुक्त आल्यानंतर या विभागाने एक टिप्पणी सादर केली. त्यामध्ये असलेला जो डाटा आहे. तो अपडेट करण्यासाठीची टिप्पणी होती. खाजगीकरण करु नये अशी कोणती टिप्पणी या विभागाने सादर केलेली नाही. पायलट सर्वेचे काम अगोदर करावे असे मा. आयुक्तांनी आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे प्रोग्रामची आखणी केली. झोन क्र. ८ चे सर्वेक्षण सुरु केलेले आहे. त्यासाठी ३२ आकारणी प्रभाग तयार केलेले आहे. ९ तारखेपासुन प्रायोगिक तत्वावर हे काम सुरु केलेले आहे. दुसरा मुद्दा जो आहे टेंडर फ्लोट करण्याचा तो सर्व टेंडर डाक्युमेंट वगैरे तयार आहे. यावर वरीष्ठ पातळीवर कार्यवाही झाल्यास काम पुर्ण होईल.

श्री. पंडागळ रतनकुमार : दिनांक २७-०२-२००३ रोजी तत्कालीन आयुक्त श्री. गजभिये यांनी सर्वेक्षणाचे टेंडर काढावे म्हणुन आदेशित केले त्यास ३-४ महिने होत आहे. अदयापपर्यंत का कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री. संजय शिरसाठ : कर मूल्य निर्धारण या विभागातून जी टिप्पणी टकण्यात आली ती वेगळी आहे. वरीष्ठ पातळीवर निर्णय घ्यावा लागेल. वरीष्ठ पातळीवर म्हणजे नेमके कोण

कर मूल्य निर्धा. अधि-२ : उपआयुक्त (म) मुख्यलेखाधिकारी यांचे स्तरावर त्याची तपासणी होईल व त्यानंतर आयुक्तांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही होईल.

श्री. संजय शिरसाठ : मा. आयुक्तांकडे ३ महिन्यापासून प्रलंबीत आहे. ताबडतोब करतो म्हणून आश्वासन दिले त्याचे काय? मा. आयुक्तांची सही नाही का? आयुक्त जबाबदार राहतील. एकीकडे उत्पन्नात वाढ झाली पाहिजे असे बोलले जाते. उत्पन्न वाढले तर खर्च करु शकतो. मा. आयुक्तांनी ज्या क्युरी काढायच्या त्या काढल्या. एक संचिकेसाठी ६-६ महिने विलंब होत असेल तर, विकास कामे कसे होणार? मागील वर्षाच्या बजेटमध्ये सुध्दा लाईटसाठी तरतुद होती. टेंडर अंतिम करण्यास १ वर्ष गेले. याचा परिणाम अधिकाऱ्यांवर होत नसून त्या भागातील नगरसेवकांना नागरिकांचा त्रास सहने करावा लागतो. वरीष्ठ पातळीवर अडकल कोण चर्चा करणार?

मुख्यलेखाधिकारी : मा. आयुक्त यांनी सर्वेक्षणा संबंधीच्या निविदेस फेब्रुवारी २००३ मध्येच मान्यता दिलेली होती. माझी यात ठिणगी होती. उपआयुक्त व मुख्यलेखाधिकारी यांची संयुक्त तपासणी करावी. त्यानंतर संचिका लेखाविभागाकडे आलेलीच नाही. या संदर्भात भिवंडी निजामपूर, कल्याण, डोंबविली महानगरपालिकेकडुन माहिती घेतली. उप आयुक्त व मुख्य लेखाधिकारी यांची सुध्दा या संदर्भात संयुक्त बैठक झालेली होती. जे बारकावे होते. ते तपासणी करुन नमूद करण्यात आले. संगणकीकरण करण्याचा सुध्दा मुद्दा होता. अटी शर्तीत कमतरता राहु नये. म्हणून उपआयुक्त व मुख्यलेखाधिकारी यांनी संयुक्त मसुदार तयार करुन आज संचिका वर्ग आणि तर मा. आयुक्तांची मान्यता होणे इत्यादीसाठी १५ दिवसांचा अवधी लागू शकतो.

उपआयुक्त (अ) : मुख्यलेखाधिकारी यांनी सविस्तर माहिती दिली आहे. १५ दिवसात कार्यवाही पुर्ण करुन मा. आयुक्तांच्या मंजूरीसाठी पाठविण्यात येईल.

मा. सभापती : उपआयुक्त (म) व मुख्यलेखाधिकारी दोघांनी चर्चा करुन १५ दिवसात निविदा काढावी.

श्रीमती पार्वती मानकापे : शालेय मुलांना बसविण्यासाठी आसनपट्टया खेरीद करणार होते. मागील बैठकीत आसनपट्टया बाबत खुलासा केला अदयाप पुरवठा झाला नाही. जवाहर कॉलनी भागातील शाळेत मुलांना फरशीवर बसावे लागते. मी प्रत्यक्ष भेट दिली. मुलांचे हात पाय वाकडे झाले. तसेच मुलांना तांदळाची खिचडी शिजवून दिली जाते. व्यवस्थित खिचडी होत नाही. त्यापेक्षा तांदू वाटप करावे. स्वयंपाक करतांना गरम पाणी हळद-तांदुळ झाली. खिचडी असा प्रकार बंद करावा. तांदूळ वाटप करावे.

सौ. रशिदा बेगम : १५ दिवसांचा वेळ दिला होता. अदयाप पुरवठा आला नाही.

मुख्यलेखाधिकारी : १५ दिवसांच्या आत आसनपट्टया येणार आहे. आणखी १५ दिवस आलेले नाहीत. २-४ दिवसात येईल आल्यानंतर तात्काळ कसे वाटप होईल याची दक्षता घेतली जाईल.

शिक्षणाधिकारी : शालेय मुलांना खिचडी शिजवून देण्याबाबतचे शासनाचे आदेश आहेत. म्हणून काही दिवसांपुर्वीपासून खिचडी घेण्यात येत आहे. आदेशाचे भागात सुध्दा खिचडी देण्यात येत आहे. आदिवासी भागात सुध्दा खिचडी शिजवून मुलांना वाटप करण्यात येत आहे. तांदूळ देता येणार नाही.

श्री. पंडागळे रतनकुमार : सभागृहाच्या भावना शासनास कळविण्यात याव्यात.

मा. सभापती : शासनास या सभागृहाच्या भावना कळविण्यात याव्यात.

श्री. संजय शिरसाठ : दिनांक २५-०६-२००३ रोजीच्या सभेत विषय क्र. ७ मध्ये नगररचना विभागातील वर्ग-१ संवर्गातील सेवा निवृत्त अधिकाऱ्यांमार्फत लेखापरिक्षण करावे या ऐवजी सध्या सेवेत असलेल्या नगर रचना विभागातील वर्ग-१ संवर्गातील अधिकाऱ्यांमार्फत नगररचना विभागाचे लेखापरीक्षण करावे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा. सभापती : दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. नंदकुमार घोडेले : ५० हजारपासून व पुढे १० लक्ष पर्यंत मा. आयुक्तांच्या अधिकारात खर्च केलेल्या विकास कामांच्या संदर्भात मागणी करुनही माहिती दिली नाही.

अति शहर अभियंता : एप्रिल महिन्यापर्यंतची माहिती देण्यात आलेली असून, त्यानंतर झालेल्या कामाची माहिती तात्काळ देण्यात येईल.

मा. सभापती : विभाग प्रमुखांनी माहिती माझ्याकडे सादर करावी त्यानंतर सर्व स्थायी समिती सदस्यांना प्रती दिल्या जातील.

श्री. नंदकुमार घोडेले : टॉवर्स संदर्भात अहवाल आलेला आहे का? असेल तर सर्व सदस्यांना प्रती देण्यात याव्यात.

मा. सभापती : इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यात येते.

ठराव :

दिनांक २५-०६-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यात येते.

चर्चा :

श्री. संजय शिरसाठ : गेल्या ४ दिवसांपुर्वी झोन क्र. ८ दैनिक वेतनावरील कर्मचारी यांनी रुपये २.०८ लक्षचा अपहार केल्याची बातमी वृत्तपत्रात आलेली होती व सदर कर्मचाऱ्यांवर सिटी चौक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला असाही उल्लेख होता. मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसुली करीत असल्याचे बातमी करुन दिसून येते. झोन क्र. ८ चे एका सक्षम अधिकाऱ्यांनी ऑडीट केले व दोन बुक मध्येच २.०९ लक्ष रुपयांचा अपहार केल्याचे दिसून आले. ज्यांनी पाणीपट्टी मालमत्ता कर भरणा केला सदर कर्मचाऱ्यांनी त्या नागरिकांना पावत्या दिल्या असेल परंतू त्या नागरिकांनी त्या पावत्या सांभाळला असेल तर, नोंद होईल अन्यथा नागरिकांवर जो कराचा बोजा आहे. तो तसाच राहणार तात्कालीन आयुक्त श्री. जहागीरदार यांनी अस्थायी कर्मचाऱ्याकडे कोणत्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार होतील असे

काम देऊ नये. असे सूचीत केले असतांना सुध्दा झोन अधिकारी यांनी सदर कर्मचाऱ्यांस वसुलीचे काम का दिले. झोन अधिकारी यांनी जबाबदारी पार पाडली नाही. त्याचेवर प्रथमत: कार्यवाही करण्यात यावी. अशी माझी मागणी आहे. कायम स्वरुपी कर्मचारी नसेल तर का देण्यात येत नाही. सर्व झोनला वसुलीसाठी कर्मचारी नाही. मुख्य कार्यालयात अशी परिस्थिती आहे की, अधिकारी त्यांचेकडे एक स्वीय सहाय्यक व त्या स्वीय सहाय्यकाला दोन-दोन सहाय्यक तेथील स्टाफ हलवावा मुख्य कार्यालयातील जो कर्मचारी वर्ग वाढलेला आहे. तो कर्मचारी यांना झोनमध्ये वसुलीसाठी द्यावे. मनपाच्या आर्थिक हिताचा प्रश्न आहे. म्हणून मुख्य कार्यालयातीन जास्तीचा झालेला कर्मचारी तात्काळ झोनमध्ये देण्याचे आदेश द्यावेत.

श्री. नंदकुमार घोडेले : जो अपहार झाला त्यासंबंधी प्रशासनाकडे काय माहिती प्राप्त आहे. खुलासा देण्यात यावा.

उप आयुक्त (म) : ४ जुलै २००३ रोजी झोन कमीशनवर यांनी एक अहवाल माझ्याकडे सादर केला होता प्राथमिक अहवालामध्ये रुपये २,०८,२२०/- चा अपहार संतोष लिंबाजीराव देशमुख या वसुलीवर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांकडुन झाला. त्यामध्ये भांडार विभागातून जे पावती पुस्तके दिले होते. ते मालमत्ता विभागाच्या वसुलीसाठी पावती पुस्तक क्र. ४१४ चे एकुण रुपये ९७,३७६/- ची वसुली झाली होती. ती रक्कम सदर कर्मचाऱ्यांने मनपाकडे भरणा केलेली नव्हती. तसेच पाणीपट्टीचे रुपये १,१०,८८४/- होते ते सुध्दा भरणा केलेले नव्हते. दोन्ही रक्कमा मिळुन रुपये २,०८,२२०/- रुपयाचा अपहार झाल्याचा माझ्याकडे आल्यानंतर तात्काळ संबंधित कर्मचाऱ्यांवर पोलीस गुन्हा नोंदविण्याचे सूचना दिलेल्या होत्या. जो काही अपहार झालेला आहे. त्याचे अभिलेख सिल करावे. जप्त करावे आणि त्यांचेवर लेखापरिक्षण विभागाने तात्काळ सखोल चौकशी करावी. याशिवाय अतिरिक्त त्यांचेकडे काही आणखी पैसे निघाले किंवा शिल्लक राहीले किंवा अपहार झाला त्याची माहिती समोर येईल आणि अतिरिक्त कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकारच्या सुचना झोन आयुक्तांच्या निदर्शनाखाली करावे अशा सुचना मा. आयुक्तांची मान्यता घेऊन संबंधीतांना देण्यात आलेल्या होत्या. झोन अधिकारी यांनी प्राथमिक अहवालाच्या आधारे दिनांक ०८-०७-२००३ पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद केला पोलीसांना जो काही प्राथमिक रिपोर्ट, पावती पुस्तके पाहिजे होती. त्या आधारे गुन्हा नोंद करुन घेतलेला आहे. लेखापरीक्षण विभागाने सुध्दा लेखा परीक्षणाचे काम सुरु केलेले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : किती दिवसाची रक्कम होती.

श्री. संजय शिरसाठ : मा. आयुक्तांच्या आदेशांचे उल्लघंन केले. दिनांक २८-०३-२००३ पासुनची ती रक्कम होती. दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना काम द्यावयास नको होते. झोन अधिकारीच जबाबदार आहे.

श्री. घोडेले नंदकुमार : दररोज रक्कम जमा करण्याचे आदेश द्यावे असा प्रकार पुन्हा होणार नाही.

मुख्यलेखाधिकारी : झोन ऑफिसरची डयुटी आहे. जॉब चार्ट दिलेला आहे. दैनंदिन जी वसुली होते. ती प्रमाणिक करुन लेखा विभागात जमा करणे गरजेचे आहे. बऱ्याच झोन मध्ये कॅशियर परस्पर सही करुन देतात. झोन अधिकाऱ्यांना माहित नसते. एक-दोन झोन अधिकारी बघतात. बऱ्याच झोनला १५-२०

पावती पुस्तके दिली जातात. दोन पुस्तके एकाच वेळी वापरली जातात. एका पुस्तकातील रक्कम भरायची एकातील नाही. दररोज कॅश प्रमाणित करुन भरणे आवश्यक असून, तशा सुचना प्रशासनाकडुन दिलेल्या आहेत.

मा. सभापती : ८ दिवसात झोनला कायमस्वरुपी कर्मचारी वसुलीच्या कामासाठी दररोज रक्कम लेखा विभागात जमा होईल.

श्री. संजय शिरसाठ : ताबडतोब कर्मचारी द्यावेत. झोन ८ ला वसुली कोण करेल.

मा. सभापती : झोन नं. ८ साठी तात्काळ कर्मचारी द्यावेत व दररोज जमा होणारी रक्कम झोन अधिकारी यांनी प्रमाणिक करुन भरावी.

श्री. माणिक साळवे : मनपाच्या एकुण ८० शाळा आहेत. ३०-३५ हजार विद्यार्थी शिक्षण होतात. काही शाळामध्ये वर्ग १ ते वर्ग ४ तुकडयावर एक शिक्षक आहे. ज्या रिक्त जागा असतील त्या तात्काळ भरुन आवश्यकतेनुसार त्या त्या शाळेवर शिक्षक द्यावेत. मुलांचे शैक्षणिक नुकसान येणार नाही. याची दखल घेण्यात यावी.

मा. सभापती : शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

शिक्षणाधिकारी : मनपाच्या एकुण ८१ शाळा आहेत. २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. १ ली ते ७ वर्गापर्यंत एकुण शाळा ४९ आहेत. उर्वरीत १ ते ४ वर्ग असलेल्या शाळा आहेत. ६१८ शिक्षक कार्यरत आहे. ६५४ शिक्षकांची आवश्यकता आहे. आणखी ३६ शिक्षकांची आवश्यकता आहे.

श्री. संजय शिरसाठ : काही शाळेत शिक्षक बसुन आहेत. विद्यार्थी संख्या ५-६ पर्यंत आहे. अशा शाळा बंद केल्या आहे काय?

शिक्षणाधिकारी : ४-५ शाळा आहेत. १ ते ४ पर्यंत वर्ग चालतात. २ शिक्षक आहेत.

श्री. नंदकुमार घोडेले : १ ली ते ४ थी पर्यंत विद्यार्थी एकत्रीत बसवितात. एक शिक्षक शिकवितात. अनेक शाळैत प्र. मुख्याध्यापक दिले प्रमोशन का दिले जात नाही. हा महत्वाचा विषय आहे. किती मुख्यध्यापाकांच्या जागा रिक्त आहे.

श्री. संजय शिरसाठ : ज्या ठिकाणी विद्यार्थीची संख्या जास्त आहे त्या ठिकाणी असे बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या शाळेतील शिक्षक द्यावे. विद्यार्थी नसलेल्या शाळा बंद कराव्या मनपाचे नुकसान होते. याची दखल घ्यावी.

शिक्षणाधिकारी : एकुण ४८ जागेस मान्यता आहे. १८ जागा रिक्त आहे.

श्री. संजय शिरसाठ : एक समिती नियुक्त करावी. त्या समितीने संपूर्ण शाळेचा सर्वे करावा. कोणत्या शाळेची काय परिस्थिती आहे. माहिती घ्यावी. समितीने अहवाल द्यावा. त्यानुसार पुढील निर्णय घेता येईल. काही शाळेत शिक्षक मुलांना शिकवीत नाहीत.

श्री. माणिक साळवे : काही शाळांवर शिक्षक नाही तर काही शाळावर अतिरिक्त शिक्षक दिले तर काही शाळावर अतिरिक्त शिक्षक दिले त्यांचे त्वरीत बदल्या कराव्यात याव्यात. काही शाळेवर १०-१५ वर्षापासून शिक्षक काम करतात. त्यांचे बदल्या होत नाही. १० वर्षापेक्षा जास्त सेवा एकाच शाळेवर करणाऱ्या शिक्षकांच्या बदल्या करण्या संदर्भात आदेश द्यावेत.

श्रीमती पार्वती मानकापे : समिती नियुक्त करावी त्या समितीने त्या त्या भागातील शाळेचा सर्वे करतांना त्या भागाचे स. सदस्य यांना सोबत घेऊन माहिती घ्यावी जेणे करुन खरी परिस्थिती लक्षात येईल.

श्री. शिरसाठ संजय : उपआयुक्त शिक्षणाधिकारी व ३ सदस्यांचा समितीमध्ये समावेश करावा.

मा. सभापती : शाळेचा सर्वे करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात येत आहे. यात उपआयुक्त, शिक्षणाधिकारी, शिक्षण सभापती, तसेच स. सदस्य श्री. माणिक साळवे, श्री. नंदकुमार घोडेले श्रीमती पार्वती मानकापे यांचा समावेश करण्यात येत असून, १५ दिवसांत त्यांनी अहवाल सादर करावा.

श्री. नंदकुमार घोडेले : जाफर गेट भागात मनपाचे व्यापारी संकुल आहे. एम. एस. ई. बी. विभागाने एक गाळा भाडे तत्वावर मागणी केलेली होती. सर्वसाधारण सभेने सुध्दा मान्यता दिलेली आहे. २१३५/- रुपये भाडे सुध्दा ठरविण्यात आले होते. सदर विभागाने २०००/- रुपये प्रमाणे देण्याची तयारी दर्शविली आहे. भाडेतत्वावर दिल्यास तेथे सामान्य नागरिकांना वीज बील वगैरे भरण्यास मदत होणार आहे. या संदर्भात २-३ वेळेस टेंडर काढण्यात आले होते. कुणीही तयार नाही म्हणून जनतेच्या सेवेसाठी सहानुभूतीपुर्वक विचार करुन २०००/- प्रमाणे एक गाळा एम एस. ई. बी. ला देण्याची कार्यवाही करावी तसे आदेश देण्यात यावे.

श्री. रतनकुमान पंडागळे : नोंद दयावा प्रशासकीय प्रस्ताव सभागृहात यावा तसे आदेश द्यावे.

मा. सभापती : प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्यात यावा.

श्री. नंदकुमार घोडेले : यापुर्वी बऱ्याच ले-आऊटला तात्पुरत्या स्वरुपात रेखांकनास मंजुरी दिलेल्या आहेत. एका रेखांकनात ५० प्लॉट असतील ४५ प्लॉटसला मंजुरी दिली त्या भागात जर नागरिकांना बेटरमेंट चार्जेस भरलेले असेल तर, जलवाहिन्या ड्रेनेज रस्ते इत्यादी सुविधा सुध्दा दिलेल्या आहे. ५० प्लॉट धारकांपैकी ४५ लोकांना परवानगी दिली उर्वरीत जे लोक ५ लोक राहीले त्यांना मनपाचे संबंधित विभाग परवानगी नाकारत आहे अशा बऱ्याच परवानग्या प्रलंबीत आहे. अशा प्लॉट धारकांवरच अन्याय का? असे किती रेखांकन आहे की, तेथे सुविधा देतो व उर्वरीत प्लॉट धारकाला का मंजूरी दिली जात नाही. माहिती घेऊन तसे आदेश दयावेत. तात्पुरते रेखांकन मंजुर झालेले असतील त्यातील कुणी प्लॉट घेऊ नये.

सहा. संचालक नगररचना : याबाबतची माहिती अशी की, दि. २६-१२-२००० रोजी महानगरपालिकेने एक जाहीर प्रगटन काढलेले होते. तात्पुरते रेखांकन मंजु२र असे १०० पेक्षा जास्त ले-आऊट आहे. हा मुद्दा मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणून कशी परवानगी देता येईल हे पाहण्यात येईल व हा मुद्दा स्थायी समिती समोर ठेवता येईल. पुढील सभेत सविस्तर माहिती देण्यात येईल.

मा. सभापती : पुढील बैठकीत माहिती सादर करावी.

श्रीमती पार्वती मानकापे : कचरा वाहुन नेण्यासाठी पाणी पुरवठयात दिलेल्या गाडया काढुन देणार होते. वार्डात साफसफाई व्यवस्थित होत नसल्याने व वेळेवर कचरा उचलला जात नसल्याने ओरड होत आहे. झोन अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यास गाडया नाही म्हणून उत्तर मिळते कचरा वाहुन नेण्यासाठी केव्हा गाडया देणार आहे.

मा. सभापती : भाडे तत्वावर गाडया घेण्यात येऊन कचरा उचलण्यात यावा. मागील बैठकीत प्राण्यांसाठी लागणोर बीफ खन्नीचा प्रस्ताव स्थगीत होता. संचालक प्राणी संग्राहालय यांनी एक निवेदन देऊन मंजूरी देण्याची मागणी केलेली आहे. त्यांनी त्यांचे मत मांडावे.

प्रा. स. संचालक : दिनांक २५-०६-२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या बैठकीत प्राणी संग्राहालयाकरीता बीफ खन्नी २१=२३.०० प्रति किलो दराने पुरवठा करणे करीता प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु सदर बैठकीत बीफ खन्नीच्या खरेदीसाठी फेर निविदा मागविण्यात याव्यात अशी चर्चा झाली.

या संदर्भात या विभागाचे खालील प्रमाणे मत आहे. बीफ हे प्राणी संग्राहालयातील महत्वाचे प्राण्याकरीता खाद्य म्हणून देण्यात येते. मागील वर्षी (२००२-२००३) मध्ये बीफचे दर अत्यंत कमी प्रती किलो रु. ९.९० निश्चित आले होते. निविदा धारकाचे आपआपसातील संवादामुळे अत्यंत कमी दर प्राप्त झाले होते. निविदा धारकाचे आपआपसातील स्पर्धेमुळे अत्यंत कमी दर प्राप्त झाले होते. या दराची व बाजार भावाचे दराचे तुलना करणे बरोबर नाही. कारण मागील २३ वर्षापासून शहरात बीफचे भाव रु. २८.३० प्रति किलो असे आहेत. सन २०००-२००१ मध्ये प्राणी संग्राहालयाकरीता बीफचे दर रु. २०.०० प्रती किलो तर २००१-२००२ साठी रु. २३.०० प्रती किलो भाव होते.

वरील बाबींचा विचार होऊन तसेच प्रशासनाचे स्तरावर २००३-२००४ वर्षासाठी दोन वेळा निविदा मागविण्यात आल्या ज्यामध्ये एक फेर निविदा आहे. या दोन्हीही निविदेमध्ये बाजार भावाप्रमाणे दर प्रापत झाल्याने त्यांना मा. आयुक्तांचे दालनात मुख्य लेखाधिकारी समवेत चर्चा करण्यात आली व निविदेतील दर कमी करुन रु. २३.०० प्रती किलो निश्चित करुन मा. आयुक्त यांचे आदेशान्वये प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजुरीसाठी सादर करण्यात आला. जे दर बाजार भावापेक्षा कमी आहेत. तसेच हे दर २००१-२००२ वर्षी स्थायी समितीने मान्य केले आहेत.

करीता बीफची निविदा यापुर्वीच मा. आयुक्त यांचे आदेशान्वये फेर निविदा मागविण्यात आली व त्यामध्ये बाजार भावापेक्षा कमी दर प्राप्त झाल्याने यास स्थायी समितीने ३० जुन २००३ पर्यंत प्राणी संग्राहालयातील प्राण्यांची गरज लक्षात घेता मान्य केले आहे. अशा परिस्थितीत उर्वरीत ८-९ महिन्यांसाठी फेर निविदा काढणे ऐवजी स्थायी समितीने जुन २००३ अखेर पर्यंत दर रु. २३.०० प्रती किलो मान्य केलेले आहेत. त्यास पुढील आर्थिक वर्षासाठी ३१-०३-२००८ पर्यंत मान्यता दिल्यास प्राणी संग्राहालयातील प्राण्यांना खाद्य देण्यास सोईचे होईल. कारण सध्याचे दर २३.०० प्रती किलो हे बाजार भावापेक्षा कमी आहेत.

श्री. रतनकुमार पंडागळे : हा प्रस्ताव मागील बैठकीत होता. स्थगिती दिली. त्या प्रस्तावास मान्यता देता येईल का?

नगरसचीव : स्थायी समितीला एकदा मान्य झालेला आपला ठराव निम्यापेक्षा जास्त सदस्यांनी पाठींबा दिला आहे. असा ठराव करुन बदलता येतो. नविन प्रस्ताव घेण्याबाबत सभागृहाच्या बहुमताने ठरविण्यात यावे.

मुख्यलेखाधिकारी : सचीव यांनी आताच खुलासा केला. नविन प्रस्ताव ठरवून घेता येईल व मान्यता देता येईल. संबंधित अधिकारी निवेदन सुध्दा दिलेले आहे ते योग्य आहे. हा प्रस्ताव दुसऱ्यांदा रिकॉल आला आहे. जे दर आले ते मा. आयुक्त पशसंवर्धन अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांचे समितीने दर निश्चित केले होते. त्यामुळे मान्य करण्यास हरकत नसावी.

श्री. नंदकुमार घोडेले : नवीन प्रस्ताव म्हणुन घेण्यात यावा.

ऐनवेळचा विषय

विषय क्र. (दिनांक २५-०६-२००३ च्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. ६) :

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००३-२००४ या वित्तिय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणीसंग्राहालयातील प्राण्याकरीता बीफ (खन्नी) चे दर रुपये २३.०० प्रति किलो या दराने श्री. मुसा अब्दुल करीम. रा. सिल्लेखाना, औरंगाबाद यांचे स्थायी समिती विषय क्रमांक ०४ दिनांक २८-०५-२००३ अन्वये ३० जुन पर्यंत पुरवठा करणे बद्दल मान्यता दिलेली आहे.

मा. स्थायी समितीच्या सुचनेप्रमाणे प्रत्येक जनावरांना देण्यात येणाऱ्या बीफ (खन्नी) ची माहिती सादर करण्यात येते.

(सोबत तक्ता जोडण्यात आलेला आहे.)

तरी दि. २८-०५-२००३ च्या सभेचा विषय क्र. ४ अन्वये दि. ३०-०६-२००३ पर्यंत बीफचा पुरवठा करणे करीता श्री. मुसा अब्दुल करीम यांचे दर रुपये २३.०० प्रतिकिलो प्रमाणे पुरवठा करण्यास मान्यता दिली आहे. ती दिनांक ३१-०३-२००४ पर्यंत वाढीवण्याबद्दल प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

मा. सभापती : जनावरांसाठी लागणारे खाद्यांचा हा महत्वाचा जिव्हाळयचा विषय आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेवून सर्वाच्या सहमतीने बीफ खन्नी खरेदीचा नवीन प्रस्ताव म्हणुन सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन २००३-२००४ या वित्तिय वर्षाकरीता प्राणी संग्राहालयातील प्राण्यांकरीता बीफ (खन्नी) प्रती किलो रु. २३.०० या दराने श्री. मुसा अब्दुल करीम रा. सिल्लेखाना औरंगाबाद यांचेकडे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचीव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक ०७-०८-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक ०७ ऑगस्ट २००३ रोजी मा. सभापती श्री. भाऊसाहेब पुंडलिकराव ताठे ह्यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. या सभेत अधिकारी वर्गासह खालील स. सभासद उपस्थित होते.

१.	स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण	स. सदस्य
२.	स. स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग	-//-
३.	स. स. श्री. कैसरखान बद्रोउद्दीनखान	-//-
४.	स. स. सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर	-//-
५.	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
६.	स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन	-//-
७.	स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग	-//-
८.	स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण	-//-
९.	स. स. सो. शाहीन जफर महेमुद जफर	-//-
१०.	स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान	-//-

चर्चा :

श्री. संजय शिरसाठ : मागील सभेत मा. सभापतींनी दिलेल्या रुलींग बाबत चर्चा घेण्यात यावी. मागील सभेत शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याबाबत चांगली चर्चा झाली आहे. त्यावी मा. उपआयुक्त (म) यांनी मालमत्ता सर्वेक्षणाबाबत पुढील सभेत सविस्तर माहिती देण्यात येईल. असा खुलासा केला होता. तेव्हा शहरातील प्रशासनातर्फे शहरातील मालमत्ता सर्वेक्षणाबाबत काय कार्यवाही झाली. याबाबतची माहिती सभागृहापुढे ठेवण्यात यावी.

उप आयुक्त (म) : मागील सभेत मा. सभागृहाने सुचित केल्याप्रमाणे शहरातील मालमत्तांचे खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षणाबाबत पुर्ण अभ्यास केला आहे. उपआयुक्त (महसुल) व विभाग प्रमुख म्हणून महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे. यास मी सहमत आहे. उत्पन्न वाढले तरच महापालिकेला पैसा मिळणार आहे हे तितकेच खरे आहे. शहरात एक लाख एकोणतीस हजार मालमत्ता आहेत. मालमत्तांचे सर्वेक्षण झाल्यानंतर त्यात दोन लाखांपर्यंत वाढ होईल. याशिवाय सर्वेक्षणामुळे मालमत्तांच्या बांधकामात फेरबदल व वाढ झाली असेल तर या दोन्ही बाबींमुळे महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. यातून महापालिकेला ३०/३५ कोटी उत्पन्न मिळेल. इतर महापालिकांमध्ये मालमत्तांमध्ये मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याच्या कमी निविदा काढण्यात आल्या आहेत. त्या महापालिकांना निविदा काढतांना त्यात काय काय अडचणी आल्या आहेत. याचा विचार करुन शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षणाबाबत निविदा काढण्यासाठी मा. सभापती यांचेशी चर्चा करुन ऐनवेळचा एक प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मा. सभागृहाने त्यावर विचार करावा. औरंगाबाद महानगरपालिकेने मालमत्ताचे खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण

याबाबत अर्थसंकलपात जी तरतूद केली आहे. त्यात ऊर्जा पाणी सर्वेक्षण यासाठी रु. ६०/- लाखाची तरतुद केली आहे. शहरातील मालमत्तांचे खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्यासाठी प्रस्तावानुसार किमान दोन कोटी खर्च अपेक्षीत आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत जवळपास १ लाख १३ हजार मालमत्तांचे सर्वेक्षणासाठी एक कोटी खर्च आलेला आहे. डोंबिवली महापालिकेला लागलेला एक खर्च विचारात होता आपल्या महापालिकेत किमान दोन कोटी खर्च अपेक्षीत आहे. सर्व बाबींचा विचार करुन या प्रस्तावात काही सुचना केल्या आहेत. सर्व शहराचे एकाच वेळी सर्वेक्षण न करता एका झोनचे सर्वेक्षण केल्यास आऊटपुट समाधानकारक नसल्यास इतर निविदा धारकाकडुन काम करुन घेता येईल आणि झोनचे सर्वेक्षण केलेल्या निविदाधारकाचे समाधानकारक नसल्यास इतर निविदाधारकाकडुन काम करुन घेता येईल. आणि एका झोनचे सर्वेक्षण केलेल्या निविदा धारकाचे काम समाधानकारक राहीले तर सर्व शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण निविदाधारकांकडुन करुन घेता येईल. या व्यतिरिक्त इतरही काही अटी शर्ती प्रस्तावात आहेत. या अटी शर्तीचा आपल्या महापालिकेच्या उत्पन्नाशी संबंध येऊ शकतो.

श्री. संजय शिरसाठ : शहरातील मालमत्ता सर्वेक्षणाबाबत प्रशासनाने मा. सभापतीकडे काय प्रस्ताव दिला आहे तो अदयापपर्यंत स. सभासदांना मिळालाच नाही. त्याबाबत आपण मुद्दे सभागृहात मांडीत आहात. त्यात काही मुद्दे इकडेच काही मुद्दे तिकडेच अशा प्रकारे मांडले जात आहेत. तो प्रस्ताव वाचून दाखवला तर सभासदांना नाही. समजू शकेल.

मा. सभापती : प्रस्तावाच्या प्रती स. सभासदांना वाटप करण्यात यावे. करमूल्य अधिकारी यांनी प्रस्ताव वाचावा.

(कर मूल्य निर्धारण अधिकारी शहरातील मालमत्तांचे खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहात वाचून दाखवितात.)

विषय क्र. २० (अ) :

उपआयुक्त (म) यांचेकडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कर आकारणी करण्यात आलेल्या एकुण १.२९ लाख मिळकती असून, अनेक मिळकती ह्या मालमत्तांवर कर आकारणी पासून वंचीत राहील्या आहेत. तसेच काही मिळकतीमध्ये वापरात बदल झालेले असतील किंवा बाधकामात वाढ झाली असेल अशा अनेक मिळकतीचे कर आकारणी करण्यासाठी खाजगी संस्थेमार्फत कर आकारणीसाठी व घर क्रमांक देण्यासाठी सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. खाजगी संस्थेमार्फत मालमत्तर कर आकारणीसाठी सर्वेक्षण करण्याच्या कामासाठी निविदा काढण्यात यावी. याबाबत मा. स्थायी समितीने प्रशासनास आदेश दिले आहेत. खाजगी संस्थेमार्फत मालमत्तांचे सर्वेक्षण केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात कोटयावधी रुपयाची वाढ होण्याची शक्यता आहे. व यातून उपलब्ध होणारा पैसा विकास कामासाठी वापरता येईल याकरिता खाजगी संस्थेमार्फत मालमत्ता कर आकारणीचे सर्वेक्षण करण्यासाठी निविदा काढण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरु केली आहे व निविदेच्या मसुदा तयार करतांना असे लक्षात आले की, राज्यातील इतर महानगरपालिका उल्हासनगर, महापालिका सांगली मिरज-कुपवार महानगरपालिका, भिवंडी निजामपूर महानगरपालिका या महानगरपालिकांनी खाजगी संस्थेमार्फत मालमत्ता करासाठी सर्वेक्षण करण्याच्या निविदा प्रक्रियेत करारनामा करतांना

अटी व शर्तीमध्ये कमतरता राहील्याने त्या महानगरपालिकेचा खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याचा प्रयोग अयशस्वी झाला व परिणामी महानगरपालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. सध्या औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक असल्याने महानगरपालिका तिजोरीतील रक्कम खर्च करण्यापूर्वी अत्यंत जबाबदारीने व गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. निविदा काढतांना सुरुवातीस एका झोनचा पायट सर्वे पूर्ण करण्यासाठी मान्यता देवून त्या झोनचा सर्वे यशस्वीपणे पूर्ण केल्यास व प्रशासनाचे समाधान झाल्यास उर्वरीत झोनचे काम देण्यात यावे म्हणजे करर केलेली एजन्सी अकार्यक्षम किंवा अयशस्वी ठरल्यास त्यांचा करार रद्द करुन नवीन सक्षम एजन्सीमार्फत पूढील काम करुन घेता येईल व महानगरपालिकेचे मोठया प्रमाणांवर नुकसान होणार नाही.

खाजगी संस्थेमार्फत मालमत्तांचे कर आकारणी करीता सर्वेक्षण करणे कर आकारणी अंतीम करणे व घरक्रमांक देणे या कामसाठी अंदाजे २.०० कोटी रुपये खर्च अपेक्षीत आहे. सन २००३-२००४ च्या मंजूर अर्थसंकल्पात या कामासाठी ऊर्जा/पाणी परिक्षण यासह एकत्रित केवळ ६०.०० लाख रुपयांची तरतू आहे. तरी वाढीव रक्कमेस मान्यता देणे आवश्यक आहे. खाजगी करणाचा प्रयोग यशस्वी व्हवा व सर्वेक्षणाच्या कामासाठी होणारा अंदाजे १.५० ते २.०० कोटी रुपये खर्च सत्कारणी लागावा या करीता निविदा काढतांना करार नाम्यात खालील अटींचा समावेश करणे आवश्यक आहे.

१. निविदा धारकास महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही महानगरपालिकेस यापूर्वी मालमत्ता कर आकारणीसाठी सर्वेक्षण करणेचे काम यशस्वीरित्या पूर्ण करुन त्यांनी आकारणी केलेल्या मालमत्ता करांची सुरळीतपणे वसुली सुरु असल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२. सर्वेक्षण कामांसाठी नियुक्त कर्मचारी तांत्रिकदृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे. त्याकरीता कर्मचारी आकृती बंध व शैक्षणिक अर्हता निविदेत असावी.

३. ज्या मिळकतीमध्ये कर आकारणीच्या दृष्टीने कोणताही बदल आढळणार नाही. त्याच्या सर्वेक्षणाबाबतचा कोणताही मोबदला निविदाधारकास दिला जाणार नाही.

४. निविदाधारकास सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर मालमत्ता धारकास कर आकारणीची कायदेशीर खास नोटीस सामिल झाल्यानंतर त्यावरील प्राप्त आक्षेपांची सुनावणी घेवून कर आकारणी अंतीम केल्यानंतरच २०% मोबदलाची रक्कम देण्यात येईल. व कायदेशीर तरतुदीप्रमाणे आर्थिक वर्षाकरीता अखेरीस जाहीर प्रगटनाद्वारे मागविलेली कर आकारणीवरील आक्षेप निकाली काढल्यानंतर मालमत्ता कराच्या वसुलीसाठी जी कर आकारणी अंतीम केली जाईल. त्यांच्या वसूलीनंतर वाढीव वसूलीच्या रक्कमेतून मान्य टक्केवारींच्या मोबदल्याची रक्कम दिली जाईल.

५. मिळकतीच्या सर्वेक्षणासाठी महानगरपालिकेच्या क्षेत्रफळावर सर्वेक्षण कामावर कोणताही दर निश्चित करण्यात येऊ नये. केवळ प्रत्यक्ष जितक्या मिळकतींना मालमत्ता कर वाढ होईल. त्या मिळकतीच्या वाढीव मालमत्ता कराचे टक्केवारीवरही मोबदला रक्कम निश्चित

६. निविदाधारकास प्रथम एक झोनचा पायलट सर्वे पूर्ण करावा लागेल. सदरील सर्वेक्षण योग्य व समाधानकारक आहे. याबाबत प्रशासनाची खात्री झाल्यानंतरच उर्वरीत झोनचे काम सुरु करण्यास परवानगी देण्यात येईल व प्रशासनास पायलट सर्वेचे काम समाधानकारक न वाटल्यास उर्वरीत सर्वेक्षणाचे काम रद्द करण्यात येईल. तथापि पूर्ण झाल्यानंतरच नवीन कर आकारणीची अंमलबजावणी सर्व झोनमध्ये एकाच वेळी करण्यत येईल.

संवाद :

श्री. संजय शिरसाठ : शहरातील मालमत्तांचे खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याबाबत गेल्या दोन मिनिटापासून चर्चा चालू आहे. ही चर्चा चालू असतांना चांगले काम तर दूरच राहीले पण या कामात अडथळा कसे आणता येतील याचा पूरेपूर प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे. मागील सभेत या विषयावर बरेच वादळ उठले. त्या पुर्वीच्या सभेत मा. आयुक्त उपस्थित होते. त्यांनी त्यावेळी मालमत्ता सर्वेक्षणाचे प्रकरणांवर ताबडतोब सही होवून सर्वेक्षणाला सुरुवात होईल. या प्रस्तावाबाबत निवेदन करतांना शहरात १ लाख २९ हजार मालमत्ता आहेत. पण सर्वेक्षणाचे वेळी दोन लाख मालमत्ता निघण्याची शक्यता आहे. याचा अर्थ महापालिकामध्ये सक्षम अधिकारी सक्षम अधिकारी हा शब्द प्रयोग या ठिकाणी मी मुद्दाम करीत आहे की, सक्षम अधिकारी या ठिकाणी आहेत. असा शब्द त्यांच्या तोंडुन येत आहे. याचा अर्थ पाऊण लाख मालमत्ता आम्ही शोधू शकलो नाहीत आणि दुसऱ्यालाही शोधू देणार नाहीत. असा याचा अर्थ आहे. या संचिकेवर बराच गोंधळ झाला आणि त्यावेळी मा. उपआयुक्त यांनी पंधारा दिवसात निविदा पूर्ण करण्यात येईल असे सांगितले. शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करु नये. असा दबाव मध्यंतरी आला आणि त्यानंतर वेगवेगळा खुलासा वृत्तपत्रांमधून प्रसिध्द झाला यात मा. महापौर, माजी महापौर, मा. सभापती यांचा खुलासा वृत्तपत्रातात आला. यात कळस म्हणजे मा. आयुक्त यांचाही खुलासा वृत्तपत्रात झाला आहे. या खुलासात असे सर्वेक्षण केले तर एखादी मिळकत दुसऱ्यांच्या नावांवर लागेल असा खुलासा वृत्तपत्रात आला आहे. हा खुलासा आपण केला की नाही हे मला माहीत नाही पण महापालिकेच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या कामात किती अडथळे येऊ शकतात. याचे एक जिवंत उदाहरण आहे. निविदेमध्ये अटी, शर्ती, टाकण्याचे काम हे सभागृहाचे नाही. ते काम प्रशासनाचे आहे. या अटी शर्तींना सभागृहाची मान्यता कशा करता होतात. यात एका झोनचे सर्वेक्षण करण्याचा मुद्दा टाकण्यात आला आहे. मग झोन ८ चे सर्वेक्षण करण्याला गेलो की, स. नगरसेवक आपल्यावर अन्याय होऊ लागला आहे. मा. आयुक्तांना पत्र देणार मग मा. आयुक्त ती कार्यवाही थांबवून ठेवणार झोन ८ चे सर्वेक्षण थांबवून झोन ४ चे सर्वेक्षण सुरु केले तर हिंदूवर अन्याय होऊ लागला. आपला कर वाढणार आहे. अशी मागणी येणार म्हणजेच जातीयतेचे विष पेरावयास महापालिकेला आर्थिक उत्पन्न वाढविण्याची बाब दूर राहणार असा गाभा स्पष्ट आरोप आहे. यावरुन महापालिकेचे प्रशासन हे कोणाच्या तालावर नाचत आहे. यातून महापालिकेला ३५ कोटीचे उत्पन्न होणार आहे. हे प्रशासनाने प्रस्तावाच्या माध्यमातून कबूल केले आहे. महापालिकेचे ३५ कोटीचे उत्पन्न वाढत असेल तर, मा. आयुक्तांनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या तालावर नाचू नये अशी प्रशासनास सूचना आहे. एखादा विषय असेल तर त्यात नगरसेवक बदनाम होतो. चांगल्या विषयाला पाठींबा दिला. तरी त्यांचे हे असे परिणाम समोर येतात. ही टिप्पणी मा. सभापतीकडे यावयाची काही गरज नाही असे माझे स्पष्ट मत आहे. या टिप्पणीत ज्या चार महापालिकेचा उल्लेख करण्यात आला आहे. त्या महापालिकाचा अहवाल प्रशासनाकडे असेल तर तो सभागृहात सादर करावा. चार महापालिकांचे नांवे टाकावयाचे आणि तिकडे

घोटाळा आहे असे सांगवयाचे त्या महापालिकेत घोटाळा झाला हे सांगण्यापेक्षा तुम्ही सक्षम अधिकारी आहात तुमचे टेंडर फायनल करावयो आहे. यामध्ये सदस्यांचा कुठे संबंध येतो. सदस्यांला कुठे विचारले जाते. निविदामध्ये नियम/अटी टाकण्याचे काम प्रशासनाचे आहे. मागील वेळी जकात खाजगी करणाबाबतची निविदा काढण्यत आली. त्यावेळी नियम/अटी टाकण्याबाबत सभागृहाला विचारले का शंभर पानांच डॉकेट होत. सभापतींपुढे आले होते की, नाही. म्हणजे जे प्रशासनाच्या सोईच होत ते करावयास यातून प्रत्येक काम प्रलंबीत कस राहील हे पाहिले जाते. म्हणजे आज या महापालिकेची ही आर्थिक स्थिती झाली आहे. त्यामूळे प्रत्येक वेळी नगरसेवकांवर आक्षेप येतात. जकात खाजगी करणाची निविदा काढण्यास सर्वसाधारण सभेने चार वेळा मान्यता दिली. आजपर्यंत ते टेडंर काढण्यात आले नाही. शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात येईल. असा मुद्दा देण्यात आला आहे. त्यातून मनपास उत्पन्न मिळणार आहे. मी मा. आयुक्तांना विनंती करतो की, यात अनेक गंभीर धोके आहेत. मी जी माहिती घेतली त्या अनेक लोक यात सहभागी होण्याच्या प्रयत्नात आहेत. तेव्हा मा. आयुक्त यांनी या प्रकरणाबाबत त्यांचे मत काय आहे. हे सभागृहासमोर मांडा व हे टेडंर डॉकेट अंतीम होण्यास सहा महिने लागले आहेत. आर्थिक चेपी कशी करावयाची हे दाखवावयाचे आले तर अर्थसंकलपात ६० लाखाची तरतुद केली आहे. यात निविदेच्या कलमावर अभ्यास करण्याऐवजी या ६० लाखावर जास्त अभ्यास कसा करता येईल याचा जास्त विचार झालेला दिसतो. हे टेडंर आज तरी मंजूर करण्यात आले तरी टेडंर आज तरी मंजूर करण्यात आले तरी ते टेंडर अंतीम करण्यास जवळपास ६ ते ८ महिन्याचा कालावधी लागणार आहे. वार्षीक अर्थसंकल्प १ एप्रिलपासून सुरु होते. टेंडर फायनल झाले की, निविदाधारकास आपण ६० लाख रुपये देणार आहोत का? या सर्व कार्यवाहीस जवळपास एक वर्षाचा कालावधी लागणार आहे मग ६० लाखाची काढावी. या सुधारीत अंदाजपत्रकाचे वेळी आर्थिक बाबींबाबत विचार कता येईल. आजच आर्थिक अडचण येणार नाही. यात एक षडयंत्र रचले जात आहे ६०/७० हजाराचा कर आला तर एक अर्ज लिहा तो कर ५/६ हजारावर येतो. ही पध्दत कुठेतरी बंद व्हावी. यासाठी आपण हा सर्वेक्षण करणार आहोत. याबाबत लेखा परिक्षकानेही अहवाल दिलेला आहे. तेव्हा मा. आयुक्त यांनी याबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी. अशी मी त्यांना आपल्यामर्फत विनंती करतो.

मा. सभापती : मुख्यलेखाधिकारी यांनी अर्थसंकल्पातील ६० लाखांचे तरतुदीबाबत सभागृहाला माहिती दयावी.

मुख्यलेखाधिकारी : अर्थसंकल्पात ऊर्जा, पाणी आणि मालमत्ता सर्वेक्षणासाठी ६० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. शहरातील मालमत्ता सर्वेक्षणाच्या कामासाठी निविदा कशा प्रकारच्या येतात. यावर आज भाष्य करता येणार नाही. तरी पण मालमत्ता सर्वेक्षणाचे काम परसेंट (टक्केवारी) बेसिसवर द्यावयाचे नाही हे माझे मत आहे. पूर्ण फायदा मनपाचा असावा. निविदाधारकास टप्प्याने बील अदा करता येईल. मालमत्ता सर्वेक्षणासाठी ज्या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकाचेवेळी आर्थिक तरतुद वाढवून घेता येईल. मालमत्ता कर

आकारणीच्या प्रकरणाचे लेखापरिक्षण करतांना अनेक प्रकरणात कर आकारणी अत्यंत कमी प्रमाणात करण्यत आल्याचे निर्दशनास आले आहे. अशा प्रकरणाबाबत अधिनियमाचे कलम १०५ खाली स्थायी समितीस अहवाल दिला जातो. त्याबाबतची टिप्पणी मा. आयुक्तांना सादर केली आहे. यात अशी ५५९ प्रकरणे तपासण्यात आली आहेत. त्यापैकी ११ प्रकरणे मा. सभापती यांना सादर केली आहेत. या सर्व प्रकरणात महापालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान दिसून येते.

श्री. संजय शिरसाठ : मालमत्ता कराचे जी प्रकरणे मा. सभापती यांना सादर केली आहेत. त्याबाबत जी टिप्पणी सादर केली आहे. त्याबाबत माहिती द्यावी.

प्र. मुख्य लेखापरिक्षक : अधिनियमाचे कलम १०५ खाली स्थायी समितीस जो आठवडी अहवाल यावा लागतो. त्यात कर आकारणी विभागाचे लेखापरिक्षण करीत असतांना ज्या गंभीर बाबी आढळल्या आहेत. त्याबाबत मा. आयुक्त आणि मा. सभापती यांना एक टिप्पणी सादर करण्यात आली होती यात मोकळया जागेवर जो कर आकारण्यात येतो त्यात ११ प्रकरणांत अत्यंत चुकीच्या पध्दतीने कर आकरणी करण्यात आली आहे. एक प्लॉट १९९२ ला खरेदी केला असेल तर त्यास १९८२ पासून कर आकारणी केली आहे. दुसरी खरेदी १९९६ आहे तर त्यास २००२ पासून कर आकारणी करण्यात आली आहे. अशी ११ प्रकरणे उदा. दाखल मा. स्थायी समितीस सादर केली आहेत. याशिवाय ज्या प्रकरणाचे लेखा परिक्षण करण्यात आले आहे. त्यात सुनावणी अंती जी कर आकारणी झाली आहे. ती अत्यंत चुकीच्या पध्दतीने झाली आहे. याबाबत या विभागाचे विभागप्रमुख या नात्याने मा. उपआयुक्त (म.) यांना ही कल्पना दिली आहे. कर आकारणीची विभागाची एकुण ५५९ प्रकरणे तपासणीसाठी हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी फक्त २१२ संचिका कर आकारणी विभागातर्फे देण्यात आल्या आहेत. या ५५९ प्रकरणामध्ये जी कर आकारणीची प्रकरणे आहेत. त्यात कर कमी केल्यानंतर संबंधित झोन विभागाला कळवावे लागते. ही माहिती आम्ही झ ोन विभागाकडील रजिस्टरवरुन गोळा केली आहे. यामध्ये अशा प्रकरणात जी सुनावणी करण्यात आली आहे. ती अर्धवट कागदपत्राच्या आधारे करण्यात आली आहे. यामुळे महापालिकेचे लाखो रुपयाचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी आहे. यामुळे महापालिकेचे लाखो रुपयाचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले आहे. याबाबत या प्रकरणात ज्या मोठमोठया इमारती आहेत की, ज्यांचा पुर्वीचा कर एक लाखापर्यंत होता तो कमी करुन १४ हजारावर आणला आहे. या कर आकारणी पुर्वी लक्षी भावनेने कमी केलेल्या आहेत. असे आढळुन आले आहे. पुर्वी भाडेकरु आहे म्हणुन कर आकारणी करण्यात आलेल्या प्रकरणात कर आकारणी करतांना भाडेकरुन नाही असे दाखऊन कर कमी करण्यात आला आहे. हा कर कमी करतांना १९९९ पासून पुर्व कमी परिणामाने कर आकारणी कमी करण्यात आली आहे. पद्मपुऱ्यात एक इमारत आहे. या इमारतीमध्ये पुर्वी शाळा चालत असे. या इमारतीच्यानंतर घरगूती वापर दाखविण्यात आला. या इमारतीत एकुण २४ खोल्या आहे. या चोवीस खेल्या घरगूती वापरासाठी होवू शकत नाही. हे कोणताही अधिकारी प्रथमदर्शनी तपासून घेवू शकतो. अशा प्रकारच्या गंभीर चूका निर्दशनास आल्या आहेत. या दृष्टीने या

विभागाचे सविस्तर लेखा परिक्षण हाती घेण्यास आले आहे. यासाठी प्रशासनास एक पत्र देवून तांत्रिक अधिकारी सोबत देण्याची मागणी करण्यात आली आहे. कर आकारणी विभागाचे कनिष्ठ अभियंता दुय्यम आवेक्षक यांनी आम्ही स्थळ पाहणी केली. याठिकाणी भाडेकरुन नाही. अशी टिप्पणी दिली आहे. या टिप्पणीच्या आधारावर कर आकारणी कमी करण्यात आलेली आहे. उस्मानपुरा भागातील एक प्रकरण आम्ही तपासले त्या ठिकाणी एस. एस. आय. नावाची कॉम्प्युटर संस्था चालते. या सहा गाळे ३,५००/- महिन्याने घेतल्याचे निर्दशनास आले आहे. या भागातील बाजार भावाने असा गाळा साधारणपणे ५ ते ६ हजार रुपये भाडयाने मिळु शकेल. अशा प्रकारे ज्या विभागाचे लेखापरिक्षण केले आहे. त्याबाबतच सविस्तर अहवाल देवून स्थळ पाहणीच्या प्रकरणासाठी एखादा तांत्रिक अधिकारी देवून या ५५९ प्रकरणाची लेखा परिक्षण करण्याची गरज आहे असे आमचे मत झाले आहे.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : मालमत्ता सर्वेक्षण याबाबत स. नगरसेवक श्री. संजय शिरसाठ यांनी त्यांचे विचार मांडले आहेत. महापालिकेचा कर्मचारी आहे. त्याच्याकडुन ज्या चुका झाल्या त्यात दोषी काय मालमत्ता सर्वेक्षणासाठी दोन कोटी रुपये लागतील. असा प्रस्ताव आला आहे. मग महापालिकेचे कर्मचारी काय करतात? अशी प्रकरणे महापालिकेला तोटयात नेत आहे. माझ्या वार्डात एक ओपन स्पेस आहे. या ओपन स्पेस पासून महापालिकेला २० कोटी रुपये मिळतील आणि २ लाख रुपये महिना मिळेल. पण आतापर्यंत महापालिकेने ती जागा ताब्यात घेतली नाही. याविषयी मी एक हजार रुपयाचे बॉण्ड पेपरवर लिहून देण्यास तयार आहे. अशी अनेक प्रकरणे आहेत. याबाबत संबंधित अधिकारी यांनी उत्तर दयावे.

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : सभागृहात खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याबाबत चर्चा चालु आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतील मालमत्तांचे सर्वेक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. वृत्तपत्रात खुलासा देण्याची माझी सवय नाही. या पदाधिकाऱ्यांशी अनौपचारीक चर्चा मात्र नेहमी करतो. समन्वय आणि साकल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम चालावे असा माझा विश्वास आहे. आज पर्यंतच्या माझ या २३ वर्षाच्या सेवेमधील रेकॉर्ड उत्कृष्ट आणि चांगले आहे.

श्री. संजय शिरसाठ : मा. आयुक्त चुकीचे सांगत आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येतील की, मा. आयुक्तांचे स्टेटमेंट पेपरमध्ये आले आहे. मुळात महापालिकेच्या सर्व कारभार हा सर्वसाधारण सभेच्या माध्यमातुन चालतो आणि पत्रकार परिषत घेण्याचे अधिकार मा. महापौरांना आहे. पण अनेक अशी उदाहरणे दाखविता येतील की, पेपरला मा. आयुक्त यांचे स्टेटमेंट नेहमीच येत असतात. मा. आयुक्त यांनी प्रसिध्दी करु नये असे शासनाचे आदेश निर्देश आहेत. स्टेटमेंट हा शब्द मी जाणीवपुर्वक वापरला आहे. पेपरच्या माध्यमातून मी वाचले आहे. ते मा. आयुक्त यांना दिले किंवा नाही हे मला माहीत नाही.

मा. आयुक्त : मी आपल्याला अत्यंत जबाबदारीने उत्तर देत आहे. मालमत्तेच्या सर्वेक्षणाबाबत कोणतयाही प्रकारचे स्टेटमेंट मी पेपरला दिले नाही. अतिशय जबाबदारीने वागणारा अधिकारी म्हणून या सरकारमध्ये माझी ख्याती आहे.

श्री. संजय शिरसाठ : मा. आयुक्त यांनी सभागृहावर दबाव टाकु नये. मा. आयुकतांनी २३ वर्षाची कारकीर्द काय आहे. याबाबत आम्ही स्पष्टीकरण मागितले नाही. आपली २० वर्षाची कारकीद चांगली आहे हे या सभागृहात सांगून उपयोग काय?

मा. आयुक्त : मी सभागृहाला खुलासा करीत आहे. आपण जे म्हटले मी पेपरमध्ये वाचले ते मी केलेले नाही अशी स्टेटमेंट करण्याची माझी पध्दत नाही. अनौपचारीक चर्चा ही मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, स. पालिका सदस्य यांच्याशी मात्र मी जरुर करतो आणि ती करणे आवश्यक असते. त्या चर्चेचा धागापकडून महापालिकेबाबत अन्य काही येत असेल. आणि आपण म्हणता त्या प्रमाणे अशा प्रकारचे स्टेटमेंट मा. महापौर यांनी द्यावे असे असेल तर, ती गेष्ट सर्वात आधी मला आवडेल आणि प्रशासनाच्या वतीने सर्व अधिकाऱ्यांना या ठिकाणी असे सांगेन की, कोणीही कोणताही खुलासा देवू नये.

श्री. संजय शिरसाठ : खुलासा संदर्भात एखादी पाईप लाईन फुटली तर मा. महापौरांनी करु नये. परंतू या शहराच्या नागरिकांच्या हिताचे संदर्भात एखादा निर्णय असेल तर तो मा. महापौर यांना प्रसिध्द करण्याचा पुर्ण अधिकार आहे. कोणत्याही अधिकाऱ्याने खुलासा करु नये. असे आपण सांगत आहात त्यावर आपल्याला हे सांगावे लागेल.

श्री. नंदकुमार घोडेले : कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार हा मा. महापौर यांचा आहे. असे मा. मुख्यमंत्री यांचे आदेश आहेत. स. सभासद श्री. संजय शिरसाठ यांच्या बोलण्याचा अर्थ आपण वैयक्तीकपणे घेवू नये. याचा एकच अर्थ आहे की, लोकप्रतिनिधींना हा अधिकार आहे.

मा. आयुक्त : मी वैयक्तिक होत नाही. आपला विषय मालमत्ता सर्वेक्षणाशी मर्यादीत आहे. सभागृहाला जर असे वाटत असेल की, मी याबाबत प्रेस स्टेटमेंट दिलं तर अर्थात मी तसं दिलं नाही. मालमत्तांचे सर्वेक्षण करणं आवश्यक आहे. हे सर्वेक्षण करता असतांना आपण मुळ अंदाजपत्रकही पाहिले आहे. अंदाजपत्रकात जो उल्लेख आलेला आहे. त्यापध्दतीने आपण अशा प्रकारचे सर्वेक्षण करण्याचे धोरण या महापालिकेने घेतलेले आहे. परंतू आताच स. सदस्यांनी भावना व्यक्त केल्यामूळे हे सर्वेक्षण करत असतांना आपण मुळ अंदाजपत्रकही पाहिले आहे. अंदाजपत्रकात जो उल्लेख आलेला आहे. त्यापध्दतीने आपण अशा प्रकारचा सर्वेक्षण करण्याचे धोरण या महापालिकेने घेतलेले आहे. परंतू आताच स. सदस्यांनी भावना व्यक्त केल्यामूळे हे सर्वेक्षण कसं पार पाडावं याची प्रक्रिया काय असावी आणि याचे टेंडर डॉक्युमेंट कशा प्रकारे केले जावेत या प्रकारच मार्गदर्शन अर्थातच आपण भावना व्यक्त केल्याप्रमाणे अर्थातच प्रशासनाच आहे. हे काम स. सभासद अथवा मा. सभापतींच नाही. याबद्दल आयुक्त म्हणून आणि प्रशासन म्हणून इतर अधिकाऱ्यांचही वेगळ मत असण्याचं कारण नाही. मी मध्यंतरी काही काळ नसतांना आणि त्याही आधी या संचिकेवर चर्चा झाली ही वस्तुस्थिती आहे. निविदा प्रक्रिया सुरु करतांना निविदेचा कच्चा मसुदा तयार केला गेला. ही निविदा तयार करतांना एका मालमत्तेला किती खर्च येतो हे आपण अंदाजाने ठरवत आहोत. अशा प्रकारचे कोठेही झालेले नाही. आपण एक अंदाज घेतलेला आहे. सभागृहाला माझी विनंती आहे की, उपायुक्त यांनी

आर्थिक तरतुदींबाबत खुलासा केला असला तर ती एक वस्तुस्थिती ठेवली आहे. आर्थिक तरतुद नाही म्हणून हे काम करावयाचे नाही अशी भूमिका आयुक्तांची नाही आणि कधी असणार नाही. बजेट हे सभागृह आणि आयुक्त ठरवितात. सार्वजनिक हितासाठी बजेटला आकार कसा द्यावयाचा हे सभागृहाच्या आणि माझ्या हातात आहे. तेव्हा या सर्वेक्षणाबाबतच्या प्रक्रियेसंबंधी ज्या विविध अडचणी पुढे आल्या त्यामुळे इतर मनपामध्ये घोटाळे आपल्याकडे होवू नये म्हणुन प्रशासनाकडुन त्रुटी राहु नये. एवढाच हेतू त्यामागे होता. वास्तविक पाहता जूनमध्ये किंवा त्याआधीही ही निविदा प्रक्रिया पूर्ण करुन अंतीम करता आली असती. परंतू पायलट बेसीसवर एका झोनच काम करुन त्या एजन्सीज काम कसं आहे ते पाहुन पुढाचा सर्वे होण्याचा यावा असा प्रशासनाचा हेतू आहे. ते स्थायी समितीचे मा. सभापती यांना अवगत केलेले आहे. ही दिरंगाई किंवा ढिलाई नाही. परंतू यातील आर्थिक बाबी आणि प्रक्रियेतल्या बाबी शक्य तितक्या काळजीपूर्वक करण्यात एवढीच भावना आहे. यादृष्टीने ही निविदा अंतीम स्तरावर आणली आहे. आणि प्रक्रिया एका झोनने सुरु करावी हे प्रामाणिक मत आहे. मुळ काम प्रशासनाच राबविले आणि प्रशासन त्यासाठीच आहे.

श्री. संजय शिरसाठ : मुळ प्रश्न पुन्हा बाजूलाच राहीलेला आहे. आपण अर्थसंकल्प सादर करत असतांना ठळक वैशिष्टे यामध्ये हा विषय घेतलेला आहे. मागील सभापतींना हा विषय मंजुर केला त्यास सहा सात महिन्यांचा कालावधी निघून गेला आहे. या सात महिन्यांत एक निविदा अंतीम होत नाही आणि आज पुन्हा त्यामधील अटी-शर्तीबाबत चर्चा करणार आहोत. हे आमचे दुर्देव आहे. अर्थसंकल्प करतांना प्रशासनाने विषय सभापतींसमोर आपणला होता. तो आम्ही आणलेला नाही. प्रशासनाने हा प्रस्ताव आणतांना दहा ठिकाणचा विचार करुनच आणलेला असावा आणि प्रशासनात सर्व सक्षम अधिकारी आहेत. या भावनेतून आणला असावा असे माझे मत आहे. आज सात महिन्यानंतर हा प्रस्ताव सभागृहापुढे असता तरी आपण आज त्याच सुरुवातीच्या जागेवर उभे आहोत. म्हणजे आणखी स्टेशन आपल्याला आठवयाचे आहे. तेव्हा याबाबत सभागृहाला ठोस असे आश्वासन देण्यात यावे. महापालिकेचे नुकसान करण्यात नगरसेवक अग्रेसर आहेत असे नागरीक म्हणतात. त्यातून काही नगरसेवकांना टारगेट केले जाते. सर्वेक्षणाचे अनुषंगाने ५५२ संचिकांचा उल्लेख सभागृहापुऐ आला आहे. यात पद्मपुऱ्याचा शाळेचा उल्लेख आहे. ही शाळा मुख्य रस्त्यावर आहे. या इमारतीत २४ खोल्या आहेत. या २४ खोल्यात चार माणसांच कुटुंब रहात असेल तर त्या बाबीची गिनिज बुकात नोंद व्हायला हवी. या इमारतीत सहा-सात शटर आहेत. दर्शनी भागात दुकाने आहेत. तरीही या इमारतीचा कर कमी होतो. हा गंभीर प्रकार मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी मांडला आहे. यावर एक समिती नियुक्ती करुन अशा प्रकरणांची चौकशी होवू द्यावी. तो अहवाल सभागृहासमोर येऊ दयावा. या समितीत मुख्य लेखापरिक्षक, श्री. डी. पी. कुलकर्णी, श्री. एस. डी. पानझडे, अशा सक्षम अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा. या शहरांच्या विकासाचे कामासाठी नगरसेवक म्हणून आम्हालाही अनेक बाबींना तोंड द्यावे लागते. आयुक्त म्हणून आपलीही जबाबदारी असते. नगरसेवकांची व्याख्या आज बदलत

चालली आहे. सकाळी उठल्यानंतर प्रथम नाली कोणती तुंबलेली आहे. ड्रेनेज कुठ चोकअप झालेले आहे. कोणता लाईट बंद आहे हे सर्व पाहुन त्याबाबत संबंधिताकडे हे काम करण्याबाबत विनंती करावयाची. या शहराचा विकास व्हावा. नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा देता याव्यात म्हणून हे तीजवस्तीस कोटी जर वाढले तर या सुविधा देता येतील.

मा. आयुक्त : मुख्य लेखा परिक्षक यांच्याशी चर्चा केली. ही जी प्रकरणे आहेत. ज्यात मोठया प्रकरणांवर कर कमी करण्याच्या, मुल्यांकन कमी करण्याच्या बाबतीत पध्दत चुकली असेल, मिळकची राहुन गेल्या असतील किंवा सुनावणी दरम्यान ज्या अपुऱ्या कागदपत्रांवर सुनावणी दिली आहे त्या सुनावणीच्या आधारे महापालिकेने नुकसान झाले आहे. यात मुख्यलेखापरिक्षक यांनी दिलेल्या अहवाल यावर यांच्याशी चर्चा झाली. त्यानुसार मुख्य लेखापरिक्षक यांनी केलेली शिफारस अत्यंत योग्य आहे. सर्व मिळकतींची १००% तपासणी आणि सुनावणी मध्ये जे आक्षेप आढळुन आले त्या सर्व प्रकरणांची फेरतपासणी घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा बेजबाबदार समजूया, गैर समजूया कदाचीत अनावधाने काही प्रकरणे झाले असतील ज्यात महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असेल तर, कोणतेही सभागृह कोणतेही सदस्य आणि कोणताही आयुक्त सहन करणार नाही. या दृष्टीने या सर्व प्रकरणांची सविस्तर चर्चा करुन जितके उत्पन्न बुडाले आहे. ते प्रचलित कायदयाच्या तरतुदीनुसार वसुलच केले पाहिजे. प्रसंगी जे कामचुकार अधिकारी त्यात आढळतील त्यांच्यावरही कार्यवाही झाली पाहिजे. महापालिका अस्तित्वात झाल्यापासून आयुक्तांनी त्यांच्या खालच्या अधिकाऱ्यांना जे अधिकार दिले त्यांची सर्व अधिकाऱ्यांना मागच्या आठवडयात आठवण करुन दिली आहे. आणि आपल्याला दिलेले अधिकार आपण सक्षमपणे वापरावेत दैनिक वेतनावरील कर्मचारी आणि वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बरेचशे अधिकार उपआयुक्त यांना दिलेले आहेत. त्यांनाही विनंती केलेली आहे. आपण आपले अधिकार सक्षमपणे वापरा. मागच्या स्थायी समिती सभेत हा घोटाळा झाला होता. त्याचं उपरं म्हणजे चाचणी लेखा परिक्षण झालं होत. ते सविस्तर झाल्यानंतर ही रक्कम चार लाखाच्यापुढे गेलेली आहे. तो अहवाल आल्या नंतर उपआयुक्त (प्र) यांना संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्या संचिकेवर गरज नसतांना माझी सही आहे. ताबडतोब अशा सुचना दिल्या आहेत. त्यानुसार उपआयुक्त (प्र) यांनी झोन प्रमुखांना पत्र पाठविले आहे. एवढयावर सांगून चालणार नाही. ज्या ज्या कर्मचाऱ्यांनी वसुली करण्यात कुचराई केली असले. ज्या झोन अधिकाऱ्यांनी पर्यवेक्षणात कुचराई केली असेल, चार लाख म्हणजे काही लहान रक्कम नाही. आणि अशा प्रकारची प्रकरणे सक्षमपणे वेळीच हाताळणी केली नाही तर अशी प्रकरणे वाढतात. तेव्हा प्रकरणात प्रशासन विभागाकडून तातडीने व्हाव्यात अशा सूचना मी दिल्या आहेत. तेव्हा याबाबत या निमित्ताने स्थायी समितीचे सभापती यांच्या परवानगीने अस्थापना विभागाला परत एकदा सूचीत करतो की, यामध्ये आपल्याला दिलेले अधिकार आपण सक्षमपणे वापरावेत. आयुक्त हे कोणत्याही गैरकृत्याला पाठीशी न घालता त्यांच्या पाठीमागे (फिलोअप) राहतील असे या निमिताने मी पुन्हा एकदा सांगतो.

श्री. माणिक साळवे : मालमत्ता कराचे उत्पन्न वाढावे म्हणून खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करणार आहोत. या प्रस्तावात शहरात १,००,०२९ मालमत्ता आहेत. अशी माहिती दिली आहे. पाणीपट्टी वाढीच्या दुप्पटीनेही आपण सर्वेक्षण करणार आहोत तेव्हा ते दोन संस्थामार्फत न करता याच संस्थेला जे अनाधिकृत नळ आहेत. त्याच्या सर्वेक्षणाचे कामही या संस्थेला देण्यात यावे. खाजगी संस्थामार्फत सर्वेक्षण करतांना महापालिकेवर खर्चाचा बोजा पडणार आहे.

मा. आयुक्त : आपली सूचना मान्य आहे. पाणीपट्टी वसूली बाबत आपल्या डिमांड नोटीस वाटण्याची जी मोहीम चालु आहे. याबाबत कार्यकारी अभियंता आणि त्यांच्या संबंधित अधिकारी यांनी अशी प्रकारच्या जोडण्यावर लक्ष दयावे. अशा सूचना कार्यकारी अभियंता (पापू) यांना दिल्या आहेत. शेवटी पाण्याची वसुली वाढव्यात फायदा होईल. कारण ज्या नोटीसेस इश्यु झाल्या आहेत. शेवटी पाण्याची वसुली वाढण्यात फायदा होईल कारण ज्या नोटीसेस इश्यु झालेल्या आहेत. त्याचा पाठपुरावा करुन त्यांनी ही त्यात सक्रिय भाग घ्यावा. वसुली विभाग असला तरी कोणत्या भागात कुठे कुठे जोडणी आहे. याची सविस्तर माहिती त्याच्या विभागाला आहे.

मा. सभापती : मालमत्ता सर्वेक्षणाबाबतची निविदा कशी अंतिम होईल याबाबत मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : उपआयुक्त यांच्याशी कालच चर्चा झाली. साधारणत: २०-०८-२००३ पर्यंत शक्यतो टेडंर काढण्याचे काम केले जाईल.

श्री. नंदकुमार घोडेले : मालमत्ता सर्वेक्षणाबाबतची निविदा काढण्यापुर्वी निविदा ही सर्वे करीता खुली असली पाहिजे. अट क्र. १ जाचक आहे. या अटीप्रमाणे एकाच संस्थेचे चार एजन्सीमध्ये काम घेतले असेल आणि त्यांनीच या महापालिकेची निविदा भरती असेल तर, अशा संस्थेची मोनोपॉली होईल. या करीता या प्रकरणाच्या निविदा सर्वाकरीता खुल्या असाव्यात. निविदा अंतीम करण्याचा जो निर्णय आहे. आपल्याकडे राखीव आहे. आणि पायलट बेसिसवर एका झोनचे सर्वेक्षण करण्याऐवजी संपुर्ण शहराचे करण्याबाबतची निविदा काढण्यात यावी. या दोन सूचना बाबत गांभीर्याने विचार करण्यात यावा. आणि या निविदा खुल्या स्पर्धेने विकल्या जाव्यात अशी दुरुस्ती कराण्यात यावी.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : स. स. श्री. माणिक साळवे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पाणीपट्टी बाबतचा विषय यात घेतल्याने आपला खर्च वाचणार आहे.

श्री. माणिक साळवे : मालमत्ता सर्वेक्षणामध्येच पाणीपट्टी बाबत एक कॉलम टकाण्यात यावा. बेकायदा नळ कनेक्शन मोठया प्रमाणात आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : स. स. श्री. माणिक साळवे यांनी जो मुद्दा मांडला त्यास मी सहमत आहे. पाणीपट्टीचा सर्वे केल्याप्रमाणे महापालिकेचे बजेट वाढेल आणि प्रशासनाचे काम वाढेल. बऱ्याच ठिकाणी एक घर तेथे एक-दोन किंवा चार नळ आहेत. असे आढळले आहे. तेव्हा मालमत्ता सर्वेक्षणाबरोबरच पाणीपट्टीचा सर्वे करण्यात यावा.

उपआयुक्त (म) : नळ कनेक्शनच्या सर्वेक्षणा संदर्भात जेव्हा आपण मालमत्तेच्या समग्र सर्वे हाती घेत आहोत तेव्हा त्याच्या डॉक्युमेंटमध्ये नळ आहे का हा कॉलम त्यात समाविष्ट केलेला आहे. तेव्हा नळ कनेक्शनच्या सर्वेक्षणासाठी वेगळी निविदा काढण्यात गरज नाही. यासी महापालिकेला अतिरिक्त खर्च होणार नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : मालमत्ता सर्वेक्षणाचे निविदाबाबत मी ज्या सूचना केल्या होत्या त्यावर काय निर्णय झाला.

मा. आयुक्त : आपण केलेल्या सूचनांची नोंद घेतलेली आहे.

मा. सभापती : सभागृहात आलेल्या चर्चेप्रमाणे सदर प्रकरणी संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी आवश्यक ती निविदा काढण्यात यावी. अटी व शर्ती प्रशासन स्तरावर ठरविण्यात याव्यात.

ठराव :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी मालमत्ता करासाठी पात्र मिळकतीची कर आकारणी करण्यासाठी खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्यासाठी आवश्यकती निविदा काढण्यात यावी. अटी व शर्ती प्रशासनाचे स्तरावर ठरविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

उपआयुक्त (म) : महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत साधारण २००० पासून जकातीच्या निविदेबाबत निर्णय होत आलेला आहे. सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीमध्येही याविषयी अनेक वेळा चर्चा झाली. महापालिकेने प्रशासनामार्फत चार वेळा निविदा काढीत असतांना त्याला फार कमी प्रमाणात प्रतिसाद मिळालेला आहे. किंबहुना आलेलाच नाही. शेवटच्या ज्या दोन निविदा होत्या आपल्या निविदाही विक्री झालेल्या नाहीत राज्यस्तर आणि राष्ट्रीय पातळीवरील पेपरला ही या निविदांची प्रसिध्दी दिली होती. अनेक महापालिका, नगरपालिकांमध्ये खाजगी संस्थेमार्फत वसुली चालु आहे. परंतू औरंगाबाद महापालिकेच निविदा विक्रीसाठी जो प्रतिसाद मिळाला नाही त्याचा या विभागाचा प्रमुख म्हणुन मी अभ्यास केलेला आहे. जकात निविदाबाबत जो प्रतिसाद येत नाही यावर काही तरी उपया शोधुन पुढील निविदा प्रसिध्द करावा. अशा प्रकारच्या विचारावर आम्ही आलो आहोत. पुढे जेव्हा निविदा प्रसिध्द करणार आहेत. त्यावेळी त्याला निश्चितच चांगला प्रतिसाद मिळेल. जकातीसारख्या विषयावर महापालिकेचा अर्थसंकल्प अवलंबून आहे. आज आम्ही जो प्रस्ताव करत आहोत. तो ७३ कोटीच्या रक्कमेवर निविदा काढत आहोत. जकातीची निविदा काढण्यात विलंब होत असला तरी जकातीचे जेवढे उत्पन्न देय रक्कमेपर्यंत आहे. तितके उत्पन्न त्या रक्कमेपर्यंत नेण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. महापालिकेच्या उत्पन्नात घट होणार नाही. याची काळजी प्रशासनातर्फे घेतली जात आहे. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे जकातीची निविदा काढण्याचा लवकरात लवकर प्रयत्न करत आहोत.

मा. आयुक्त : अमरावती महापालिकेची निविदा नुकतीच अंतीम झालेली आहे. त्या निविदेचे कागदपत्र आणव्यात झाले आहेत. त्यावर विचार चालू आहे.

श्री. संजय शिरसाठ : ज्या ५५९ संचिका आहेत त्यात आपण चौकशी समिती नेमावी अशी आपल्याला विनंती केली होती. त्यातून जो काही भ्रष्टाचार आलेला आहे. तो उघड होईल म्हणून पुन्हा विनंती की, मुख्य लेखा परिक्षक श्री. डी. पी. कुलकर्णी, श्री. एस. डी. पानझडे या सक्षम अधिकाऱ्यांची एक समिती नेमण्यात यावी. आणि त्यांना चौकशीसाठी नेमावे. स. स. श्री. नंदकुमार घोडेले त्यांना त्यात सदस्य म्हणुन घेण्यात यावे.

मा. आयुक्त : सभागृहाला समिती नेमण्याचा अधिकार आहे. लेखापरिक्षणात जे मुद्दे काढण्यात आले आहे ते मुख्यत: उपआयुक्त (म) विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखाली विभागाविषयी काढण्यात आलेले आहे. या मुद्दयांनी पुर्तता करणे हे कायदयाने त्या विभागाचे काम आहे. तेही काम त्या विभागाने चालु ठेवावे. समिती नेमली म्हणुन काम थांबवू नये.

श्री. संजय शिरसाठ : समिती नेमण्यात यावी. जे लेखा परिक्षणात मुद्दे काढलेले आहेत. त्याच्यात चौकशी करावी.

मा. सभापती : या उपसमितीमध्ये मुख्य लेखा परिक्षक श्री. एम. पी. खैरनार, कार्यकारी अभियंता (पापु) श्री. एस. डी. पानझडे कार्यकारी अभियंता (जल/विदयुत) श्री. डी. पी. कुलकर्णी स. स. श्री. नंदकुमार घोडेले यांचा समावेश करण्यात येतो. या उपसमितीने चौकशी करुन घेत महिन्यात आपला अहवाल दयावा.

श्री. माणिक साळवे : गेल्या दोन महिन्यांपासून देशभरात शीतपेयात किटकनाशंकाचे प्रमाण आढळुन आले आहे. अशा बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्या आहेत. तसेच दुधामध्ये युरिया आणि वेगवेगळे मिश्रण केलेले दुध महापालिका अधिकाऱ्यांनी पकडले आहे. तेव्हा या गेल्या दोन दिवसांपासून आपल्या आरोग्य विभागातर्फे शहरात अशा काही तपासण्या करण्यात आल्या आहेत का व या शहरात शीत पेयांचे उत्पादन करणारे कारखाने किती आहेत. याची माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : आरोग्य वैदयकिय अधिकारी यांनी माहिती दयावी.

श्री. नंदकुमार घोडेले : या प्रश्नाला जोडुनच माझाही एक प्रश्न आहे. अगोदर दोन वेळा आपण जे भेसळयुक्त दुध नष्ट केले होते. या दुधाचे नमुने प्रयोग शाळेत पाठविण्यात आले होते व या कंपन्यावर कार्यवाही करा याबाबतचा अंतीम अहवाल आलेला आहे. प्राथमिक अहवालानुसार दुध नष्ट करण्याची कार्यवाही करण्यात आली होती. संपूर्ण देशात अशा प्रकारची दुग्ध तपासणी होते. या अगोदर आपण जी दुध तपासणी करुन कार्यवाही केली त्याचे पुढे काय आहे. या कंपन्याकडे परवाना नाही. प्राथमिक आणि अंतीम तपासणी अहवालात या कंपन्यांचे दुध निकृष्ट असल्याचे निष्पन्न झाले आहे. याबाबत आपण काय कार्यवाही केली.

आरोग्य वैदय. अधिकारी : पुर्वी ज्या दुध तपासण्यात आल्या आहेत. त्याचा अहवाल माझ यासमोर नाही. या दोन दिवसात ज्या बातम्या आल्या आहेत. त्यानुसार गुप्त तपासणीची मोहीम कशा प्रकारे घ्यावयाची, पुर्व तयारी करुन नगरनाक येथे आयोजीत केली. या मोहीमेत १४ गाडयातून ३६ नमून्यांची तपासणी केली. या तपासणीत २४ अप्रमाणित आणि १२ प्रमाणित नमुन आहेत. शीत पेयांबाबत अन्न आणि औषधी प्रशासन यांच्या विभागाशी चर्चा झाली आहे. शीतपेय विक्रेत्यांची अधिकृत गोपनीय यादी त्या विभागाकडे आहे. त्यामध्ये त्यांच्यामार्फत तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्याबाबतची आकडेवारी आपल्याकडे नाही. नगर नाक्यावर घेण्यात आलेल्या नमुन्यापैकी २४ अप्रमाणित नमुन्यापैकी पुर्नतपासणीसाठी १४ नमुने शासनास पाठविण्यासाठी घेण्यात आले आहेत. ज्या वाहनातून दुधाचे नमुने घेण्यात आले ते नष्ट केले. या दुधात घनता कमी आढळून आल्याने ते अप्रमाणित आहेत. असे ग्राह्य धरले आहे. या नमुन्यातील दुधात साखर असल्याचे

आढळुन आले आहे. याविषयी आठ वाहनांवर आणि त्यांच्या मालकावर छावणी पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंदविण्यात आली आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : आपण जी दुध तपासणी केली त्या दुध कंपन्या कोणत्या त्यांचे नांप-गांव काय आहे याची माहिती देण्यात यावी. त्यामुळे कोणत्या कंपन्याचे दुध वापरु नये. याची माहिती नागरिकांना होईल जनतेची दिशाभूल होणार नाही.

आरोग्य वैदय. अधिकारी : प्रभात दुध प्रा. लि. राजन, अहमदनगर यांचे ५०० एम. एल. ची. बॅग हे दुध अप्रमाणित आहे.

श्री. संजय शिरसाठ : मा. आरोग्य वैदयकिय अधिकारी जी माहिती देत आहेत. त्याचा कुठे ताळमेळ बसत नाही. याबाबत मा. महापौरांच्या उपस्थितीस एक प्रेस नोट काढुन प्रसिध्दीस द्यावी.

श्री. नंदकुमार घोडेले, श्रीमती पार्वती मानकापे : प्रगटन मा. महापौर आणि पदाधिकारी यांच्या उपस्थित एक प्रेस नोट काढुन जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे. यामुळे नागरिकांना कोणते दुध योग्य आहे व कोणते दुध अयोग्य याची माहिती मिळु शकेल. काही मुलांना त्रास सुरु झाल आहे. काही उलटया जुलाब झाले आहेत. तेव्हा जनतेला माहिती झाल्यानंतर ते असे दुध वापरणार नाहीत.

मा. आयुक्त : डॉ. काळे आणि अन्न व औषधी प्रशासन यांनी एकत्रित कार्यवाही केलेली आहे. त्याची पण सही ह्या आणि मा. महापौरांना दुध तपासणीमध्ये काय आढळुन काही जनतेने काय काळजी घ्यावी अहवालास प्रसिध्दी देण्यात यावी.

श्री. नंदकुमार घोडेले : काही दिवसांपूर्वी झोन क्र. ८ मध्ये नागरिकांच्या जीवनाशी निगडीत असे जन्म मृत्यू प्रमाणपत्र हे बोगस देण्यात आल्यचे सिध्द झाले आहे. याबाबत वृत्तपत्रातही बातमही प्रसिध्दी झाली आहे. यात महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सहीने बोगस प्रमाणपत्र दिल्याची बातमही आली आहे. शाळा, कॉलेज, पासपोर्ट, एल. आय. सी. अशा विविध ठिकाणच्या कामांसाठी लागणारे हे अत्यंत महत्वपूर्ण असे प्रमाणपत्र काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा. असे कर्मचारी कोण आहेत. आतापर्यंत किती बोगस दाखले देण्यात आले. अशा प्रकारे बोगस पावत्या देवून मालमत्ता कर वसुल केला जातो. अशा प्रकरणांचा सखोल अभ्यास करुन समुळ नष्ट करण्याची कार्यवाही आतापर्यंत प्रशासनाकडून आलेली नाही. याबाबतचे जे प्राथमिक अहवाल प्राप्त झाले आहेत. त्याबाबत उपआयुक्त (प्र) यांनी काय कार्यवाही केली. कर्मचाऱ्यांनी घोटाळे करावयाचे, प्रशासनाने दिरंगाई करावयाची अशा प्रकारने असे घोटाळे वाढत चालले आहेत. नागरीकांनी जन्म-मृत्यूचे दाखले कोठून घ्यावयाचे आणि ते कोणाच्या सहीने वितरीत करण्यात येतील. याबाबतची माहिती जनतेला कळविण्यात आली आहे का. याबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे.

श्री. संजय शिरसाठ : याबाबत अशी माहिती प्राप्त झाली आहे की, ३००/- रुपये दिले तर दोन वर्षापुर्वीची तारीख टाकुन प्रमाणपत्र दिले जाते. जन्म-मृत्यू हे अत्यंत गरजेचे प्रकरण आहे. हे प्रकरण उघडकीस येऊन जवळपास दीड महिना होत आलेला आहे. या प्रकरणात प्रशासनाने कोणतही कार्यवाही केली याबाबत खुलासा करावा.

मा. सभापती : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (प्र) : मागील महिन्यात झोन क्र. ८ मध्ये जे जन्म दाखले दिले गेले. त्यात ज्यांना अधिकार नाहीत. अशा अधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र दिल्याची बातमी प्रसिध्द झाली आहे. याबाबत या विभागाचे अधिकाऱ्यांकडुन सविस्तर अहवाल घेतला असात आता पर्यंत या झोनमधून बुक क्रमांक ९१, ९२, ९३ व ७४ व या चार पुस्तकांची वेगळया पध्दतीने पाहणी केली असता यातून जे जन्म दाखल वितरीत करण्यात आले त्यावर झोन ऑफिसरच्या सह्या नव्हत्या, ज्यांनी सह्या केल्या त्यांना ते अधिकार नव्हते. त्यामध्ये त्या विभागातले क. लिपीक, श्री. साळवे स्वच्छता निरिक्षक श्री. युनूस आणि आणखी काही कर्मचाऱ्यांच्या सह्या आहेत. त्यांचे जबाब घेण्याचे काम चालू आहे. या प्रकरणांत एकुण १८४ प्रमाणपत्र वितरीत झाली आहे. याबाबत त्या कर्मचाऱ्यांचा खुलासा मागविला असून, त्यावर कार्यवाही चालू आहे. येत्या आठ दिवसांत सादर कार्यवाही पूर्ण करुन अहवाल ठेवला जाईल.

श्री. नंदकुमार घोडेले : चौकशी नुसार अधिकार नसतांना सह्या केल्या हे त्यांनी मान्य केले आहे. मग आता अहवाल कुठल्या प्रकारचा यावयाचा राहीला.

श्री. संजय शिरसाठ : जन्ममृत्यूबाबतचे बोगस प्रमाणपत्र देणे हा आरोप गंभीर प्रकारचा आहे. सर्व बाबी निर्दशनास आल्या आहेत. सभागृहात त्याबाबत स्टेंटमेंटही दिले आहे. मग गुनहा नोंद का झाला नाही. विभाग प्रमुख या नात्याने ही सर्व जबाबदारी मा. आयुक्त यांची आहे. या प्रकरणाबाबत आजचे आज गुन्हा नोंदविण्याचे आदेश विभाग प्रमुख म्हणून मा. आयुक्त यांनी दयावेत.

मा. आयुक्त : जन्म आणि मृत्यूच्या नोंदीबाबत २००० साली सर्वकष नियम महाराष्ट्रात झालेले आहेत. त्या नियमाखाली महापालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांना अधिकार दिलेले आहेत. ते नियम अगदी स्पष्ट आहेत. त्या नियमानुसार संबंधित उपआयुक्त यांनी जे सक्षम प्रधिकारी आहेत. ज्यांना जन्म अथवा मृत्यू दाखल देण्याचे अधिकार आहेत. त्याशिवाय अन्य कर्मचारी अथवा अधिकारी यांनी दाखला दिला असेल ते चुकीचे होते. हे लक्षाम घेवून तात्काळ कळविण्यात यावी.

श्री. माणिक साळवे : यापुर्वी या सभागृहात सत्यम फर्टीलायझरला नोटीस देण्याचा निर्णय देण्यात आलेला होता. त्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी.

आरोग्य वै. अधिकारी : सत्यम फर्टीलायझर यांना अल्प मुदतीच्या यात नोटीस देण्यात आल्या होत्या. आणि यानंतर दिनांक १८-०७-२००० ला तीन महिने मुदतीची अंतीम नोटीस देण्यात आलेली आहे. या तीन महिन्यात त्यांनी करारनाम्याच्या अटी/शर्ती प्रमाणे काम केले नाही तर करार रद्द करुन महापालिकेचा जो खर्च झाला आहे. तो त्यांच्याकडुन वसुल करण्यात येईल अशा प्रकारची नोटीस देण्यात आली आहे.

मा. सभापती : विषय पत्रिकेला सुरुवात करावी.

श्री. नंदकुमार घोडेले : अनुशेष भरण्याबाबत शासनाने आपल्याला आदेश दिले आहेत. तो एक प्रश्न आणि अस्थापना विभागाकडे पदोन्नती वाहन चालकांच्या रिक्त जागा अतिरिक्त कारभार असे प्रश्न प्रलंबीत आहेत. यासाठी शासनाने महापालिकेस मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. यात ठराविक कालावधीच्या मर्यादा दिल्या होत्या. अनुकंपाबाबतची प्रकरणे हा सुध्दा महत्वाचा विषय

आहे. परंतू यावर कुठल्याच प्रकारची कार्यवाही होत नाही. तेव्हा अस्थापना विभागाकडून अशा प्रकारच्या प्रकरणांबाबत आपण केव्हा निर्णय घेणार याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा करावा.

मा. सभापती : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

उपआयुक्त (प्र) : महापालिका अस्थापनेवर अनुशेष जवळ जवळ ५१ पदे रिक्त दाखविण्यात आली आहेत. एस. सी. एस. टी. डी. एन. टी., ओ. बी. सी. या संवर्गातील विविध पदे भरण्याची कार्यवाही आपण प्रस्तावित केली असून, शासनाच्या नॉर्म्सप्रमाणे ही पदे भरण्याची मुदत दिनांक ३०-०९-२००३ पर्यंत वाढविली आहे. महापालिकेतर्फे प्रत्येक पदासाठी सेवायोजन कार्यालय, ट्रायबल डेव्हलपमेंट, आणि स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून अर्ज मागवून प्राप्त झालेल्या ३००० ते ३५०० अर्जाची छाननी करण्यात आली आहे. या छाननी नंतर संवर्ग निहाय वर्गवारी करुन मुलाखती घेण्यात येईल व ही कार्यवाही ३०-०९-२००३ पर्यंत करण्यात येईल. तसेच वाहन चालकाची पदे पदोन्नतीने भरावयाचे आहेत. त्यात एस. सी., एम.टी, डी. एन. टी. या संवर्गातील जी पदे भरावयाची आहेत. अशी प्रकरणे सुध्दा ३०-०९-२००३ पर्यंत भरण्यात येतील.

श्री. माणिक साळवे : एखादया बांधकामाची किंवा ले-आऊटची परवानगी देतांना त्या ले-आऊटवर किंवा त्या मिळकतीवर कर्ज असेल अशी परवानगी आपण देती का? आणि देता येत असतील तर अशी प्रकरणे किती आहेत याचा खुलासा करावा.

सहा. संचालक नगररचना : स. सभासदांनी ज्या ले-आऊट बाबत प्रश्न उपस्थित केला आहे त्या ले-आऊटची संचिका येथे उपलब्ध येथे उपलब्ध नाही. याबाबत पुढील बैठकीत माहिती देता येईल.

श्री. माणिक साळवे : निश्चित ले-आऊट बाबत मी माहिती विचारलेली नाही. ले-आऊट अथवा मिळकतीवर कर्ज असेल तर आपण परवानगी देतो का? आणि देत असेल तर अशी किती प्रकरणे आहेत याची माहिती मी विचारलेली आहे.

श्री. संजय शिरसाठ : ले-आऊट मंजुरी अथवा बांधकाम परवानगी घेतांना संबंधित मिळकतीवर बँकेचे कर्ज असेल आणि त्याबाबत संबंधितांनी ना हरकत प्रमाणपत्र घेतले नसेल तर अशा मिळकतीवर आपल्याला परवानगी देता येते का?

सहा. संचालक न. र. : या प्रकरणी मी असे सादर करु इच्छितो की, सुरुवातीला आपण तात्पुरता ले-आऊट मंजूर करतो या प्लॉट विक्री करता येणार नाही असा शिक्का मारुन दिलेला असतो. त्यामूळे अशी मिळकत डिपॉझिट करणे किंवा व करणे याबाबत विशेष असा काही फरक पडत नाही. ले-आऊटला अंतीम मंजूरी देण्यात प्रक्रिया बाकी असते. तात्पुरते ले-आऊट मंजुरी म्हणजे विक्रीला परवानगी नाही. जागेवर सिमांकन करण्यासाठी देतो.

श्री. संजय शिरसाठ : याबाबत कायदयात तशी तरतुद आहे का?

सहा. संचालक न. र. : पाहून सांगतो.

मा. आयुक्त : कुठल्याही ले-आऊट मंजुरीबाबतच्या प्रकरणांच्या संदर्भाने अशी प्रकरणे अभिन्यासाच्या विकासासाठी तात्पुरती परवानगी असो अथवा अंतीम परवानगी असो त्यासाठी त्या जागेची टायटल किलयर असणे गरजेचे आहे किमान अपेक्षा आहे.

श्री. माणिक साळवे : शिक्षण विभागातील दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गेल्या दोन महिन्यापासून मुदतवाढ देण्यात आली नही. ती का दिली गेली नाही.

उपआयुक्त (प्र) : याबाबत मा. आयुक्त यांनी मला कालच आदेशीत केले आहे.

मा. सभापती : विषय पत्रिकेला सुरुवात करण्यात यावी.

विषय क्र. ११ :

दिनांक ०९-०७-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्रीमती शाहीन जफर : महापालिका शाळेतील काही वर्गांना आसनपट्टया पुरविण्यात आल्या आहेत. आणि काही वर्गासाठी आसनपट्टया पुरविण्यात आल्य नाहीत. त्यामुळे काही शाळेतील अर्धे विद्यार्थी शासन पट्टयावर बसतात व काही विद्यार्थी खाली बसतात असे का? याबाबत खुलासा व्हावा. माझ्या वार्डातील शाळेत तीन वर्गांना आसनपट्टया झाल्यात एका वर्गाला नाही.

मुख्यलेखाधिकारी : महापालिकेतील शालेय विद्यार्थीसाठी मागणीनुसार ३१५० आसनपट्टया मागविण्यात आल्या आहेत. यापैकी १२३५ आसनपट्टयाचे वितरण करण्यात आले आहे. आसनपट्टयांचे शालेय वितरण हे शिक्षणाधिकारी यांचे मार्फत केले जाते.

श्री. माणिक साळवे : महापालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांबरोबरच महापालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या बालवाडी विद्यार्थ्याकरीताही आसनपट्टया पुरविण्यात याव्यात.

मा. सभापती : महापालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या बालवाडी विद्यार्थी नाही. आसनपट्टया पुरविण्यात याव्यात.

उपआयुक्त (प्र) : सर्व शाळेला आसनपट्टया काळजी घेण्यात येईल. एकही विद्यार्थीखाली बसणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. महापालिका बालवाडी विद्यार्थांना आसनपट्टया पुरविण्याबाबत स्वतंत्र विषय ठेवावा लागेल.

श्री. संजय शिरसाठ : महापालिकेच्या ज्या शाळा आहेत. त्यापैकी काही शाळा या भरतच नाही. काही शाळात २-२, ३-३ विद्यार्थी आहेत. तर काही शाळेत ५ विद्यार्थी आणि शिक्षक ३ अशी परिस्थित आहे. तसेच काही शाळेत तर एका पट्टीवर दुसरीचे विद्यार्थी एका पट्टीवर तिसरीचे विद्यार्थी एका पट्टीवर तर चौथीचे विद्यार्थी असे एकाच वर्गात ३-३ वर्ग घेतले जातात. ५ विद्यार्थी आहेत. म्हणुन ती शाळा चालविणे योग्य नाही. तर अशा ज्या काही शाळे आहेत. त्यांचा सर्वे करण्यात यावा. अशी मागणी मी मागील सभेत केली होती. यासाठी एक समिती तयार करण्यात आली होती. त्या समितीचा काही अहवाल आपल्याकडे आला आहे काय?

श्री. म. शाहीन जाफर : या समितीने सर्वे केलाच नाही. जर सर्वे झाल असता तर, विद्यार्थी संख्येप्रमाणे शाळेतील सर्व विद्यार्थीसाठी आसनपट्टयांचे वितरण झाले असते.

श्री. संजय शिरसाठ : या शहरात अशा अनेक शाळा आहेत की, विद्यार्थी ५ शिक्षक ३ आणि शाळेचे इमारतीसाठी महापालिका मात्र दरमहा १०-१०, १५-१५ हजार भाडे दिले जाते आणि काही शाळा अशा आहेत. त्या शाळेत विद्यार्थी संख्या जास्त आहेत. पण शिक्षक कमी आहेत. यासाठी मागील सभेत एक चांगला निर्णय घेण्यात आला होता की, शिक्षणाधिकारी आणि काही नगरसेवक यांनी

एकत्र जावून अशा शाळांचा सर्वे करावा. ज्या शाळेत पाचच विद्यार्थी आहेत. अशा बंद करण्यात याव्यात आणि महापालिकेचे आर्थिक नुकसान टाळावे. जी समिती नेमण्यात आली होती ती एक महिन्याच्या कालावधीत गेलेलीच नाही. असे संबंधित सदस्यांचे मत पडले आहे.

मा. सभापती : पुढील बैठकीत या समितीने याबाबतचा संपूर्ण अहवाल दयावा.

श्रीमती शाहीन जफर : शाळेतील शिक्षकांना बसण्यासाठी खुर्च्या व आवश्यक टेबल नाहीत. विद्यार्थ्यांना पिण्यासाठी पाणी व ग्लास इ. सुविधाही शाळेत नाहीत.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : महापालिकेच्या शाळेचा दर्जा फारच घसरलेला आहे. या शाळा म्हणजे महापालिकेला आर्थिक बोजा आहे. तेव्हा महापालिका खाजगीकरण करण्यात यावे अशी माझी सुचना आहे.

श्रीमती शाहीन जफर : महापालिका शाळेतील पाचवी चौथीतील विद्यार्थ्यांना जे गणवेश वाटण्यात आले त्यात या वर्गातील विद्यार्थी गणवेश घालण्यास तयार नाहीत. गणवेशाचे गठ्ठे जसेच्या तसे शाळेत पडुन आहेत. या गणवेशात चौथी-पाचवा वर्गातील विद्यार्थ्यांसाठी चड्डया देण्यात आल्या आहेत. त्या रद्द करुन त्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी पॅन्ट देण्यात याव्यात.

मुख्यलेखाधिकारी : स. सदस्या यांनी सभागृहात जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबत शिक्षणाधिकारी यांचा कोणताही लेखी स्वरुपाचा अहवाल प्राप्त झालेला नाही. सर्व गणवेशाचे वाटप झाल्याबाबत शिक्षणाधिकारी यांचा कोणताही लेखी स्वरुपाचा अहवाल प्राप्त झालेला नाही. सर्व गणवेशाचे वाटप झाल्याबाबत शिक्षणाधिकारी यांचा लेखी अहवाल आमच्याकडे आहे. कोणत्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी कोणता गणवेश घ्यावा. त्याबाबत नॉर्म्स ठरलेले आहेत. त्याप्रमाणे तयार करुन देण्यात येईल.

श्रीमती शाहीन जफर : शिक्षणाधिकारी शाळेतच येतातच कधी? शिक्षणाधिकारी शाळेत आले तर त्यांना कळेल की, कोणत्या विद्यार्थ्यांला शर्ट लहान आहे किंवा कोणत्या विद्यार्थ्याला शलवार लहान आलेला आहे. जे गणवेश दिलेले आहेत ते दोन वर्षाच्या मुलाला एक वर्ष वयाच्या मुलाचा गणवेश दिला जात आहे. विद्यार्थ्याला वाटप करण्यात आलेले गणवेश योग्य आकारात येतात की नाही हे पाहण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी यांची आहे. विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करतांना संबंधित विभागाचे नगरसेवक यांचे हस्ते वाटप करण्यात येते. अशा वेळी लहान आकाराचे गणवेश असल्याने विदयार्थ्यांचे आई-वडील असे गणवेश स्विकारत नाहीत. तेव्हा गणवेश द्यावयाचे असतील तर चांगले द्यावेत. अन्यथा देवू नयेत.

मा. आयुक्त : प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याची योजना ही शासनाची आहे. आणि प्रत्येक वर्गातील वर्गातल्या विद्यार्थ्यांची साधारण उंची आणि आकारमान काय असावा या पध्दतीनच त्यांच एकच माप दिला जातो. एक माप दिल्यानंतर उदा. तिसरी-तिसरीचा वयोगट किती त्यांची माप किती हे शासन ठरवत हे ठरवू नये. मी जिल्हा परिषदेत काम करत असतांना पुष्कळ वाद झाला प्रत्येकाच मापं घ्याव पण प्रत्येकाच माप घ्यायला आणि निविदा भरण्यासाठी कोणीही येत नाही. मोठया पण प्रत्येकाच माप दयायला आणि निविदा भरण्यासाठी कोणीही येत नाही. मोठया मुलांना लाल पॅन्ट देण्यात यावी. माझ्या माहितीप्रमाणे अशा सूचना नाहीत. प्र. शिक्षणाधिकारी (प्रकल्प

अधिकारी) यांनी या प्रकरणात लक्ष देवून पाहणी करावी व त्याबाबतचा अहवाल मा. सभापती व प्रशासनास सादर करावा.

श्री. ठकुजी वाणी : माझ्या वॉर्डातील काही शाळांमध्ये मुलांची संख्या कमी पण शिक्षक जास्त आहेत आणि काही शाळेत शिक्षक कमी आहेत पण विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. तेव्हा शाळेत शिक्षक जास्त आहेत. त्या शिक्षकांच्या ज्या शाळेत शिक्षक कमी आहेत. अशा ठिकाणी बदल्या कराण्यात याव्यात.

श्रीम. शाहीन जफर : माझ्या वॉर्डातील शाळेत सातवी पर्यंतचे विद्यार्थी आहेत. त्या शाळेत चार शिक्षक आहे. अशा शोत विद्यार्थ्यांना शिक्षण कसे द्यावे. मतदान यादीच्या कामासाठी शिक्षक देण्यात येवू नयेत. अशा सुचना यापुर्वीच केल्या आहेत. सहा शिक्षकांपैकी तीन शिक्षक मतदानाचे कामावर गेल्यानंतर उरलेले चार शिक्षक विद्यार्थ्यांना कसे शिकवतील. मतदानाच्या कामासाठी शिक्षक पाठवु नयेत. याबाबत उपआयुक्त (प्र) यांना यापुर्वीच सुचना करण्यात आली होती. त्यावेळी पुढच्या वेळी मतदानाचे कामासाठी शिक्षक पाठविले जाणार नाहीत असे उपआयुक्त (प्र) यांनी सांगितले होते. मतदानाचे कामासाठी गेलेले शिक्षक त्या ठिकाणी सह्या करतात आणि घरी जातात.

उपआयुक्त (प्र.) : मतदान यादीच्या कामासाठी शिक्षक पाठवू नयेत याबाबत स. सभासद यांनी चर्चा केली होती. त्यावेळी या कामासाठी शिक्षक पाठविले जाणार नाही असे सांगितले होते हे खरे आहे. पण मतदान यादीच्या कामासाठी शिक्षक पाठवावेत असे भारतीय निवडणूक आयोगाचे आदेश प्रशासनाला आहेत आणि ते आदेश पाळणे प्रशासनाला बंधनकारक आहे. तरीपण प्रशासनाने मा. जिल्हाधिकारी यांना पत्र देवून ज्या शाळेत जास्त शिक्षक आहेत. ते शिक्षक आहेत हे शिक्षक घेण्याबाबत विनंती केली आहे.

श्रीमती शाहीन जफर : मा. जिल्हाधिकारी यांना पत्र पाठविले हे सांगणे सोप आहे. पण ज्या शाळेत मुळातच शिक्षक कमी आहेत त्या शाळेचे काही शिक्षक मतदान कामावर गेले तर त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षणावर काय परिणाम होतो याची कल्पना नाही. एका वर्गात तीन विद्यार्थी शिक्षक घेतात तेव्हा कोणता विद्यार्थी काय शिक्षण होतो हे कसे कळणार.

उपआयुक्त (प्र) : स. सभासदांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याविषयी प्रशासन १००% सहमत आहे. याबाबत आम्ही हेल्पलेस आहोत. भावसिंगपूरा शाळेत सहा शिक्षक आहेत. त्यापैकी चार शिक्षक मतदानाचे कामासाठी गेलेले आहेत. दोन शिक्षकावर कशी चालवावी याबाबत सर्वे करुन अशा शाळेतील शिक्षक परत देण्यात यावेत. असे पत्र दिलेले आहे. याबाबत पुन्हा पत्र देण्यात येईल.

मा. आयुक्त : भारत निवडणूक आयोगाच्या कामाबाबात आपण जेथे चर्चा करु नये तो अधिकार आपल्याला नाही. याबाबत मी स्वतः मा. जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करेन. शिक्षण देणे ही सर्वात महत्वाची बाब आहे. मतदानाच्या कामासाठी आपण नाही म्हणू शकत नाही. तरी पण ठराविकच शिक्षक पाठविले पाहीजेत असेही नाही. पाचवी सहावीचे विद्यार्थी एकत्र बसवून शिक्षण देण्यात येत असेल तर ही बाब गंभीर आहे. त्यासाठी ज्या शाळेत अशा शिक्षकांची गरज आहे. याबाबत उपआयुक्त (प्र) यांनी समायोजन करुन या शाळेत इतकी विद्यार्थी इतके वर्ग आहेत. इतके शिक्षक पाहिजेत. यात पाचवी सहावी सातवी अशा वर्गाकरीता कमीत कमी एक शिक्षक

आवश्यक आहे. यादृष्टीने निवडणूक कामासाठी पाठविण्यात आलेल्या शिक्षकांपैकी १२-१५ शिक्षक परत बोलविणे आवश्यक आहे. असे वाटत असेल तर, याबाबतीत मी स्वत: मा. जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करील. याबाबत तातडीने पावले उचलण्यात यावीत.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वॉर्डातील शाळेचीही हीच स्थिती आहे. शिक्षकाप्रमाणेच महापालिकेतील बरीच कर्मचारी निवडणूक कामासाठी पाठविण्यात आले आहेत. त्यांनाही परत बोलावून घेण्यात यावे. कोणत्याही विभागात नागरी सुविधाच्या सुचना देण्याबाबत गेले असता अधिकारी कुठे गेले असे विचारता मिटींगला गेले आहेत असे सांगण्यात येते. कार्यकारी अभियंता (ड्रे/वि) यांच्या विभागातील झोन ४ च्या ड्रेनेजच्या कामाच्या कनिष्ठ अभियंता यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागेवर दिड महिन्यापासून दुसरा अभियंता देण्यात आला नाही. त्यामुळे त्या भागातील ड्रेनेज कामे खोळंबून राहीली आहेत.

श्री. ठकुजी वाणी : माझ्या वॉर्डात ९०% ग्रामीण भाग येतो. या भागातील वस्त्यांच्या कच्च्या रस्त्यावर खड्डे झाले आहेत. त्याच प्रमाणे चिखलही झालेला आहे. लाईट नाहीत. त्यामूळे नागरिकांची गैरसोय होत आहे. या भागात किमान पावसाळयाच्या दिवसात तरी विकास कामे करावीत. या भागातील लाईटची दुरावस्था झालेली आहे. एक-दीड वर्षापासून या भागात लाईट बसविले नाहीत.

श्रीमती पार्वती मानकापे : या भागातच नाही तर गेल्या तीन वर्षापासुन मागणी करुन ही माझ या वार्डात एक गाडीही मुरुम टाकला नाही.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : आपण जी काम बजेटमध्ये घेतली आहेत. त्याबाबत अधिकाऱ्यांचा समन्वय नसल्याचे दिसून येते. माझ्या वार्डात काम सुरु झाली आहेत. त्या रस्त्याची कामे आहेत. पण रस्त्यांची कामे करण्यापुर्वी त्या भागातील ड्रेनेज काम आधी होणे गरजेचे आहे. त्यामुळे तयार झालेल्या रस्त्यावर खोदकाम केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. यासाठी प्रथम ड्रेनेज पाणी आणि त्यानंतर रस्ते असा समन्वय असायला पाहिजे. दुसरी सुचना अशी आहे की, शहरातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात येते. प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणात खर्च होत असतो. त्योएवजी सिंमेट कॉक्रीटचे रस्ते तयार देल्यास महापालिकेचे आर्थिक नुकसान थांबेल.

मा. सभापती : संबंधित अधिकारी यांनी याचा सर्व तो निर्णय घ्यावा. विषय पत्रिकेवर चर्चा करण्यात यावी.

श्री. नंदकुमार घोडेले : इतिवृत्ताचे पान क्र. ८ वर जाफरगेट येथील एक शाळा एम. एस. ई. बी. ला देण्याबाबत प्रशासकीय प्रस्ताव सभागृहात सादर करण्यात यावा व रेखांकनास तात्पुरती परवानगी दिली. ५० प्लॉट असतील ४५ लोकांना परवानगी दिली असेल आणि ५ प्लॉट वरच घर बांधण्याचे राहीले असेल तर असे किती ले आऊट आहेत. याचे आदेश दिले होते. याबाबतची माहिती सभागृहात येणे आवश्यक होते. तसेच सुरुवातीच्या बैठकीपासून विधी सल्लगारांचे पॅनल बदलण्याची मागणी करण्यात येत आहे. महापालिका मालकीची १४.००० स्क्वे फुट जागा वकीलाच्या चुकीमुळे श्री. भगवानदास काल्डा या बिल्डरच्या घशात गेली आहे. याबाबत स्थानिक वर्तमान पत्रातही बातमी प्रसिध्द झाली आहे. असे होत असेल तर, असे वकिल किती दिवस

आपल्याला ठेवावयाचे आहेत. त्या वकीलांवर आपण काय कार्यवाही केली. अशा भूखंडाचे संरक्षण महापालिकेची नैतिक जबाबदारी आहे. या बिल्डरने सिटी सर्वे कार्यालयात या भूखंडावर स्वत:चे नांव लावून घेतले आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा. नियमानुसार जो जबाबदार आहे त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

मा. आयुक्त : महापालिकेचे ठरावाद्वारे धोरण ठरविलेले असते. तर औरंगाबाद महापालिकेत आपण काय धोरण ठरविले आहे. धोरण ठरविणारा सक्षम कोण पध्दती काय आहे. याबाबत संबंधितांनी खुलासा करावा.

श्रीमती पार्वती मानकापे : हे प्रकरण माझ्या भागातीलच आहे. याबाबत मी दोन वेळा पत्र दिले. त्यावर आतापर्यत कार्यवाही झाली नाही. संबंधितावर (त्याच्यावर) कार्यवाही करावी. खुलासा व्हावा.

विधीसल्लागार : प्रकरणामुळे सिटी सर्वे ऑफिसला नोंद झाली अशी स्थिती नाही. न्यायप्रविष्ट प्रकरण हे सिटी सर्वेला त्या व्यक्तीची नोंद झाल्यानंतर त्या व्यक्तीने जे अनाधिकृत बांधकाम केले आहे. त्या कार्यवाहीच्या अनुषगांने प्रकरण न्याय, प्रविष्ट आहे. केवळ निर्णय झाला किंवा कसे झाला नाही म्हणून नोंद झाली अशी वस्तुस्थिती नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : आपण वकीलांचे प्रतिनिधी म्हणून बोलू नका. महापालिकेचे विधी सल्लागार म्हणून आपण वक्तव्य करावे. या प्रकरणात महापालिकेचे कोण वकील होते. आणि त्यांनी आपला स्टे दाखल केला किंवा नाही. या प्रकरणांची अंतर्भूत माहिती असेल तर बोला नाही. तर बोलू नका. शर्मा साहेब असतांना वकीलांचे पॅनल बाबत आदेश दिले होते.

विधी सल्लागार : वस्तुस्थिती काय आहे म्हणुन मी स्पष्ट निवेदन करत आहे. वृत्तपत्रातील बातमीनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयाच्या आधारे या व्यक्तीने महापालिकेची जी जागा ओती. त्यावर सिटी सर्वे कार्यालयात त्याच्या नावाची नोंद केली. आणि या नोंद हे प्रकरण चालु झाले आहे. आणि त्या नोंदीचे आधारे त्या जागेवर अनाधिकृत बांधकाम केले आणि ते अनाधिकृत बांधकाम पाडु नये म्हणून प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आहे. आणि त्या अनुषंगाने कार्यवाही चालु झाली. न्यायप्रविष्ट प्रकरणात पुरेशे कागदपत्र न मिळाल्याने स्टे दाखल आला नाही ही वस्तुस्थिती आहे. या प्रकरणात तात्पुरता स्टेट स्को झालेला आहे. आत या प्रकरणासंबंधीची सर्व कागदपत्रे प्राप्त झाली आहेत. त्या आधारे न्यायालयात स्टे दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात स्टेटस्को रद्द बातल करण्याबाबत मी स्वत: लक्ष देवून आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे सिटी सर्वेला रद्द करण्याची कार्यवाी अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे अपील करण्यात येईल.

श्रीमती पार्वती मानकापे : या प्रकरणात पंचनामा केव्हा केला. कोणत्या तारखेला केला याची माहिती देण्यात यावी. ही जागा महापालिकेची असतांना या गृहास्थाने अपल्या लोकांना हाताशी धरुन सिटी सर्वे ऑफीसला नोंद केली. त्या प्रकरणात त्यांना अटकही झाली होती. आताही त्या जागेवर बांधकाम चालू आहे. याबाबत सविस्तर खुलास देण्यात यावा. मी याबाबत पत्रही दिलेले आहे. त्याचाही खुलासा झाला नाही.

श्री. संजय शिरसाठ : मालमत्ता विभाग/नगररचना विभाग यांच्याकडुन ऐकमेकांना माहिती दिली जात नाही. मा. उच्च न्यायालयात ५७ संचिका बाबतचे प्रकरण आले

होते. या प्रकरणात या विभागाकडुन काही संचिका गहाळ झाल्याचे सांगण्यात आले आहे. नगररचना विभागाच्या गोधंळावर नागरीक सरळ कोर्टात जातात. या भुखंड प्रकरणांचे वकील यांना मी भेटलो. विधी विभागाकडुन कागदपत्रे प्राप्त न झाल्याने स्टे दाखल झाला नाही अशी माहिती त्यांच्याकडुन मिळाली. आणि त्यामुळे ती जागा त्यांच्या नांवावर झ ाली. त्याबाबतची बातमीही पेपरमध्ये आली. तरी त्या बाबीचे गांभीर्य वाटत नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत आधी त्यांच्याकडे येते. मग विधी विभागाकडे येते. पण नगररचना/मालमत्ता विभागाकडुन कागदपत्र मिळत नाही. आणि प्रकरणांत से दाखल केला जात नाही. एखादया जागेचा मालक ज्या कोणत्या व्यक्तीला व्हावयाचे असेल ती व्यक्ती महापालिकेच्या वकीलाकडे सहजासहजी अप्रोच्च होवू शकते. आणि त्यानंतर हे सगळे घोटाळे होतात. महापालिकेचे वकिल जे करतात ते या कार्यालयाच्या सर्व अधिकाऱ्यांना हाताशी धरुन करतात. असा माझे स्पष्टपणे मत आहे. माझ्या वार्डात जवळपास ८० लाख रुपये किंमतीची महापालिकेची जागा आहे एका महिलेने स्टेटस्को घेतला तो ही आपल्या चुकीमुळेच आज बाबीला वर्ष झाले आहे. त्यातही हाच वकील आहे. या प्रकरामुळे आपण महापालिकेच्या जागा दुसऱ्यांच्या नांवे करु लागलो आहोत. असचं एक प्रकरण स. सदस्य श्री. भरत लकडे यांनीही एक प्रकरण उचललं होत. त्यातही हाच प्रकार आहे. एक साधं अतिक्रमण जरी पाडावयाचे असेल तर संचिका जवळपास पाच ठिकाणी जाते. ती जावू नये अशी माझी भावना नाही. पण किती वेळात गेली पाहिजे याचा विचार झाला पाहिजे. महापालिकेचे वकिल पॅनल बदलावे म्हणून मी दहा वेळा पत्र दिले आहे. आपण पॅनलवर जे वकीला नेमलेले आहेत ते वकील नसून दलाली करण्याची काम करतात. म्हणून हे पॅनल बदलावे अशी मागणी करु त्यावर कोणीही काळजीही कार्यवाही करीत नाही. वृत्तपत्रांनी ती बातमी द्यावयाची. आपण ते पाहायचे आणि शांत बसावयाचे अशी परिस्थिती सध्या आहे. अनेक वेळा सदस्य जेव्हा चिडुन बोलतात. अतिक्रमण पाडायला जातात तेव्हा काही नगरसेवक अधिकाऱ्यांना अडवतात अशी आमची बातमी आहे. असे एक पत्रकार मागे म्हणाले या प्रकरणात से दाखल न करणाऱ्या त्या वकीलावरही आपणाला कार्यवाही करावी लागेल. महापालिका पॅनलवर असलेले वकील गेल्या १०-१५ वर्षापासून आहेत. या वकीलाच्या संदर्भाने नागरिकांच्या अनेक तक्रारीही आल्या आहेत. तरी पण आपण काहीही करत नाही. फार कमी प्रमाणात आपल्याला यश आले आहे. माझ्या वार्डातील ८० लाखाची जमीन जाणार आहे. हे सिध्द होणार आहे. तरी पण त्यात काही फरेबदल होत नाही. महापालिकेच्या ज्या जाग असतील त्यासाठी किमान दोन अधिकाऱ्यांची नेमणूक करुन अदयावत माहीती तयार करावी या प्रकरणाच्या भ्रष्टाचारात जो कोणी संबंधित अधिकारी असेल त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे. वकीलाचे पॅनल बदल्याची जी कार्यवाही असेल ती करुन हे पॅनल बदलण्याची कार्यवाही करण्यात यावी. आणि चांगल्या नामवंत वकीलांचे फॉल तयार करण्यात यावे. या पॅनलवर कोणते वकील घ्यावयाचे ही जबाबदारी प्रशासनाची आहे. विधी सल्लागार पदाचा प्रभारी

पदभार श्री. शिरसाठ ह्यांच्यावर आहे. ह्या दोन्हीवर ताबडतोब निर्णय घेण्यात यावा.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : माझ्या वॉर्डात २० कोटीची ओपनस्पेसची मालमत्ता आहे. त्यावर मालमत्ता अधिकारी, नगररचना विभाग यांच्याकडून कुठलीही कार्यवाही झालेली नाही. एखाद्या दिवशी ती जागाही जाईल. नाथसुपर मार्केटच्या मागील जागेचे जे प्रकरण आहे. त्याबबत मी १००० च्या बॉंडपेपरवर लिहून देण्यास तयार आहे. तरीही २० कोटी कसे येणार याबाबत आजपर्यंत विचार केला नाही याबाबत मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा द्यावा. ही जागा आपली नसेल तर संस्थेला दयावी.

श्रीमती पार्वती मानकापे : महापालिकेची जागा कोठे कोठे आहे. यात कोठे-कोठे घोटाळे झाले आहेत. त्याबाबत कार्यवाही करा आणि सर्व माहिती पूढील बैठकीत देण्यात यावी. यात महापालिकेचे नुकसान होत आहे.

मा. सभापती : याबाबत पुढील बैठकीत संपुर्ण माहितीचा अहवाल मा. आयुक्त यांनी द्यावा. वकिलांचे पॅनल ताबडतोब बदलण्यात यावे. श्री. काल्डा यांच्या भुखंड प्रकरणात मा. आयुक्तांनी चौकशी करावी. विषय क्र. १ मंजूर करण्यात येतो.

ठराव :

दिनांक ०९-०७-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. १२ :

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मिळकत सर्व्हे नंबर २३/६ जयसिंगपूरा भागशः क्षेत्र सहा एकर दोन मुंढे मोजणी नकाशा नुसार क्षेत्र दोन हेक्टर तीस-आर (२३००० चौ. मी.) या मिळकतीवर अर्जदार दि. फ्रांसीस कॉर्पोरेशन, रेशन कॅथालिक चर्चा करीता विद्यमान कादर जार्ज (ट्रस्टी) यांनी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक १६२/१७/२००२ नुसार बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला असून, या प्रस्तावामध्ये मतिमंद मुलांसाठीची शाळा व्यावसायिक शिक्षण केंद्र व कर्मचारी निवासस्थान या इमारतीसाठी बांधकाम प्रस्तावित केले असून, विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक खुली जागा रस्त्याचे नियोजन ही केलेले आहे. सद्यस्थितीत या मिळकतीमध्ये मतिमंद मुलांची शाळा अस्तिवत असणाऱ्या जुन्या इमारतीमध्ये भरते. ती पाडावयाची प्रस्तावित केले आहे.

प्रस्तावा अंतर्गत मिळकतीस अधिकृत पोच रस्ता उपलब्ध नाही करीता अदयाप पावेतो संबंधित अर्जदारास विकास परवानगी अनुज्ञेय केली नाही. तथापी या प्रकरणी अर्जदार यांना प्रस्तावित मिळकतीच्या उत्तरेस असणाऱ्या व अनाधिकृतरित्या बसलेल्या अमाननगर, न्यु नंदनवन कॉलनी ह्या वसाहतीमधून पोच रस्ता उपलब्ध असून, सदरील ४.५० मीटर रुंद पोच रस्ता अर्जदार हे बऱ्याच वर्षापासून वापरत आहेत. व या रस्त्यालगत असणाऱ्या रहिवाश्यांनी गुंठेवारी अधिनियम अंतर्गत त्यांची बांधकामे नियमीत करण्यासाठी महानगरपालिकेकडे अर्जही केले आहेत. सदरील विद्यमान रस्ता हा पोच रस्ता गृहीत धरुन विकास परवानगी द्यावी. अशी अर्जदाराची मागणी आहे. तसेच प्रस्तावाअंतर्गत विकासाची कामे आम्ही स्वखर्चाने करुन व त्याचे कायमस्वरुपी देखभाल दुरुस्तीची आम्हीच करु

करीता विकास खर्च आकारु नयेत अशी अर्जदाराची विनंती आहे. या प्रकरणी अर्जदाराकडुन हमी पत्र घेता येऊ शकेल तरी,

०१. उक्त नमुद अनाधिकृत वसाहतीमधील विद्यमान पोच रस्ता गृहीत धरुन विकास परवानगी अनुज्ञेय करणे.

०२. अंतर्गत विकास कामासंबंधी अर्जदाराकडुन हमी पत्र घेवुन अर्जदारास विकास परवानगी अनुज्ञेय करणे.

या दोन गुठयांवरील निर्णयासाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

संवाद :

श्री. संजय शिरसाठ : नगररचना विभागाने हा प्रस्ताव स्थायी समिती समोर का आणला? याचा खुलासा व्हावा. त्याबाबत काय नियम आहेत.

सहा. संचालक न. र. : विषय क्र. २ हा बांधकाम परवानगीच आहे. या मिळकतीस अप्रोच रोड नाही. जो रस्ता आहे. तो ८.५ मीटर रुंदीचा आहे. तो रस्ता अनाधिकृत वसाहतीचा असल्याने आपण त्याला अधिकृत धरत नाही. त्यासाठी डी. सी. रु. १३.३.८ प्रमाणे हा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवला आहे.

श्री. संजय शिरसाठ : अनाधिकृत जी वसाहत आहे. त्यातुन ८.५ मीटरचा रस्ता चालला आहे. हा कोणाच्या मालकीच्या आहे. का वहिवाट म्हणून आहे. जी अनाधिकृत वसाहत आहे. त्याचा मुळ मालक कोणीतरी असेल आणित्यांनी हरकत घेवून हा रस्ता बंद पाडला तर त्याला परवानगी कशी देणार? गुंठेवारी नियमाप्रमाणे तेथील लोकांनी आपल्याकडे अर्ज देखील केलेले आहेत. याबाबी अंतिम होणे बाकी आहे. १२.१५ फुट रुंदीच्या रस्त्यावर एवढी मोठी बांधकाम परवानगी देवून अडचणीत येणार आहेत.

सहा. संचालक नगररचना : ही जी संस्था आहे. ती मागील कित्येक वर्षापासून त्या जागेवर विद्यमान संस्था आहे. आजही या संस्थेचा वापर तेथुनच आहे म्हणुन हा प्रस्ताव ठेवला आहे.

श्री. संजय शिरसाठ : आजही ही संस्था आहे त्या संस्थेत पुढे विद्यार्थी संख्या वाढली तर या १५ फुटाच्या रस्त्यावर जाणार आहेत का? वाहनाची वर्दळ वाढणार आहे. गुंठेवारी योजनेत अनाधिकृत वसाहती अधिकृत झाली तर सर्व त्रास कोणाला होणार? आहे हा विषय स्थगित ठेवण्यात यावा.

श्री. नंदकुमार घोडेले, श्रीमती पार्वती मानकापे : हा विषय स्थगित देवुन स्थळा पाहणी करण्यात यावी.

मा. सभापती : विषय क्र. १२ स्थगित ठेवून स्थळ पाहणी करण्यात यावी.

ठराव :

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवुन स्थळ पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. १३ :

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्र. २२०/१ मिळकत हर्सुल, जटवाडा रोडवर असून, या मिळकतीमधील अर्ध्या भागावर

रेखांकन मंजूर झालेला असून, या रेखांकनास अंतिम मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे त्या भागाचे रस्ते व खुली जागा मनपास हस्तांतरीत झाले आहेत. आता अर्जदार क्र. (०१) श्री. अशोक राधाकृष्ण भतकरे (०२) पद्मा विश्वासराव धनवट (०३ पुष्पा विलासराव साळुंके यांनी सर्वे नं. २२०/१ या मिळकतीवरील उर्वरीत भागावर रेखांकन प्रस्ताव दाखल केला होता. त्यास महानगरपालिकेने तत्वतः मान्यता दिलेली आहे. या रेखांकनातुन १२ मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता जात असून, अर्जदारास १००% जमीन विकास शुल्क भरण्यासाठी पत्र जा. क्र./मनपा/नरवी/१००६/०२ दिनांक ३०-०४-२००२ ला दिले असता त्यांनी १००% जमीन विकास शुल्क रक्कम रु. १,६४,११०/-रक्कम चलन क्र. ००५१०७ दि. ०१-०६-२००२ अन्वये महानगरपालिकेत जमा केलेले आहेत. तथापी विकास खर्चाचे (बेटंरमेंट चार्जेस) च्या बाबतीत अर्जदार यांनी १२ मीटर विकास योजना रस्त्याचे मोबल्यातून विकास खर्च वळती करुन घ्यावा अशी विनंती केली होती. त्या अनुषंगाने सदरील १२ मीटर रुंद विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्र २७९६ चौ. मी. असून, त्याचा मोबदला सन २००३ चे शिघ्र गणकानुसार रु. १००० प्रति चौमी दराने खुल्या जागेसाठी मोबदला रक्कम रु. ८,७७,२८०/- होते.

अर्जदारास वरील रेखांकनासाठी रु. ११,४८,९५२/- एवढा विकास खर्च भरणे आवश्यक आहे. वरील मोबदल रक्कम रु. ८,७७,२८०/- ही विकास खर्चाचे रक्कमेत वळती करुन समायोजीत करणेची व उर्वरीत विकास खर्च (रु. ११,४८,९५२ रु. ८,७७,२८०, रु. २,७१,६७२/- अर्जदाराकडुन भरुन घेण्याची मान्यता घेण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७७ अन्वये मा. स्थ्ज्ञायी समिती समोर ठेवण्यासाठी मा. आयुक्तांनी मंजूरी दिली आहे.

मिळकत धारकाने विकास योजना १२ मीटर (८० फुट) रुंद रस्त्याने बाधीत क्षेत्र २७९६ चौ. मी. हे महानगरपालिकेस नोंदणीकृत हक्क सोडपत्र (रिंलीक्कमीटडिड) ने हस्तांतीत करुन देणे व महानगरपालिकेच्या नाले ७/१२ वर नोंद करुन देणे आवश्यक राहील.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री. नंदकुमार घोडेले : बेटरमेंट चार्जेस कोणत्या दराने आकारण्यात झाले आहे. ते वाढीव दराने आहेत का?

श्री. संजय शिरसाठ : सभागृहात चर्चा चालु असतांना नगररचना विभागातर्फे अभिन्यासाच्या विकासासाठी तातुपरती अथवा अंतिम परवानगी देण्याची प्रकरणे नाहरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय मंजूरी देता येत नाही. हे वक्तव्य मा. आयुक्त यांनी केले आहे. माझ्याकडे एका गट नंबरची माहिती आहे. ज्याचा स्थायी समितीशी संबंध येतो. या २० एकरच्या ले-आऊटला कोणत्याही प्रकारे नाहरकत प्रमाणपत्र न घेता मंजूरी देण्यात आली आहे. त्याबाबतच अहवाल पुढील बैठकीत देण्यात यावा. हा विषय स्थगित ठेवण्यात यावा.

सहा. संचालक न. र. : सर्वे नं. २२० मधील अर्ध्या भागाचे ले-आऊट मंजूर आहे. आणि अर्ध्या भागाच्या ले-आऊटला आपण तत्वतः मान्यता दिलेली आहे. उरलेल्या अर्ध्या भागात मान्यतेसाठी पत्र दिल्यानंतर त्याच्या जमीनीतून १२ मीटरचे रस्ते जात आहेत. त्या मोबदल्याच्या रक्कमेतून बेटंरमेंट चार्जेसच रक्कम ॲडजस्ट करा असा प्रस्ताव आहे. ह्या प्रकरणात नविन दराने बेंटरमेंट चार्जेसचे लावून २,७२,०००/- त्यांच्याकडुन भरुन घ्यायचे आहेत. त्यानंतर अंतीम ले-आऊटची मंजूरी द्यायची आहे.

श्री. संजय शिरसाठ : या प्रस्तावात चार गट नंबरचा समावेश गट नं. ६८, ६९, ७० व ७११ ईटखेडा नगररचना विभागाने त्यांना सोयीस्कर असा प्रस्ताव आणलेला आहे. २० एकरचा जो ले-आऊट मंजूर करण्यात आला आहे म्हणून, हे सर्व विषय स्थगित ठेवावेत आणि पुढच्या मिटींगमध्ये येवू द्या त्यावेळी अधिकृत माहिती आम्ही देवून.

मा. सभापती : विषय क्र. १३ स्थगित ठेवण्यात येवून पुढील बैठकीत माहितीसह ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ठराव :

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवुन पुढील बैठकीत माहितीसह ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. १४ :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जा. क्र./सी.आर.१४७/औरंगाबाद/२००३/१३६८ दिनांक १२-०६-२००३ नुसार आरोपी लोकसेवक श्री. कादरी महंमद असलम अब्दुल लतीफ, स्वच्छता निरिक्षक महनगरपालिका औरंगाबाद (सध्या निलंबीत) यांचे विरुध्दच्या लाचलुचपतीच्या सापळा केस प्रकरणी त्यांचे विरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. पत्रासोबत सदरच्या गुन्हा प्रकरणांचा तपासाचे संपूर्ण कागदपत्र संच त्यांनी पाठविलेला आहे.

सर्व कागदपत्रे बारकाईने तपासली आहे. संबंधित श्री. कादरी महंमद असलम अब्दुल लतीफ स्वच्छता निरिक्षक, (सध्या निलंबीत) यांचे विरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी पुरेसा पुरावा दिसुन येत आहे. सबब प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जा. क्र./सी.आर.१४७/औरंगाबाद/२००३/१३६८ दिनांक १२-०६-२००३ सोबतच्या कागदपत्रावरुन लोकसेवक श्री. कादरी महंमद असलम अब्दुल लतीफ, स्वच्छता निरिक्षक (निलंबीत) यांच्या विरुध्द लाचलुचपतीच्या सापळा केस प्रकरणाच्यांविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. १५ :

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको व शहराच्या विविध प्रभागामध्ये स. नगरसेवक स्वेच्छानिधीतुन मागणीप्रमाणे विंधन विहीर खोदुन हातपंप बसविण्याच्या कामासाठी एक वर्षासाठी दर निश्चित करणे आहे.

या कामसाठी निविदा सुचना देवून निविदा मागविण्यात आल्यास एकुण चार निविदा विक्री झाल्या व चार प्राप्त झाल्या. झालेले दर खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.		अंदाजपत्रकीय दरापेक्षा
१.	मे. तिरुपती बोअरवेल्स, नाशिक	१५% कमी
२.	मे. अनुराग बोअरवेल्स, औरंगाबाद	०१% कमी
३.	मे. यश बोअरवेल्स औरंगाबाद	०१% कमी
४.	मे. उपासना बोअरवेल्स, औरंगाबाद	०१% कमी

प्राप्त निविदामध्ये तुलनात्मकदृष्ट्या मे. तिरुपती बोअरवेल्स नाशिक (ओझर) यांचे दर सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी असे आहेत. सदर एजन्सी स्थानिक नसल्यामूळे खालील अटीवर त्यांचे दर मंजूर करणे योग्य होईल.

१. जसे स्वेच्छानिधीमधून हातपंपाचे प्रस्ताव मंजूर होतील तसतसे एजन्सीजला लेखी कळविण्यात येईल. लेखी कळविण्यात आल्यानंतर सात दिवसाच्या आत त्यांनी काम पुर्ण केले पाहिजे. अन्यथा हेच काम इतर उपलब्ध एजन्सीजकडुन Risk and cost Basis वर करुन देण्यात येईल.

२. संबंधित एजन्सीजने औरंगाबाद येथे संपर्क कार्यालय अथवा त्यांचा प्रतिनिधी ठेवला पाहिजे.

वरील अटीच्या अधिन राहुन सर्वात कमीच्या दरास म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

संवाद :

श्री. नंदकुमार घोडले : प्रस्तावातील काम उन्हाळयाचे दिवस लक्षात घेवून करण्याचे ठरविले होते. या कामाची एजन्सी स्थानिक नाही. प्रस्ताव आता पावसाळयात सुरु झ ाला आहे. स्वेच्छानिधीतूनही कामे करावयाची आहेत. प्रस्ताव मंजूर करण्यात यावा. पण त्यात एजन्सीला सात दिवसांचा कालावधी देण्यात यावा आणि या सात दिवसात संबंधित एजन्सीने काम सुरु केले नाहीतर रिस्ट ॲण्ड फॉस्ट बेसिसवर हे दुसऱ्या एजन्सीकडून करुन घेण्यात यावे. या एजन्सीजचा भागाचा अनुभव चांगला नाही. या एजन्सीने टेंडर भरले असल्यामूळे या एजन्सीचा मागचा अनुभव चांगला नाही. या एजन्सीने टेंडर भरले असल्यामुळे या एजन्सीला काम दयावे लागले. ही बाजु सत्य असली तरी सात दिवसंचा वेळ देण्यात यावा. आणि एजन्सीने काम केले नाही तर रिस्ट ॲण्ड कॉस्ट बेसिस वर दुसऱ्या एजन्सीकडून काम करुन घेण्यात यावे. याबाबत मा. आयुक्त यांना अधिकार देण्यात यावे. असे रुलींग दयावे.

श्रीमती मानकापे पार्वती : या कामाचे दर निश्चित करण्यात यावेत. आणि हे काम शहरातील एजन्सीकडुन करुन घेण्यात यावे. नाशिक भागात एजन्सीला काम घेण्यात येवू नये. मागील वर्षी या एजन्सीने सर्व कामे बोगस केली आहेत.

मा. आयुक्त : राज्य स्तरावर कार्यवाही होते. २२० प्रती मीटर हा कमाल दर राज्य स्तरावर ठरविण्यात आला आहे. यात वाटाघाटी करुन स्थायी समिती कमी दर निश्चित करुन शकतात. अशा राज्य शासनाच्या स्थायी सूचना आहेत. या सुचना समोर देवुन आपण निविदा मागविण्यासाठी कार्यवाही केलेली आहे. या कामासाठी कमाल दरापेक्षा हे दर इतक्या टक्क्यांनी कमी झाले आहेत. यात १५% आणि १% म्हणजे यात जवळपास १४% चा फरक आहे. ही निविदा नागकारावयाची असेल तर निविदेतील अटी व याचा विचार करुन दयावा असे मला सभागृहाला सुचवावेसे वाटते. चालु आर्थिक वर्षात आपण किती हातपंप खोदणार आहोत. याची माहिती टिप्पणीत नाही ती सभागृहाला सुचवावेसे वाटते. चालु आर्थिक वर्षात आपण किती हातपंप खोदणार आहोत याची माहिती टिप्पणीत नाही ती सभागृहाला अस वाटते. चालु आर्थिक वर्षात आपण किती हातपंप खोदणार आहोत याची माहिती टिप्पणीत नाही ती सभागृहाला असणे आवश्यक आहे.

काय. अभियंता (पा. पु.) : संबंधित नगरसेवकाचे जसजसे प्रस्ताव येतील त्याची संख्या सध्या माझ्या जवळ नाही तरी पण ६० हातपंप गृहीत धरुन दरपत्रके मागविण्यात आली आहेत. सध्या ३०-३५ प्रस्ताव आमच्याकडे प्रलंबित आहेत.

श्री. संजय शिरसाठ : हातपंप खोदण्याचे स्टॅफर्ड दर निश्चित करण्यत यावेत. कोणत्याही एजन्सीकडुन करा. त्यात ९० ऐवजी १०० होतील त्यानंतर प्रशासकीय माध्यमावर काम करण्यात यावे दरास मान्यता घ्यावी.

कार्य. अभियंता (पा.पु.) : हातपंप खोदण्याच्या कामासाठी ५५% कमी दराची निविदा आली आहे. इतर एजन्सीचे दर त्या तुलनेत फार कमी आहेत. स्थानिक एजन्सी बरोबर चर्चा झाली आहे. या दरात इतर कोणतीही एजन्सी काम करण्यात तयार नाही. प्राप्त निविदा दरामध्ये महापालिकेचा आर्थिक फायदा होत असून, रिक्त ॲण्ड कॉस्टची अट टाकण्यात आली आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन ही कामे करावयाची आहेत या एजन्साचे शेवटचे काही बील असेल ते थांबवून ठेवण्यात यावे म्हणजे नंतर काही अडचण यावयाला नको.

मा. आयुक्त : सर्वसाधारणपणे जिल्हा परिषद राज्यात अशी कामे करतात. १५%, २०% कमी दराने सर्व राज्यात कामे चालू आहे.

मा. सभापती : विषय क्र. २५ हा संबंधित एजन्सीला कार्यादेश मिळाल्यापासून सात दिवसाचे आंत प्रत्यक्ष मशिन साईटवर येवून ड्रींलीग सुरु सुरु झाले नाही तर दुसऱ्या एजन्सीकडुन काम करुन घेण्यात यावे. या अटीवर मंजूर करण्यात येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगरसेवक स्वेच्छानिधीतुन शहरात आणि सिडको भागाच्या विविध प्रभागामध्ये विंधन विहीर खोदून त्यावर हातपंप बसविण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकाच दरापेक्षा १५% कमी दराची मे. तिरुपती बोअरवेल्स नाशिक यांची निविदा खालील अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. संबंधित एजन्सीला कार्यादेश मिळाल्यापासून सात दिवसांचे आत प्रत्यक्ष मशिन साईटवर सात दिवसांचे आत प्रत्यक्ष मशिन साईटवर येवून ड्रीलींग सुरु झाले नाही तर दुसऱ्या एजन्सीकडुन रिक्स ॲण्ड कॉस्ट बेसिस काम करुन घेण्यात येईल.

२. संबंधित एजन्सीजने औरंगाबाद येथे संपर्क कार्यालय अथवा त्यांचा प्रतिनिधी ठेवला पाहिजे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. १६ :

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा मनपा यांनी सन २००३-०४ सालाकरीता औरंगाबाद पाणीपुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा करीता वार्षिक ब्लिंचींग पावडर पुरवठयासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकुण चार निविदा प्राप्त झाल्या होत्या. या निविदा धारकांपैकी मे. फोनिक्स केमीकल्स औरंगाबाद यांचा दर रुपये ११.८८०.०० प्रति मे. टन असा प्राप्त असून, पुरवठा धारकांनी रुपये ११,८३०.०० प्रती मे. टन असा दर स्विकृत केला आहे. त्यास मा. आयुक्त यांनी (परी.४७) अन्वये मान्यता दिली आहे.

सन २००३-०४ वर्षाकरीता एकुण १५० मे. टन ब्लिंचीग पावडरचा खेरदीचा प्रस्ताव असून, सध्या उपलब्धसाठा संपत आला आहे. पाणी पुरवठा संदर्भातील तातडीची गरज

लक्षात घेता प्रस्तावास त्वरीत मान्यता मिळावी. करीता प्रस्ताव मंजूरीसाठी स्थायी समिती समोर सादर.

संवाद :

श्री. संजय शिरसाठ : पाणीपुरवठा विभागासाठी मागील वर्षी जी ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यात आली होती त्याचा दर काय होता.

कार्यकारी अभियंता (पापु) : मागील वर्षी मे. टन रु. ९,१५०/- या दराने ब्लिंचींग पावडर खरेदी करण्यात आली आहे.

श्री. संजय शिरसाठ : मागील वर्षाचे दर आणि निविदेतील दर यात एका वर्षात एवढा फरक कसा काय झाला? त्याचे कारण काय आहे. आपण अशी बरीच कामे केलेली आहेत ज्यात ३५% कमी दर असतात त्याच दराने दुसऱ्या एजन्सीला काम दिले जाते. आज हे लाखो रुपयाचे काम आहे. यातील दरात २,७०० रुपये दराचा फरक होतो. या मागील कारण काय झाले?

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : सध्या ब्लिचिंग पावडरचासाठा १५-२० दिवस पुरेल इतका शिल्लक आहे. ब्लिचिंग पावडरची गरज आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : ब्लिचिंग पावडरची गरज आहे आणि हा जनतेचा प्रश्न आहे म्हणून या प्रस्तावाला मान्यता देण्यात यावी.

श्री. संजय शिरसाठ : ब्लिचिंग पावडरची अत्यत गरज आहे हे जरी योग्य असले तरी सध्या किती साठा शिल्लक आहे आणि उपलब्ध असलेला साठा किती दिवस पुरेल यात महापालिकेचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे म्हणून १५ दिवस पुरेल एवढा साठा आपल्याकडे उपलब्ध आहे. आणि त्यात आणखी तातडीने लागणारी २ लाख रुपयापर्यंतची ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याबाबतचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात यावेत आणि ब्लिचिंग पावडरच्या दरात जो एवढा मोठा फरक आला आहे. त्यासाठी फेर निविदा मागविण्यात याव्यात.

श्रीमती शाहीन जफर :आपल्याकडे एवढया मोठया प्रमाणावर ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यात येत असतांना शहरातील काही भागात विशेषतः मी ज्या भागात राहते त्या ठिकाणी गढुळ पाणी येते हे पाणी दहावेळा गाळुन जावे लागते. पण कार्यकारी अभियंता हे गढुळ पाणी येते मानण्यास तयार नाहीत.

श्री. संजय शिरसाठ : सामान्य नागरिकांच्या जीवनाशी आपण खेळु शकत नाही. पाण्यासारख्या महत्वाच्या विषयावर ब्लिचिंग पावडर टाकावयाची आहे. आपल्याकडे २० दिवस पुरेल एवढा साठा शिल्लक आहे. आणखी आवश्यकता असेल तर, २ लाखापर्यंतची ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यात यावे. यावर प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा. तरी पण निविदा दराने ब्लिचिंग पावडर खरेदीचा निर्णय घ्यावयाचा असेल तर तो सभापतींनी त्याच्या स्तरावर घ्यावा. नसता फेर निविदा मागविण्यात याव्यात.

श्रीमती पार्वती मानकापे : आपल्याकडे २० दिवसांचा कोठा आहे. पण पुढची मिटींग होईपर्यंत १५ दिवस होतात आणि मंजूरी मिळण्यास पुन्हा एक महिना जातो. याचा विचार करता या प्रस्तावाला मंजूरी देण्यात यावी. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आपणाला हे करणे गरजेचे आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : जनावरांच्या खाद्याबाबतची निविदा आपण परत पाठविली आहे. यात कुठल्याही प्रकारच्या वाटाघाटी झाल्याचे दिसत नाही. मा. आयुक्तांना वाटाघाटी करु दया.

मा. सभापती : पावसाळयाचे दिवस असल्यामूळे आपल्याला आवश्यकता आहे.

श्री. संजय शिरसाठ : महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे दोन्ही ठराव प्र. मे. टन २७०० रुपयाचा फरक आहे. महापालिकेचे हित पाहणे गरजेचे आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : महापालिकेची पाण्याची परिस्थिती नाजुक आहे. जायकवाडी धरणात पाणीसाठा कमी आहे. यासाठी ब्लिचिंग पावडर असणे गरजेचे आहे. म्हणून मंजूरी देण्यात यावी.

श्री. माणिक साळवे : महापालिकेचे आर्थिक हित पाहता यात फेर निविदा काढण्यात यावी. यातील दरामध्ये २७०० प्रति मे. टन दराची तफावत आहे. स्पर्धेत दुसरे टेंडर आले तर महापालिकेचा लाखो रुपयाचा फायदा होईल.

श्री. कैसरखान, बाद्रोद्दीनखान : फेर निविदा काढण्यात याव्यात. शॉर्ट टेंडर नोटीस देण्यात यावी.

मा. सभापती : सदरील विषय स्थगित करण्यात येतो. हा विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. आवश्यक असलेली ब्लिचिंग पावडर या एजन्सीकडुन खरेदी करण्यात यावी.

श्री. नंदकुमार घोडेले, श्री. संजय शिरसाठ : यापुर्वी ज्या एजन्सीकडुन ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यात आली त्या एजन्सीकडुन खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात यावा. या एजन्सीकडुन ब्लिचिंग पावडर खरेदीचा चुकीचा निर्णय घेण्यात येवु नये. ज्याच्याशी वाटाघाटी करता येतील अशा कोणत्याही एजन्सीकडुन खरेदी करण्याची मंजूरी देण्यात यावी. आठ दिवसांत शॉर्ट टेंडर नोटीस काढता येते. फेर निविदा काढण्यात याव्यात. अशी सर्व सदस्यांची मागणी आहे.

मा. सभापती : हा विषय स्थगित ठेवून पुढील बैठकीत सविस्तर माहिती घेण्यात येईल. तोपर्यंत जितका पावडर लागेल तो या एजन्सीकडुन घेण्यात यावा.

श्रीमती पार्वती मानकापे : सर्व माहिती घेण्यात यावी आणि पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा. आता आपण मंजुरी देत नाही.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता (पापु) सविस्तर माहिती देतील. सर्व सभासदांनी खाली बसून घ्यावे.

श्री. संजय शिरसाठ : मागील खरेदीच्या वेळी आलेला दर किती खरेदी करण्यात आला आणि पावसाळयासाठी किती आवश्यकता आहे आणि दरातील फरक किती याची माहिती कार्यकारी अभियंता (पापु) यांनी दयावी.

कार्य. अभियंता (पा.पु.) : दिनांक ४ एप्रिलला या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. शेवट २५ एप्रिल या तारखेपर्यंत सहा निविदा विकण्यात आल्या होत्या त्यापैकी चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

०१	एस. व्हि. सर्विसेस, औरंगाबाद	रु. १६,६००	प्रति मे. टन
०२	शिव केमिकल्स शेवगांव	रु. १२,६००	-//-
०३	कोनिक्स केमिकल औरंगाबाद	रु. ११,८८०	-//-

०४.	निधी असोसिएट औरंगाबाद	रु. १७,४००/-	-//-

मा. सभापती : बोअवेलच्या प्रस्तावात जसे सविस्तर दर दिलेले आहेत. तसे या प्रस्तावात दिलेले नाही. एजन्सीचे नांवेही दिलेली नाही.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : आमची चूक झाली. यानंतर सविस्तर माहिती ठेवण्यात येत जाईल.

श्री. संजय शिरसाठ : फोनिक्स एजन्सी यांनी जे दर दिलेले आहेत ते अत्यंत चुकीचे आहेत. यात एजन्सी मॅनेज झाल्याचे दिसते. एका वर्षात १००% वाढ कशी काय? जनतेचा हिताचा विचार करण्यात यावा.

श्री. माणिक साळवे : मागील वर्षाच्या तुलनेत दर मे. टनला २७०० प्रमाणे १५० मे. टन पावडर खरेदी केले तर महापालिकेचे ८ लाख ५० हजाराचे नुकसान घेणार आहे. हे नुकसान आपण कशासाठी सहन करावयाचे. त्यासाठी फेर निविदा काढण्यात याव्यात. नसता मतदान घेण्यात यावे.

श्री. कैसरखान बद्रोद्दीनखान : फेर निविदा कढण्यात याव्यात नसता मतदान घेण्यात यावे.

श्रीमती शाहीन जफर : जर बीफसाठी फेरनिविदा काढण्यात आल्या तर या कामासाठी फेर निविदा का काढण्यात येत नाही.

मा. सभापती : सर्व सदस्याच्या भावना लक्षात घेवून फेर निविदा काढण्यात याव्यात.

ठराव :

प्रस्तुत प्रस्तावात सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे व सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रस्तावित कामासाठी फेर निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. १७ :

अतिरिक्त शहर अभियंता मनपा औरंगाबाद यांनी प्रसताव सादर केला आहे की, जायकवाडी पाणी पुरवठा (यांत्रिकी) या विभागाची सध्याची जीप क्र. एम. एच. २० ई. ८०७८ ही २.५ लाख किलोमीटर पेक्षा जास्त चाललेली असून, १० वर्षापेक्षा जास्त कमी झ ाली आहे व शासनाचे धोरणानुसार सदरील जीप निरुपयोगी करुन त्याजागी नवीन जीप खरेदी करणे जरुरी आहे. सदरील वाहन खरेदी करण्यासाठी खालील प्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

अ. क्र.	एजन्सीचे नांव	कंपनी व मॉडेल	किंमत
०१	मे. रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद	बोलेरो कॅपर जीप महिंद्रा	४,०१,०००.००
०२	मे. सतिश मोटर्स, प्रा. लि. औरंगाबाद	टाटा २०० डी. आय (टाटा)	४,१५५३६.००
०३	मे. रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद	मार्शल रॉयल जीप महिंद्रा सी. जे. ५००/२ डब्ल्यू डी.	४,१२,०००.००
०४	मे. रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद	(डी. आय) फायबर बॉडी जीप महिंद्रा	३,२१,५००.००
०५	मे. सान्या मोटर्स, औरंगाबाद	स्पेसीओ डी. आय. (टाटा)	३,८४,१३२.००

तुलनात्मकदृष्ट्या स्पेसीओ टाटा (डी.आय.) मॉडेल (टाटासुमो) ह्या वाहनाची किंमत कमी असून, तांत्रिक घाटया सदरील मॉडेल चांगले आहे. सदरील दर जकात सोडून आहे. जुनी जीप क्र. एम. एच. २० ई-८०७८ निरुपयोगी करुन लिलावात विक्री करण्यासाठी मंजूरी मिळावी म्हणजे नवीन जीप खरेदी करता येईल.

सदरील वाहन " हासारा निधी " अंतर्गत उपलब्ध निधीतुन खरेदी करता येईल. ज्यांस मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिनांक १९-०६-२००३ रोजी मंजुरी दिली असून, प्रस्ताव स्थायी समोर ठेवण्यास आदेशीत केले आहे. त्यानुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे नवीन वाहन खरेदी करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

संवाद :

मा. सभापती : विषय क्र. १७ मंजूर करण्यात येतो.

श्री. नंदकुमार घोडेले : मंजूर करण्यात हरकत नाही. पण पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता यांना अत्यावश्यक सेवेकरीता गाडीची आवश्यकता आहे. अधिकाऱ्यांना गाडया खरेदीसाठी वैयक्तिक कर्ज देण्यात येत होतो. श्री. कोल्हे यांचे प्रकरण ही प्रलंबीत आहे त्याच्यासाठी गाडी मंजुर करण्यात यावी.

श्रीमती पार्वती मानकापे, श्री. चंद्रशेखर जैस्वाल, श्री. नंदकुमार घोडेले : नगरसचीव यांनाही गाडीची आवश्यकता आहे. त्यांनी गाडी जुनी झाली आहे. सर्वसाधारण सभेच्या कामासाठी त्यांना फिरावे लागते. त्यांना नवीन काम देण्यात यावी. जायकवाडीसाठी सध्या असलेले वाहन व नगरसचीव यांचेकडे असलेली जीप एकाच दिवशी खरेदी केलेली आहे ती पण जुनी आलेली आहे. सर्वसाधारण सभेत देखील ठराव पारीत झालेला आहे. त्यांचेसाठी देखील घसारा निधीतून नवीन वाहन खरेदी करावे.

श्री. कैसरखान, श्री. रशिदा बेगम : सचिव हे विभाग प्रमुख आहेत. त्यांना देखील इतर विभाग प्रमुखाप्रमाणे कार देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी : नविन गाडया खरेदीबाबत शासनाचे निर्बंध आहेत. यासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवलेली नाही. ही जीप खरेदी करण्यात येत आहे ती पाणी पुरवठा पाईप लाईनच्या अत्यावश्यक सेवेसाठी घसारा निधीतून खरेदीचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. इतरांसाठी आपणाला वैयक्तिक कर्ज प्रकरण मंजूर करता येईल.

मा. सभापती : सर्वसाधारण सभेने प्रस्ताव क्र. ४२४/७ दिनांक २०-०९-२००१ अन्वये नगरसचीव यांना नविन कार देण्याबाबत मान्यता दिली आहे. त्यांचे विभाग प्रमुखाचे पद असल्यामुळे व घसारा निधी लेखाशिर्ष मधुन तरतुद उपलब्ध असल्याने आणि त्यांची जीप देखील याच जीप बरोबरची असल्यामुळे नगरसचीव यांना मारोती ८०० अल्पे कार कंपनीकडुन कंपनी दराने खरेदी करण्याच्या अधिन राहुन या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जायकवाडी पाणी पुरवठा (यांत्रिकी) या विभागाची जीप निरुपयोगी करुन लिलावात विक्री करण्यास मंजूरी देण्यात येते. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची मे. सान्या मोटर्स औरंगाबाद यांची स्पेसीओ डी. आय. (टाटा) हे वाहन नगरसचीव यांचेसाठी मारोती ९०० अल्टो कार कंपनीकडुन कंपनी दराने खरेदी करण्याचे अधिन राहुन " घसारा निधी " अंतर्गत उपलब्ध तरतुदीतुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. आयुक्त : अतिरिक्त शहर अभियंता यांनी वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत काय मदत करता येईल ते पाहावे.

विषय क्र. १८ :

श्री. कादरी मोहम्मद असलम अ. लतीफ, स्वच्छता निरिक्षक (निलंबीत) मनपा, औरंगाबाद यांचे निलंबनाविरुध्दचे अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

संवाद :

श्री. संजय शिरसाठ, श्री. नंदकुमार घोडेले, श्रीमती पार्वती मानकापे : मा. सभापती महोदय अशी प्रकरणे आपल्याकडे प्रलंबीत आहेत ती सर्व प्रकरणे एकत्र करुन त्याबाबत प्रशासनाकडुन माहिती घेण्यात यावी आणि एकत्र रित्या पुढच्या बैठकित ठेवण्यात यावी. उदा. थोरात, टाक राचजतवार यांची सर्व प्रकरणाचे अपीलावर निर्णय घेवून सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात यावी.

मा. सभापती : सदरील प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

ठराव :

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. सर्व प्रकरणे एकत्रीत करुन ठेवण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळचे विषय

टिप्पणी :

औरंगाबाद विकास योजना (वाढीव हद्द) नुसार मौजे ईटखेडा येथील सर्वे क्र. ४७, ५२ व ५३ मधील अर्जदार यांची मिळकत क्र. ४ व ५ हारकुळ व प्ले-ग्राऊंड व १५ मीटर रुंद रस्ता प्रस्तावीत बाधीत आहे.

आरक्षण क्र. ४ व ५ हायस्कुल व प्ले-ग्राऊंडसाठी बाधीत मिळकत संपादन करणेसाठी दिनांक १८-१०-२००० च्या मा. आयुक्त यांचे मंजूरीनंतर सर्वसाधारण सभेत ठराव क्र. १५९/५ प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक ०९-०५-२००१ रोजी पाठविण्यात आला. मा. जिल्हाधिकारी यांनी पूढील कार्यवाहीसाठी विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचेकडे दि. ३०-०५-२००१ रोजी वर्ग केला आहे.

तसेच अर्जदाराने त्यांचे मिळकतीतून विकास योजनेचा १५ मीटर रुंद रस्त्याचा मोबदला खाजगी वाटाघाटीने संपादन करुन मोबदला देणे बाबत विनंती केली आहे.

परंतू अर्जदाराने त्यांच्या उक्त मिळकतीचे रेखांकन मंजूर केलेले असून, रेखाकंन मंजूरीच्या वेळी विकास योजना १५ मीटर रुंद रस्त्यासह अंतर्गत रस्ते व खुली जागा मनपास नाममात्र रुपये १ घेवून मनपाच्या ताब्यात दिले आहे. त्यामुळे रस्त्याचा मोबदला अर्जदार यांना देय होणार नाही. तथापि आरक्षणाने बाधीत जागेचा मोबदला अर्जदार यांना देय आहे.

अर्जदार उक्त बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळणेसाठी नेहमी पाठपुरावा करुन असल्यामुळे भुसंपादन प्रकरण लवकर निकाली काढण्यासाठी विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांना दि. २२-०८-२००२ रोजी पत्र देण्यात आले आहे.

अर्जदाराने सर्वे क्र. ४७ मधील आरक्षण क्रमांक ५ प्राथमिक शाळा या प्रस्तावाने बाधित क्षेत्राचा मोबदला मिळण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदाराची उक्त मिळकत आरक्षणाखालील क्षेत्र ३२७६ चौ. मी. आहे. तथापि आरक्षणाखालील संपूर्ण क्षेत्र संपादन

करणेसाठी भु-संपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी मार्फत विशेष भु-संपादन अधिकारी विशेष घटक यांचेकडे वर्ग झालेला आहे.

मिळकत धारक कार्यालयात वारंवार येवून आणि मा. आयुक्त साहेबांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे बाधीत क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करुन त्याचा पुरत मोबदला दयावा असा तगाब लावत आहे. तसेच त्यांनी दि. ०३-०६-२००३ रोजी पत्र देवून ते व त्यंची पत्नी वयोवृध्द असून, हार्टअटॅकचे पेशंट आहे व त्यांना मुलबाळ नसल्याने उदरनिर्वाहास अडचण येत आहे. करीता त्यंचे अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करावयाचा झाल्यास त्यांचे जमिनीचा मोबदला (संचिकेतील पृष्ठ क्र. एन. एस-२ वरील प्रमाणे) रु. ११,२६,९४३/- द्यावा लागेल व सदरील क्षेत्र संपादीत झाल्यानंतर विशेष भुसंपादन अधिकारी यांना सदरील क्षेत्र भुसंपादनाचे प्रस्तावामधून उर्वरीत क्षेत्राचेच संपादन करावे असे कळवावे लागेल.

सदरील मोबदला रक्कम देय करण्यांपूर्वी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संवाद :

मा. सभापती : सदरील टिप्पणी मंजुर करण्यात येते. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

श्री. शिरसाठ संजय : टिप्पणी मंजुर करणे म्हणजे प्रस्ताव मंजुर करण्यासारखे होईल. तेव्हा या बाबतचा सविस्तर प्रस्ताव येवू द्यावा. त्यानंतर त्यावर निर्णय घेता येईल.

मा. आयुक्त : नगरसचीव यांनी टिप्पणी मंजुर करण्याची तरतुद असेल तर दाखवावी व मार्गदर्शन करावे.

नगरसचीव : या प्रकारची अशी कोणतीच टिप्पणी सभागृहापुढे यापुर्वी ठेवण्यात आलेली नाही. ही पहिलीच टिप्पणी आहे. टिप्पणीला जोपर्यंत प्रस्तावाचे स्वरुप येणार नाही तोपर्यंत ठराव करता येणार नाही. टिप्पणी सभागृहापुढे आल्यानंतर त्यावर सभागृहाचा टिप्पणी वरील निर्णय होईल ठराव होणार नाही. स्थायी समितीने घेतलेला तो निर्णय होईल.

मा. सभापती : प्रस्ताव पुढील सभेत स्थायी समिती समोर ठेवावा. संबंधित मालकाने दिलेल्या अर्जाचा विचार व्हावा. खाजगी तडजोडीने संपादन करण्यास मान्यता देण्यात येते.

टिप्पणीवरील निर्णय :

वरील टिप्पणी प्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खाजगी तडजोडीने सदर जमीन संपादन करण्यास मान्यता देण्यात येते. जमीन मालकाने दिलेल्या अर्जाचा विचार करुन पुढील स्थायी समिती सभेसमोर प्रशासनाने प्रस्ताव ठेवणे बाबत निर्णय घेण्यात आला.

विषय क्र. १९ :

मा. उपआयुक्त (म.हर्सुल) यांनी प्रस्ताव सादर केला की, भवानीनगर जाफरगेट येथील झोन क्र. ३ च्या खालील मनपाने भाडयाने देणेसाठी दुकाने बांधली असून, त्यातील दुकान क्र. २ महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ यांना भाडयाने देणेसाठी मा. सर्वसाधारण सभा दिनांक २०-०९-२००१ रोजी विषय क्र. ४८५/२ अन्वये पारीत करुन एम. एस. ई. बी. ला दुकान भाडयाने देण्यात यावे. परंतु अनामत रक्कम न घेता निवासी दराने भाडे वसुल करावे.

सदर प्रकरणी एम. एस. ई. बी. यांना दरमहा रु. २,१३५/- भाडे आकारण्यात आलेले आहे.

एम. एस. ई. बी. चे पत्रानुसार त्यांनी दरमहा भाडे रु. २०००/- भरण्याची समंती दर्शविली आहे. त्या १३५ रु. भाडे दरमहा कमी होईल. तसेच दर पाच वर्षांनी इतर व्यापारी संकुलाप्रमाणे भाडयात २५% वाढ करण्याची अट आहे. ती सुध्दा लागु राहील. सदर गाळयाचा आकार ७.२७ X ३.०० मीटर एकुण क्षेत्रफळ २१.८१ चौ. मीटर आहे. सदर भाडे दर ११-०५-२००१ रोजी ठरला असून, त्याचा दर रु. ८९/- प्र. चौ. मीटर व अनामत रु. ४०००/- प्र. चौ. मीटर असा ठरलेला आहे. तसेच सदर ठिकाणचे दुकाने भाडयाने देणेसाठी आज पर्यंत तीन (०३) वेळेस निविदा मागविल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. करीता सदर दुकान एम. एस. ई. बी. ला भाडयाने दिल्यास सदर ठिकाणचे दुकानास मागणी येईल करीता रु. २०००/- प्रति महा भाडे व अनामत रक्कम न घेता दुकान भाडयाने देण्यास्तव स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भवानीनगर जाफरगेट झोन क्र. ३ मधील झोन इमारतीचे खालील दुकान क्र. २ महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ यांना त्यांचे पत्रानुसार अनामत रक्कम न घेता प्रतिमहा रु. २०००/- याप्रमाणे दुकान क्र. २ भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

विषय क्र. २० :

महानगरपालिकेच्या मालकीचे हर्षनगर येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र. ३.३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास्तव भाडे १५५/- प्रति चौ. मी. प्रतिमहा व अनामत रक्कम रु. ४०००/- प्रति चौ. मी. ठरविण्यात आले आहे. सदर दुकानासाठी श्री. खिजरोद्दीन सिध्दीकी यांची निविदेतील रक्कम रुपये ६९,४५८/- नमूद केली आहे. सदरील व्यापारी संकुलातील एकुण ०३ दुकानांपैकी एकच निविदा प्राप्त झाली होती. श्री. खिजारोद्दीन सिध्दकी यांनी आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त देवू केली होती. त्याच्या निविदेतील दर मंजूरीसाठी मा. स्थायी समिती सभेत मंजूरीस्तव पाठविण्यात आले होते. परंतू दि. ०७-०५-२००२ रोजी संपन्न झालेल्या सभेतील विषय क्र. ६ तुर्त स्थगित ठेवण्यात आले आहे.

श्री. खिजरोद्दीन सिध्दकी यांची निविदेतील दर तुर्त स्थगित ठेवला असून, त्यांनी अर्जासोबत स. नगरसेवक, श्री. इलियास किरमानी यांचे शिफारस पत्र देवून विनंती केली आहे. त्याची निविदा स्थगित केल्यामुळे निविदा सोबत भरलेली अनामत रक्कम रु. १०,०००/- परत करण्यात यावी. करीता, प्रस्ताव पून्हा विचारार्थ व अंतीम निर्णयास्तव सादर.

संवाद :

श्री. नंदकुमार घोडेले : दिनांक ०७-०५-२००३ ला हा विषय स्थगित का करण्यात आला होता.

मालमत्ता अधिकारी : सदर प्रस्ताव दि. ०७-०५-२००३ रोजी मा. स्थायी समिती समोर मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. सभागृहाने तो स्थगित ठेवला आहे. कारण दिलेले नाही.

मा. मुख्य लेखाधिकारी : निविदा अंतीम करावी किंवा रिजेक्ट करावी तोपर्यंत अनामत रक्कम परत करता येणार नाही.

मा. सभापती : दिनांक ०७-०५-२००३ च्या सभेतील विषय क्र. ६ वरील स्थगिती उठविण्यात येते. विषय मंजूर करण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०७-०५-२००३ सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. ६ वरील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. ६ वरील स्थगिती उठविण्यात येऊन हर्षनगर येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र. ३ करीता श्री. खिजरोद्दीन सिध्दकी यांना त्यांनी दाखल केलेल्या निविदा दराप्रमाणे म्हणजेच रु. ६९,४५८/- आणि प्रतिमहा प्रति चौ. मी. रु. १५५/- याप्रमाणे भाडे आकारुन ३० (तीस) वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २१ :

मा. उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या कबाडीपुरा येथील व्यापारी संकुलातील उर्वरीत एकुण १० दुकानासाठी ३० वर्षाच्या भाडेतत्वावर देण्यासाठी दैनिक लोकमत टाईम्स, सामना, शासन सम्राट या वर्तमानपत्रात जाहिरात निविदा सुचना देऊन सिलबंद निविदा जा. क्र./मनपा/मामअ/६२२/२००३ दिनांक ०६-०६-२००३ रोजी मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीची तारीख दि. ०९-०६-२००३ ते १७-०६-२००३ पर्यंत एकुण उर्वरीत १० दुकानासाठी ०२ निविदा विक्री झाल्या व दिनांक २१-०६-२००३ पर्यंत निविदा भरण्याची अंती तारखेपर्यंत दर भरलेली सिलबंद निविदा ०१ प्राप्त झाली ती खालील प्रमाणे आहे.

दु. क्र.	भाडे प्र. महा प्र. चौमी.	आधारभुत रक्कम	निविदा भरण्याचे नांव	देवू केलेली अनामत रक्कम
१.	१५५/-	४०००/- प्र. चौ. मी. ४२,०००/-	सय्यद नजक हुसेन जाफरी	४३,०००/-

उक्त प्रमाणे निविदा धारकाने दु. क्र. ०१ साठी देवू केलेली अनामत रक्कम २१,४३,०००/- आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त आहे. करीता निविदा धारकाचे दर मा. स्थायी समिती सभेत विचारार्थ सादर.

संवाद :

श्री. माणिक साळवे : महापालिकेने ठिकठिकाणी व्यापारी संकुल बांधून ठेवले आहेत. माझ्या वार्डात ३० दुकाने बांधून तयार आलेली आहेत. परंतू हे गाळे अदयापपर्यंत कोणीही विकत घेतले नाहीत. या सहा बाय आठच्या गाळयासाठी रु. १८००/- मासिक भाडे आकारण्यात येते. हे भाडे कमी केल्यास नागरिक ते विकत घेतील आणि पर्यायाने मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढेल. अशा प्रकारचे पत्रही दिलेली आहे. पाच वर्षापासून गाळे बांधून तयार आहेत. या गाळयाचे शटर तोडणे त्याचा वेगवेगळया वापर करणे असे प्रकार सुरु आहेत. या दुकानाचे भाडे कमी करता आले तर ते कमी करुन लवकरात लवकर निविदा काढण्यात याव्यात. झोपडपट्टी भाग नसल्याने किमान दर ठरवून निविदा काढण्यात याव्यात.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : कबाडीपुरा येथील दुकाने भाडयाने देण्याबाबत यापुर्वी चार वेळा जाहिरात देण्यात आली आहे. १५ दुकानांपैकी चार दुकाने भाडयाने दिली

गेली. उस्मानपुऱ्यातील दुकांनाचीही हीच स्थिती आहे. तेव्हा शहरातील सर्व रिकाम्या गाळयाबाबत मा. आयुक्त ह्यांना अधिकार देवून मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढवावे अशी विनंती आहे.

मा. आयुक्त : या विषयाबाबत उपआयुक्त (म) यांना दोन सूचना देण्यात आल्या आहेत. यात २४ ठिकाणी जी मनपाचे दुकान केंद्र आहेत त्यातील रिकाम्या गाळयांचा आढावा घेणे. गाळे भाडयाने देण्याबाबत अपसेट साईजचा अभ्यास करुन गाळयाचा परिसर इत्यादी बाबींचा विचार करण्यात यावा. अशा प्रकारच्या सूचना दिल्या आहेत.

श्री. संजय शिरसाठ : दुकान भाडयाने देतांना आपण स्टॅर्डंड दर आकारतो मग नागरिक ते भाडयाने घेवोत अथवा ना घेवोत. याचा काहीही विचार केला जात नाही. यासाठी भाडे समिती नेमण्यात यावी व समितीने दुकानांचे भाडे ठरवावे.

मा. आयुक्त : भाडे समिती आहे. त्याबाबत उपआयुक्त (म) यांनी माहिती द्यावी.

श्री. माणिक साळवे : जिल्हा मराठी पत्रकार संघ यांनी पैठणगेट येथील गाळा पत्रकार संघाला मिळावा म्हणून चार-पाच महिन्यांपूर्वी पत्र दिले आहे. त्यावर काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कबाडीपूरा येथील व्यापारी संकुलातील दहा दुकानापैकी दुकान क्र. १ करीता ३० वर्षाच्या भाडेपट्टयावर श्री. सय्यद नजफ हुसैन जाफरी याची अनामत रक्कम रु. ८३,०००/- आणि प्रतीमाह प्रतिचौरस मीटर रु. १५५/- या दराचे निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २२ :

मा. उपआयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या एकनाथ नगर उस्मानपुरा मिनि शॉपिंग सेंटर येथील २९ दुकानांसाठी ३० वर्षाच्या भाडे तत्वावर देण्यासाठी वर्तमानपत्र दैनिक लोकमत टाईम्स, सामना, शासनसम्राट या वर्तमानपत्रात जाहीर निविदा सूचना देवून सिलबंद निविदा जा. क्र./मनपा/मामअ/६२२/२००३ दिनांक ०६-०६-२००३ रोजी मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीची तारीख दि. ०९-०६-२००३ ते १७-०६-२००३ पर्यंत व निविदा भरण्याची अंतीम तारीख दि. २१-०६-२००३ पर्यंत ०१ निविदा विक्री झाली व दर भरलेली ०१ निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणे.

दु. क्र.	भाडे प्र. महा प्र. चौमी.	आधारभुत रक्कम ४०००/- प्र. चौ	निविदा भरण्याचे नांव	देवू केलेली अनामत रक्कम
२७	१८२४/-	१८४४०/-	विदया मनोहर गवळी	१८,६९६/-

उक्त प्रमाणे निविदाधारकाने दु. क्र. २७ साठी देवू केलेली अनामत रक्कम रु. १८,६९६/- आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त असून, सदर दुकान महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्यापैकी आहे. करीता निविदा धारकांचे दर मा. स्थायी समिती सभेत विचारार्थ व मंजरूीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथनगर उस्मानपुरा मिनि शॉपिंग सेंटर येथील २९ दुकानांपैकी दुकान क्र. २७ करीता तीस वर्षाच्या भाडे पट्टयावर विदया मनोहर गवळी यांची अनामत रक्कम रु. १८,६९६/- आणि प्रतिमाह प्रति चौरस मीटर रु. १,८२४/- या दराच्या निविदेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २३ :

मा. उपआयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या औरंगपुरा प्रिया मार्केट (पहिला मजला) येथील व्यापारी संकुलातील उर्वरीत एकुण २४ दुकानासाठी ३० वर्षाच्या भाडे तत्वावर देण्यासाठी दैनिक लोकमत टाईम्स, सामना शासन सम्राट या वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना देवून सिलबंद निविदा जा. क्र./मनपा/मामअ/६२२/२००३ दि. ०६-०६-२००३ रोजी मागविण्यात आल्या होत्या निविदा विक्रीची तारीख दि. ०९-०६-२००३ ते १७-०६-२००३ पर्यंत एकुण उर्वरीत २४ दुकानासाठी ०५ निविदा विक्री झाल्या व दिनांक २९-०६-२००३ पर्यंत निविदा भरण्याची अंतीम तारखेपर्यंत दर भरलेली सिलबंद निविदा ०४ प्राप्त झाल्या ती खालील प्रमाणे आहे.

दु. क्र.	भाडे प्र. महा प्र. चौमी.	आधारभुत रक्कम ४०००/- प्र. चौ	निविदा भरणाऱ्याचे नांव	देवू केलेली अनामत रक्कम
०३	१५५/-	२८,८००/-	विदया मनोहर गवळी	२९,५२०/-
०८	१५५/-	२८,८००/-	संदीप बालाजी चौथमल	२९,५२१/-
१२.	१५५/-	२८,८००/-	सौ. चित्रलेखा जोंगेद्रकुमार खरे	३०,८०७/-
१६.	१५५/-	२८,८००	सौ. कमीनी ह. शर्मा	३०,३००/-

उक्त दुकानांपैकी दुकान क्र. ३,१२,१६ या महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या व दुकान क्र. ०८ खुल्या प्रवर्गापैकी आहे. वरील तक्त्यातील नमूद दु. क्र. ३, ८, १२, १६ साठी निविदा धारकांचे देवू केलेल्या रक्कमा आधारभूत रक्कमेपेक्षा जास्त आहे.

करीता निविदा धारकांचे दर मा. स्थायी समिती सभेत विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

संवाद :

श्री. संजय शिरसाठ : एखादया ठिकाणच्या दहा गाळयांपैकी अशा प्रकारे एकाच गाळयाच्या निविदेस मंजूरी दिल्यानंतर त्या दरापेक्षा कमी दराने इतर नऊ गाळे आपल्याला भाडयाने देता येत नाहीत. याकरीता भाडेसमिती नेमण्यात यावी अशी माझी पुन्हा एकदा सुचना आहे. यामुळे सर्वांना दुकाने भाडयाने देता येतील.

मा. सभापती : भाडे समिती नेमलेली आहे.

उपआयुक्त (म) : या भाडे समितीमध्ये मा. सहाय्यक संचालक नगररचना, शहर अभियंता मुख्य लेखाधिकारी आणि उपआयुक्त (म) यांची एक समिती आहे. सहा. संचालक नगररचना हे त्या गाळयाचे भाडयाने मूल्याकंन ठरवितात. यावर समितीत भाडे योग्य आहे का, याचा निर्णय घेण्यात येतो. त्यानंतर सभागृहासमोर ठेवण्यात येतो.

श्री. संजय शिरसाठ : अस्तित्वात असलेल्या भाडे समितीत स्थायी समितीचे दोन सदस्य घेण्यात यावेत. यावर त्यांचा अहवाल घेण्यात यावा. या समितीत दर निश्चित करण्यात यावेत.

मा. सभापती : भाडे समितीमध्ये श्रीमती जयश्री किवळेकर, श्री. माणिक साळवे, श्रीमती शाहीन जफर, श्री. चंद्रशेखर जैस्वाल, यांचा समावेश राहील.

श्री. नंदकुमार घोडेले : उस्मानपूरा भागात शासनाकडून मंजूर मिळालेल्या पोलीस केंद्रासाठी एकनाथनगर येथील समाज मंदिराची जागा मध्यवर्ती भागात असल्याने नाममात्र भाडयाने मिळण्याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी महापालिकेच्या विनंती पत्र दिले आहे. येत्या १५ ऑगस्ट दिनी या पोलीस केंद्राचे उद्घाटन होण्याचे दृष्टीने नाममात्र आहे आकारुन एकनाथ नगरसमाज मंदिराची इमारत देण्यात सभागृहाने मंजूरी दयावी.

श्री. माणिक साळवे : एकनाथ नगर हा मा. उपमहापौर यांचा वार्ड आहे. पोलीस अधिकारी आणि मा. उपमहापौर यांनी स्वतः समाज मंदिराची पाहणी केली आहे. या भागात पोलीस स्टेशन आल्यामूळे नागरिकांचे संरक्षण होणार आहे. तेव्हा बी ॲण्ड सी च्या नियमाप्रमाणे ही जागा पोलीस खात्यास भाडयाने देण्यात यावी.

मा. सभापती : सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दराने देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा येथील प्रिया मार्केटच्या (पहिला मजला) व्यापापरी संकुलातील उर्वरीत २४ दुकानापैकी खालील चार दुकाना करीता प्राप्त झालेल्या निविदेतील अनामत रक्कम आणि प्रतिमाह प्रति चौरस मीटर करीता प्राप्त झालेल्या निविदा दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

दु. क्र.	भाडे प्र. महा प्र. चौ.मी.	आधारभुत रक्कम ४०००/- प्र. चौ.मी.	निविदा भरणाऱ्याचे नांव	देवू केलेली अनामत रक्कम
०३.	१५५/-	२८,८००/-	विदया मनोहर गवळी	२९,५२०/-
०८.	१५५/-	२८,८००/-	संदीप बालाजी चौथमल	२९,५२१/-
१२.	१५५/-	२८,८००/-	सौ. चित्रलेखा जोंगेद्रकुमार खरे	३२,४०७/-
१६.	१५५/-	२८,८००/-	सौ. कामिनी ह. शर्मा	३०,०००/-

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगरसचीव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक ०२ सप्टेबंर २००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. मंगळवार दिनांक ०२ सप्टेबंर २००३ रोजी मा. सभापती श्री. भाऊसाहेब ताठे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.४० वाजता " वंदे मातरम् " या गीताने सुरु झाली. या सभोत अधिकारी वर्गासह खालील स. सभासद उपस्थित होते.

१.	स. स. श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण	स. सभासद
२.	स. स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग	-//-
३.	स. स. श्री. कैसरखान बद्रोद्दीनखान	-//-
४.	स. स. सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश	-//-
५.	स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु	-//-
६.	स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन	-//-
७.	स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग	-//-
८.	स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण	-//-
९.	स. स. श्री. शेख इलियास किरमाणी	-//-
१०.	स. स. श्री. किवळेकर जयश्री सारंग	-//-
११	स. स. श्री. शाहीन जफर महेमुद जफर	-//-
१२.	स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फरयारखान	-//-

विषय क्र. २४ :

दिनांक ०७-०८-२००३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिजी सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. संजय शिरसाठ : मागील स्थायी समितीच्या बैठकीत अनेक बाबींवर चर्चा झाली. त्यानुसार माहिती हाती आली की, थोडेफार फलीत चांगले निघते. मा. आयुक्तांना प्रशासकीय कामाचा करण्याचा जो अनुभव आहे. त्याचा मनपास फायदा होत असल्याचे जाणवत आहे. गेल्या २० तारखेला मालमत्ता सर्वेक्षणाच्या निविदा निघाल्या दिलेल्या शब्दाला मा. आयुक्त जागतात असे चित्र दिसते. यातून जो काही फायदा होणार आहे तो सर्वसामान्यांना होणार आहे. येणाऱ्या उत्पन्नातून विकास कामे करता येतील. ६-७ महिने उशिरा का होईना निविदा जाहीर झाली. प्रशासनाच्या कार्यवाहीस सुरुवात झाली. दुसरा मुद्दा असा की, नगर विकास खात्याचे सचिव मा. श्री. लाला यांचेशी मनपाचे पदाधिकारी/अधिकारी यांची संयुक्त बैठक झाली. यात जकातीचे खाजगी करणाचा विषय होता. मी अधिकृत बोलणे योग्य होणार नाही. सचिव यांचे समवेत कोणत्या विषयावर चर्चा झाली. या बैठकीतून काय निष्पन्न झाले. तसेच मागील बैठकीत मा. आयुक्त यांनी असे सांगितले की, जकात खाजगी करणाचे टेंडर निघणार आहे का उशीर होत आहे. या सर्वांचा खुलासा मा. आयुक्तांनी करावा. जकात खाजगी करणाच्या संदर्भात

काय सूचना मा. सचिव यांनी दिल्या सविस्तर खुलासा करावा. चर्चेत मा. सचिवांनी काय सांगितले त्याबद्दल मा. आयुक्तांना निवेदन करावे.

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी या संबंधीचा सविस्तर खुलासा करावा.

मा. आयुक्त : प्रधान सचिव मा. श्री. लालासाहेब यांचे सोबत जी बैठक झाली त्यात प्रमुख मुद्दयावर चर्चा होणार त्यासंबंधी आपण पुस्तक काढलेले आहे. त्या पुस्तकाच्या आधारे चर्चा केली. एका चर्चेत विषय संपणार नसून त्यात शासनाकडे पाठपुरावा करण्याची गरज आहे. मला आनंद वाटतो की, सर्व पदाधिकारी यांचे सुध्दा शंभर टक्के सहाकार्य मिळत आहे. यात शंका नाही. दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांचा मुद्दा होता. काळ एखादा कळाले आहे की, हा प्रस्ताव अंतिम मंजूरीच्या टप्यात आहे. एवढे कर्मचारी कायम झाल्यावर अधिकारी/पदाधिकारी यांचे प्रयत्नास यश आले असे म्हणणे वावगे होणार नाही. दुसरा मुद्दा अनुदानापच्या संदर्भात निघाला. मनपाचे २४.५ कोटीचे अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे. आयुक्त म्हणून जे समर्थन केले ते शासनाने स्विकारले व प्रलंबित २४ कोटीतील काही हिस्सा देण्याचे शासनाने स्विकारले या संदर्भात मान्यतेचा प्रस्ताव सचिव पातळीवरुन कार्यवाही होवून पुढे गेलेला आहे. ही रक्कम जर नजिकच्या भविष्यात तुमच्या सहकार्याने व मा. मुख्यमंत्र्याकडे पाठपुरावा करुन मिळाली तर मेजर ॲचिव्हमेंट होईल. त्या दोन बाबी झालेल्या बैठकीतून फायनल स्टेजवर आल्या हे विचारात घेतले तरी ही भेट पदाधिकारी व मनपाच्या हिताच्या दृष्टीने मोठी पावले आहे असे म्हटले तरी योग्य होईल. जकात खाजगीकरण संदर्भात सचिवांनी ज्या सूचना/मत व्यक्त केले की, शासनाचा जो सध्याचा निर्णय आहे तो काही प्रमाणात जाचक आहे. १६% डिपॉझीट भरणे किंवा ५% ३ एमडी भरणे हे औरंगाबाद पिंपरी-चिंचवड सोलापूर असेल अशा मनपाचे आयातीचे मालाचे उत्पन्न विचारात घेतले तर मोठी रक्कम होते. त्यामुळे प्रतिसाद मिळत नाही. असे सचिव यांचे म्हणणे होते. याशिवाय स्थानिक कारणे सुध्दा असतात. परंतू या मनपाने खाजगीकरण करण्याचे धोरण ठरविलेले आहे. सभागृहाला सांगू इच्छितो की, यासंबंधी सतत पाठपुरावा चालु आहे. किंबहुना जकात खाजगीकरणाची निविदा सुचना सुध्दा तयार होती. परंतू सेक्युरिटी डिपॉझिट व इ. एम. डी. मध्ये सवलत होणे हे शासन निर्णयाला बाजूला ठेवून करणे शक्य नसते. म्हणून सचिव यांचेशी चर्चा झाली. तेव्हा त्यांनी सांगितले की, प्रस्ताव करुन पाठवा. या दोन्ही बाबतीत शासन सवलत देण्यासंदर्भात आदेश देईल. सचिव मा. तिवारी व मा. लाला यांना पत्र सुध्दा पाठविण्यात आलेली आहेत. व माझे वैयक्ति विनंती पत्रही पाठकविण्यात आले आहे. पुढील ८-१० दिवसांत पाठपुरावा करण्याचे दृष्टीने मुख्य लेखाधिकारी श्री. खैरनार यांना आदेशीत केलेले आहे. आणखी काही मुद्दे होते. अस्थापना-१ विभागाच्या संबंधात होते. वैदयकी य अधिकाऱ्यांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित आला. वैदयकिय अधिकाऱ्यांची पदे मनपाने जेव्हा सेवा भरती नियमावली बनविली तेव्हा शैक्षणिक अर्हता एम. बी. बी. एस. अशी ठेवली. कदाचित तेव्हा या विषयावर विचार करण्यास अवधी मिळाला नसेल. परंतु आयुर्वेद बी. एम. एस. ही सुध्दा एक महत्वाची पॅथी आहे. ज्याला समाजात मान्यता आहे. बी. ए. एम. एस. अर्हता असलेले डॉक्टर मनपामध्ये काम करतात. ठराविक वेतनावर आहेत. त्यांना सुध्दा त्यास

मिळला पाहिजे. अशी मनपा व सर्व लोकांची भूमिका होती व तसा पत्रव्यवहारही शासनाकडे झालेला आहे. हाही विषय बैठकित झाला. त्यांचे म्हणणे असे की, मनपा प्रशासनाचे त्यांचे पातळीवर निर्णय घेवू शकत असतील तर घ्यावा. आल्यावर तपासणी केली असता सेवा भरती नियमावली मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सर्वसाधारण सभेसमोर हा दुरुस्तीचा प्रस्ताव येईल त्यास मान्यता दिल्यानंतर तो ठराव पुर्वीचे जे अनेक पत्र शासनाकडे पाठवले जे की, या पध्दतीने बी. ए. एम. एस. पदे सुध्दा रेग्युलर करुन घ्यावे. ते सोयीचे होईल. कारण व्यावहारीक अडचण अशी आहे की, एम. बी. बी. एस. कर्मचाऱ्यांना कायम वेतनावर होणार असेल तर, बी. ए. एम.एस. कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्यासारखे होईल असे वाटते. ते सुध्दा न्यायालयात माऊ शकतात. फक्त ठराविक कर्मचाऱ्यांना कायम करणे योग्य होणार नाही म्हणून हा निर्णय सेवाभरती नियमावलीच्या अधिन राहील. आयुक्तांना याबाबत स्वतंत्र अधिकार नाही. प्रशासनाला प्रस्ताव ठेवता येतो. आयुक्त किंवा प्रशासनाला याबाबतीत मर्यादीत अधिकार आहे. मागील बैठकीत या विषयावर चर्चा होईल असे वाटले होते. चर्चेला वेळ मिळावा व सविस्तर चर्चा व्हावे असे अपेक्षीत आहे.

श्री. संजय क्षिरसाठ : मनपामध्ये वैदयकिय सेवेचे ११ पदे रिक्त आहेत. त्यापैकी १७ पदे एम. बी. बी. एस. व ४ पदे इतर आहेत. नियमावलीत दुरुस्ती करायची ती फक्त बी. ए. एम. एस. चे जे कर्मचारी आहे. ४ डॉक्टरसाठीच करावी लागणार आहे. ११ जागा रिक्त आहेत. सध्या कार्यरत कर्मचारी ११ डॉक्टर्स आहेत. ७ वर अन्याय होणार नाही का ७ जागा आताही ताबडतोब भरु शकतात. जे ४ कर्मचारी राहतील त्यांचेवर सुध्दा अन्याय होता कामा नये. गेल्या १०-१५ वर्षापासून एम. बी. बी. एस. डॉक्टर मनपामध्ये काम करतात मानधनावर काम करतात. गेल्या महिना भरापूर्वी ४ डॉक्टर्स येथील सेवा सोडून गेलेले आहेत. नियमावलीत दुरुस्ती ही ४ कर्मचाऱ्यांसाठी करायची त्यासाठी ७ कर्मचाऱ्यांना थांबून ठेवायचे त्यांचेवर अन्याय होणार नाही का?

श्री. नंदकुमार घोडेले : वैदयकिय सेवेत ठराविक वेतनावर असलेले चार डॉक्टर्स, राजीनामा देवून गेलेले आहेत. मनपाकडे आरोग्य केंद्र संख्या २४ असून डॉक्टरांची संख्या कमी आहे. मागील स्थायी समिती, आरोग्य समिती मध्ये ४ आरोग्य केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित होते. वारंवार चर्चा केली दवाखाने सुरु झाले नाही. कार्यवाही काहीच नाही. मा. आयुक्तांशी या संदर्भात खाजगीत चर्चा केली. शासनाची मान्यता घ्यावी लागेल असे म्हटले. डॉक्टर विना केंद्र बंद ठेवावे लागते. पार्ट टाईम हे डॉक्टर काम करीत नाही. त्यांना कमी वेतन दिले जाते म्हणून सेवा सोडुन जातात. मनपाचे दुर्देव आहे. एक वेळ अशी होती की, ३५% कमी, ४२% कमी चे वर खर्च न जाता अशी पदे भरण्यास मा. आयुक्त यांना अधिकार होते. आता आपल्या अधिकारात का भरत नाही. माझ्या माहितीनुसार आजही ४२% कमी च्या वर खर्च गेल्यास शासनाची मंजूरी लागते.

उपआयुक्त (प्र) : वैदयकिय सेवेत ११ पदे भरण्याबाबत प्रस्ताव मागील वर्षी शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. अदयाप मान्यता नाही. त्यात ७ पदे एमबीबीएस आलेल्या डॉक्टरांच्या संदर्भात जर ८ पदे बीएएमएस झालेल्या साठीची आहेत. सेवाभारती नियमानुसार मेडीकल ऑफीसर पदासाठी उमेदवार एम.

बी. बी. एस. असावा अशी तरतुद आहे. दैनिक वेतन/ठराविक वेतनावर बी. एम. एम. एस अर्हता धारण करणारे सुध्दा डॉक्टर्स आहेत. गरज लक्षात घेऊन आयुर्वेदिक डॉक्टर असावे अशी भावना त्यावेळी व्यक्त झाली म्हणून ४ बी. ए. एम. एस. अर्हताधारक डॉक्टर्स घेण्यात आले होते. याबाबत निवड समीतीची बैठक झाली. त्या बैठकीत ७+४ असे एकुण ११ पदांचा प्रस्ताव मंजूर करुन निवड समितीपुढे ठेवण्यात आला. करणे नियमावलीत तरतुद केलेली नाही म्हणून मनपा बी. ए. एस. एस. पदवी धारण केलेले डॉक्टरांच्या नेमणूक करु शकत नाही. जे एम. बी. बी. एस. पदवीधारक डॉक्टर आहेत. त्यांची नियुक्ती प्रशासनास करता येईल. दुसरा मुद्दा उपस्थित झाला की, पार्टटाईम जे आरोग्य केंद्र चालु करणार आहे त्याचा प्राथमिक प्रारुप तयार आहे जे दैनिक/ठराविक वेतनावर डॉक्टर काम करतात ते पार्टटाईम मध्ये काम करण्यास तयार आहेत.

श्री. संजय शिरसाठ : सात पदे भरण्यास प्रशासनास अडचण नाही. कार्यवाही करावी. नियमावली नुसार सात पदे भरता येतात. शासनाची काहीही अडचण नाही.

उपआयुक्त (प्र) : या पदांना शासन मंजूरी होण्यासाठी रितसर प्रस्ताव पाठविला आहे. शासनाची मंजुरी प्रतिक्षाधिन आहे.

मा. आयुक्त : या संबंधीचे कागदपत्र मी पाहिले. दोन टप्यांमध्ये शासनाला प्रस्ताव पाठविलेला आहे. पहिला प्रस्ताव हा दैनिक वेतन मजूर/कामगारांच्या संदर्भात आहे. आताच स. सदस्य श्री. घोडेले यांनी मुद्दा उपस्थित केला तो योग्य आहे. ३५% कसे मोजावे. या साठीच बरीचशी चर्चा चालू होती. दूसरा टप्पा कर्मचाऱ्यांचा त्यात डॉक्टरांचा प्रस्ताव आहे. दुसरा टप्पा कदाचीत यावर्षी शासन मंजूर करणार नाही. मुळ मुद्दा असा की, जे एम. बी. बी. एस आहेत. ते पात्र ठरतात हे रास्त आहे. त्यांना घेतले तर खर्च होणाऱ्या रक्कमेमध्ये फारसा फरक होत नाही. याबाबत तपासणी करावी लागेल.

श्री. नंदकुमार घोडेले : याच बैठकीत विज बिल देयकाबाबत चर्चा झाली काय? थकीत बील रेग्युलर भरण्याचे कारण काय दर महिन्याला १.६० कोटी बील भरणार काय? तरतूद नाही. या संदर्भात काय चर्चा झाली. खुलासा करावा. थकीत बील निसमीत भरा असा शासनाचा आग्रह होता त्यावर काय चर्चा झाली.

मा. आयुक्त : यासाठी माझा एकच खुलासा राहील की, मा. उच्च न्यायालयाचे शासनाचे आदेश पाळलेच पाहीजे.

श्री. संजय शिरसाठ : आमची बॉडी ही पब्लीक बॉडी आहे. जनतेची कामे कशी होतील त्यास प्राधान्य देणे हे आमचे कर्तव्य आहे. सक्षम अधिकाऱ्यांमुळे आपली ही अशी परिस्थिती झाली ही मंत्रालयात झालेल्या बैठकीत चर्चा आयुक्त का सांगू शकत नाही. परंतू तोडगा असा निघतो की, थकीत बील भरू. या संदर्भात काय चर्चा झाली खुलासा करावा.

मा. आयुक्त : सचिव पातळीवरील अवघड काम करुन घेण्याची जबाबदारी आम्ही पार पाडलेली आहे. शासनाचे नगरविकास सचीव यांनी थकीत अनुदानाचा एक हप्ता देण्याचे कबूल केलेले आहे. पुढील जबाबदारी पदाधिकाऱ्यांनी पार पाडावी असे माझे मत आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : बोर देवून भोपळा काढणेच प्रकार दिसतो. १.६० कोटी दर महिन्याला विजेचे बील अदा करणार असेल तर, विकास कामे होतील

काय? यामुळे अर्थसंकलप कोलमडेल विकास कामे झाली नाही तर ही जबाबदारी कोणाची राहील.

मा. सभापती : मा. सचीव यांचे समवेत जी बैठक झाली त्या बैठकीस मी सुध्दा उपस्थित होतो. नगर विकास सचीव श्री. लाला यांचेसह मी प्रत्यक्ष बोललो. महानगरपालिकेस दर महिन्याला १.६० कोटी रुपये भरणे शक्य होणार नाही. विकास कामास पैसा राहणार नाही. शासनाकडे मनपाचे अनुदानापोटी रु. २३.५० कोटी प्रलंबीत आहे. ते दिल्यास भरणा करता येईल असे मी प्रत्यक्ष बोललो.

श्री. नंदकुमार घोडेले : १.६० कोटी रु. भरणा केले. स. सदस्यांना माहिती दिली नाही. वर्तमानपत्राद्वारे माहिती मिळाली.

मा. सभापती : मा. आयुक्त माझ्याकडे आले होते मनपा फक्त १.१० कोटी रुपयेच दर महिन्याला भरु शकेल असे सांगितले. त्यांनी १.६० कोटी भरले ठिक आहे. यापुढे १.१० कोटीच भरावे. सभागृहाची परवानगी घेणे आवश्यक होते. माहिती दिली नाही. ही माहिती सुध्दा पदाधिकारी यांना व मला वृत्तपत्राद्वारे मिळाली हे बरोबर नाही.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : सातत्याने विज बिल भरणा केले नाही तर मनपाची वीज बंद केली जाईल. वृत्तपत्रात नेहमी बातम्या सळकतात. एखादया वेळेस तसे झालेच तर शहर अंधारमय होईल. दरोडे, चोऱ्या होऊ शकतात. शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. यास कोण जबाबदार राहणार आहे? दुसरा प्रश्न असा की, एम. एस. ई. बी. विभागाचे पोल डी. पी. मनपाच्या जागेवर उभे आहेत. त्यावर भाडे आकारणी केली जाते का?

श्री. नंदकुमार घोडेले : शहरात एम. एस. ई. बी. विभागाचे मोठमोठया गाडया भरुन साहित्य येते. त्यावर जकात आकारण्यात येत नाही. शहरात कोणतीही वस्तु आल्यास जकात आकारणी होते. व जकात घ्यावी असा नियम असतांना एम. एस. ई. बी. विभागाच्या साहित्यावर जकात का आकारण्यात येत नाही?

उपआयुक्त (म) : शहरात जे साहित्य येते त्यावर जकात आकारणी होते. एम. एस. ई. बी. विभागाच्या साहित्यावर जकात आकारणी केली जाते. कायमस्वरुपी या विभागाचे अकौंट ओपन केलेले आहे. यादृष्टीने नियमीत पैसा भरणा होतात याबाबतीत मी आढावा सुध्दा घेतलेला आहे.

मा. आयुक्त : मा. आयुक्तांच्या परवानगीने उपआयुक्त(म) तसेच मालमत्ता अधिकारी यांना सुचना करतो की, उदयोग आणि ऊर्जा विभागाचे सर्क्युलर पुन्हा बघावे. डी. पी. व सबस्टेशन यांना भरपुर जागा लागते. याबाबतीत ग्राऊंड रेट किंवा रिज रेट असेल तर, त्याप्रमाणे दर आकारु शकतो का? अशी सूचना आहे. कारण हा महापालिकेचा आर्थिक प्रश्न आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : मागील बैठकीत अतिक्रमण संदर्भात चर्चा झाली मालमत्ता अधिकारी यांना माहिती घेण्याचे आदेशित केले होते. संबंधित अधिकाऱ्यांनी आतापर्यंत काय माहिती सादर केलेली आहे. माहिती घेतली का? महानगरपालिकेच्या जागेवर बऱ्याच लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. त्या जागा सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न झाले खुलासा द्यावा.

श्री. नंदकुमार घोडेले : मागील बैठकीत महापालिकेच्या जागा कोठे आहेत. कोणत्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. माहिती देण्याबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार

या बैठकीत चर्चा न होता स्वत:हून मालमत्ता अधिकारी किंवा उपआयुक्त (म) यांना माहिती सादर करणे आवश्यक होते. प्रत्येक वेळी इतिवृत्त कायम करतांना अनेक बाबीत चर्चा होते. पूढील बैठकीत माहिती देऊ असे सांगण्यात येते. इतिवृत्त कायम होते. माहिती येत नाही. हे योग्य नाही.

श्रीमती पार्वती मानकापे : मागील इतिवृत्त कायम करतांना त्या बैठकीतील जी माहिती देणार होते ती दिल्याशिवाय बैठक होवू नये असे माझे मत आहे.

उपआयुक्त (म) : महापालिकेच्या ज्या खुल्या जागा आहे. त्याबाबतीत संपूर्ण माहिती घेवून सदर जागेचे पी. आर. कार्ड महापालिकेच्या नांवावर आहे किंवा कसे. अतिक्रमण आहे किंवा काय याची माहिती घेण्यासाठी अतिक्रमण असेल तर ते काढणे. या संदर्भात चौकशी करण्यासाठी मा. आयुक्तांच्या सुचनेखाली उपआयुक्त (म) ह्यांचे अध्यक्षतेखाली सहा. संचालक, नगररचना, प्रशासकीय अधिकारी मालमत्ता अधिकारी व झोन अधिकारी यांची बैठक झाली आहे. या समितीची एक बैठक सुध्दा माझ्या अध्यक्षतेखाली झालेली आहे. प्राथमिक माहिती अशी की, रेखांकनातील ४१८ खुल्या जागा त्याबाबतचे पी. आर. कार्ड महापालिकेच्या नांवे करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. मी. स्वत: सिटी सर्व्हे अधिकाऱ्यांशी चर्चा केली. १०५ जागांचे पी. आर. कार्ड मनपाच्या नावांने आहे. २७७ प्रकरणे सिटी सर्व्हे कार्यालयात पाठविण्यात आलेले आहेत. एक महिन्यांच्या आंत या २७७ जागांचे पी. आर. कार्ड प्राप्त होतील असे वाटते. उर्वरीत माहिती नगररचना विभागाकडुन घेवून पुढील कार्यवाही केली जाईल. जागेवर अतिक्रमण आहे किंवा काय. झोननिहाय प्रत्यक्ष पाहणी चालू आहे. एक महिन्यात तयार होईल त्यानंतर सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

श्रीमती पार्वतीबाई मानकापे : खुली जागा दुसऱ्यांच्या नांवे झाली याचा पुरावा आहे. काधी कार्यवाही करणार?

उपआयुक्त (म) : ह्या संदर्भात विधी सल्लागार यांचेशी चर्चा केली. अतिक्रमण झालेल्या जागांबाबत पी. आर. कार्ड मनपाच्या नांवे घेण्यासाठी अधिक्षक भुमी अभिलेख यांचेकडे अपील दाखल करण्याची कार्यवाही विधी सल्लागार यांचे मार्फत सुरु केलेली आहे. विशिष्ट असे प्रकरण असेल तर विधी सल्लागार यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : हा विषय साधारण नाही. प्रशासनाने तसे समजू नाही. गंभीर विषय आहे. ज्या लोकांनी मनपाच्या जागा बळकावलेल्या आहेत ते म्हणतात काय करायचे तर करु द्या. प्रशासन आमचे काही करु शकत नाही. दुसरी बाब अशी की, अतिकमण काढण्यासाठी गेलेले कर्मचारी यांना मारहारण झाली. त्यांचे फ्रॅक्चर झाले. परंतु त्याची दखल प्रशासनाने घेतलेली नाही. साधी विचारणा सुध्दा केली नाही. अशी परिस्थिती असेल तर अतिक्रमण झोल्या जागा कशा मिळविणार? एका जागेवर बसून जागा हस्तांतर होणार नाही. प्रशासन कार्यवाही करीत नसेल तर योग्य नाही. सायली प्रकरणाचे काय झ ाले? नेहमी नेहमी तेथील नागरिक माझ्यात मागे तगादा लावतात. सुंदर नाल्यावरील पुल होण्याबाबतची संचिका कोठे आहे. बजेटमध्ये तरतुद केली अदयाप पुलाचे काम सुरु केले नाही. का केले नाही?

श्री. नंदकुमार घोडेले : स. सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या बरोबर आहेत. त्या घटनेची बातमी सुध्दा वृत्तपत्रात प्रसिध्दी झालेली होती. वर्ष गेले. दाखल

घेतली नाही. जेव्हा सायली नावाच्या मूलीच्या मृत्यू झाली तेव्हा प्रशासनाने कोणत्याही परिस्थितीत पुल बांधणार आहे. तरतुद करुनही कार्यवाही घेत नाही हे योग्य नाही. तो पुल अनाधिकृत होता असे म्हणायला नको.

श्री. ठकुजी वाणी : अनाधिकृत वसाहत झालेल्या भागात खड्डे झाले. पाणी साचते. मुरुम सुध्दा टाकु शकत नाही का? मी निवडुन आल्या पासूनची मागणी आहे. अनाधिकृत भागाच्या नावाखाली कोणतीच कामे केली जात नाहीत. माझ्या वार्डात अनाधिकृत भाग जास्त प्रमाणात येतो. रस्त्यावर पोल टाकुन विदयुत व्यवस्थाही होत नाही.

श्री. माणिक साळवे : नागेश्वरवाडीतील पुल वाहुन गेला. पाण्याने एका मुलीचा त्यात बळी गेला. आता पुन्हा पुल करायचा म्हणुन अनाधिकृत भाग आहे. म्हणून फेटाळण्यात आले. नाल्याची जागा ही अनाधिकृत नसते. ती मनपाची मालमत्ता असते. अनाधिकृत आहे. असे बोलणे कितपत योग्य आहे. मंजूरी देण्यास हरकत नाही. तात्काळ काम करावे.

श्री. नंदकुमार घोडेले : विशेष बाब म्हणून मान्यता द्यावी. तात्काळ त्या पुलाचे काम करण्यात यावे.

मा. सभापती : याविषयी संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

अति. शहर अभियंता : नागेश्वरवाडी येथील लोखंडी पुल दोन वर्षापुर्वी पावसाच्या पाण्यामुळे वाहुन गेला. त्यामध्ये सायली नावांच्या मुलीचा दुर्देवी अंत झाला होता. त्यानंतर सन २००१-२००२ मध्ये सदर पुल बांधण्याबाबत प्रस्ताव प्रशासनासमोर आला होता. परंतू शासनाच्या जी. आर. नुसार अनाधिकृत वस्त्यात कोणतेही विकास काम करु नये. नाला मनपाच्या मालकीचा आहे. या पुलाच्या दोन्ही अनाधिकृत वसाहती वसलेल्या आहेत. म्हणून काम रद्द करण्यात आले होते. या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदरचे काम होण्यासाठी रु. ३.०० लक्षची तरतुद केली. परंतु हा फुल पूर्ण होण्यासाठी किमान पाच लक्षची आवश्यकता आहे. ही वस्ती अनाधिकृत असल्याने प्रशासकीय निर्णय झालेला नाही. शासन निर्णयानुसार या पुलाच्या दोन्ही बाजुकडील वसाहती गुंठेवरी कायदयात येणार आहेत. परंतू त्याबाबतीत मनपास जास्त प्रतिसाद मिळत नाही.

श्री. माणिक साळवे : नाला मनपाच्या मालकीचा आहे. ती जागा मनपाची आहे. बाजुच्या वस्तीत लोक राहतात. त्यांचे आरोग्य चांगले राहण्याच्या दृष्टीने मनपामार्फत साफसफाई केली जाते म्हणून ती वस्ती अनाधिकृत आहे व जागा अनाधिकृत आहे असे म्हणणे योग्य नाही. पुर्वीचा पुल कोणत्या नियमाने केलेला होता?

श्री. नंदकुमार घोडेले : तीन लक्ष तरतुद असेल आणखी दोन लक्ष मंजूरी देण्यात यावी. विशेष बाब म्हणून प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा.

मा. सभापती : या कामासाठी पाच लक्ष रुपये खर्चास मान्यता देण्यात येते. हा विषय सर्वसाधारण सभेपुढे प्रशासनामार्फत मंजुरीसाठी आणावा.

श्रीमती पार्वतीबाई मानकापे : मनपाच्या जागेचे पी. आर. कार्ड काही लोकांनी त्यांचे नावे केले. असा प्रकार झाला आहे काय? प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा. मनपाकडे पुरावा नसेल तर मी त्याबाबतचे कागदपत्र पुढील बैठकीत प्रशासनाकडे सादर करते.

मा. आयुक्त : प्रशासकीय अधिकारी असतील तर सूचना लक्षात घ्यावी. जागेसंबंधी व्यापक मोहीम प्रशासनाने हाती घेतलेली आहे. यासंबंधीचे काम वरिष्ठ महसुल अधिकारी पाहात आहेत. याबाबतीत मला संबंधित विभागाचे पत्र येत आहे की, आपण आपला प्रतिनिधी ठेवावा. जागेच्या बाबत काही तक्रार असेल तर, स. सदस्य यांनी उपआयुक्त (म) कडे द्यावी.

प्रशासकीय अधिकारी : जागेची पाहणी करुन पंचनामा केला. विधी सल्लागार यांचे विभागामार्फत न्यायालयात त्या जागेच्या संदर्भात प्रकरण चालु आहे. त्या जागेचे पी. आर. कार्ड जो पर्यंत मनपाच्या नांवे होत नाही. तो पर्यंत अतिक्रमणाबाबत कार्यवाही करता येणार नाही. ज्यांचे नांव पी. आर. कार्ड झ ाले ते प्रथम रद्द करणे आवश्यक आहे.

श्रीमती पार्वतीबाई मानकापे : मनपाची जागा लोकांनी नावांवर करुन घेतला. मनपाची जागा आहे हे मनपा प्रशासनास माहीत असतांना अतिक्रमण काढण्यास इतका वेळ का लागतो?

मा. आयुक्त : या प्रकरणाची मी तपासणी केलेली आहे. सभागृहाच्या माहितीसाठी बोलतो की, आयुक्त म्हणून मी एक प्रकारची कार्यपध्दती ठेवलेली आहे. आपल्यासमोर आहे. तयार केलेली नाही. रु मुद्दे काढलेले आहे. प्रत्येक विषयावर सभागृहात चर्चा झाली. त्याची कार्यवाही काय झाली? त्यात आपला मुद्दा आहे. ती संचिका मी वाचली. या जागेवरील स्थगिती आदेश उठविण्यासाठी मनपामार्फत न्यायालयात गेलेलो आहोत. या संदर्भात उपआयुकत (म) यांना तशा सुचनाही दिलेल्या आहेत. ती उप-आयुक्तांकडे पाठपुरावा करण्यासाठी ठेवलेली आहे. एक न्यायलयीन प्रकरण व दुसरे अधिक्षक भुमी अभिलेख यांचे कडील प्रकरण आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : मनपाच्या प्रवेशद्वारासमोर स्मशानजोगी उपोषणास बसलेले आहेत. त्यांची व्यथा प्रशासनाने एकुण घ्यावी. त्यांचे कडुन गेल्या दहा वर्षापासून काम करुन घेत आहोत. त्यात काही लोक माझ्या वार्डातील नक्षत्रवाडी स्मशानभूमी येथील आहेत. दोन वर्षापूर्वी या प्रमाणेच उपोषणास बसले होते. श्री. कांबळे साहेबांनी त्यांचे उपोषण सोडले. त्यांना स्मशान जोगी म्हणून कायमस्वरुपी नोकरीला घेवू असे आश्वासन दिले. या अटीवर त्यांनी उपोषन सोडले होते. स्मशानजोगी म्हणून आदेश नसतांनाही ते स्मशानाची जागा सांभाळतात. काही मोबदला त्यांना देत नाही. सर्व रेकॉर्ड त्यांचेकडे आहे. दैनंदिन माहीती मनपाकडे देतात. प्रतापनगर येथील स्मशानभुमीची तीच व्यथा आहे. तेथेही विना मोबदला स्मशानजोगी काम करतात. असे एकूण आठ-दहा स्मशानजोगी आहेत. त्यांना कोणतेही आदेश नसतांना स्मशान सांभाळतात. त्यांना कामावर घेण्यात यावे. अशी त्यांची मागणी आहे. त्यांना प्रशासन केव्हा न्याय देणार आहे? एक वेळेस त्यांनी उपोषण केले होते. सोडविण्यात आले. त्यांना आश्वासन देवून कार्यवाही केली नाही म्हणून पुन्हा उपोषणास बसले. मा. आयुक्त यांनी आता उपोषण सोडवावे. परंतू पुर्वीप्रमाणे नुसते आशवासन न देता कार्यवाही करावी. गरीबाची जाणीव आयुक्तांना आहे. किती दिवस विना मोबदला काम करुन घेणार आहे

श्री. ठकुजी वाणी : पडेगाव येथील स्मशानजोगी सुध्दा लेकरा-बाळांसह उपोषणास बसलेले आहेत. त्यांना न्याय द्यावा. विना मोबदला काम करुन घेऊ नये.

उपआयुक्त (प्र) : स्मशान जोगी यांचा प्रश्न गेल्या दोन वर्षापासून असून, शहरातील एकुण ३० स्मशानजोगीचा सर्वे केला. ३० स्मशानजोगी पदनिर्मितीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. मागील महिन्यात पदाधिकारी, मा. आयुक्त व सचीव पातळीवर झालेली बैठक या बैठकीत सुध्दा हा विषय होता. पदांना शासनाची मंजूरी आल्यावर तेव्हा नेमणूका देता येतील. कालच त्यांना उपोषण मागे घेण्याबाबत प्रशासनाने विनंती केलेली आहे.

श्री. संजय शिरसाठ : जे स्मशानभूमीचे रेकॉर्ड त्यांचेकडे दिले जाते ते कोणत्या अधिकारात दिला जातो.

उपआयुक्त (प्र) : महापालिकेचे कोणतेही रेकॉर्ड त्यांचेकडे दिलेले नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : सभागृहात चुकीचा खुलासा करु नये. सर्व रेकॉर्ड स्मशानजोगी यांचेकडे दिले जाते. सर्व नोंदी होतात. महापालिकेस माहिती देतात. गेल्या दहा वर्षापासून ते खोली बांधून तेथेच राहतात. खाजगी संस्था नाही.

श्री. संजय शिरसाठ : कदाचित उपआयुक्त (प्र) यांना याबाबतीत माहिती नसेल ते स्मशानभूमी ठिकाणी गेलेले नसतील.

उपआयुक्त (प्र) : ज्या वेळेस नक्षत्रवाडी पडेगाव भागात स्मशानभुमीचा सर्वे केला तेव्हा जे उपोषणास बसलेले आहे ते लोक तेथे नव्हते. तसेच शासनाकडुन पुहा जी. आर. प्राप्त झाला आहे की,

श्री. संजय शिरसाठ : ३० स्मशान भूमीचा सर्वे झाला. उपोषणास बसलेले लोक तेथे नव्हते. किती लोक व कोणत्या स्मशान भूमीत होते. जे होते त्यांना वेतन दिले जाते का

उपआयुक्त (प्र) : १७-१८ लोक समानभुमीच्या ठिकाणी सर्वेच्या वेळी आढळुन आले. त्यांना दैनिक वेतन देतो.

श्री. नंदकुमार घोडेले : जे उपोषणास बसले. त्यांना एक रुपया सुध्दा मानधन दिले जात नाही. ते विना मोबदला आतापर्यंत स्मशानभुमी सांभाळतात. दुसरे असे की, दोन वर्षापूर्वी या लोकांना कामावर घेवून मोबदला देण्याचे आश्वासन दिले होते. आता पून्हा उपोषणास बसलेले आहे. लहान लहान मुले सुध्दा त्यांचे बरोबर आहे. दाखल घेण्यात यावी. प्रशासनावर जबाबदारी आहे. किती वेळेस आश्वासन देवून उपोषण सोडणार आहे. मा. आयुक्त यांनी योग्य निर्णय घ्यावा.

मा. आयुक्त : जो व्यक्ती ज्या पदावर काम करतो ते पद अस्तित्वात आहे का, पद नसेल तर महापालिकेने रेकॉर्ड ठेवले का. असेल तर पद निर्मिती करता येऊ शकेल.

श्री. संजय शिरसाठ : स्मशानभूमीचा सर्वे केला नांवे आहेत. २७ लोकांच्या बाबतीत प्रशासन काय करणार आहे.

मा. आयुक्त : महापालिकेत हा संवर्ग नसावा. येथील स्मशानभूमीचा या शहरातील प्रश्न जुना आहे. त्यामुळे या पदाचा प्रस्ताव पुरवणी म्हणून हा प्रस्ताव आम्ही समाविष्ठ केला आहे.

श्री. ठकुजी वाणी : एक स्मशानजोगी आहे. जो धनगर समाजाचा आहे. त्याया जागी दुसरा काम करतो. हा मात्र पगार घेतो. रेकॉर्डवर स्मशानजोगी म्हणून नांव आहे. परंतू काम करत नाही. पगार घेतो. धनगर जातीचा आहे. पगार कसा उचलतो.

मा. सभापती : प्रशासनाने याबाबत चौकशी करुन कार्यवाही करावी. जे उपोषणास बसलेले आहे. प्रशासन त्यांचे उपोषणा सोडविण्याबाबत कार्यवाही करावी.

श्रीमती पार्वती मानकापे : झोन क्र. ४ मध्ये कर वसुलीसाठी कर्मचारी नाही. एक दै. वेतनावरील कर्मचारी वसुलीचे काम करतात. मागे ४ कर्मचारी सेवानिवृत्त झाले. त्यांचे जागेवर कर्मचारी दिले नाही. वार्डात सुविधा दिल्या जात नाही. एक महिला मजूर कर्मचारी होते त्याची बदली केली त्यांचे जागेवर कुणी दिले नाही.

मा. सभापती : त्वरीत नेमण्यात यावे.

श्री. संजय शिरसाठ : कर आकारणी संदर्भात ५५९ प्रकरणांची चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त केलेली होती. त्या समितीच्या सदस्यांना अदयाप आदेशीत केलेले नाही. स. स. श्री. घोडेले हे सुध्दा त्या समितीचे सदस्य आहेत. त्यांना पत्र वगैरे काहीच अदयापपर्यंत देण्यात आले नाही.

मा. सभापती : स. सदस्यांच्या सूचना लक्षात घेवून सर्व समितीतील सदस्यांना पत्र दयावे.

श्रीमती पार्वती मानकापे : समिती नेमली जाते. कार्यवाही होत नाही.

मा. आयुक्त : कामकाज जलदगतीने चालण्यासाठी सुचना होतात त्याबद्दल मी आभारी आहे. मागील बैठक ०७ तारखेला झालेली होती. माझे अधिकारी/कर्मचारी किती काम करतात या विषयावर नंतर बोलता येईल. सर्वसाधारण सभेत किंवा या समितीत जेव्हा चौकशी समिती नियुक्त करण्याचे आदेश मिळतात. समिती नियुक्त होते. त्यासाठी उतारा सुध्दा मागविण्याबाबत मला पाठपुरावा करावा लागतो. तो पाठविण्याबाबत विनंती आहे.

श्री. संजय शिरसाठ : गेल्या दोन दिवसापूर्वीच्या वृत्तपत्रात वाचले. मा. आयुक्त परदेशी दोऱ्यावर जाणार आहे. ही नेहमीचीच पंरपरा लागते की, काय अशी शंका निर्माण आली आहे. गजभिये साहेब आयुक्त असतांना ते सुध्दा दोन महिने अमेरिकेला गेले होते. त्यावेळी कायम स्वरुपी आयुक्तांची या महापालिकेसाठी मागणी केली होती. अशा काळात ही महापालिका बेवारस होते. नुकतीच विकास कामे व इतर कामाच्या बाबतीत सुसूत्रता आलेली आहे. मा. आयुक्तांनी परदेशी दौयावर जाऊ नये अशी विनंती आहे. त्यांनी जाऊ नये यासाठी लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून काय प्रयत्न करावे त्यांनी मार्गदर्शन करावे तसे प्रयत्न केले जाईल. मुख्य सचिव यांना सुध्दा सांगता येईल की, आयुक्तांना प्रशिक्षणासाठी पाठवू नये.

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : आताच स्मशानभूमीचा प्रश्न उपस्थित झाला होता. विदयुत वाहिनी आणली परंतु उदघाटन झालेले नाही.

कार्य. अभि. (वि) : सध्या बंद आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : विदयूत वाहिनी चालू केलेली आहे. विदयुत वाहिनीची देयक मासिक रु. १०,०००/- विदयूत बील येत होते. उत्पन्न काहीही नव्हते मी आरोग्य समितीचा सभापती असतांना माझे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. तुर्त जनतेची मानसिकता नाही. विदयुत वाहिनी बंद करावी व त्यासंबंधी जाहीर जनतेची मानसिकत नाही. विदयुत वाहिनी बंद करावी. व त्यासंबंधी जाहीर प्रगटर दयावे. १० हजार कसे वाचविता येईल ते पाहावे.

श्रीमती पार्वतीबाई मानकापे : प्रभाग समित्यांचे सभापती निवडले. समितीला कोणतेही अधिकार दिले नाही. यावर्षी अर्थसंकल्पात तरतुद केली नाही. मागील वर्षी तरतुद केलेली होती. सर्वसाधारण सभेने प्रभाग समितीसाठी अर्थसंकल्पीय

तरतुद मंजुर केली. अशी परिस्थिती असेल तर, नागरिकांची विकास कामे कशी होतील? नसता प्रभाग समित्या बरखास्त करण्यात याव्यात. गाडयात काढून घ्याव्यात. एक महिना झाल पत्र देवून काहीही कार्यवाही होत नाही.

श्री. संजय शिरसाठ : महिला सभापतीवर अन्याय होतो. समस्या सोडविता येत नाहीत.

मा. आयुक्त : मी या महापालिकेचा आयुक्त आहे हे खरे आहे. परंतु मी एक सामान्य सरकारी नोकर आहे. ही सत्य बाब आहे. केंद्र सरकारच्या सर्वोच्च पातळीवर प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांमधून कार्यक्रम असतो. निवड होणे हे माझे पेक्षा मनपासाठी अभिमानाची बाब आहे असे म्हटले तरी वेगळे होणार नाही. महाराष्ट्र राज्यामधून माझी तर आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश राज्यातून प्रत्येकी एका अधिकाऱ्यांची निवड झालेली आहे. विषय निघाला म्हणून खुलासा केला.

श्री. संजय शिरसाठ : आपण जाण्यास उत्सुक आहे. अभिनंदनीय बाब आहे. आपल्या प्रशिक्षणापासून या मनपास जास्तीत जास्त फायदा होण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्वाचे ठरावे अशी अपेक्षा आहे. परंतू आपण गेल्यानंतर विकास कामे थांबली जाऊ नये. तसे जे कोणी चार्ज होतील त्यांना अधिकार द्यावेत.

मा. आयुक्त : याबाबत मी स. पदाधिकारी यांचेशी चर्चा केली. मी काही अधिकाऱ्यांना लेखी सूचना देणार आहे. अंदाजपत्रक तयार झाली त्याबाबती ती निविदा स्तरावर निविदा काढणे, प्रसिध्द देणे, एजन्सी फिक्स करणे या पातळीवर कामे राहतील. जे विभाग प्रमुख आहेत. त्यांनी सप्टेंबर आणि ऑक्टोबर या महिन्यात कामांना गती देणे आवश्यक आहे. एजन्सी फिक्स करुन कामास सुरुवात करता येईल. ज्या कामांत अडचण आल्यास त्या अडचणी दूर करण्यासाठी सुध्दा कालावधी वापरला पाहिजे. जेणे करुन कामे मार्गी लागतील. लेखा विभागाचा आढावा घेतला असता पुर्ण वर्षाची तरतुद बुक झालेली आहे. काम करण्यासाठी तरतुद असणे व कामाची मंजुरी असणे याचा समन्वय ठेला तर कामे सुकर होतात. अडचण येत नाही. या दृष्टीनेच मुख्य लेखाधिकारी यांनी स्थायी समितीसमोर तसा प्रस्ताव दिलेला आहे. त्यावर विचार होणे आवश्यक आहे. जेणेकरुन वार्षीक अंदाजपत्रक व होणारे कामास नक्कीच आकार देता येईल. ज्या आर्थिक अडचणी लेखा विभागाच्या पातळीवर आहेत. त्याबाबतीत मी निर्णय घेवू शकणार नाही. ज्या ज्या योजना त्यात महिला व बाल कल्याण, शिक्षण प्रकल्प आरोग्य विभागाच्या आहेत. त्यांना गती देण्यासाठी बाहेरुन सुध्दा निधी आलेला असून, यासाठी आयुक्तांना स्वतंत्र आदेश देण्याची गरज नाही. शासनाकडे विभाग प्रमुखांना निकष, निधी व कशा पध्दतीने त्या योजना अंमलात आणायच्या यांच्या सूचना प्राप्त होतात. त्यामूळे तीन चार विभागातील हे काम पुढील महिन्यापर्यंत प्राधान्याने करणे आवश्यक आहे. अमुक विभागासाठी इतका निधी दिला होता. त्यांचे काय केले? असा उलट प्रश्न विचारला जाऊ शकतो. अशा प्रकारची कामे आयुक्त स्वतः करतात असे नाही. प्रशासनाने या कामास गती देणे हे विभाग प्रमुखांचे काम आहे. दुसरा मुद्दा असा की, जी स्पील ओव्हरची कामांबाबत आढावा घेतला. अनिष्ठ प्रथा आहे. वर्षानुवर्षे चालू आहे. कामानिहाय आढावा घेण्याच्या सवत सूचना दिलेल्या आहेत. यासाठी मी पुन्हा चार कार्यकारी अभियंता यांचेकडुन आढावा घेवून त्यावर मुख्य लेखाधिकारी हे लक्ष घालणार आहेत व सन २००३-२००४ या वर्षातील

स्पील ओव्हर राहायला नको यासाठी प्रयत्न करणार आहे. महत्वाचा मुद्दा अनाधिकृत वसत्यातील कामांना प्रशासकीय मान्यता देवू शकत नाही. अनाधिकृत वस्त्यात यापुर्वी विशिष्ट परिस्थितीत कामे झालेली आहेत. त्यावर देखभाल दुरुस्तीची कामे घेण्यासाठी शासनाकडे मंजुरी घेण्याकरीता पाठपुरावा चालु आहे. हा विषय शासनाकडे पत्र व्यवहार करुन होणार नाही. तर पुन्हा पदाधिकारी व आयुक्त यांनी शासनाकडे जावून पाठपुरावा करणे गरजेचे आहे. नवीन कामे नसली तरी जुन्या कामांसाठी मानवतेच्या दृष्टीने प्रयत्न करणे योग्य ठरले. शासन मंजुरी देईल असे अपेक्षीत आहे. मागचा सर्व इतिहास बोलणे व वेळ वाया घालविणे बरोबर होणार नाही. परंतु ज्या जागा रेखांकनातल्या असतील. डी. पी. प्लॅन मधल्या असतील ते वैधानिकरित्या दुसऱ्यांच्या नावांवर होत नाही. त्या मनपाच्या असतात ही बाब प्रशासनाला माहीत आहे. तर या बाबतीत कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. जी काही प्रॉपर्टी रेकॉर्ड समोर आली व येतील त्या त्या वादाच्या जमीनी आहेत. त्यांचा नियमीत आढावा घेण्यासाठी उपआयुक्त (म) यांना सुचना दिलेल्या आहेत. महत्वाच्या प्रकरणांचा अभ्यास करुन काही प्रकरणांस न्यायालय व भूमी अभिलेख कार्यालयात अपिलास वेळ लागतो. म्हणून एक प्रकारे प्रशासनाने जाणीवपुर्वक कार्यवाहीस सुरुवात केली आहे. मनपाच्या मालकीच्या जागा भविष्यात विकास कामे होण्यासाठी अडचण निर्माण होऊ नये म्हणुन सर्व रेकॉर्ड मनपाकडे असणे आवश्यक आहे मला खात्री आहे. उपआयुक्त (म) व इतर खात्याचे जे संबंधित अधिकारी यांचे सहकार्याने हे काम करतील. जिल्हाधिकारी, महसूल आयुक्त यांचे सहकार्य लागेल ते मिळेल. मी स्वतः हाताळतो. पुढच्या काही महिन्यात दिसून येईल. मालमत्ता विभागाकडुन कालमर्यादीत (Time Bond) कार्यवाही होण्याची गरज आहे. चालढकल व्हावयास नको. नगररचना विभागाच्या बाबतीत वैयक्तिक बांधकाम परवानग्यांच्या बाबतीत सहा. संचालक नगररचना यांचे पातळीवर आढावा झालेला आहे. सर्वसाधारण सभेत चर्चा झाली परंतू आयुक्त स्तरावर अभ्यास झाल्यानंतर स्थायी समितीसमोर पुढील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी अहवाल ठेवावा अशी मी सूचना करतो.

मा. सभापती : प्रशासनाने शासनाकडे तात्काळ पाठपूरावा करावा.

श्री. माणिक साळवे : मनपा अस्थापनेवर वरिष्ठ लिपीक, कार्यालयीन अधिक्षक व लिपीक अशी पदे मंजूर आहेत. कार्यालयीन अधिक्षकाची आठ पदे रिक्त असून तीन पदावर कायम नियुक्त्या केल्या तर पाच पदांवर अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. वरीष्ठ लिपीकांची पदे रिक्त आहेत. लिपीक पदाची मंजूर असलेली पदे २४८ असून, सध्या १५ पदे रिक्त आहेत. मनपा अस्थापनेवर २५.०० वर्षापासून काही कर्मचारी काम करतात. त्यांना पदोन्नती दिली जात नाही. तरी मनपावर कोणताही जास्तीचा बोजा पडणार नाही. कारण यापुर्वीच यात ते बारा वर्षाची समय श्रेणी देण्यात आलेली आहे. पदनाम द्यावे. पदे भरावी. तसेच करमूल्य निर्धारक व जकाती निरिक्षक ही पदे सुध्दा रिक्त असून, त्यासंदर्भात कार्यवाही व्हावी. जकात विभागाकडुन या संदर्भात मागणी झालेली असतांना का पदे भरली जात नाहीत खुलासा करावा.

उपआयुक्त (प्र) : मनपाच्या विविध स्तरावरील पदे रिक्त आहेत. जेष्ठ लिपीक, कार्यालयीन अधिक्षक या पदाच्या भरतीबाबत निवड समीतीची बैठक झाली त्या

संदर्भातील संचिका मा. आयुक्तांकडे पाठविलेली आहे. जकात निरिक्षक पद रिक्त नाही.

मा. आयुक्त : या संदर्भात संचिका माझ्याकडे असेल तर, नक्कीच मी विचार करेन. परंतू कोणतेही पदे भरण्याबाबत शंभर टक्के शासनाची बंदी आहे. अनुषेश पदे जी आहेत. ती भरणे बाबत शासनाचा आग्रह आहे. ती भरण्याची प्रक्रिया चालु आहे. अनुषेश पदे भरणा झाल्यानंतर खुल्या जागांच्या बाबतीत काय प्रस्ताव आहेत ते उपआयुक्तांनी दाखवावे.

मा. सभापती : रिक्त असलेली पदे भरण्याबाबत प्रशासनाने तात्काळ पाठपुरावा करावा. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा.

ठराव :

दिनांक ०७-०८-२००३ रोजी संपन्न झालेलया स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. २५ :

(दि. ०७-०८-०३ च्या सभेतील स्थगीत ठेवण्यात आलेला विषय क्र. १२)

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मिळकत सर्व्हे नंबर २३/६ जयसिंगपूरा भागशः क्षेत्र सहा एकर दोन गुंठे मोजणी नकाशानुसार क्षेत्र दोन हेक्टर तीस आर (२३००० चौ. मी.) या मिळकतीवर अर्जदार दि. फ्रांसीस कार्पोरेशन रोमन कॉथालिक चर्चकरीता विदयमान फादर जार्ज (ट्रस्टी) यांनी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक १६९/१७/२००२ नुसार बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला असून, या प्रस्तावामध्ये मतिमंद मुलांसाठीची शाळा, व्यावसायिक शिक्षक केंद्र व कर्मचारी निवासस्थान या इमारतीसाठी बांधकाम प्रस्तावित केले असून, विकास नियंत्रण नियमावली नुसार आवश्यक खुली जागा रस्त्याचे नियोजन ही केलेले आहे. सद्यस्थितीत या मिळकतीमध्ये मतिमंद मुलांची शाळा अस्तित्वात असणाऱ्या जुन्या इमारतीमध्ये भरते. ती पाडावयाची प्रस्तावित केले आहे.

प्रस्तावाअंतर्गत मिळकतीस अधिकृत पोच रस्ता उपलब्ध नाही. करीता अदयाप पावेतो संबंधित अर्जदारास विकास परवानगी अनुज्ञेय केली नाही. तथापि या प्रकरणी अर्जदार यांना प्रस्तावित मिळकतीच्या उत्तरेस असणाऱ्या व अनाधिकृतरित्या बसलेल्या आमाननगर, न्यु नंदनवन कॉलनीच्या वसाहतीमधुन पोच रस्ता उपलबध असून, सदरील ४.५० मीटर रुदं पोच रस्ता अर्जदार हे बऱ्याच वर्षापासून वापरत आहे व या रस्त्यालगत असणाऱ्या रहिवाश्यंनी गुंठेवारी अधिनियम अंतर्गत त्यांची बांधकामे नियमित करण्यासाठी महानगरपालिकेकडे अर्जही केलेले आहेत. सदरील विद्यमान रस्ता पोच रस्ता गृहीत धरुन विकास परवानगी द्यावी. अशी अर्जदाराची मागणी आहे. तसेच प्रस्तावाअंतर्गत विकासाची कामे आम्ही स्वखर्चाने करुन व त्याचे कायमस्वरुपी देखभाल दुरुस्तीही आम्हीच करु करीता विकास खर्च आकारु नयेत अशी अर्जदाराची विनंती आहे. याप्रकरणी अर्जदाराकडुन हमी पत्र घेता येवू शकेल तरी.

१. उक्त नमुद अनाधिकृत वसाहतीमधील विद्यमान पोच रस्ता गृहीत धरुन विकास परवानगी अनुज्ञेय करणे.

२. अंतर्गत विकास कामासंबंधी अर्जदाराकडुन हमी का घेवुन अर्जदारास विकास परवानगी अनुज्ञेय करणे.

या दोन मुद्यावरील निर्णयासाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

संवाद :

श्री. संजय शिरसाठ : माझा विरोध आहे नोंदवुन घ्या. सहा. संचालक नगररचना यांचे मत घ्यावे. ४-५० मीटरचा रस्ता आहेत. एकुण सहा एकर जागा आहे. लिटल प्लॉवर शाळेजवळ ८० फुटांचा रस्ता असतांना शाळा सुटल्यानंतर मुलांना जाण्यायेण्यासाठी रस्ता नसतो. सहा एकर जागेवर परवानगी देणार त्या बाजुला ४.५० मीटर रुंद रस्ता मोडणे कायदेशीर योग्य होते का? मागील बैठकीत या विषयावर चर्चा झाली. स्थळ पाहणी करण्याचा निर्णय झाल. स्थळ पाहणी केली का? खुलासा करावा.

श्री. नंदकुमार घोडेले : सहाय्यक संचालक नगररचना यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक न. र. : या संदर्भात जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता स. सदस्य जयवंत ओक तसेच नगररचनाकार-१ व मी स्वत: जागेची पाहणी करण्यासाठी गेलो होते. मतीमंद मुलांची शाळा व व्यवसाय केंद्रासाठी परवानगी आहे. ४.५० मी. रुंद रस्ता अमाननगर न्यु नंदनवन कॉलनी इत्यादी वसाहतीतुन जातो. हा भाग गुंठेवारी विकास योजनेत येणार आहे. रस्ता जागेवर आहे. बाजुला दोन-तीन मजली घरे सुध्दा झालेली आहेत.

श्री. संजय शिरसाठ : या दोन्ही कॉलनीत गुंठेवारी कायदा लागू केलेला आहे का? येणारी वाहतुक व वर्दळ, विद्यार्थी, पालक हे या जागेवरुन जातील का? फिजीबल आहे का? तेथे होणाऱ्या वर्दळीचा व वाहतूकीचा विचार केलेला आहे का?

श्री. संजय शिरसाठ : सहाय्यक संचालक नगर रचना म्हणून आपले मत काय आहे? यात अटी दिल्या त्याबद्दल सुध्दा खुलासा व्हावा.

सहा. संचालक न. र. : सदरील वस्ती ही विकास आराखडयानुसार निवास वापरासाठी आहे. सहा. संचालक नगररचना म्हणून मी माझे मत मांडतो की, गुंठेवारी अधिनियमाच्या कलम ३ पोटकलम २ खंड (ख) नुसार रस्ते हक्क सोड प्रमाणपत्राद्वारे हस्तांतरीत करुन घेण्याची गुंठेवारीत तरतुद नाही. परंतु ओपन स्पेस म्हणून दहा टक्के जागा घेण्याची तरतुद आहे. रस्ते देखभाल दुरुस्ती करावे लागतील. जेव्हा गुंठेवारी कायदयाअंतर्गत नियमीत करु तेव्हा आवश्यक रुंदीसाठीचे रस्ते करुन घ्यावे लागतील. शाळेसाठी जी पार्कींग होणार आहे. त्या सहा एकर जागेतच तरतुद करण्यात येईल.

श्री. संजय शिरसाठ : प्रश्न वेगळा विचारलेला आहे. उत्तर दुसरे देण्यात येते. जो प्रस्ताव आला त्यास मंजूरी देणे योग्य की अयोग्य हे सांगावे. सहा एकर मध्ये बांधकाम करणार आहेत. बेटरमेंट चार्जेस सुध्दा होत नाहीत. एकीकडे उत्पन्न वाढविण्याबाबत घोषणा केली जाते. ही प्रस्ताव मंजुर करणे योग्य की, अयोग्य एवढाचा खुलासा करावा. बांधकाम परवानगी देता येते की, नाही? यात मनपाचे नुकसान होणार आहे. याचा विचार करणार नाही का? व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र आहे. हे व्यापारी तत्वावर चालणार आहे मुलांकडून २५०-३०० फीस होणार आहे यात सर्व माफ करतो आहोत मनपाचे आर्थिक नुकसान नाही का

श्री. नंदकुमार घोडेले : वाहतुकीच्या दृष्टीकोनातून ८.५ मीटर हा एकपदरी/एकेरी रस्ता वाहतुकीसाठी योग्य होईल का?

सह. संचालक न. र. : प्रस्ताव सभागृहाच्या मान्यतेसाठी आलेला आहे. स्थायी समितीने ठरवावे.

श्री. नंदकुमार घोडेले : स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले होते. ४.५० मी. रुंद रस्ता नियमानुसार बरोबर आहे का? मंजुरी देणे योग्य की, अयोग्य हे सांगावे. आम्ही या क्षेत्रात तज्ञ नाही

सहा. संचालक न. र. : परवानगी देणे योग्य होईल.

श्री. संजय शिरसाठ : सहा. संचालक नगररचना यांनी माझा मुद्दा लक्षाम घ्यावा. सहा एकर जागेवर बांधकाम परवानगी देणार या लोकांना जाण्यासाठी रस्ता नाही. जो ४.५० मी. रुंदीचा रस्ता आहे तो सुध्दा त्या संस्थेच्या मालकीचा नाही. अप्रोच रस्ता आहे. मंजुर करणे योग्य असे आपले म्हणणे रेकॉर्डवर आले. भविष्यात असेच प्रकरण समोर आले, एखादयाने परवानगी मागितली तर रस्ता नसतांना परवानगी द्यायची असेल तर, असे प्रस्ताव स्थायी समिती समोर आणण्याची गरज नाही. सहा. संचालक नगर रचना यांना अधिकार आहे. मंजुरी द्याल का? खुलासा करावा.

श्री. नंदकुमार घोडेले : परिस्थिती बघून मंजुरी द्यायची का. असा त्याचा अर्थ निघतो. असे प्रस्ताव आणण्याची गरज काय?

सहा. संचालक न. र. : विशिष्ट परिस्थिती असल्याने असा प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा. आयुक्त : सहाय्यक संचालक नगररचना यांनी खुलासा केला. त्यांना पद म्हणून खुलासा करणे अपेक्षीत असते. यात दोन मुद्दे आहेत. रस्त्याची रुंदी, या रस्त्याची लांबी, व वाहतुक यावरच अवलंबून असते. पाहणी करुन सुस्पष्ट मत देणे आवश्यक होते. पहिला मुद्दा असा की, रस्त्यांची रुंदी ४.५० मीटर की, त्यापेक्षा जास्त ठेवणे आवश्यक आहे. अधिकृत मालकी हक्क तपासणे व त्याबाबत वाटाघाटी (निगोसिएशन) करणे कायदयाखाली त्या जागेचा मोबदला देणे हे त्या संदर्भात उत्तर होवू शकते. कायदयात जी तरतुद आहे. त्यानुसार अभिप्राय द्यावे लागतील. असा आयुक्त म्हणून माझा खुलासा आहे.

श्री. संजय शिरसाठ : देखभाल दुरुस्ती आम्हीच करु. विकास खर्च आकारणी करु नये असे दिले. अशा पध्दतीने मान्यता देता येते का? याचा सुध्दा स्पष्टीकरण झाले पाहिजे.

सहा. संचालक न. र. : सदर प्रस्ताव सेल्फ डेव्हलपमेंट अंतर्गत आलेला आहे.

श्री. संजय शिरसाठ : विकास खर्च वसुल करावा. मनपाच्या उत्पन्नाचा प्रश्न आहे. उदया सामान्य व्यक्तीने परवानगी मागितलयास परवानगी द्यावी लागेल. सहा एकरमध्ये निवासस्थान आहे. पाणी पूरवठा द्यावा लागेल. सर्व सुविधा द्याव्यात लागणार आहेत. व्यवसाय प्रशिक्षण चालणार. व्यापारी तत्वावर ही संस्था चालणार परंतु ८.५० मीटरचा रस्ता असतांना बांधकाम परवानगी देणे योग्य आहे का या प्रस्तावास मंजुरी दिल्यास भविष्यात ले-आऊटसाठी एखादे प्रकरण अशा प्रकारे आल्यास त्यास नामंजूर केल्यास संबंधित अधिकारी जबाबदारी राहतील. प्रस्ताव मंजूर करणे योग्य आहे. असे अधिकाऱ्यांनी सांगितले. रेकॉर्ड झाले. पुन्हा त्यांनी खुलासा करावा नसता प्रसताव स्थगित ठेवावा.

श्री. ईलीयास किरमाणी : स्थगित करा पुढील बैठकीत ठेवा.

सहा. संचालक न. र. : मा. आयुक्तांनी ज्या सुचना दिल्या. सर्व तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सौ. शाहीन जफर : स्थगित करुन अभ्यासासाठी वेळ द्यावा.

मा. सभापती : हा प्रस्ताव मागील बैठकीत स्थगित ठेवला होता. किती वेळा स्थगित देणार?

श्री. नंदकुमार घोडेले : ही चूक सभागृहाची नाही. प्रस्ताव सादर करतांना योग्य रितीने ठेवावा. रस्त्याबाबत स्पष्ट असा अभिप्राय संबंधित अधिकाऱ्यांनी दिला नाही. आताच मा. आयुक्तांनी सांगितले ट्राफिक किती, रुंदी किती लांबी किती याचा प्रस्तावात कुठेच उल्लेख नाही.

मा. सभापती : सहा.संचालक नगररचना हे नव्यानेच आलेले आहेत.

श्री. नंदकुमार घोडेले : सविस्तर माहिती घेवून प्रस्ताव यावयास पाहिजे. एखादी दुर्घटना घडली दोन गाडया ४.५ मीटर मधून जातील का? महानगरपालिकेचे हित बघावे.

श्री. संजय शिरसाठ : आपण अत्यंत आस्था दाखविता मुळात हा स्थायी समितीचा विषय नाही. कोणत्या नियमान्वये परवानगीची मान्यता देय होते? ते सुध्दा माहित नाही. सहा. संचालक नगररचना हे नवीन नाहीत. या क्षेत्रातील कामाचा अनुभव मोठा आहे. शहराच्या दोन लक्ष मालमत्तेचा सांभाळ करतात. ते नवीन आहेत असे म्हणणे चुकीचे होईल. तुम्ही आम्ही काय म्हणतो याला महत्व न देता कायदा काय म्हणतो याचा विचार करावा. सहा. संचालक नगर रचना यांनी पाहणी केली. सभापती यांनी सुध्दा या प्रस्तावाच्या संदर्भात प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी. ह्या प्रस्तावात ४.५० मीटर रुं पोच रस्ता अज्रदार हे बऱ्याच वर्षापासून वापरत आहेत. सदरील विदयमान रस्ता हा पोच रस्ता गृहीत धरुन विकास परवानगी द्यावी असे बंधनकारक आहे का आपण स्वत: निर्णय दयावा. तेथील नागरिकांना त्रास होणार आहे. यास मनपा जबाबदार राहील. अभ्यास करण्यासाठी वेळ मागितला. सविस्तर माहिती दयावी.

सौ. शाहीन जफर : प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री. संजय शिरसाठ : प्रस्ताव मंजूर करायचा असेल तर, आमचा विरोध नोंदवावा. आपल्या अधिकारात द्यावे. ज्यांनी व्यक्तत्य केले आहे. त्याची नोंद घ्यावी.

श्री. नंदकुमार घोडेले : एखादया रस्त्याचे नियमाने कागदपत्र तयार करायचे असेल तर, हेड इन्व्हेस्टमेंट असून, देखील दस्तऐवज तयार करतो. कागदपत्र मनपाच्या ताब्यात ठेवतो. त्यानंतर बांधकाम परवानगी देण्यात येते. सर्व कागदपत्र बाधून निर्णय घ्यावा. इतिवृत्तात नोंदी घ्याव्या. विरोध नोंदवावा उदया काही घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणावर राहणार ते सुध्दा फिक्स करावे. मनपाचे त्यात नुकसान होता कामा नये. योग्य तो निर्णय घ्यावा.

सौ. सुवर्णा चंद्रात्रे : रस्ता पहिल्यापासुन चालु आहे. मंजुर करावे.

मा. सभापती : वारंवार प्रस्ताव स्थगित ठेवणे बरोबर वाटत नाही.

श्री. संजय शिरसाठ : प्रस्ताव मंजूर करणे योग्य होणार नाही. यात नगरसेवकांच्या दोष नाही. संबंधित अधिकारी जबाबदार आहे. त्यांना निलंबीत करावे. मनपाचे नुकसान होणे आम्हा सदस्यांना बरोबर वाटत नाही. संबंधित अधिकारी जबाबदार आहे. निलंबीत करण्याचे आदेश द्यावे.

श्री. नंदकुमार घोडेले : अधिकाऱ्यांनी सविस्तर अहवाल देण्यासाठी वेळ मागितला. अहवाल दिल्या नंतरच प्रस्ताव मंजूर करावा. मनपाचे नुकसान होवू नये.

सौ. सुवर्णा चंद्रात्रे : रस्ता देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम आपणावरच अवलंबून आहे.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : हा प्रस्ताव मंजूर करण्यास आमचा विरोध आहे. अहवाल येवू द्यावा नंतर निर्णय घ्यावा.

मा. सभापती : ज्यांचा विरोध असेल, त्यांचा विरोध नोंदवावा. दोन स. सदस्यांचा विरोध नोंद करुन प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. महत्वाचा प्रस्ताव आहे म्हणून मंजूर केला.

श्री. नंदकुमार घोडेले : अधिकारी काय बोलले नोंद व्हावी. ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांनीच अहवाल देण्यासाठी वेळ मागितला असे असतांना सुध्दा मंजूरी देणे कितपत योग्य होवू शकते.

सौ. सुवर्णा चंद्रात्रे : स. सदस्यांचा विरोध नोंदवून प्रस्ताव मंजूर केल्यास त्यावर पुन्हा चर्चा नको.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर शाळेचा प्रश्न आहे. मुलांचा प्रश्न आहे. आपण मंजूर करुन परत स्थळ पाहणीसाठी जाऊ प्रत्यक्ष स्थळ पाहणी सुध्दा मी स्वतः करेन स. सदस्यांना सोबत घेवून जाईल.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे दि. फ्रांसीस कार्पोरेशन, रोमन कॅथालिक खर्च करीता विदयमान फादर जार्ज (ट्रस्टी) यांनी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक १६९/१७/२००२ नुसार बांधकाम परवानगीसाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनाचे मत विचारात घेवून मतिमंद मुलांसाठीची शाळा, व्यावसायिक शिक्षक केंद्र व कर्मचारी निवासस्थानासाठी बांधकाम परवानगी प्रस्तावित असल्याने उक्त नमुद दोन अटीस अधिन राहुन अर्जदाराकडुन हमी पत्र घेवून अर्जदारास विकास परवानगी अनुज्ञेय करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २६ :

(दि. ०७-०८-०३ च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. १३)

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना वाढीव रद्द नुसार मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्र. २२०/१ मिळकत हर्सुल जटवाडा रोडवर असून, या मिळकतीमधील अर्ध्या भागावर रेखांकन मंजुर झालेले असून, या रेखांकनास अंतिम मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे त्या भागाचे रस्ते व खुली जागा मनपास हस्तांतरीत झाले आहेत. आता अर्जदार क्र. (०१) श्री. अशोक राधाकृष्ण अतकरे (०२) पद्मा विश्वासराव धनवट (०३) पुष्पा विलासराव साळुंके यांनी स. न. २२०/१ या मिळकतीवरील उर्वरीत भागांवर रेखांकन प्रस्ताव दाखल केला होता. त्यास महानगरपालिकेने तत्वतः मान्यता दिलेली आहे. या रेखांकनातुन १२ मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता जात असून, अर्जदारास १०० विकास खर्च व १०० जमीन विकास शुल्क भरण्यासाठी पत्र जा. क्र./मनपा/नवी/१००६/०२ दिनांक ३०-०४-२००२ ला दिले असता त्यांनी १०० जमीन विकास शुल्क रक्कम रु. १,६४,११०/- रक्कम चलन क्र. ००५१०७ दि. ०१-०६-२००२ अन्वये महानगरपालिकेत जमा केलेले आहेत. तथापि विकास खर्चाचे (बेंटरमेंट

चार्जेस) च्या बाबतीत अर्जदार यांनी १२ मीटर विकास योजना रस्त्याचे मोबदल्यातून विकास खर्च वळती करुन घ्यावा अशी विनंती केली होती. त्या अनुषंगाने सदरील १२ मीटर रुंद विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्र चौ. मी. असून, त्याचा मोबदला सन २००३ चे शिघ्र-शिध्द गणकानुसार रु. १०० प्रति चौ. मी. खुल्या जागेसाठी मोबदला रक्कम रु. ८,७७,२८०/- होते.

अर्जदारास वरील रेखांकनासाठी रु. ११,४८,९५२/- एवढा विषय विकास खर्च भरणे आवश्यक आहे. वरील मोबदला रक्कम रु. ८,७७,२८०/- ही विकास खर्चाने रक्कमेत वळती करुन समायोजीत करण्याची व उर्वरीत विकास खर्च (रु. ११,४८,९५२/- रु. ८,७७,२८०, रु. २,७१,६७२/-) अर्जदाराकडु भरुन घेण्याची मान्यता घेण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७७ अन्वये मा. स्थायी समोर ठेवणेसाठी मा. आयुक्तांनी मंजूरी दिली आहे.

मिळकत धारकांने विकास योजना १२ मीटर (४० फुट) रुंद रस्त्याचे बाधीत क्षेत्र २७९६ चौ. मी. हे महनगरपालिकेस नोंदणीकृत हक्कसोड पत्र (रिलीक्कशमींट डिड) ने हस्तांतरीत करुन देणे व महानगरपालिकेच्या नांवे ७/१२ वर नोंद करुन देणे आवश्यक राहील करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना वाढीव रद्द नुसार मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्र. २२०/१ या मिळकतीमधील १२ मीटर रुंद विकास योजना रस्ता ह्या प्रस्तावाने बाधीत क्षेत्र २७९६ चौ. मी. संपादन करण्यास व सदर क्षेत्राचा मोबदला रक्कम रु. ८,७७,२८०/- सदर मिळकती वरील या कार्यालयात दाखल रेखांकनाचे एकुण विकास खर्च रक्कम रुपये ११,४८,९५२/- या रक्कमेत समायोजीत करुन घेण्यास (भुसंपादन) व उर्वरीत रक्कम रुपये २,७१,६७२/- अर्जदारांकडुन भरुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र २७ :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. सादतनगर (स्लम) येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता र. रु. १४,९९,१३२/- चे अंदाजपत्रक सा. बा. दरसुची सन २००१-२००२ नुसार तयार करण्यात आले असून, मा. आयुक्तांनी दि. १०-०१-२००३ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तसेच दि. १५-०२-२००३ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभा विषय क्र. ६९ अन्वये सदरील प्रस्तावास मंजूरी मिळाली आहे. स्थायी समितीची मंजूरी मिळाल्यानंतर रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/नि/७५/२००३ द्वारे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विकण्याचा अंतीम दि. ०६-०३२००३ पर्यंत एकुण १० कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याचा अंतीम दि. १७-०३-२००३ रोजी फक्त ०५ (पाच) मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दिनांक ०१-०४-२००३ रोजी उपस्थित ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१.	श्री. के. बी. पाथ्रीकर	अं. प. दरापेक्षा ०१% कमी दराने
२.	मे. एस. कन्स्ट्रक्शन	अं. प. दराने
३.	श्री. एम. ए. सिध्दीकी.	अं. प. दरापेक्षा ०३% जास्त दराने
४.	मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन	अं. प. दरापेक्षा ०५% जास्त दराने
५.	श्री. डी. अजितसिंग	अं. प. दरापेक्षा ०६% जास्त दराने

सदरील ठेकेदारांनी भरलेले दर हे या कार्यालयात जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांच्या तजविजीनुसार संबंधित ठेकेदार यांना दराच्या प्रत्यक्ष वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता दराच्या वाटाघाटी अंती मा. आयुक्त यांनी ०१% कमी दराऐवजी ०३% कमी दराने मंजुरी दिली आहे. करीता १% कमी ऐवजी श्री. के. बी. पाथ्रीकर यांची अं. प. दरझ्रिपेक्षा ०३% कमी दराची निविदा स्विकारण्याचे योजिले आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ व अवलोकनार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. सादतनगर (स्लम) येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. के. बी. पाथ्रीकर यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री. के. बी. पाथ्रीकर यांचेकडुन अं. प. दरापेक्षा ३% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २८ :

मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रमाणेयाही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत सन २००३-२००४ साठी तयार गणवेश देणे आहे. यास्तव खालील वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली.

१. दैनिक लोकमत, औरंगाबाद,
२. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई
३. दैनिक सकाळ, पुणे

एकुण ०७ निविदा विक्री झाल्या पैकी ०८ निविदा लेखा विभागात प्राप्त झाल्या. सदरील प्राप्त निविदा मधील पाकीट क्र. १ उघडण्यात आले. संबंधिताचे निविदेच्या अटीनुसार मागविण्यत आलेले सर्व कागदपत्रे असल्याने त्यांचे प्रथम लिफाफाबिड मान्य करुन त्यांनी दिलेले कापडाचे नमुने मे. केंद्रीय कपास प्रौद्योगिक अनुसंधान संस्थान मुंबई येथे निविदा विवरणाप्रमाणे कापड आहे किंवा नाही हे तपासण्यास्तव दि. ११-०६-२००३ रोजी पाठविण्यात आले.

मे. केंद्रीय कपास प्रौद्योगिक अनुसंधान संस्थान मुंबई यांच्याकडुन दि. १५-०७-२००३ रोजी फॅक्सद्वारे अहवाल प्राप्त झाला. प्राप्त तपासणी अहवालानुसार मे. सरस्वती महिला विविध उदयोग सहाकारी संस्था लि. जळगांव मे. वैष्णवी महिला बहुउद्देशीय संस्था, बार्शी या दोन संस्थेचे अनुक्रमे पांढरे व निळे कापडाचे नमुने दरपत्रकातील नमुन्यानुसार असल्याचे अहवाल प्राप्त झाले. तथापी खाकी कपडयाने अहवाल प्राप्त न झाल्याने कार्यालयाने दि. २५-०७-२००३ रोजी मे. सरकॉट मुंबई यांना खाकी कपडयांमध्ये पाठविलेल्या चार नमुन्यांपैकी कोणता नमुना विवरणामध्ये वापरण्यास योग्य असले बाबत अहवाल मागविण्यात आला होता. मे. सरकॉट मुंबई यांचे दि. ०४-०८-२००३ चे फॅक्सद्वारे प्राप्त पत्रानुसार मे. शुभम इंडस्ट्रीज पैठण यांचा नमुना योग्य असल्याबाबत अहवाल प्राप्त असल्याने संबंधित चारही निविदा धारकाचे दराचे पाकीट क्र. २ उपस्थित निविदाधारकाचे समोर उघडण्यात आले.

वरील निविदाधारकांनी दिलेल्या दरानुसार प्राप्त दरांचा तक्ता सोबत जोडण्यात आला असून, अधोरेखीत केलेले दर हे वेगवेगळया साहित्यात एकुण दोन निविदाधारकांचे दर तुलनात्मकदृष्ट्या तसेच कापडाचे प्राप्त अहवालानुसार कमी आले आहेत. ते खालील

प्रमाणे मे. एम. एस. आय. डी. सी. औरंगाबाद यांचे एकही साहीत्याचे नमुने हे विवरणानुसार नसल्याचे अहवाल प्राप्त असल्याने तसेच मे. वैष्णवी यांचे फक्त निळे कापड हे विवरणानुसार असल्याचा अहवाल मिळाल्याने व त्यांचे दर इतर निविदाधारकांपेक्षा जास्त असल्याने त्यांचा विचार करण्यात आलेला नाही.

१. मे. सरस्वती महिला विविध उद्योग सहकारी संस्था लिमिटेड, जळगांव : एकुण तेवीस (२३) बाबी.

२. मे. शुभम इंडस्ट्रीज, पैठण : एकुण आठ (८) बाबी.

वरील प्रमाणे एकुण ३१ ॲटमच्या दरामध्ये मे. सरस्वती महिला विविध उदयोग सहकारी संस्था लिमिटेड, जळगांव यांचे २३ ॲटम्समध्ये तर मे. शुभम इंडस्ट्रीज पैठण यांचे आठ ॲटममध्ये तुलनात्मकदृष्ट्या कमी दर आहे. वरील दोन्ही एजन्सीने दिलेले कापडाचे नमुने निविदा विवरणानुसार प्राप्त असल्याने व प्राप्त दर हे सरासरी गतवर्षीच्या मान्य दराचे तुलनेत कमी प्राप्त झाल्याने प्रस्ताव मंजूरीस्तव मा. आयुक्त यांच्याकडे दि. २५-०८-२००३ रोजी सादर करण्यात आला.

शिक्षणाधिकारी यांनी दि. १६-०८-२००३ रोजी दिलेल्या विद्यार्थी संख्येच्या आधारे खालील प्रमाणे खर्च दर्शविण्यात आलेला आहे.

अ. क्र.	साहित्याचा तपशील	वयोगट (वर्ष)	दर (रु.)	नग	खर्च (रु)
अ)	**मुलांसाठी खाकी रंगाची हाफ पॅन्ट**				
१.	बालवाडी	५ ते ६	१५.१०	२५५४	३८५६५
२.	इयत्ता १ ली	६ ते ७	१६.१०	२१४२	३४४८६
३.	इयत्ता २ री	७ ते ८	१८.३०	१९०६	३४८८०
४.	इयत्ता ३ री	८ ते ९	२०.०५	१७४९	३५०६७
५.	इयत्ता ४ थी	९ ते १०	२१.१०	१६०८४	३५५३२
६.	इयत्ता ५ वी	१० ते ११	२२.१०	१४०६१	३२२८८
	मुलांसाठी खाकी रंगाची फुल पॅन्ट				
७.	इयत्ता ६ वी	११ ते १२	६०.७५	१३०४३	८१५८७
८.	इयत्ता ७ वी	१२ ते १४	६६.१०	११०८२	७८१३०

ब)	**मुलांसाठी पांढऱ्या रंगाचा हाफ शर्ट**				
१.	बालवाडी	५ ते ६	१३.५०	२५५४	३४४७९
२.	इयत्ता १ ली	६ ते ७	१४.००	२१४२	२९९८८
३.	इयत्ता २ री	७ ते ८	१५.००	१९०६	२८५९०
४.	इयत्ता ३ री	८ ते ९	१७.००	१७४९	२९७३३
५.	इयत्ता ४ थी	९ ते १०	१८.००	१६८४	३०३१२
६.	इयत्ता ५ वी	१० ते ११	२०.००	१४८१	२९३२१
७.	इयत्ता ६ वी	११ ते १२	२२.००	१३४३	२९५४६
८.	इयत्ता ७ वी	१२ ते १४	२४.००	११८२	२८३६८

क)	**मुलींसाठी निळा स्कर्ट**				
१.	इयत्ता १ ली	६ ते ७	२०.००	२१२०	४२४००
२.	इयत्ता २ री	७ ते ८	२२.००	१९२८	४२४१६

३.	इयत्ता ३ री	८ ते ६	२३.००	१६७४	३८५०२

ड)	**मुलींसाठी पांढरे ब्लाऊज**				
१.	इयत्ता १ ली	६ ते ७	१३.००	२१२०	२७५६०
२.	इयत्ता २ री	७ ते ८	१४.००	१९२८	२६९९२
३.	इयत्ता ३ री	८ ते ६	१६.००	१६६४	२६७८४

इ)	**पिनो क्रॉक**	५ ते ६	४९.००	२६८५	१३१७६१

ई)	**मुलींसाठी निळा सलवार**				
१.	इयत्ता ४ थी	९ ते १०	२९.००	१७२६	६७३१४
२.	इयत्ता ५ री	१० ते ११	४५.००	१५१९	६८३५५
३.	इयत्ता ६ री	११ ते १२	४९.००	१५३९	७५४११
४.	इयत्ता ७ री	१२ ते १४	५२.००	१२९१	६६०१२

क)	**मुलींसाठी पांढरा पंजाबी शर्ट**				
१.	इयत्ता ४ थी	९ ते १०	३९.००	१७२६	६७३१४
२.	इयत्ता ५ री	१० ते ११	४२.००	१५१९	६३७९८
३.	इयत्ता ६ री	११ ते १२	४८.००	१५३९	७३८७२
४.	इयत्ता ७ री	१२ ते १४	५२.००	१२७१	६६०९२
				एकूण	**१४,९५,८३६**

उपरोक्त नुसार या योजनेअंतर्गत एकुण खर्च रु. १४,९५,८३६/- इतका येणार आहे. या योजनेअंतर्गत एकुण ४२ लाखाची अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आली आहे.

करीता उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थी संख्येच्या आधारे मे. सरस्वती महिला विविध उदयोग सहाकारी संस्था लिमिटेड जळगांव व मे. शुभम इंडस्ट्रीज, पैठण यांना पुरवठा आदेश देण्याचा व रु. १४,९५,८३६/- एवढया खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत सन २००३-०४ साठी तयार गणवेश खरेदीकरीता प्राप्त झालेला निविदापैकी कापडाचे नमुने निविदा विचारणानुसार प्राप्त असलेल्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे प्रस्तावात दर्शविल्यानुसार निविदाधारक मे.सरस्वती महिला विविध उदयोग सहकारी संस्था लिमिटेड, जळगांव व मे. शुभम इंडस्ट्रीज पैठण यांची निविदा स्विकारणेस तसेच या कामाकरीत लागणाऱ्या रक्कम रु. १४,९५,८३६/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. २९ :

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजेनवरील जायकवाडी पंपगृह (नविन) येथील ४९० अश्वशक्ती पंपाकरीता नविन बाऊल असलेली व कॉलम असलेचे सुटे भाग खरेदी करणेसाठी रुपये १९,०६,७२१/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

जायकवाडी पंपगृह (नविन) येथे ४९० अश्वशक्तीचे ज्योती कंपनीचे एकुण ०६ पंप असून, त्यापैकी ०४ पंप सतत चालु असतात हे पंप वर्ष १९९१ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेले असून, आतापर्यंत मोठे दुरुस्तीचे किंवा बाऊल असलेली बदली केलेल्या नाही. पंप सतत चालु असल्यामुळे पंपाचे पार्ट घासले गेलेले आहेत. पंपाची कार्यक्षमता कमी झालेली असल्यामुळे पाण्याच्या विसर्गाच्या प्रमाणात विदयूत बिला करीता जास्तीचा खर्च होतो. पंपाचे इम्पेलर खुपच खराब झालेले असल्यामुळे बाऊल असेंब्ली दुरुस्ती करुनही पंपाच्या कार्यक्षमतेत अत्यल्प वाढ होईल त्यामुळे सदर पंप पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी नवीन बाऊन असेंब्ली बदलणे व पंपाचे इतर पार्ट नवीन बसविणे आवश्यक आहे वर्ष २००३-२००४ च्या अर्थसंकल्पातील पाणीपुरवठा व मशिनरी दुरुस्ती करीता उपलब्ध तरतुद लक्षात घेवून यावर्षी केवळ दोन पंपासाठी बाऊल असेंब्ली व कॉलम असेंब्लीचे स्पेअर पार्टस खरेदी करीता प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी रु. १९,६,७२१/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेवरील जायकवाडी पंपगृह (नविन) येथील ४९० अश्व शक्ती पंपाकरीता नवीन बाऊल असेंब्ली व कॉलम असेंब्लीचे सुटे भाग खरेदी करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १९,०६,७२१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. ३० :

उपआयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेने मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार नविन जाहीरात दर अवलंबिलेले आहेत. त्यानुसार खाजगी मालमत्तेवरील होर्डींग्ज धारकांना ०७-०१-२००३ रोजी वाढीव दराने पैसे भरणेबाबत व सदरील पैसा पुर्वलक्ष्मी प्रभावाने ०१-०४-२००२ पासुन भरण्यात यावे म्हणुन नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. ह्या नोटीसा विरुध्द एकूण १७ जाहीरात धारकांपैकी ०६ जाहीरात धारकांनी कोर्टातून जैसे थे चा आदेश मिळविला. त्यामुळे महानगरपालिकेस त्यांचे होर्डीग्ज काढता येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या जागेवरील होर्डींग्जच्या निविदा अंतीम केल्यामुळे जाहीरात दर कमी करत येणार नाहीत. अशी प्रशासनाची भूमिका आहे. या संदर्भाने जाहीरात असोसिएशन सोबत चर्चा करण्यात आली. मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे खालील अटी खाजगी जागेवरील जाहीरात धारकांना १८-०२-२००२ चे सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या त्यानुसार खालील प्रमाणे जाहीरात कर अंमलबजावणीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. नवीन जाहीरात कर आकारणी ०१-०४-२००३ पासुन करण्यात येईल. महानगरपालिकेच्या निविदा अटीनुसार ६ महिन्याचे आगाऊ भाडे भरावे लागेल.

ब. नवीन जाहीरात दर ०१-०४-२००३ पासुन मान्य असल्याचे हमीपत्र देण्यात यावे.

क. ०१-०४-२००२ ते ३१-०३-२००३ पर्यंतचे फी सर्वसाधारण सभेने पुर्वी मान्य केल्यानुसार मुळ दरापेक्षा तीनपट अधिक या दराने वसुल करावे.

ड. महानगरपालिकेने मनपाच्या जागेवरील जाहिरात कलकाची निविदा दिनांक ११-०७-२००३ रोजी अंतिम केली आहे. त्यानुसारच खाजगी इमारत व जागेवर जाहिरात फलक धारकांना ०१-०४-२००३ पासुन नवीन दर आकारण्यात हरकत नाही.

इ. महानगरपालिकेच्या अटीनुसार मान्य करीत असल्यास असोसिएशन त्यांचे व्हावे न्यायालयातुन काढुन घेण्याचे हमीपत्र घ्यावे, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टळेल व जाहीरात धोरण पुर्णपणे अंमलात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री. नंदकुमार घोडेले : खाजगी मालमत्तेवरील होर्डींगधारकांना दि. ०७-०१-०३ पासुन वाढीव दराने पैसे भरणा करण्याबाबत नोटीस दिलेली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने जैसे थे आदेश दिले. यात ज्या अटी टाकण्यात आल्या त्यातील 'ड' नुसार दिनांक ०१-०४-२००० पासुन त्यांचेकडुन दर आकारावे परंतू under protest. कारण प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच 'इ' बाबत हमी पत्र घ्यावे. न्यायालय जो निर्णय देईल तो या सभागृहाला व निविदाधारकास मान्य राहील. दुरुस्ती करुन प्रस्ताव मंजूर करावा.

मा. सभापती : दिनांक ०१-०४-२००३ पासून नविन दराने under protest मनपाकडे पैसे भरणा करावेत. मा. न्यायालयाचा निर्णय दोंघाना बंधनकारक राहील. आणि त्यास अधिनराहुन ०१-०४-०२ ते ३१-०४-०२ या कालावधीसाठी जुने लागु असलेल्या दराने भरण्यास मंजुरी देण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नविन जाहीरात दरांचे अंमलबजावणी संदर्भाने न्यायालयातून जैसे थे चा आदेश मिळाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्याचे दृष्टीने जाहिरात असोसिएशन सोबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रस्तावातील नमुद केलेल्या अ, ब, क, ड, इ या अटींमधील "इ" या अटीमध्ये खालील दुरुस्तीसह मान्यता देण्यात येते. असोसिएशनचे न्यायालयात जे दावे दाखल आहेत. त्यामध्ये न्यायालयाचा अंतीम निर्णय दोन्ही बाजूस मान्य राहील. तोपर्यंत असोसिएशनचे (under protest) अंतीम निर्णयाचे अधिन नवीन दराने ०१-०४-२००३ पासुन मनपाकडे पैसे भरणा करावेत व ०१-०४-२००२ ते ३१-०३-२००३ या कालावधीकरीता जुने लागु असलेले दराने भरणा करावेत. नविन दर हे १८-०२-२००२ चे सर्वसाधारण सभेने मान्य केलेल्या ठरावानुसार असतील.

त्यानुसार अंमलबजावणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री. संजय शिरसाठ : होर्डींगच्या माध्यमातून मनपास गेल्या वर्षी फक्त २.५० ते ३ लक्ष रुपये उत्पनन येत होते. जेव्हा जनरल सर्वे केला तेव्हा असे आढळुन आले की, हाच सर्वे खाजगी संस्थेकडुन केल्यास मनपाचा फायदा होईल. उत्पन्न वाढेल. त्यावेळेच आयुक्त व मुख्यलेखाधिकारी यांनी योग्य माहिती घेऊन टेंडर काढले. त्याबद्दल प्रशासनाचे या सभागृहातर्फे अभिनंदन करतो. आता टेंडर काढले म्हणुन ४३-४४ लक्ष उत्पन्न येणार आहे ही कार्यवाही चालु असतांना काही लोक त्या एजन्सीची बाजु घेत नाहीत. ४० लक्ष उत्पन्न मिळवुन देणाऱ्या एजन्सीला मदत करणे योग्य की, अयोग्य परंतू काही लोक क्षुल्लक कारण दाखवून अनाधिकृत बोर्ड लावतात. तक्रार आल्यास मालमत्ता/प्रशासकीय विभाग एकमेकांवर ढकलतात. कायदेशीर मत घेण्यात येते. सरस्वती भुवन स्कुल, रेल्वे स्टेशन व इतर ठिकाणी अनाधिकृत बोर्ड लागलेले आहेत. एस. बी. कॉलेजचा जवळचा नाला मनपाच्या मालकीचा असतांना व नाल्यावरील बोर्ड अनाधिकृत असतांना काढला जात नाही. एखादी एजन्सी ४०-४३ लक्ष रुपयांचे उत्पन्न करुन देत असेल तर, त्या एजन्सीला सहाकार्य करणे योग्य आहे. या शहरात अनेक इमारतीवर होर्डींग

लागलेल्या आहेत. परवानगी देतो परंतू त्या इमारतीच्या वापरात बदल होतो. पुन्हा लागणारा टॅक्स ही निवासी होतो. म्हणुन मी केलेल्या सुचनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. जे अनाधिकृत बोर्ड असतील ते ताबडतोब काढण्याची गरज आहे. तशी कार्यवाही मा. आयुक्तांनी जातीने लक्ष देवून करावी अशी विनंती आहे. उदया दुसऱ्या एजन्सीला दिले तरी वाईट अनुभव येईल उत्पन्न कशी होईल.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचीव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.